श्री चंपालाल रामलालजी खत्री
टेलीफोन कार्यालय समोर अमरावती
ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(प्र.शा)
महानगर पालिका अमरावती
ता. जि. अमरावती
2) श्री एम. ए. रहमान
जन माहिती अधिकारी तथा सहा.संचालक(स.सं.न.र.)
महानगर पालिका अमरावती
ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.संचालक(स.सं.न.र.) महानगर पालिका अमरावती यांचेकडे त्यांच्या दि.13.10.2008 च्या अर्जात चार बाबीबाबत माहिती मागितलेली होती ती अर्जदारास आजपर्यंत पुरविण्यात आली नाही. या संबंधात अर्जावर काय कार्यवाही होत आहे याची माहिती देण्यात यावी तसेच संबंधित अर्जात उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याबाबत काय कार्यवाही होत आहे अगर झालेली आहे याची माहिती देण्यात यावी. माहिती स्वतः घेवून जाणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 29.12.2008 रोजी एकुण चार मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलाचा निर्णय हा दि. 3.2.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व त्या उत्तरामुळे सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. राजेंद्र पांडे यांनी युक्तीवाद केला. युक्तीवाद करतांना त्यांना माहिती मागण्याची पार्श्वभूमी आयोगाचे निदर्शनास आणली. परंतु जी माहिती त्यांनी मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. 29.12.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व अपीलकर्ता यांचा दि.13.10.2008 च्या अर्जाचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी योग्य माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुद्या क्र. 4 च्या बाबत मात्र जन माहिती अधिकारी सदरचा अर्ज बांधकाम विभागाच्या माहिती अधिका–याकडे हस्तांतर करणे आवश्यक होते व त्याप्रमाणे बांधकाम विभागाच्या माहिती अधिका–याने माहिती उपलब्ध करुन देणे

अपेक्षित होते. परंतु बांधकाम विभागाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे जे कळविलेले आहे ते अधिनियमाच्या 6 प्रमाणे नाही. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये संपूर्ण प्रकरणाचे सविस्तर विवेचन केलेले दिसून येते. व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निश्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे वकीलांचे युक्तीवादातून त्यांना कार्यवाही अपेक्षित आहे असे दिसून येते. दि.13.10.2008 च्या अर्जात कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मागितलेली नाही किंवा माहितीच्या अर्जामध्ये सुध्दा विशिष्ट प्रकरणातील कागदपत्रे मागितलेली नाही. व तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये पुन्हा अपीलकर्ता यांना संपूर्ण प्रकरणातील कागदपत्रे दि. 5.3.2009 तसेच 25.3.2009 ला देण्यात आलेली आहे असेही आयोगाचे निदर्शनास जन माहिती अधिकारी यांनी आणले. व त्यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना जी कार्यवाहीची अपेक्षा आहे त्याबाबत चौकशी करणे किंवा कार्यवाहीचे आदेश देणे याबाबतची तरतुद अधिनियमात नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1372/2009**

श्री प्रितमसिंह उल्हाससिंह चव्हाण
अनुश्री बिल्डींग क्वा.नं.1 कांता नगर अमरावती
ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एन. आत्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. आयुक्त(महसुल)/अध्यक्ष
विभागीय जात पडताळणी समिती अमरावती विभाग अमरावती
ता. जि. अमरावती
2) श्री प्रदिप भोगले
जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी
जात प्रमाणपत्र पडताळणी
समिती समाज कल्याण विभाग अमरावती
व्ही.एम.व्ही.कॉलेज रोड राठी नगर अमरावती
ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती विभाग अमरावतीच्या स्थापने पासुन ते दि.12.12.2008पर्यंत राजपुत भामटा जात प्रमाणपत्र पडताळणी करीता आलेल्या अर्जदाराची नावे यादी स्वरुपात मिळणे करीता व त्या पैकी किती प्रकरणे वैध? किती प्रकरणे अवैध? व किती प्रकरणे प्रलंबीत आहेत याबाबत माहिती मिळणेकरीता व दिलेल्या नमुन्यात मिळणेकरीता अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.1.2009 रोजी माहिती एकत्रित स्वरुपात पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 19.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 30.1.2009 रोजी समितीच्या स्थापने पासुन राजपुत भामटा जातीचे प्रलंबित प्रकरणाची आकडेवारी आपणास दि. 10.2.2009पर्यंत कळविण्यात येईल तसेच या कालावधीत वैधता प्रमाणपत्र निर्गमीत झालेल्या प्रकरणांची माहिती नावासह दि. 5.3.2009पर्यंत देण्यात येईल असे समाज कल्याण अधिकारी जात प्रमाणपत्र पडताळणी क्र.2 यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 4.2.2009 रोजी सन 2006 ते 09 या कालावधीतील प्राप्त प्रकरणे, निकाली प्रकरणे, प्रलंबीत प्रकरणाची आकडेवारी दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा केलेला आहे त्यामध्ये मात्र अपीलीय अधिकारी यांना प्रथम अपील प्राप्त झाले नाही असे त्यांनी नमूद केलेले आहे. तसेच विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जातीनिहाय माहिती ठेवली नसल्याने अर्जदाराने मागितलेल्या नमुन्यात अर्जदारास माहिती पुरविता आली नाही ही वस्तुस्थिती आहे. तथापी अर्जदारास या कार्यालयाचे अभिलेख/प्रकरण नोंदवहया तपासणीसाठी उपलब्ध करण्यात येतील असे खुलाशात म्हटलेले आहे. दि. 19.1.2009 रोजी अपीलकर्ता यांनी अति. आयुक्त(महसुल)/अध्यक्ष विभागीय जात पडताळणी समिती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तरी सुध्दा प्रथम अपील प्राप्त नाही असा खुलासा आयोगापुढे करण्यात आलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना क्रमशः तारखेवार माहिती सुध्दा आयोगापुढे योग्य रित्या देता येत नाही असा निश्कर्ष काढावा लागतो. आयोगापुढे खुलासा केलेला आहे तो वेगळा आहे व अपीलकर्ता यांना दिलेले उत्तर हे वेगळे आहे. त्यामुळे विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालया मध्ये माहितीच्या अधिका—याच्या तदतुदींची कोणतीही माहिती दिसून येत नाही किंवा आलेल्या अर्जाची छाननी कोणत्या निकषाप्रमाणे करावी याबाबतची माहिती दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना वेगळया पध्दतीनी माहिती द्यावी आणि आयोगापुढे वेगळा युक्तीवाद करावा यात कोणताही ताळमेळ नाही. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्रयस्थ पक्षा संबंधीची माहिती होते. तसेच जातीनिहाय माहिती उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही व या पुढेही जातीनिहाय माहिती समिती ठेवत नाही असे आयोगापुढे सांगण्यात आलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक अम 1369/2009, अम 1370/2009 व अम 1371/2009**

श्री देविदस आनंदराव तंतरपाळे
मु. पो. लेहेगांव
ता. मार्शी जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील कमांक अम 1369/2009</u>**
1) श्री एस. ई. जोल्हे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती मार्शी
ता. मार्शी जि. अमरावती
2) श्री एस. जी. मुळे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय काटपूर
ता. मार्शी जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक अम 1370/2009</u>**
1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
जिल्हा परिषद अमरावती
ता. जि. अमरावती
2) श्री एस. ई. जोल्हे
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती मार्शी
ता. मार्शी जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक अम 1371/2009</u>**
1) श्री एस. ई. जोल्हे
जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती मार्शी
ता. मार्शी जि. अमरावती
2) श्री व्ही. एम. कंदे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय येवती पो. नयावाठाडा
ता. मार्शी जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 8.3.2010 )

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. अम 1369/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी ग्रामपंचायत सचिव यांचेकडे सन 2006–07–2008 या कालावधीतील शासन निर्णय दि. 20.5.1999 प्रमाणे जमा खर्चाच्या संदर्भातील माहिती तसेच तहसिलदार मोर्शी यांच्या न्यायालयाचे आदेश दि.6.6.2008 प्रमाणे अतिक्रमण काढण्याबाबत काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती तसेच ग्रामपंचायत काटपूर येथील नागरीकाचे मालमत्तेबाबत फेरफार ग्रा.पं.चे मिळकत रजिष्टर नं.7 नोंदी रुजू होण्याची तपशीलवार माहिती अर्जासह पुरावे स्टॅम्प पेपर इत्यादीची व ग्रा.पं. ठरावाची सत्यप्रती अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता दारिद्रय रेशेखालील प्रमाणपत्र धारक आहे असे त्यांनी नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2008 रोजी प्रथम अपील गट विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.12.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता हे उशिरा हजर झाले परंतु त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि.22.9.2008 चा अर्ज त्यांचे कार्यालयात प्राप्त नाही मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा असे सांगितले की. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली होती. अपीलकर्ता व उत्तरवादी सुनावणीस हजर होते. व मुद्या क्र. 1,2,3 ची माहिती दि. 12.12.2008पर्यंत द्यावी असे आदेश दिले व त्याप्रमाणे माहिती दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी नंतर युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती मिळाली परंतु ती दिशाभूल करणारी आहे असे आयोगापुढे सांगितले. परंतु त्याबाबत कोणतेही विश्लेष त्यांनी केलेले नाही. त्यांच्या प्रथम अपील मेमोमध्ये किंवा द्वितीय अपील मेमोमध्ये आरोप केलेले आहे की मागितलेली माहिती व उपलब्ध माहिती यामध्ये तफावत आहे याबाबतचा फरक नमुद

केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. अम 1370/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती कार्यालय मोर्शी यांचेकडे सन 2002–2003 चे दारिद्रय रेषेखाली सर्व्हे यादी व मंजुरी व इंदीरा आवास लाभ देणे बाबत तपशिलवार माहित मिळणेबाबत एकुण दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.9.2008 रोजी माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 29.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.12.2008 रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे या कारणास्तव खारीज करण्यात आले असे दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांनी याही अपीलामध्ये युक्तीवाद करतांना माहिती उपलब्ध झाली नाही असाच युक्तीवाद केला. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे विवेचन केलेले दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे असेही दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी नंतर सांगितले की जी माहिती उपलब्ध झाली ती दिशाभूल करणारी आहे परंतु कशा प्रकारे दिशाभूल करणारी आहे याबद्यलचा कोणताही खुलासा द्वितीय अपीलामध्ये तपशिलात दिलेला नाही. त्यात फक्त दपतरदिरंगाई व भ्रष्टाचाराचे आरोप केलेले दिसून येते जी माहितीच्या अधिकारात अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. अम 1371/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 8.7.2008 रोजी ग्रामपंचायत सचिव यांचेकडे शासन निर्णय दि. 20.5.1999 प्रमाणे ग्रा.पं.चे खातेदारांना देण्यात येणारा जमा खर्च सन 2005–2006–2007–2008 देण्यात आलेल्या नुसार माहितीचे अधिकारान्वये तपशिलवार माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असून दि. 22.9.2008 पुर्वी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 22.9.2008 माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

7. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली तीच माहिती त्यांनी अपील क्र. अम 1369/2009 मध्ये मागितलेली दिसून येते. व यावरुन अपीलकर्ता हे एकच माहिती वेगवेगळया अर्जाच्या माध्यमातून मागणी करतात असे दिसून येते. व त्यावरुन त्यांचा हेतू हा कळून येत नाही. अपीलकर्ता यांनी सुध्दा माहिती मागतांना योग्य ते माहितीचे वर्णन

करणे आवश्यक आहे. अर्ज माहिती अधिकारी यांना दिल्यावर त्याबाबतची पोच घेणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा त्यांचे कार्यालयात प्राप्त नाही व म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर त्यांना माहिती देण्यात आलेली आहे. माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती व मिळालेली माहिती याबाबतचा फरक हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणणे आवश्यक होते. परंतु माहिती मिळाली नाही असे आधी सांगायचे व नंतर ती दिशाभूल करणारी मिळाली नाही असे सांगायचे यात आयोगची दिशाभूल करण्यात येत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची तीनही अपील ही खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 76/2010 व अपील क्रमांक नाग 77/2010

श्री एस. एस. कनोजे
37 बी गांधी लेआऊट जाफर नगर
नागपूर 13 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राऊत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री मो. मुस्ताक मंसुरी
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
मलीक उर्दू हायस्कूल ताजाबाद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 76/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मलीक उर्दू हायस्कूल ताजाबाद नागपूर यांचेकडे श्री मिर्झा फारुख बेग स.शिक्षक या पदासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये संपूर्ण माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2009 रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे दाखल केले. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की जन माहिती अधिकारी हे माहितीच्या अर्जाची दखलच घेत नाही. व प्रथम अपीलीय अधिकारी हे प्रथम अपीलाची

सुनावणी अशा पध्दतीने ठेवतात की नोटिस सुनावणी तारखेनंतर मिळेल. त्याप्रमाणे मला प्रत्येक अपीलाची नोटिस दि. 24.12.2009 ला सुनावणी आली होती परंतु नोटिस मला दि. 3.10.2009 ला प्राप्त झाली. दि. 15.1.2009 ला मी उपस्थित मी उपस्थित झाला परंतु जन माहिती अधिकारी हे उपस्थित झाले नाही. त्यामुळे द्वितीय अपील हे दाखल करावे लागले. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांना अर्ज प्राप्त झाला नाही व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतु माहिती त्यांचेकडे आहे व ती उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 77/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे श्री जाकीर अहमद दिलावार स.शिक्षक याच्या बद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे असे नमूद केलेले दिसून येते. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात अलेला नाही. कारण सुनावणीस मुख्याध्यापक उपस्थित झालेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. सदरच्या अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी रु. 500/— ची मनि ऑर्डर पाठविलेली होती परंतु त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. अर्ज प्राप्त झालेला नव्हता आता तो प्राप्त झालेला आहे. माहिती उपलब्ध आहे व देण्यास तयार आहे. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

6. आयोगाचा असा अनुभव आहे की कोणत्याही शिक्षण संस्थेत माहितीचा अर्ज हा योग्य रितीने नोंदविला जात नाही किंवा नोंदविला असेल तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे तो सादर केला जातो असे नाही व त्यामुळे माहितीचा अर्ज मिळाला नाही अशा प्रकारे बहुतांश शिक्षण संस्था आयोगापुढे सांगत असतात. वरील दोन्ही अपीलाच्या संदर्भात दि. 24.12.2009 रोजी मुख्याध्यापक यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना पत्राद्वारे विलंबाचे कारण कळविले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की ते हज यात्रेला गेले होते व आल्या नंतर अपीला बद्यलची माहिती मिळाली व अपीलकर्ता यांनी रु. 500/— मनि ऑर्डरनी पाठविले ती ही माहिती मिळाली. अपीलकर्ता यांनी रु. 500/— मनि ऑर्डरनी पाठविले असल्यास ते परत करणे संयुक्तिक राहिल. कारण माहिती 30 दिवसामध्ये द्यावयाची असते व त्यानंतर विनामुल्य द्यावयाची असते.

## आ दे श

1) अपील क्र. नाग 76/2010 व अपील क्र. नाग 77/2010 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी पाठविलेले रु. 500/- हे परत करण्यात यावे. तसेच अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत दोन्ही अपीलाच्या जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास प्रत्येक जन माहिती अधिकारी यांस रु. 25000/- ची शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 80/2010**

श्री राजु शंकरराव निकोसे
मु. पो. सावरी(बिड)
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एन. पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) श्री जे. जी. तेलकापल्लीवार
जन माहिती अधिकारी तथा
पंचायत समिती कार्यालय चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती चिमूर यांचेकडे सन 2006 मध्ये केलेल्या विहिरीचा निधी, नुकसान भरपाई, मोटार पम्प, सिंचन पाईप, औषधी मिळण्याबाबतची माहिती एकुण सात मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता हजर झाले नसल्यामुळे देण्यात आलेला नाही असे दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 12.8.2009 चा अर्ज त्यांच्या कार्यालयामध्ये दि. 14.9.2007 ला

प्राप्त झाला. व त्यानंतर संबंधित अधिका–यास माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिले. त्याप्रमाणे दि. 7.10.2009 रोजी माहिती प्राप्त झाली व अपीलकर्ता यांना ती माहिती दि. 9.10.2009 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता वारंवार तीच माहिती मागत असतात व त्यांना आतापर्यंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांना माहिती पेक्षा त्यांना जे अनुदान मंजुर झालेले आहे व त्याचा विहीरी करीता जो खर्च जास्त झालेला आहे तसेच विद्युत पम्पाकरीता जे अनुदान उपलब्ध झालेले आहे त्यापेक्षा त्यांना जास्त अनुदान पाहिजे या करीता अशा प्रकारची माहिती मागत असतात. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 79/2010**

श्री नितीन जी. तातीया
345 श्रध्दा हाऊस पहिला माळा किंग्जवे
नागपूर 440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता (विद्युत)
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित राहता येणार नाही व पुढील तारीख मिळावी असे कळविलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे सहा. अभियंता हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी (विद्युत) महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1) How much amount against security deposit and other deposit amount refunded by the Nagpur Municipal Corporation to the old contractors for street light maintenance worked up to year 2003?
2) And what is the balance amout against the work?
3) If balance then under which account it is?
4) List of old contractors is attached with this.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 21.10.2009 रोजी अर्जदारास आवश्यक शुल्क भरण्यास कळविले व त्याप्रमाणे दि. 5.11.2009 रोजी अपीलकर्ता यांना एकुण 42 पृष्ठ माहिती पाठविण्यात आलेली दिसून येते. परंतु माहिती अपुर्ण असल्यामुळे दि. 24.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.12.2009 रोजी देण्यात आला असून उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्याला पुरविण्यात आली परंतु उर्वरित झोन संबंधी कामाच्या नस्त्यांचा शोध घेता आला नसल्याने ती माहिती अपीलकर्त्याला पुरविण्यात आली नाही. ती माहिती दि. 10.12.2009पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांना सांगण्यात आले होते. दि. 14.12.2009 माहिती उपलब्ध झाली नाही व प्राप्त झाल्यावर ती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर

दि. 5.1.2010 रोजी सुध्दा सुनावणी घेण्यात आली. व त्यात उपलब्ध झोन क्र. 1, 2, 4, 5, 6, 9अे व 10 बाबतची माहिती दिली. उर्वरीत झोन क्र. 3,7,8 व 9 बी च्या नस्त्यांचा शोध माहिती अधिकारी



यांना वाढीव कालावधीत घेता आलेला नाही. सर्व संबंधितांचे म्हणणे एकुन घेतल्यानंतर व 45 दिवसांची कालमर्यादा लक्षात घेता दि. 5.1.2010 रोजी प्रकरण अंतरीम आदेश पारीत करण्यास्तव बंद नस्त्या प्राप्त होताच माहिती पुरविण्यात यावी असे आदेश देवून अपील निकाली काढण्यात आले व त्यानंतर माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भातील नस्त्या हया वेगवेगळया मुद्याच्या मान्यतेबाबत वेगवेगळया शाखांमध्ये पाठविण्यात आलेल्या असतात व त्यामुळे त्या नस्त्याचा शोध घेणे आवश्यक असते. व त्यामुळे एकुण सात विभागांना दि.26.10.2009 ला पत्रे देण्यात आलेली होती व त्यातही झोन क्र. 9 मधील पथदिव्याची साहित्यासह देखभाल व दुरुस्ती करणेबाबतची नस्ती क्र. 1116 दि. 2.11.2001 गहाळ होण्याबाबत पत्रे दिलेली होती परंतु आतापर्यंत सदरची नस्ती उपलब्ध झालेली नाही. त्यातूनही झोन क्र. 3,7,8 व 9 बी च्या नस्त्यांचा शोध वाढीव कालावधीत घेता आलेला नाही. परंतु तो शोध घेतल्या नंतर उपलब्ध करुन देण्यात येईल असे आयोगास सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न होत आहे अशी आयोगाची खात्री झाली. परंतु संपूर्ण माहिती मिळणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत झोन क्र. 3,7,8 व 9 बी च्या नस्त्यांचा शोध घेण्यात येवून अपीलकर्ता यांना निरीक्षणा करीता प्रकाश विभागाच्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात याव्या. अपीलकर्ता यांना कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळविण्यात यावी व अपीलकर्ता यांना आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन याव्या. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 78/2010

श्री अतुल सोपानजी लामसोंगे
रा. वानाडोंगरी(महाजनवाडी)
ता. हिंगणा जि. नागपूर 441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचा)
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री डब्लू. एम. दामेधर
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत वानाडोंगरी
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत वानाडोंगरी यांचेकडे 1. वाचनालयाची इमारत उदघाटना पासून कुणाच्या ताब्यात आहे. इमारतीस लावल्या जात असलेल्या कुलूपांच्या चाबी कुणा जवळ असतात. 2. पंचायत समिती हिंगणा पत्र क्र. पसहि/पंचायत220/09 दि.30.9.2001 वर कसा निर्णय घेतला. याबाबतची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.10.2009 रोजी अपीलकर्ता यांना सचिव ग्रामपंचायत यांनी सदर वाचनालयाच्या इमारती बांधकाम हे रमेशचंद्रजी बंग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, (आमदार फंड) यांच्या विकास निधीतुन करण्यात आलेले असुन सदर वाचनालय अजुनपर्यंत ग्रा.पं.ला हस्तांतरीत करण्यात आलेले नाही. करिता आपण सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगणा यांचेशी संपर्क साधुन माहिती उपलब्ध करावी. सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.11.2009 रोजी प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा

निर्णय हा दि. 14.12.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली उपलब्ध सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांना देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांचे जवळ दि. 31.3.2008 ची ताबा पावती आहे व प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा सदरचे विवेचन आलेले आहे व तो स्वयंस्पष्ट असला तरी जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या कार्यालयात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नव्हती व त्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. व त्याकरीता दि. 15.12.2009 रोजी सचिव ग्रामपंचायत यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांना वाचनालयाची इमारत ग्रा.पं.ला हस्तांतरीत झाली किंवा नाही याची माहिती त्वरीत कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 17.12.2009 रोजी अपीलकर्ता यांना खंड विकास अधिकारी यांनी दिलेले पत्र दि. 30.5.2009 रोजी हे मासिक सभेत चर्चेकरिता ठेवण्यात येईल व याबाबत आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. ही माहिती त्यांना सुरुवातीला 30 दिवसात देणे आवश्यक होती त्यावेळेस ती त्यांनी दिलेली नाही. दि. 15.2.2010 रोजी सार्वजनिक बांधकाम अभियंता यांनी अपीलकर्ता यांना ताबा पावतीची माहिती दिलेली दिसून येते. त्यावर पुन्हा पुर्विचे सचिव रमेश चंपतराव साळुंके यांनी सदर बांधकाम हे त्यांच्या कालावधीचे अगादर असुन ताबा पावती दि.31.3.2008 ची दर्शवु त्यावर कोणीतरी डुप्लीकेट सही केलेली आहे. त्या ताबा पावतीवरील सही माझी नाही असे कळविलेले दिसून येते. यावरुन या संपूर्ण प्रकरणामध्ये योग्य त्या प्रकारे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असे दिसून येते. व त्याकरीता खंड विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांनी चौकशी करुन अहवाल आयोगाकडे सादर करणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात काढण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्ता यांच्या दि. 22.9.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व त्याबाबतचा प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येते.

2) सदरच्या शास्तीची वसुली खंड विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांनी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वानाडोंगरी यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा,

800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी. तसेच खंड विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणा यांच्या सचिव, सरपंच ग्रामपंचायत वानाडोंगरी यांना दि. 30.5.2009 च्या अर्जाप्रमाणे भाग्यश्री बहुजन सार्वजनिक वाचनालय यांनी त्यांना वाचनालयस इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करुन अहवाल सादर करावा. त्याप्रमाणे चौकशी करुन अहवाल आयोगाकडे सादर करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1394/2009 व अम 1395/2009**

श्री प्रदिप अंबादास इंगोले
आर्किटेक्चरल ॲन्ड टेक्नोलिगल कन्सलटन्सी
20 तळमजला पाडिया कॉम्प्लेक्स टॉवर चौक अकोला
ता. जि. अकोला 444005 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रमेश कोठीकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्र.)
महानगर पालिका अकोला
ता. जि. अकोला

2) श्री विजय भांडेकर
जन माहिती अधिकारी तथा लेखापाल (लेखा विभाग)
महानगर पालिका अकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.3.2009 व दि. 9.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. राज्य माहिती आयोग कार्यालयाने पाठविलेली नोटिस ही या कार्यालयात परत आलेली आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. अम 1394/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 11.11.2008 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत आपल्या कार्यालयात आलेले अर्जाच्या चौकशी संबंधाने 13 ऑक्टोबर 2005 ते 10 नोव्हेंबर 2008 तक्ता क्र. 1 व 2 प्रमाणे

माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 12.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन न देण्याबाबतत कोणतेही कारण दिलेले दिसून येत नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये मागितलेली माहिती संदिग्ध स्वरुपात असल्यामुळे लेखापाल माहिती देवू शकले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस सांगितले. याबाबत अपीलकत्याचे सुध्दा समाधान झाले होते. त्यानंतर अपीलकर्ता यांस सात दिवसात माहिती पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्यात आले होते असे उपआयुक्तांचे आदेश दिसून येतात. पुन्हा दि. 27.1.2009 रोजी अपीलकर्ता यांच प्रतिनिधी सौ. वर्षा धानोकार हजर होत्यात्र लेखापाल श्री गोपाल वानखेडे हजर होते व त्यामध्ये सुनावणी मध्ये झालेल्या चर्चेनुसार जन माहिती अधिकारी तथा लेखापाल यांचे माहिती देण्याबाबतची सविस्तर बाब लक्षात न आल्यामुळे त्यांना माहिती पाठविली. अपीलकर्ता यांची संपूर्ण सदर बाब विस्तृतपणे मांडण्यात आली. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान झाले. अपीलकर्ता यांस सात दिवसात माहिती पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना दि. 10.2.2009 रोजी आदेशीत केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. परंतु तक्त्यात तयार करुन देता येणार नाही असे मात्र जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जशी माहिती उपलब्ध आहे त्याप्रमाणे छयांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. परंतु ही बाब जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत करणे आवश्यक होते व ते केलेले नसल्यामुळे ते दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे बंधनकारक असल्यामुळे त्यांना त्याबाबत विचारले त्यावर त्यांनी अपीलकर्ता यांना काहीही कळविले नाही याबद्यल कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही व त्यामुळे ते शास्ती पात्र आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. अम 1395/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 10.10.2008 रोजी आपल्या कार्यालयातील बांधकाम विभागातील प्रत्येक कर्मचारी व अधिकारी यांच्या मासिक वेतन व इतर भत्त्यासंबंधी 1 जाने. 1008 ते 30 सप्टें.2008पर्यंत तक्ता कं. 1 च्या नमुन्यात माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.11.2008 रोजी अपीलकर्ता यांना मासीक वेतन पत्रकाच्या प्रतीचे पाने एकुण 268 आहेत त्याबाबत प्रतिपान रु. 20 प्रमाणे रु. 5360/– होतात व आस्थापना खर्च 560/– असे एकुण 5920/– मनपा.च्या फंडात जमा करुन त्याबाबतच्या पावतीच्या प्रती अभिलेख विभागात सादर करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी

असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 5.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यामध्ये मागितलेल्या माहितीच्या प्रती पानाचे शुल्क अव्वाच्या सव्वा दराने मागितलेली आहे असे कारण नमूद केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात कोणत्याही प्रकारचा निर्णय न देता जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 11.11.2008 रोजी 268 पृष्ठाच्या संदर्भात प्रती पृष्ठ 20 कोणत्या नियमाच्या आधारे लावले ते दिलेले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार प्रत्येक पानासाठी 2/– रुपये एवढाच खर्च दिलेला आहे. त्यानुसार 536/– रुपये भरण्यास तयार आहे. तरी आपण आकारलेल्या खर्चाबाबत संपूर्ण तपशिल त्वरीत दयावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला नाही. उपआयुक्त यांनी युक्तीवादाद्वारे असे सांगितले की वेतन भत्त्याच्या संदर्भामध्ये संपूर्ण बांधकाम विभागातील प्रत्येक कर्मचारी व अधिकारी यांच्या संदर्भामध्ये जे रजिस्टर असते त्या रजिस्टरची साईज जी आहे ती सहा पट मोठी आहे व त्यामुळेच छायांकित प्रती काढण्याचा खर्च हा 6 ते 7 पट येतो व त्याप्रमाणे मनपा ला सुध्दा शुल्क आकारले जाते व त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा नियम 4 पोटनियम 1 (A) (B) (II) प्रमाणे सदरची आकारणी काण्यात आलेली आहे. परंतु ही बाब आयोगापुढे सांगितली हीच माहिती अपीलकर्ता यांना त्याच वेळेस कळविण्यात आली असती तर योग्य झाले असते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कर्मचा–यानी नोटशीट लिहुन त्यावर सही करणे हे अपील निर्णयाची पध्दत होत नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त यांनी सुध्दा निर्णय कसा द्यावा याबद्यलची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. असे असले तर प्रत्यक्ष छायांकित प्रत करुन घेण्याकरीता किती खर्च येतो तेवढा खर्च आकारुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. अम 1394/2009 मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टान विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांच्या दि. 10.11.2008 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार केलेले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येते.

2) सदरच्या शास्तीची वसुली **आयुक्त महानगर पालिका अकोला** यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावी व लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) अपील क्र. अम 1395/2009 अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना प्रत्यक्ष छायांकित प्रति करण्या करीता येत असलेल्या खर्चाचे विवरण कळवून भरणा केल्यावर 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1392/2009

श्री संतोष रामदास साबळे
मु. पो. कान्हेरी(गवळी)
ता. बाळापूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती बाळापूर
ता. बाळापूर जि. अकोला
2) श्री जी. बी. इंगळे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत कान्हेरी(गवळी)
ता. बाळापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत कान्हेरी(गवळी) यांचेकडे महाजल योजनेच्या कामाचा निधी आला किती व खर्च झाला किती केलेल्या कामाचा संपूर्ण अहवाल विहिर खोदकाम किती व लांबी रुंदी किती व बांधकाम किती व पाईपलाईन खोदकाम विहिरीपासून ते ताळीपर्यंत किती मीटर व पीसी पाईप किती, मोटर पंप, वालपाईप एडी बुक पासबुक चेक बुक व संपूर्ण कामाचे एस्टीमेट बील व नकाशा अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने सचिव यांनी अध्यक्ष सचिव महाजल यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्या करीता दि. 17.12.2008 ला पत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. दि 12.2.2010 रोजी पुन्हा ग्राम विकास अधिकारी यांनी अध्यक्ष सचिव महाजल योजना यांना माहिती उपलब्ध करुन देण्या करीता स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यांना माहितीच उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत

यांनी सांगितले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दि. 19.1.2009 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की आता महाजल किंवा जलस्वराज यांजना संबंधाने ही जबाबदारी सरपंच, व सचिव ग्रामपंचायत यांचेकडे शासन निर्णया प्रमाणे देण्यात आलेली आहे. व त्या शासन निर्णया प्रमाणे अध्यक्ष सचिव यांनी प्रभार सचिव ग्रामपंचायत यांचेकडे द्यावयाचा आहे व तो प्रभार न दिल्यास त्यांचे विरुध्द पोलीस कारवाई करणे आवश्यक होईल असे सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात काढण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती अध्यक्ष सचिव महाजल/जलस्वराज प्रकल्प यांचेकडून सचिव यांनी प्रभार घेवून माहिती उपलब्ध द्यावी. अध्यक्ष सचिव यांनी प्रभार न दिल्यास त्यांचे विरुध्द योग्य ती पोलीस कार्यवाही करावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1391/2009

श्री अरुण रामचंद्र माळी
मु. उरळ खुर्द पो. उरळ बु.
ता. बाळापूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती बाळापूर
ता. बाळापूर जि. अकोला
2) श्री अशोक उकर्डा भुंबरे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत उरळ खुर्द पो. उरळ बु.
ता. बाळापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उरळ खुर्द पो. उरळ बु. ता. बाळापूर जि. अकोला यांचेकडे मौजे उरळ खुर्द येथील सार्वजनिक रस्ते व अतिक्रमणाबाबत माहीती मिळण्याबाबत एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली असून सर्वसाधारण नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.1.2009 रोजी अपीलकर्ता यांना आपण मागितलेली माहिती ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध असून ते आपण स्वतः ग्रामपंचायत कार्यालय उरळ खुर्द येथे नाटिस मिळाल्या नंतर सात दिवसाचे आंत घेवून जावी व त्या माहितीची झेरॉक्स फी ग्रा.प.मध्ये भरण्यात यावी असे कळविले व गणेश रामचंद्र माळी यांनी स्वीकारलेली आहे असे दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.2.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उरळ खुर्द यांनी अपीलकर्त्यास माहिती दिल्या बाबत पोच सादर केली आहे. तसेच अरुण रामचंद्र माळी यांनी सुनावणीचे वेळी माहिती प्राप्त झाल्याबाबत सांगितल्यामुळे सदर प्रकरण खारीज करण्यात येत आहे असा निर्णय

दिलेला दिसून येतो. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की काहीही माहिती प्राप्त झाली नाही व कोणतेही पत्र मिळालेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की आम्ही एकाच गावात असतो व गाव लहान आहे व त्यांना प्रत्येक वेळी माहिती घेवून जा असे सांगितले. परंतु ते प्रतिसाद देत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत उरळ खुर्द यांनी संबंधीतास माहिती दिल्याबाबतची पोच सादर केली तसेच श्री अरुण रामचंद्र माळी यांनी माहिती मिळाल्याबाबत सुनावणी दरम्यान सांगितले. व संपूर्ण दस्त ऐवजांची पडताळणी केल्यावर प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक अम 1386/2009**

श्री मुक्तार शाह सत्तार शाह
रा. शाही मश्जिद खामगाव रोड बाळापूर
ता. बाळापूर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद आकोट
ता. आकोट जि. अकोला
2) श्री एस. व्ही. बोचरे
जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद आकोट
ता. आकोट जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.3.2005 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद आकोट यांचेकडे आकोट नगर परिषद मध्ये मुस्लीम समाजातील लागलेले शिक्षण सेवक कर्मचा–यांची जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राची नक्कल मिळणेबाबत. कालावधी सन 1998 ते 2008पर्यंत रजिस्टर पोस्टाने माहिती घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. तत्पुर्वी दि. 15.12.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु यांचे समाधान झालेले नसल्यामुळे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.1.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की जुनी माहिती असल्यामुळे व ती कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे व त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व अकरा कर्मचा–यांना पत्रे

दिली होती. परंतु त्यातील ज्यांनी दिली त्यांची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली. इतरांना पुन्हा पुन्हा स्मरणपत्रे देवून सुध्दा त्यांनी दिली नाही. सदरची नियुक्ती विभागीय समाज कल्याण कार्यालयाकडून आलेल्या निवडसूची प्रमाणे होते व त्यामुळे त्यांच्या विनडीच्या संदर्भातील कागदपत्रे ही विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध होवू शकतात व त्यांना आतापर्यंत दोन तीन वेळेस स्मरणपत्रे दिलेली आहेत परंतु ती माहिती उपलब्ध झालेली नाही. असे असल्यास जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगाच्या निर्णयाचा आधार घेवून विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेवून पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विभागीय समाज कल्याण कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व त्यांनी ती न दिल्यास त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. व अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 86/2010**

श्री विठोबा हिरामणजी धोटे
रा. झाशी राणी चौक ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय सावळी
ता. सावळी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार सावळी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
1. शासकीय प्रलंबीत देयके मिळण्याबाबत आपणास अर्ज दि. 3.5.2009, 28.9.2009 वर कोणती कार्यवाही करण्यात आली. 2. आवेदकाचे सेवानिवृत्तीनंतर कोणते देयक प्रलंबित आहेत. प्रवास देयके व इतर देयके महिनावार 3. सेवानिवृत्ती कर्मचारी हयांना त्यांचे सेवानिवृत्ती देयके किती दिवसात देय करण्यात येते त्याचे नियम कोणते आहेत. रजा रोखीकरण गट विमा व इतर 4. वरील प्रलंबित देयके किती दिवसात देणार 5. प्रवास देयके काढण्यास सन 2006 पासुन सन 2008पर्यंत किती आवरण प्राप्त झाले. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.1.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी माहिती पुरविलेली नाही असा निष्कर्ष काढून 15 दिवसाचे आंत माहिती पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलाच्या आदेशात दिलेली मुदत संपण्याच्या आधीच दि. 25.1.2010 लाच द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित झालेल्या अधिका—यास कोणत्याही प्रकारची माहिती या प्रकरणात दिसून आलेली नाही व त्यामुळे आयोगापुढे त्यांनी काहीही माहिती दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहेत परंतु त्यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे पाहिलेली आहेत

असे दिसून येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये अपीलकर्ता यांना दि. 15.1.2010, दि. 2.3.2010, दि. 9.3.2010 अशा प्रकारचा पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. व त्यातून काही देयकाची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु ही बाब निर्णय देतांना आयोगाचे निदर्शनास आणलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना काहीही माहिती मिळालेली नाही हे अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर नाही. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध मिळाली नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.11.2009 च्या अर्जातील ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल ती उपलब्ध असल्यास किंवा उपलब्ध नसल्यास हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य टपालाने कळविण्यात यावे.

2) विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. परंतु जन माहिती अधिकारी यांचेकडे जर सदरचा अर्ज सादर झालेला नसेल व ज्या लिपीकाने किंवा अधिका–याने तो प्रलंबित ठेवलेला असेल त्यांना त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 83/2010**

श्री गुलाब कान्हू बन्सोड
डपमहासचिव म.रा.कास्ट्राईब
218 विनोबा नगर तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री यशविर सिंह
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक
वनविभाग भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री डी. एच. राऊत
जन माहिती अधिकारी तथा वनसंरक्षक (तेंदू)
वनविभाग भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (तेंदू) यांचेकडे तुमसर वनपरिक्षेत्रा अंतर्गत खस–याच्या नावाने कापण्यात आलेली वृक्षकटाई 2. दि. 2.6.2009 रोजी पालोरा येथे जप्त केलेली सागवान व करण्यात आलेल्या कार्यवाहीचे सविस्तर विवरण. 3. खस–याची किती प्रकरणे जप्त करण्यात आली गोषवारा 4. जांभोरा बिटातील कूप नं. 5 मधील कापण्यात आलेली सागवान रोपवनातील झाडांचे विवरण. किती थूट पाहिलेत. किती थूटाचा पंचनामा केला यादी अशी एकुण 14 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.9.2009 रोजी सात पृष्ठांमध्ये काही माहिती दिली परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 8.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.9.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि. 22.9.2009 रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे या कारणास्तव अपील नस्तीबध्द करण्यात आले. तसेच दि. 3.8.2009 अन्वये केलेल्या अर्जाची पाहणी केली

असती तर अपील अर्ज व माहितीचा अर्ज यात विसंगती दिसून येते. तसेच प्रथम अपील अर्जात नव्याने जास्तीचे मुद्दे समाविष्ट केल्याचे दिसून येते. त्यामुळे नव्याने वाढविलेल्या मुद्यांविषयी माहिती जन माहिती अधिका–याकडे अर्ज करुन त्यांचेकडून वाढीव माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती मिळाली परंतु त्यामध्ये अनियमितता आहे किंवा फ्रॉड आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीच्या गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी किंवा कार्यवाही करण्याचे अधिकार माहिती आयोगास नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती जशी आहे तशी उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलात नव्याने मुद्दे उपस्थित करता येत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 88/2010**

श्री लक्ष्मीकांत धोंडूबाजी पाटोळे
कोदामेंढी
ता. मौदा जि. नागपूर 441106 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
शालेय शिक्षण व कीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(माशि–2)
शालेय शिक्षण व कीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव माशि–6 (प्र.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

शिक्षकांच्या एका शाळेतून दुस–या शाळेतील समायोजन व त्यांच्या वेतन निश्चितीबाबत

1. वर्ष 1977 ते 1978 दरम्यान मान्यताप्राप्त अनुदानीत खाजगी शाळेतील शिक्षक कर्मचा–यांचे मान्यता काढल्यामुळे रीतसर समायोजन शासकीय शाळेत झाल्यानंतर शिक्षक कर्मचा–यांच्या समायोजना नंतर वेतन निश्चिती झाल्याबाबत शासनाचे वेळोवेळचे निर्णय, परिपत्रक व मार्गदर्शक नियमांची माहितीची साक्षांकित प्रत.

2. समायोजनाबाबत शासनाचे वेतननिशितीबाबत शासनाचे अद्यावत निर्णयांची माहिती.

3. एकसमान समायोजनातील सर्व शिक्षक कर्मचा–यांस वेतननिशिती व्यक्तीशः वेगळी वेगळी करण्याचा शासकीय निर्णयाबद्यल सविस्तर माहिती किंवा नियमाची प्रत

4. वेतननिशिती अधिका–यानुसार किंवा काळानुसार बदलविण्याबद्यल शासनाचे नियमांची माहिती.

माहितीचा कालावधी सन 1978 ते 2009 असा दिसून येतो. सदरची माहिती नोंदणीकृत

टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांचे निवेदन दि. 29.1.2009 रोजी पाठविलेले दिसून येते. परंतु दि. 1.10.2009 रोजी सुनावणीस उपस्थित राहिले नसल्याने अपीलाचा अर्ज निकालात काढण्यात आले आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहिती ही शासन निर्णय किंवा परिपत्रकाची असल्यामुळे मंत्रालयीन विभागामध्ये ज्या विभागामध्ये धोरण ठरविल्या जाते त्या विभागामध्ये माहिती मागितलेली होती. ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन न देता दि. 8.8.2009 रोजी आवश्यक माहिती देण्यास शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचे अर्जाचे हस्तांतर केलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी निवेदन देवून सुध्दा प्रथम अपील हे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनीच खारीज केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. माहिती ज्या विभागाच्या माहिती अधिका—याला मागितली होती त्यांनी ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्यांनी ती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असेल तर त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी आयोगापुढे विनंती केलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की शासनाकडून जी शासन निर्णय किंवा परिपत्रके निर्ममीत केली जातात ती सर्व क्षेत्रीय अधिका—याकडे पाठविली जातात व त्यामुळेच त्यांनीच ती उपलब्ध करुन द्यावी म्हणून अर्जाचे हस्तांतर केलेले होते.

4. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी योग्य त्या जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. शासन निर्णयाच्या प्रति हया प्रशासनीक विभागानीच उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु मंत्रालयात माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात माहिती देण्याच्या बाबत टाळाटाळ केलेली दिसून येते. किंवा मंत्रालयीन अधिका—यांना अधिनियमाच्या तरतुदीची काहीही माहिती नाही किंवा त्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले दिसून येत नाही. व त्यामुळेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव हे दोषी आढळुन येतात. शिक्षणाधिकारी यांनी जरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्या करीता अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले असल्यामुळे हा संपूर्ण पत्रव्यवहार विलंबाने झालेला आहे व शिक्षणाधिकारी मागितलेल्या माहिती करीता माहिती अधिकारी नाहीत. तसेच प्रथम अपीलाचे निर्णय हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीच द्यावयाचे असतात. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये पत्रव्यवहार हा पत्रव्यवहार हा जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनीच केलेला आहे व ते योग्य नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. याबाबत मंत्रालयात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी बाबत गांभीर्याने कार्यवाही केली जाते असे दिसून येत नाही. व हा सर्व प्रकार माहिती देण्याची टाळाटाळ करुन देण्याचा दिसून येतो. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव हे मागितलेल्या माहिती करीता माहिती अधिकारी असून सुध्दा त्यांनी अर्जाचे हस्तांतर केले व अपीलकर्ता यांना माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी नसून सुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिला व अनियमितता केली या कारणास्तव त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 84/2010**

श्री मिलीन्द शिवाजी भगत
40 शिवराज नगर रोड क्र.6 विश्वकर्मा नगर
नागपूर ता. जि. नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 11.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत व उत्तरवादी तर्फे अधिक्षक तथा जन माहिती अधिकारी श्री राऊत उपस्थित आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य. विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे शाळेच्या स्तरावरील माहितीच्या अधिकारा अंतर्गत शालेय माहिती मागण्याकरीता शाळेतील माहितीचा अधिका–याच्या नियुक्ती संबंधी खालील मुद्याचे आधारे माहिती मिळण्याबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून आहे.

1. शाळेत नियमानूसार नियुक्तीस पात्र असलेल्या व नियुक्तीस शिक्षण खात्याची मंजूरी नसल्यास अशी व्यक्ती शाळेचा माहिती अधिकारी असू शकतो काय? या विषयी माहिती देण्यात यावी.

2. ग्रामीण युवक उत्कर्ष शिक्षण संस्थेच्या कै.रामचंद्रराव कामडी हायस्कुल वर्धा रोड डोंगरगाव ता.जि. नागपूर या शाळेत महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती) अधिनियम 1977 नियमावली 1981 नियम 3 उपनियम 3 अन्वये मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्यात आली नाही. तेव्हा सदर शाळेच्या संदर्भात माहिती अधिका–या संबंधी माहिती देण्यात यावी.

3. अ.क्र.2 मध्ये नमूद संस्थेच्या शाळेत श्री एस.बी.देशमुख ही व्यक्ती नियमानूसार शाळेचा कर्मचारी नाही. त्यामुळे सदर व्यक्ती मुख्याध्यापक होवूच शकत नाही व होणार सुध्दा नाही. अशी व्यक्ती माहिती अधिकारी आहे. अशा कायद्यासंबंधी माहिती देण्यात यावी.

4. मीच अ.क्र.2 मध्ये नमूद संस्थेच्या शाळेचा नियम 3 (अ) अन्वये मुख्याध्यापक आहे परंतु व्यवस्थापनानी आणि आपल्या कार्यालयात मी महार जातीच असल्यामुळे माणा नागरिक हक्क हिरावून घेतला आहे तेव्हा शाळेत नियम 3 (अ) अन्वये मुख्याध्यापकच नाही तेव्हा माहिती अधिका–या संबंधी माहिती हवी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले

आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.11.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती ही शाळेच्या स्तरावरील असल्यामुळे व माहिती अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार हे संस्थेचे असल्यामुळे माहिती ही मुख्याध्यापक यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये शाळेतील युडीटी श्री मिलींद शि. भगत बी.एस.सी.गणित बी.एड. हे दि. 5.4.2006 पासुन अनधिकृतपणे सतत गैरहजर असल्यामुळे त्यांच्या बाबत सविस्तर माहिती पाठवित आहे असे मुख्याध्यापक यांनी कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा हजर नसल्यामुळे निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता हे अनेक अर्ज करतात परंतु कोणत्याही प्रथम अपीलाच्या किंवा व्दितीय अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणीस हजर होत नाहीत व माहिती ही शाळेच्या स्तरावरील असल्यामुळे ती शिक्षणाधिकारी यांना मागतात व शिक्षणाधिकारी स्तरावरील माहिती ते मुख्याध्यापकांना मागतात. यावरुन अपीलकर्ता यांचा हेतू स्पष्ट होत नाही. व त्यांनी अपीलाच्या संदभात शाळेच्या स्तरावरील माहिती असल्यामुळे शाळेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले उत्तर योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1384/2009**

श्री प्रशांत वासुदेवराव देशमुख
संगम निवास हरीगंगा आईल मीलचे बाजुला
फरशी स्टॉप दस्तुर नगर रोड अमरावती
ता. जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य
बॅरी. आर.डी.आय.के. आणि एन.के.डी.महाविद्यालय
बडनेरा रेल्वे ता. जि. अमरावती
2) श्री आर. सी. बोपुलकर
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
बॅरी. आर.डी.आय.के. आणि एन.के.डी.महाविद्यालय
बडनेरा रेल्वे ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.3.2010 )**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 9.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी पुढे वाढवून ती दि. 15.3.2010 रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक बॅरी. आर.डी.आय.के. आणि एन.के.डी.महाविद्यालय बडनेरा रेल्वे यांचेकडे दि. 22.10.05 रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील 16 शिक्षकांविषयी पत्र क्र.458/05–06/20/10/2005 नुसार दोन पत्राद्वारे दिलेला जबाब आणि केलेली तक्रारी विषयी. माहितीचा कालावधी सन 2004 ते 2009 एकुण सहा मुद्यांमध्ये माहिती रजिस्टर टपालाने मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर दि. 13.3.2009 रोजी एकुण पाच मुद्यांत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मुदतीत माहिती मिळाली नाही असे सांगितले. परंतु दि. 2.2.2009 रोजी हया संबंधी आपणास व चौकशी समितीस यापुर्वी माहिती कळविण्यात आलेली आहे. दि.18.6.2007 अशा प्रकारे मुद्या क्र. 1,3,4, च्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 13.3.2009 रोजी 5 मुद्यावरची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणतीही कागदपत्रे दिलेली नाहीत. जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी संगणकावरील नोंदीच्या संदर्भामध्ये मशीत बंद असल्यामुळे उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. व आता आयोगापुढे हार्डडिस्क ही खराब झालेली आहे असे त्यांनी लेखी म्हटलेले आहे व त्यावरुन दोन्ही उत्तरामध्ये विसंगती दिसून येते. मुद्या क्र. 2 च्या संदर्भामध्ये कायमस्वरुपी रेकॉर्ड नाही असे म्हटलेले आहे. तरी अपीलकर्ता यांना पुर्वीच माहिती पुरविल्याप्रमाणे सुचनाच्या प्रति हया कर्मचा–याकडून प्राप्त करुन घेवून कार्यालयात परत आल्या नाहीत हे अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. मुद्या क्र. 4 च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी म्हटलेले आहे की ही माहिती पुर्वीच मागितलेली नव्हती व त्याबाबत मुद्या क्र. 4 मध्ये स्पष्ट दिलेले आहे ते मान्य केलेले आहे. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मुद्या क्र. 5 च्या संदर्भामध्ये 16 कर्मचा–यांनी कोणतीही गैरवर्तणूक केलेली नसल्याने कार्यवाही करण्याचे ठरले नसल्यामुळे कार्यवाही करण्याचा व विलंब होण्याचा प्रश्न नाही असे उत्तर दिलेले आहे. त्याकरीता निर्णयाची टिप्पणी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

4. जन माहिती अधिकारी यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता हे वारंवार अर्ज करतात. हया माहितीची त्यांना काहीही आवश्यकता नाही परंतु त्रास देण्याच्या उद्येशाने अर्ज केलेले आहेत. त्यावर व्यापक जनहित काय आहे असे अपीलकर्ता यांना याबाबत विचारले असता त्यांना त्याबाबत काहीही सांगता आलेले नाही. व त्रास देण्याचा उद्येश असेल तर जन माहिती अधिकारी यांनी सुरुवातीलाच त्यांना तसे कळविणे आवश्यक होते. मात्र आयोगाकडे तसे आज जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. अपीलकर्ता जी माहिती मागतात व त्यांना जी उत्तरे दिली जातात त्यामध्ये विसंगती असल्यास अर्जदार वारंवार माहिती मागत असतो याबाबत निश्चितपणे माहिती अधिका–यानी काळजी घेणे आवश्यक असते. असे असले तरी अपीलकर्ता यांना वर विवेचनात नमूद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता संबंधित हार्डडिस्कचे प्रात्यक्षीकरण करुन अपीलकर्ता यांना देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून

संबंधित तारखेचे संगणकावरील नोंदिचे प्रात्यक्षिक बघावे. अपीलकर्ता ज्या दिवशी व वेळी उपस्थित राहतील त्याबाबत संगणक संबंधित हार्डडिस्क व संबंधित इंजिनिअर यांना उपस्थित करुन त्याबाबतचे कागदपत्राचे प्रात्यक्षिक अपीलकर्ता यांना दाखवावे. अपीलकर्ता यांना सुध्दा त्यांचे स्वतःचे संगणक तज्ञ उपस्थित ठेवण्याची मुभा आहे. तसेच मुद्या क्र. 4 व 5 च्या संदर्भामध्ये ठरावाच्या प्रति त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 93/2010 व नाग 94/2010

श्री रामचंद्र किष्णाजी मारटकर
अमराईवार्ड मु. पो. ता. राजुरा(मा.)
जि. चंद्रपूर 442905 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. एस. खामनकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि)
जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर
2) श्री सी. व्ही. मुधोरकर
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि)
जिल्हा परिषद चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी वरील दोन्ही अपीलामध्ये दि. 16.9.2009 रोजीच्या दोन अपीलाच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

वि. शिक्षणाधिकारी यांनी बाल विद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजुरा र.नं.2146 या संस्था अध्यक्षानी 4971000.00 रु. चा गैरव्यवहार करुनही या संस्थेवर वि. शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी आतापर्यंत कोणतीही कार्यवाही न करता चौकशी अहवाल स्वतःकडे दाबून ठेवलेला असून या बद्यल वि.जिल्हाधिकारी साहेब चंद्रपूर यांनी आपल्याकडे शिक्षणाधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याकरीता पाठविलेल्या पत्रावर आपणा तर्फे काय कारवाई केली याचा तपशिल देण्यात यावा किंवा केलेल्या कारवाईची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. या करिता लागणारा संपूर्ण खर्च मी देण्यास तयार आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी न.प. राजूराचे नाहरकत प्रमाणपत्र

नसतांना नियमबाहय शाळा प्रस्ताव मंजूर केल्याबाबत. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) यांचेकडे दाखल केले असेल तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) यांनी सदरची दोन्ही अपीले ही उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) कडे दाखल करण्याकरीता अपीलकर्ता यांना कळविले व अपील अर्ज त्यांना परत केले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही शिक्षणाधिकारी स्तरावरील असल्यामुळे सदरचे दोन्ही अर्ज हे शिक्षणाधिकारी यांचेकडे दि. 22.9.2009 ला हस्तांतर करण्यात आले. शिक्षण विभागातील लिपीक एम.एम.गजबे ज्येष्ठ सहाय्यक यांचेकडे दि. 22.9.2009 ला सदर अर्ज दिलेले आहेत. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दोन्ही अपीले ही श्री श्रीधर मालेकर उप मु.का.अ.(बा.क.) दाखल केली होती परंतु सदरच्या बाबत प्रथम अपीलीय अधिकारी शिक्षणाधिकारी (प्राथ) हे असल्यामुळे त्यांचेकडे दाखल करण्यास कळविण्यात आले होते. आज आयोगाची नोटिस आल्यानंतर गट शिक्षणाधिकारी यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता कळविण्यात आले होते. परंतु आज गट शिक्षणाधिकारी हजर असून सुध्दा त्यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. शिक्षणाधिकारी यांना सुध्दा विचारले दि. 22.9.2009 चा अर्ज हस्तांतर झाल्यानंतर त्यावर काय कार्यवाही केली. त्याबाबत त्यांचेकडे सदरचा अर्ज सादर करण्यात आलेला नाही व त्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. यावरुन दोन्ही अर्जाच्या संदर्भामध्ये कक्ष अधिकारी यांचे म्हणण्याप्रमाणे सदरचा अर्ज हा शिक्षण (प्रा.) विभागातील लिपीक एम.एम.गजबे ज्येष्ठ सहाय्यक यांना दि. 22.9.2009 ला दिलेला असून सुध्दा त्यांनी सादर न केल्यामुळेच जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. यावरुन शिक्षण (प्रा.) विभागातील लिपीक एम.एम.गजबे ज्येष्ठ सहाय्यक यांचे सहाय्य घेतल्याशिवाय माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देता येत नव्हती. व त्यामुळे श्रीमती एम.एम.गजबे ज्येष्ठ सहाय्यक यांना अधिनियमाच्या कलम 5 (4) व (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांची अपीले ही मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांची अपीले ही मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांनी मागितलेल्या दोन्ही अर्जातील माहिती मुद्येनिहाय विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांचे दि. 16.9.2009 रोजी दाखल केलेले दोन्ही अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांचेकडे शिक्षण (प्रा.) विभागातील लिपीक एम.एम.गजबे ज्येष्ठ सहाय्यक यांनी अर्ज सादर केलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर** यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 89/2010**

श्री चरणदास नारायण नगराळे
शिवाजी नगर राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री फुले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
राज्य उत्पादन शल्क चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री परसमोडे
जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
राज्य उत्पादन शल्क राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता सुरुवातीला गैरहजर होते परंतु नंतर हजर झाले. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा राज्य उत्पादक दारुबंदी निरीक्षक यांचेकडे ऑगष्ट 2009 ते आक्टोबर 2009 महिन्यात अवैध देशी दारु पकडली त्याबाबतची सविस्तर माहिती. 1. राजुरा शहरात अवैध देशी दारुची दुकाने किती 2. अवैध देशी दारु दुकानातील माल हा कोणत्या परवानाधारक दुकानातून खरेदी केला त्याची खरेदी पावती. 3. राजुरा तालुक्यात किती गावात अवैध देशी दारुचे दुकान सुरु आहेत त्यांचेकडून आतापर्यंत पकडलेल्या मालाची यादी. जप्ती केलेल्या मालाची खरेदी कोणत्या दुकानदाराकडून केली होती वगैरे माहिती त्यांनी व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर दि. 10.12.2009 रोजी अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की अवैध देशी दारुची जी अधिकृत दुकाने आहेत त्या अधिकृत दुकांनामधून अवैध दुकांनाना दारु पुरविली जाते व त्यामुळे सर्वच क्षेत्रामध्ये दारुमुळे गोंधळ झालेला आहे. व त्यामुळेच अशा प्रकारची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की कार्यालयामध्ये वैध दारुच्या दुकानाची माहिती असते परंतु अवैध दारुच्या दुकानाची माहिती नसते. व त्यामुळे त्याबाबतची कोणतीही माहिती अपीलकर्ता

यांना उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी अवैध देशी दारु दुकानदाराकडून जप्त केलेल्या मालाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे तात्रिकदृष्टया उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की अशा प्रकारे अवैधरीत्या दारुचा पुरवठा करण्यात येत असल्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले. त्यावर आळा बसावा त्यामुळे ही माहिती मागितलेली आहे. अपीलकर्ता यांचा उद्येश चांगला असला तरी कार्यालयात जी माहिती उपलब्ध असते ती माहिती मिळते व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचे आदेश देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मुंबई दारुबंदी कायद्याच्या तरतुदीप्रमाणे सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन त्या तक्रारीच्या चौकशीच्या अहवालाची माहिती मागणी केल्यास त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध होवू शकेल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 91/2010

श्री आत्माराम बापूराव खेडेकर
रा. कोटोडी पो. माळेगाव (टा)
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एन. भगत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री पी. जी. जागरे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 18.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती सावनेर यांचेकडे जुनी प्राथ.शाळा कोटोडीचे साहित्याची अफरातफर झाल्याबाबत दि. 23.9.2009 ला वि.अ.(पं.) व खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर यांनी केलेल्या चौकशी अहवालाशी संबंधीत कागदपत्राच्या सत्यप्रति मिळण्याबाबत. सोबत चौकशी अहवालाची झेरॉक्स प्रत जोडली आहे. व एकुण सात मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.12.2009 रोजी अपीलकर्ता यांना आपला अर्ज दि. 9.11.2009 नुसार माहिती अधिकारा अंतर्गत पिण्याचे पाण्याचा टाकीचा खर्च तसेच सन 94–95 मधील घरकुलाबाबत माहिती मागविण्यात आली होती. परंतु माहितीच्या झेरॉक्स सत्यप्रतीलिपी आपणाकडे सादर करण्यात येत आहे. तसेच दि.18.11.2009 चे अर्जाची माहिती सादर करण्यात येत आहे. सहपत्र – माहितीची सत्यप्रत. असे दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 19.12.2009 रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या नंतर अपीलकर्ता यांनी दि. 21.12.2009 रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे तक्रारपण दाखल केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे पुन्हा दि. 11.2.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय विहित मुदतीत दिलेला नसल्यामुळे त्यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. व त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना पुर्वी माहिती उपलब्ध झालेली आहे. व जी देण्यात आलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे. मात्र आता दि. 6.3.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला परंतु मी द्वितीय अपील दाखल केलेले असल्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन घेतलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना दि. 19.12.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. खंड विकास अधिकारी हे माहिती अधिकारी नसून सुध्दा त्यांनी दि. 11.12.2009 चे पत्र दिलेले आहे. ते पत्र हे दि. 9.11.2009 च्या अर्जानुसार आहे. परंतु त्यात दिनांक 18.11.2009 चे अर्जाची माहिती दिली असे नमूद केलेले आहे. यावरुन खंड विकास अधिकारी पंचायत समिती सावनेर यांनी कोणत्याही प्रकारची खात्री करुन न घेता माहिती उपलब्ध करुन देण्याच्या पत्रावर सही केलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना दि. 15.2.2010 रोजी जी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामध्येही दिशाभूल करणारीच माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या तक्रारीवर जी चौकशी झालेली आहे मागितलेल्या खालील माहितीचे दस्तऐवज उपलब्ध नसल्यामुळे पुरविता आलेले नाही असे त्यांना कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांच्या तक्रारीची चौकशी ही योग्य रितीने करण्यात आलेली नाही असे दिसून येते. व त्याबद्यल अपीलकर्ता यांना स्वतंत्रपणे मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. मात्र अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 18.11.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी किंवा संबंधित अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केल्यावर/सादर झाल्यावर त्याबाबतचे सर्व उत्तर हे जन माहिती अधिकारी यांनी देणे आवश्यक आहे. परंतु सदरचे उत्तर हे खंड विकास अधिकारी माहिती अधिकारी नसतांना सुध्दा देण्यात आलेले आहे. तसेच माहिती ही डी. टी. थोटे विस्तार अधिकारी यांचेकडून विहित कालावधीत उपलब्ध न झाल्यामुळे अर्जदारास मागितलेली माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देता आलेली नाही जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा केलेला आहे. तसेच असेल तर श्री डी. टी. थोटे विस्तार अधिकारी पंचायत यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 18.11.2009 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 ते 7 (मुद्या क्र. 6 वगळुन) मुद्येनिहाय माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांचेशी लेखी संपर्क साधून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी. व तशी पोच द्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी विस्तार अधिकारी पंचायत यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता अधिनियमाच्या कलम 5 (4) प्रमाणे सहाय्य मागितले. परंतु सदरची माहिती अपीलकर्ता यांना पुरविण्यासाठी श्री डी. टी. थोटे विस्तार अधिकारी यांनी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर** यांनी करावयाची असून त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 112/2010**

श्री शामदेव काशिरामजी तितरमारे
प्लॉट नं. 270 चंदननगर पो. हनूमाननगर
नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री कुंभारे
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा यांचेकडे मौजा पहेला येथील सिलींग जमीन वाटप ख.नं.547/7 व 447/4 गैरअर्जदार शेषराव कळसकर ला यांनी 26.9.88 ला नियमबाहय वाटप आपले न्यायालयातील प्रकरण दि.1.12.2009 चे सुनावणी व न्यायालयाचे आदेशाबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.12.2009 रोजी चार मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 24.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये मुद्या क्र. 1 व मुद्या क्र. 3 ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.1. 2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. परंतु प्रकरणात आदेश पारीत होताच सदर आदेशाची प्रत अर्जदारास परस्पर पुरविण्यात आली असेही त्यात कळविलेले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु ती अपुर्ण आहे. त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी झालेली नाही किंवा आदेश देण्यात आलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी तक्रार केलेली आहे. त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये चौकशी करण्याचा अधिकार हा उपविभागीय अधिकारी यांना नसून तहसिलदार यांचे प्राधिकरणाशी आहे. व त्याविरुध्द अपील हे महसूल न्यायाधिकरणाकडे आहे व त्यामुळे सदरचे प्रकरण हे तहसिलदार यांचेकडे पाठविण्यात आलेले आहे. परंतु 30 दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र तहसिलदार यांचेकडे प्रकरण पाठविल्याची माहिती ही आता दि. 15.2.2010 रोजी पाठविली असल्यामुळे त्यांना उपलब्ध करुन देता आलेली नाही. ती उपलब्ध करुन देता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत उपविभागीय अधिकारी म्हणून घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भात निर्णयाच्या प्रत सहीत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नगपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 110/2010**

श्री हरीश्चंद्र रुमदेव क–हाडे
मु. पो. कुरुड
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री सुधाकर अभ्यंकर
जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.10.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालयात रुमदेव प्रा. शा. कुरुड येथील प्रभारी मुख्याध्यापकानी सकस पोषण आहाराची अफरातफर केली. त्याप्रकरणी गटशिक्षणाधिकारी यांनी दि.4.4.2009 ला ज्या चार शिक्षकांचे बयान आणि खिचडी वाटणारीनचे असे पाच बयानाची झेरॉक्स सत्य प्रत मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 15.7.2009 रोजी सुध्दा सकस पोषण आहाराच्या संदर्भातील माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.7.2009 रोजी एकुण सहा प्रतीच्या संदर्भामध्ये रक्कम रु. 12/– भरण्याचे आदेश दिलेले होते. सदरच्या अतिरिक्त खर्चाच्या रकमेचा भरणा सुध्दा केलेला होता. परंतु व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे व अपीलकर्ता हे नंतर माहिती घेण्यास आले

नसल्यामुळे त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर मात्र त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि. 26.8.2009 रोजी दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता सुनावणीसाठी हजर झालेले नाही. परंतु त्यांना पंजीबध्द डाकेने माहिती पाठविलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व आयोगापुढे त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.546-547

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 107/2010

श्री बळीराम एस. पाल
फुटाला वस्ती नागपूर
ता. जि. 23 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
2) श्री सयाम
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.1.2010 रोजी माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडे दि. 16.11.2009 रोजी अंदाजे 100 लोकांची सही असलेली विद्युत ग्राहकाची तक्रार विद्युत वितरण कंपनीवर गुन्हा दाखल करुन कारवाई करणे व अवैध रितीने विद्युत बिलाच्या नावाने ग्राहकाकडून जादा रक्कम वसुली केली. खिसे कापले ते परत मिळवून द्यावी अशी विनंती तक्रार होती त्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली अशी त्यांनी माहिती टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.1.2010 रोजी कलम 7 (8) चे पोलकलम (1) अन्वये अर्ज फेटाळण्यात आला व तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 16.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.1.2010 रोजी देण्यात आला असून माहिती मिळण्याबाबतचा मुळ अर्ज माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सिताबर्डी विभाग नागपूर शहर यांचेकडे पाठविण्यात येत असून माहितीबाबत त्यांचेकडे परस्पर पत्रव्यवहार करावा असे कळविण्यात आले. व त्यानंतर दि. 25.1.2010 रोजी सदरची तक्रार ही प्रथम दर्शनी पोलिस हस्तक्षेपनिय स्वरुपाची असल्याचे दिसून येत नाही. आपण आपले तक्रारी

संबंधाने ग्राहक तक्रार मंचाकडे कार्यवाही करावी असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.1.2010 रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी तत्पुर्वीच प्रथम अपील दाखल केलेले आहे. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की कोणत्या कलमानुसार पोलिस हस्तक्षेपनिय नाही असे जे कळविलेले आहे त्या कलमाची त्या कलमाची माहिती त्यांना कळविण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अहस्तक्षेपनिय कलमाच्या संदर्भामध्ये छायांकित प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 108/2010

श्री दिना सहागूजी सोनवाने
रा. पो. सेंदुरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री यतिन
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री सी. आर. वाघ
जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क नागपूर यांचेकडे दि. 5.8.2009 ला दिलेल्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती पोस्टाने हवी आहे असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 30.10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु ती दि. 11.11.2009 ला अपीलकर्ता यांना प्राप्त झाली व त्यांनी दि. 25.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 21.12.2009 रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात आले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान होण्यासाठी सहाय्यक दुय्यम निरीक्षक यांच्या विरोधातील तक्रारीवरच्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर नस्तीची प्रत्यक्ष विनामुल्य पाहणी करण्यास उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करण्याची टाळाटाळ करण्यात येत आहे असे त्यांचे मत झालेले आहे व त्यामुळे त्यांनी श्री दिगांबर ना. नेवारे सहाय्यक दुय्यम निरीक्षक यांच्या विरुध्द कोणतीही कार्यवाही केलेली नाही तसेच चौकशी चालू असून अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही असे उपअधिक्षक राज्य उत्पादन शुल्क नागपूर यांनी उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या तक्रारीनुसार चौकशी सुरु आहे. बयाण घेण्यात आलेले आहेत. परंतु अंतिम निर्णय झालेला नाही. परंतु ही सर्व माहिती प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या दिवशी अपीलकर्ता यांना सर्व नस्तीचे निरीक्षण देवून दाखविण्यात आलेली आहे. नस्तीचे निरीक्षण घेतले याबद्यलची अपीलकर्ता यांची सही आयोगाचे निदर्शनास आणलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांची मागणी ही लेखी असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे क्रमशः लेखी कळविणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना चौकशी सुरु असल्याचे क्रमशः तारखेनुसार माहिती ही उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.553-554

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 2.03/2010**

श्री रघुनाथ सीताराम चिटणवीस
राम मन्दीर चिटणवीसपुरा सक्करदरा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा
ता. जि. भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.7.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार तुमसर यांचेकडे कास्तकाराला भागभांडवल दरखास्त केल्यावर केव्हा मिळते. माहितीचा कालावधी एप्रिल 2005 ते मे 2009 सविस्तर माहिती सोबत जोडली आहे. ती पुढील प्रमाणे.

शेतक—यांना कर्ज देणा—या सहकारी संस्था या सहनिबंधक कोऑपरेटिव्ह सोसायटीच्या अधिपत्यात येतात. विविध कार्यकारी सहकारी संस्था चुल्हाड र.नं.68 ता. तुमसर जि. भंडारा यांनी कास्तकारांना कर्ज दिल्यानंतर भागभांडवल परत मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर भागभांडवल किती दिवसात, महिन्यात, वर्षात परत करतात. एप्रिल 2005 ते मे 2009पर्यंत.

1. किती कास्तकारांनी कर्ज फेड, जमीन विकल्यानंतर भागभांडवल परत मिळण्यासाठी अर्ज केलेत.
2. किती कास्तकारांचे भागभांडवल परत करण्यात आलेत.
3. किती कास्तकारांचे अर्ज प्रलंबित आहेत व कोणत्या कारणास्तव आहेत
4. काही कारण असल्यास त्यांना कळविले आहे काय
5. कळविले नसेल तर हेतुपुरस्सर प्रलंबित ठेवले आहेत काय, अशी माहिती मागितलेली आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 17.7.2009 रोजी तहसिलदार तुमसर यांनी विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती पुरवावी असे कळवून त्या अर्जाची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 19.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 2.10.2009 रोजी तहसिलदार तुमसर यांनी उपविभागीय अधिकारी भंडारा यांना अपीलकर्ता यांचा अर्ज हा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेकडे पाठविण्यात आलेले आहे असे कळविले व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आले असून अपीलकर्ता यांना दि. 2.12.2009 रोजी पुन्हा हवी असलेली माहिती विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. यांचेकडून प्राप्त झालेली आहे व ती अर्जासोबत

जोडलेली आहे. त्यात आपणाकडून भूमिहीन असल्याचा दाखला व प्रत्यक्षात भेट घेतल्याबाबत विनंती केलेली आहे. तरी आपण संस्थेला भेट देवून परत हवी असलेली माहिती त्यांचेकडून घ्यावी असे कळविलेले आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना माहिती मिळाली परंतु ती समाधानकारक नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या करीता तहसिलदार हे माहिती अधिकारी नाहीत. किंवा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या व्यवहारावर तहसिलदार यांचे कोणतेही नियंत्रण नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांचा अर्ज हा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आला होता. त्याप्रमाणे त्यांना जी माहिती संस्थेकडून उपलब्ध झालेली आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा ही आहे की गुणवत्तेच्या बाबत निर्णय व्हावा असे दिसून येते व त्यांनी तसा युक्तीवाद केला. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत चौकशी करता येत नसल्यामुळे व जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकारी नसून सुध्दा त्यांनी कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक अम 1407/2009

श्री मसूद ईशरत मिर्झा
मु. पो. काळी(दौ.)
ता. महागाव जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन विभाग)
विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती
ता. जि. अमरावती
2) श्री अनिरुध्द बक्षी
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय आयुक्त कार्यालय(सामान्य प्रशासन विभाग) अमरावती
ता. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी आयुक्त कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. दि. 20 ऑगस्ट हा दिवस सदभावना दिवस तसेच दि. 20 ऑगस्ट ते 3 सप्टेंबर 2008 हा पंधरवाडा सामाजिक ऐक्य पंधरवाडा म्हणून साजरा करण्यासाठी आपल्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती छायाचित्र,सिडी,वृत्तपत्र कात्रण इत्यादी पुराव्यासह देण्यात यावी आणि याप्रसंगी जर कार्यक्रम आयोजित करण्यात आले नसतील तर त्याची कारणेसहित माहिती देण्यात यावी.
2. दि. 20 ऑगस्ट हा दिवस सदभावना दिवस तसेच दि. 20 ऑगस्ट ते 3 सप्टेंबर 2008 हा पंधरवाडा सामाजिक ऐक्य पंधरवाडा म्हणून साजरा करण्यासाठी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व जिल्हयाच्या मुख्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती छायाचित्र,सिडी,वृत्तपत्र कात्रण इत्यादी पुराव्यासह देण्यात यावी

आणि याप्रसंगी जर कार्यक्रम आयोजित करण्यात आले नसतील तर त्याची कारणेसहित माहिती देण्यात यावी.

3. जुलै 2008 मध्ये दिग्रस व पुसद येथे उसळलेल्या जातीय दंगलीनंतर तेथील लोकांमध्ये ऐक्याची भावना व सौहार्दभाव वृध्दिंगत करण्याच्या व हिंसाचार टाळण्याच्या उद्येशाने दि. 20 ऑगस्ट ते 3 सप्टेंबर 2008 या पंधरवाडयात सदभावना दिवसाचे व सामाजिक ऐक्य पंधरवाडयाचे औचित्य साधून आपल्या विभागातर्फे दिग्रस व पुसद येथे कोणत्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्याची पुराव्यासह माहिती आणि याप्रसंगी जर कार्यक्रम आयोजित करण्यात आले नसतील तर त्याची कारणेसहित माहिती देण्यात यावी.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 15.12.2008 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे मुळ अर्जाचे अनुषंगाने नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्यामुळे त्यांचे दि. 15.11.2008 चे अपिल अर्ज खारीज करण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. व द्वितीय अपीला सोबत प्रतिज्ञापत्र सुध्दा दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे त्यामध्ये 30 दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु सदर माहिती टप्या टप्याने पुरविलेली आहे. जिल्हाधिकारी अकोला या कार्यालयातील माहिती अपुर्ण, अर्धवट, बिगरपुराव्याची, चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्याबाबतचे शासन परिपत्रातील सुचनानुसार केलेल्या कार्यवाहीचे छायाचित्र,सिडी,वृत्तपत्र कात्रण यापैकी कोणताही पुरावा त्यांना देण्यात आलेला नाही व अशा प्रकारे जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयाची माहिती मला देण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यवतमाळ तथा जिल्हा क्रीडा अधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या अक्षय उर्जा दिवसाच्या कार्यक्रमाची माहिती देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे अपुर्ण माहिती देवून त्यांनी कोणत्याही प्रकारचा पुरावा दिलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सद्‌भावना दिवस व अक्षय उर्जा दिवस हा एकाच दिवशी साजरा करण्यात येतो. शासनाच्या निर्णया प्रमाणे हा त्या त्या कार्यालयानी तो साजरा करावयाचा असतो व त्या त्या कार्यालयानी हा दिवस साजरा करतांना कोणत्याही प्रकारे त्याची प्रसिध्दी दिलेलीच असते असे नाही व त्या सर्व कार्यालयाची माहिती ही आयुक्त कार्यालयात उपलब्ध असते असेही नाही व तसे कळवावे असेही शासन परिपत्रकात नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सर्व कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन देणे हे सर्वस्वी अशक्य आहे. व त्यामुळे त्या त्या कार्यालयातून जी माहिती उपलब्ध झाली ती माहिती अपीलकर्ता यांना टप्या टप्याने उपलब्ध झालेली आहे व तसेच त्या त्या कार्यालयानी पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता

नियमानुसार फी भरुन माहिती घ्यावी असेही कळविलेले आहे. थोडक्यात संपूर्ण माहिती ही एकाच कोणत्याही कार्यालयात उपलब्ध नसते व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती एकत्रित करुन उपलब्ध करुन देणे म्हणजे शासनाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळविणे असे आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक अम 1408/2009

श्री जगदिश शुभकरणसिंह सोमवंशी
संपादक सा.प्रॉमीस कार्यालय वसंतनगर पुसद
ता. पुसद जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विनय गोसावी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
पुसद
ता. पुसद जि. यवतमाळ
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार पुसद
ता. पुसद जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दि.16.72007 ला दाखल केलेल्या अपीलाची व आदेशाची छायांकित प्रमाणित प्रत मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि. 29.5.2007 ला अपीलकर्ता यांना माहिती दिलेली आहे असे आयोगास कळविले त्याबाबतची छायांकित प्रमाणित प्रत मी दिलेल्या माहिती मिळाल्याची पोच पावतीची छायांकित प्रमाणित प्रत मला देण्यात यावी अशी मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपील क्र. 1836/2007, अपील क्र. 1837/2007 व अपील क्र. 1838/2007 मध्ये दि. 1.8.2008 रोजी जो निर्णय झालेला आहे व त्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जे कळविलेले आहे त्या अनुषंगाने दोन्ही अपीले ही निकाली काढण्यात आलेली असल्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती

दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या संदर्भामध्ये तहसिलदार कार्यालयात अव्वल कारकुन पुरवठा हे माहिती अधिकारी तसेच निर्णय अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत व त्यामुळे सदरचा अर्ज हा त्यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला होता. व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. परंतु आता अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यावर अपीलकर्ता यांची सही आहे व त्यावर मला आता माहितीची आवश्यकता नाही अशी सही केलेली आहे. त्या पत्राची प्रत सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरीता पुन्हा तहसिलदार पुसद यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

अपीलकर्ता श्री जगदिश शुभकरणसिंह सोमवंशी यांनी माहितीचा अधिकार अंतर्गत दि.21.11.2008 रोजीच्या मुळ अर्जाद्वारे तिन मुद्यावर माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता श्री जगदिश शुभकरणसिंह सोमवंशी यांचा मुळ अर्ज दि.21.11.2008 रोजी निवासी नायब तहसिलदार यांनी स्वीकारला व तहसिलदार पुसद यांचे समक्ष ठेवण्याबाबत शेरा मारुन अव्वल कारकुन (पुरवठा) यांना दिला. त्यांना मिळाल्याची पोच सोबत जोडली आहे. तत्कालीन अव्वल कारकुन (पुरवठा) म्हणुन श्री आर.बी.तुपोने यांनी सदर अर्ज तहसिलदार पुसद यांचे समक्ष ठेवलेला नाही व त्यावर पुढील कार्यवाही केलेली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने कलम 19 (1) अंतर्गत अपील अर्ज वि.उपविभागीय अधिकारी पुसद यांचेकडे दाखल केला होता. वि.उपविभागीय अधिकारी पुसद यांनी त्यांचे पत्र क. अका/प्र.क्र.5/कावी/08/2009 दि.9.1.09 अन्वये तहसिलदार पुसद यांचेकडे पुढील कार्यवाही साठी परत पाठविला. वरील कालावधीत श्री एस.एम.खडसे हे तहसिलदार म्हणून कार्यरत होते.

मा. राज्य माहिती आयुक्त हयांचे पत्र नोटीस क्र.रामाआ/नाग/अपील क्र. 1408/अम09/सु19/3/2010/881 दि. 17.2.2010 या कार्यालयास दि.3.3.2010 ला प्राप्त झाली. त्याप्रमाणे श्री भगत अव्वल कारकुन यांना या बाबतीत प्रकरण समोर ठेवणे बाबत सुचित केले व संबंधित अपीलकर्ता अर्जदारास माहिती पाठविण्यास सुचित केले. त्याप्रमाणे या कार्यालयाचे पत्र क. अका/ पुरवठा/कावी/884/2010 दि. 17.3.2010 अन्वये तहसिलदार पुसद करीता निरीक्षण अधिकारी यांनी स्वाक्षरी करुन माहिती श्री जगदिश शुभकरणसिंह सोमवंशी यांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आली. सदर पत्राची व पोस्टाची पावतीची छायांकित प्रत या सोबत माहितीस्तव जोडली आहे.

यावरुन अपीलकर्ता यांनीच स्वतः दि. 29.5.2008 रोजी लेखी दिलेले दिसून येते. व तरीही ते अशाप्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांना मागतात तसेच त्यांनी आयोगापुढे सुध्दा तशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.562-564

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 204/2010**

श्रीमती मंगला दिपक फरकडे
रा. कॅम्प एरिया श्री चिटनुलवार यांचे घरा समोर गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री एस. आर. माळी
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
आरोग्य विभाग जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 19.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा आरोग्य विभाग जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे माझे पती नामे कै. दिपक राजेश्वर फरकाडे यांचे मुळसेवापुस्तकाचे प्रथम पानाची झेरॉक्स प्रत अशी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. त्याकरीता दि. 1.9.2009 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे अर्ज सुध्दा केलेला दिसून येतो. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2009 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे दाखल केले. माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या मुळ सेवापुस्तक शोधल्यानंतर सेवापुस्तकाची प्रथम पानाची झेरॉक्स प्रत पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा श्री दिपक राजेश्वर फरकाडे कनिष्ठ सहाय्यक याची वैयक्तिक नस्तीचे अवलोकन केले असता सुधारीत कु.नि.वे.प्रकरण मंजुरीसाठी मुळ सेवापुस्तक व संपूर्ण दस्ताऐवजासह संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये आपल्या कार्यालयात

सादर केले होते. परंतु सुधारीत कु.नि.वे.प्रकरण मंजुरीनंतर सेवापुस्तक या कार्यालयात परत केल्याचे दिसून येत नाही. तरी श्री फरकाडे यांचे मुळ सेवापुस्तक या कार्यालयात परत पाठविण्याचे करावे जेणेकरुन माहितीच्या अधिकारात माहिती संबंधितास पुरविता येईल असे कळविलेले दिसून येते. उप मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी सुध्दा जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सेवापुस्तक गहाळ होणे ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब असून याबाबत जबाबदार असलेला कर्मचारी हा कार्यवाहीस पात्र आहे. तरी सदर कर्मचा–या विरुध्द विभागीय चौकशीबाबतचा प्रस्ताव तयार करुन तात्काळ या कार्यालयास सादर करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु तरीही सेवापुस्तकाची छायांकित प्रत मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती आतापर्यंत त्यांना मिळालेली नाही. परंतु जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.1.2010 रोजी माहे जुलै 2002 ते डिसेंबर 2002 व जुलै 2003 ते सप्टेंबर 2003पर्यंतचे आवक रजिस्टर शोधून आस्थापना 2 विभागाकडे दोन दिवसाचे आत देण्याचे करावे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती देण्यासाठी सेवापुस्तकाची आवश्यकता असल्यामुळे आवक रजिस्टर त्वरीत देण्याचे करावे असे आरोग्य सेवक (महिला) यांना कारणे दाखवा नोटिस दिलेली आहे. त्यावर श्रीमती पी. डी. राऊत आरोग्य सेवक (महिला) यांनी दि. 2.8.2006 पासून आवक विभागाचा प्रभार घेतलेला आहे. संपूर्ण रजिस्टरचे अवलोकन केले असता माहे जुलै 2002 ते डिसेंबर 2002 व जुलै 2003 ते सप्टेंबर 2003पर्यंत कालावधीचे रजिस्टर माझेकडे उपलब्ध नव्हते. अभिलेखागारात पाठविल्याची नोंद सुध्दा नाही. तसेच मला प्रभारामध्ये सुध्दा देण्यात आलेले नाही. 2002 पूर्वीच्या आवक विभागाचा प्रभार माझ्याकडे दिलेला नाही. तरी पण मी जिल्हा प्रशिक्षण येथील लेखागार ठेवलेल्या भांडारामध्ये संबंधीत रजिस्टरचा शोध घेतला त्यात 2002 ते 2003 चे रजिस्टर उपलब्ध झालेले आहेत. तरी सन 2002 ते 2003 या वर्षाचे आवक रजिस्टर आपले माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर करीत आहे असे लेखी दिलेले आहे. पुन्हा दि. 2.3.2010 रोजी अधिक्षक यांना सेवापुस्तक शोधण्याकरीता आदेश दिलेले दिसून येतात. यावरुन जन माहिती अधिकारी यांचेकडे सेवापुस्तक उपलब्ध नसल्यामुळेच माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु सदरचे सेवापुस्तक शोधण्याकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत. परंतु तरीही जर शोध लागला नाही तर पोलीसकडे एफ.आय.आर. दाखल करणे संयुक्तिक राहिल. व जबाबदार कर्मचा–याविरुध्द योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या सेवापुस्तकाचा शोध घेवून त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 213/2010

श्री के. आर. निनावे
एम.एस.ई.बी.कॉलनी प्लॉट नं.73
राजीव गांधी चौक भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एस. डडमल
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री एस. जी. पुरी
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती भंडारा यांचेकडे एप्रिल 98 ते जून 99 या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची माझ्या खात्यात जमा केलेल्या रकमेचा चालान व शेडयुल पुरविण्याबाबत अशी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 30.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.10.2009 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना 15 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी संबंधितास योग्य पाठपुरावा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की सदरच्या चालानाच्या प्रति हया उपलब्ध नाहीत. परंतु भविष्य निर्वाह निधीच्या रकमेच्या चालान क्रमांकाकरीता राशी बाबतचे विवरण दिले आहे. त्यावर कनिष्ठ लेखा अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी जेव्हा पदभार स्वीकारला त्यावेळेस पदभारामध्ये चालानाच्या प्रति हया उपलब्ध झाल्या नाहीत त्यामुळे त्या उपलब्ध करुन देता येत नाही. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचे अभिलेख दोन वेळा कार्यालयाच्या जागेत बदल झाल्यामुळे आढळुन येत नाही परंतु त्याबाबतचा शोध घेत आहोत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत सर्व कार्यालयातील अभिलेख्याचा शोध घेण्यात यावा व माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 212/2010

श्री आनंद अजाबराव धानोरकर
तुकाराम सभागृह चौक धाडीवाल लेआऊट
बौध्द विहाराजवळ रिंग नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती अनिता ताकसांडे
प्रथम अपीलीय अधिकारी
अध्यापक विद्यालय कोराडी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री बळवंत एन. सोनटक्के
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
अध्यापक विद्यालय कोराडी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी प्राचार्य अध्यापक विद्यालय कोराडी यांचेकडे अर्जासोबत खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मी अध्यापक विद्यालय कोराडीचा विद्यार्थी होतो. मी वर्ष 2009 ला डी.टी.एड. द्वितीय वर्षाची परीक्षा दिली. परीक्षेचा निकाल लागूनही माझा निकाल अद्याप मला प्राप्त झाला नाही. माझे नाव व परीक्षा क्रमांक विद्यालयाला प्राप्त झालेल्या विद्यार्थी निकाल पत्र यादीमध्ये नाही. या संदर्भात आपण जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था व परीक्षा परिषद पुणे यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराची छायांकित व सांक्षाकित प्रति मला देण्यात याव्या.

2. परीक्षा परिषदेकडून आपणास माझ्या हॉल टिकिटासोबत पत्र क्र.जा.क्र./मरापप/डी.टी.एड.प्राथ./09/6325 देण्यात आले त्याची छायांकित व सांक्षाकित प्रति मला देण्यात याव्या. अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.1.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.2.2010

रोजी देण्यात आला असून त्यामध्ये मागणी केलेला जा.क्र. 6329 आम्हास प्राप्त झालेले आहे त्यामुळे आम्हास ते पत्र देता येणार नाही असे त्यांना कळविलेले दिसून येते. त्यानंतर सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी जो क्रमांक अर्जात दिलेला आहे तो क्रमांक त्यांनी अंदाजाने दिलेला आहे. निश्चित क्रमांक त्यांना माहिती नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी जो क्रमांक दिलेला आहे त्या क्रमांकाच्या संबंधात त्यांना उत्तर दिलेले आहे. परंतु ज्या क्रमांकाचे पत्र त्यांच्या संदर्भात आलेले आहे त्याबद्यलची माहिती त्यांनी स्वतंत्रपणे अर्ज केल्यानंतर उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.571-572

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 117/2010**

श्री अब्दुल रसिद व. राज मोहम्मद
प्लॉट नं. 54 हिवरी नगर पो. लकडगंज नागपूर
नगपूर 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जी. व्ही. डोंगरे
जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त
लकडगंज झोन क्र. 8 महानगर पालिका
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त लकडगंज यांचेकडे वार्ड क्र. 21 येथील घर क्र. 3002 हे खरेदीदार श्रीमती कलावती लिंगाजी उके आणि अरुण लिंगाजी उके यांच्या नामांतरण संबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.10.2009 रोजी 10 पृष्ठा करीता रु. 38/– चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे त्यांनी रकमेचा भरणा करुन माहिती दि. 6.11.2009 रोजी प्राप्त केलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वीच दि. 21.10.2009 रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. व त्यामध्ये श्रीमती कलावती लिंगाजी उके आणि अरुण लिंगाजी उके यांच्या नामांतरण संबंधी माहिती मागितलेली दिसून येते. व त्यांचा अर्ज हा दि. 2.9.2009 चा दिसून येतो. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.11.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या तर्फे ॲड. शीतल देशपांडे यांनी युक्तीवाद केला. परंतु त्यांनी माहिती अपुर्ण मिळाली असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दोन वेगवेगळे अर्ज दि. 9.10.2009 व दि. 2.9.2009 रोजी केलेले आहेत. व त्या दोन्ही अर्जामधील माहिती एकच आहे ती त्यांना 19 पृष्ठामध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी आता जी माहिती मागितलेली आहे ती दोन वेगवेगळया पध्दतीमधून मागितलेली असल्यामुळे माहिती एकच आहे व ती त्यांना दि. 1.10.2009 रोजी देण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 118/2010**

श्री पंढरीनाथ तानबाजी सहारे
प्लॉट नं. 803 तथागत बुध्द विहाराजवळ
वैशाली नगर
नागपूर 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपधर्मदाय आयुक्त
नोंदणी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री धोटे
जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक
उपधर्मदाय आयुक्त
नोंदणी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे तथागत बुध्द विहार 186/2000 चेंज रिपोर्ट प्रकरणाशी संबंधीत समस्त अभिलेख डिसेंबर 1999 ते नोव्हेंबर 2008 या कालावधीतील संपूर्ण अभिलेख तथा नोटशिट विवरण शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन एकुण 10 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.1.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी माहिती ही सहा. धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांना मागितलेली आहे. त्यांनी माहिती ही सार्वजनिक विश्वस्त संस्थेला मागितलेली नाही. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मधील ''माहिती'' या संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई—मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्विपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी, कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो असा असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये 1. भास्करराव कुलकर्णी विरुध्द माहिती आयुक्त

नागपूर 2009 (4) महाराष्ट्र लॉ जनरल 802 व 2. नागपूर युवक शिक्षण संस्था विरुध्द माहिती आयुक्त विदर्भ रिजन नागपूर 2009 हया याचिकामधील निर्णयास लागू होत नाही. सार्वजनिक विश्वस्त संस्था ही सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 प्रमाणे धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणी केली जाते व नोंदणी केल्यानंतर अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे धर्मदाय आयुक्त यांचे सार्वजनिक विश्वस्त संस्थेवर नियंत्रण असते व त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे धर्मदाय आयुक्त यांना त्या संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेता येते. व तीच माहिती उपलब्ध करुन घेवून अर्जदारास उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचा निर्णय गैरलागू आहे. यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय हा रद्य करणे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल ती माहिती संबंधित संस्थेकडून मागवून विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 119/2010

श्री इश्वर येसोजी ढोके
मु. पो. ता. एटापल्ली
जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री एस. आर. माळी
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
आरोग्य विभाग जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी आरोग्य विभाग जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे 1. गडचिरोली तालुक्यातील प्रा.आ.केंद्राची खालील प्रपत्रात केंद्रनिहाय द्यावी. 2. या प्रपत्रात गट अ सोबत गट ब ची सुध्दा वेगवेगळी माहिती प्रपत्रात द्यावी. 3. गडचिरोली जिल्हयातील किती वैद्यकीय अधिका–यांचे वेतन व भत्ते नियीमत काढले नाही त्यांचे नाव कारण केंद्रनिहाय द्यावे. व सर्व माहिती बरोबर आहे कोणत्याही सबबीचे वैद्यकीय अधिका–यांची माहिती सुटलेली नाही हे प्रमाणित करुन द्यावे. अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 30.12.2009 रोजी मागितलेली माहिती पाठविण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना आयोगाकढे असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती ही संकलित करुन मागितलेली आहे परंतु ती त्यांना पुर्णपणे उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्याकडे डॉ. मडावी म्हणून आरोग्य अधिकारी होते व त्यांचे पत्नीस नियुक्ती दिली होती. परंतु एकाच पदावर दोन व्यक्तींना वेतन देता येत नसल्यामुळे व अपीलकर्ता यांनी त्यांच्या नातेवाईकाचे मित्र म्हणून सदरची माहिती मागितलेली आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रपत्रात आहे. याचा अर्थ सदरची माहिती ही तयार करुन द्यावयाची आहे. सदरची माहिती ही अधिनियमाच्या कलम 4 (1) प्रमाणे त्या त्या प्रकरणात उपलब्ध असते व ती अपीलकर्ता यांना त्या त्या कार्यालयामध्ये निरीक्षणा करीता उपलब्ध करुन देता आली असती. मागितलेली माहिती ही तयार करुन देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले त्यामुळे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.587-588

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 120/2010

श्री कृ. के. चांदेकर
50 दत्तात्रय नगर नागपूर
ता. जि. नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. एस. वैरागडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरिष्ठ संशोधन अधिकारी
अपर आयुक्त आदिवासी विकास
गिरीपेठ नागपूर
2) श्री गेडाम
जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी
अपर आयुक्त आदिवासी विकास
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 23.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2009 रोजी जन माहिती अधिकारी अति. आदिवासी आयुक्त आदिवासी भवन गिरीपेठ नागपूर यांचेकडे मा. अरुण पाटणकर (IAS) अति. आदिवासी आयुक्त यांनी अपील क्र. 95/1983 मिलींद कतवाडे वि. संचालक समाज कल्याण विभाग पूणे हया प्रकरणात दि. 12.11.1984 ला पारित केलेल्या आदेशात नमुद असलेल्या खालील मुद्याबाबत माहितीचा झेरॉक्स प्रती (साक्षांकीत) उपलब्ध करुन देण्याबाबत एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने सदरची माहिती या कार्यालयाशी संबंधित नसून सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती गिरीपेठ नागपूर किंवा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था क्वीन्स गार्डन पुणे या कार्यालयाशी संबंधित असू शकते असे दि. 7.1.2010 ला त्यांना कळविण्यात आलेले असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 2 (च) (झ) नुसार फेटाळण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 1.9.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.1.2010 रोजी देण्यात

आला असून सुनावणीसाठी उपस्थित झालेले नाही व त्यामुळे निर्णय झालेला नाही. व श्री चांदेकर हे दि. 31.1.2010 रोजी सुनावणीसाठी उपस्थित झाले नाही. यावरुन श्री चांदेकर यांचेकडे ही माहिती असून सुध्दा या कार्यालयात पत्रव्यवहार करीत आहे अशा प्रकारचा खुलासा त्यांनी आयोगाकडे दाखल केला. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सन 1994 मध्ये ज्या अपीलाचा निर्णय दिलेला आहे त्यामध्ये मागितलेल्या माहितीचा संदर्भ आहे. व त्यामुळे त्या संदर्भाचीच माहिती त्यांनी मागितलेली आहे. परंतु जन माहिती अधिकारी हे माहिती देण्याची टाळाटाळ करीत आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ही 1984 ची माहिती आहे. त्यानंतर जात पडताळणी समिती ही स्वतंत्र झाली व त्या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध असेल असे त्यांना कळविले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी सुध्दा माहिती उपलब्ध नाही असे कळविले. त्यापेक्षा अपीलकर्ता यांनी संबंधित अपीलाच्या नस्तीची मागणी करावी व त्यातून ती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. मात्र अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.590-591

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 138/2010**

श्री यशवंत धिसुजी होळी
मु. पो. वैरागड
ता. आरमोरी जि. गडचिरोली 441217 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद्र गोडलवाही
ता. धारोरा जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र गोडलवाही यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सेवानिवृत्ती प्रकरण, सेवानिवृत्ती दिनांकाच्या किती कालावधी अगोदर किंवा नंतर पूर्ण करुन मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयास पाठविणे अपेक्षित आहे?
2. श्री जी.डी.होळी परिचर यांचे सेवानिवृत्ती प्रकरण पुर्ण करण्याची जबाबदारी कोणत्या कर्मचा–यावर सोपवली आहे व त्यांच्याकडे किती कालावधीपासून हे काम अपूर्ण आहे?
3. या प्रकरण संबंधाने वरिष्ठ कार्यालयाकडून असलेली कामे तसेच त्यांना आपण दिलेले उत्तर अशा सर्व पत्रांच्या झेरॉक्स प्रती हव्या आहेत.
4. आपल्या कार्यालयातून 5 वे वेतन आयोग थकबाकी जि.पी.एफ.ला किती कर्मचा–यांची जमा केली? जमा केलेल्या पत्राची झेरॉक्स प्रती हवी आहे.
5. श्री जी.डी.होळी यांची 5 वे वेतन आयोग थकबाकी का जमा केली नाही. त्यामुळे व्याजाची नुकसान भरपाईची जबाबदारी कोणावर निश्चित करता येईल किंवा कसे?

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 31.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया दि. 8.2.2010 रोजी दिल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही छायांकित प्रती माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्तायांनी तत्पूर्वीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती विलंबाने व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यामुळे मिळाली. परंतु ती अपुर्ण आहे व कोणत्याही छायांकित प्रती हया उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 29.9.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली होती व त्याकरीता त्यांनी

जावक नोंदवहीची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. परंतु तद. 29.2.2009 रोजी पाठविलेले पत्र व जावक नोंदवहीतील नोंद ही बनावट दिसून येते. व अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणत्याही प्रकारचे पत्र त्यावेळेस मिळाले नाही व दि. 29.9.2009 च्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यावरुन सदरचे पत्र हे नंतर तयार केली असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. सदरच्या शास्तीच्या बद्यल त्यांना विचारणा केली असता ते समाधानकारक उत्तर देवू शकले नाही. दि. 29.9.2009 चे पत्र हे नंतर तयार करुन दिले आहे याबद्यल ते खुलासा करु शकले नाही. किंवा नंतर संपूर्ण जावक नोंदवही आणून दाखविण्या बद्यल विचार असता त्याद्यल त्यांनी आयोगापुढे काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उर्वरीत माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचे विरुध्द रु. 250/– ची शास्ती लादण्यात येते व सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहााचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.590-591

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 137/2010**

श्री विनोद कवडुजी खोब्रागडे
आर्शीवाद नगर नागपूर हायवे रोड वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी वरोरा
तहसिल कार्यालय वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा तलाठी
साझा क्र. 15 वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.2.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. फेरफाराचा अनुक्रमांक 2. फेरफाराचा दिनांक 3. कशासाठी फेरफार होता त्याबद्यल माहिती हवी. 4. फेरफार घेणार व देणा–याचे नाव 5. प्रमाणीत अधिकारी यांची नाव 6. 7/12 रेकॉर्ड किती दुरुस्त झाले त्यांचे नंबर 7. 7/12 रेकॉर्ड फेरफार रुजू होवून किती दुरुस्ती झाली नाही त्यांची भु. क्र. किंवा फेरफार व नावे 8. शासनानी वरोरा तलाठी कशा साठी ठेवले जनतेचा कामासाठी कि 9. तलाठी दप्तर निरीक्षण त्यावेळी किती फेरफार मंडल यांनी केली त्या भेट पुस्तिकेची सत्यप्रत 10. त्याकाळातील तलाठी खोब्रागडे यांना वारंवार भेटी व वरिष्ठ अधिकारी आले असता कशासाठी डिवटी लावत होते. 11. संबंधीत तलाठी यांनी केलेली कामे दुस–यांदा फेरफार घेण्याचा शासनानी कधी अधिकार दिला. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.12.2009 रोजी देण्यात आलेला असून श्री चड्डावार तलाठी वरोरा यांना माहिती पुरविण्यासाठी आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 13.1.2010 रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती त्यांना हवी असल्यास योग्य ती शासकीय फी भरुन प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय व त्यांचे निवासी घराचे अंतर हे फार कमी आहे व नेहमीच भेट होत असते. परंतु त्यांना माहिती दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता हे कार्यालयात 30 दिवसात माहिती घेण्यास आले नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा पत्र देवून माहिती घेण्यास आलेले

नाहीत. दि. 15.12.2009 रोजी सुध्दा त्यांना पत्र देवून ते माहिती घेण्यास आले नाही. व सदरचे पत्र दिल्यावर त्यांनी स्वीकारले नाही त्याची प्रत सादर केली आहे. तसेच अपीलकर्ता हे त्यांचे कार्यालयात कार्यरत होते व आत त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागत आहेत व ती व्यक्तीशः मागून माहिती घेण्यास येत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या पत्राच्या अनुषंगाने व अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती घेण्याकरीता कोणतेही प्रयत्न केलेले दिसून येत नाही. त्या अनुषंगाने आयोगाची खात्री झालेली आहे की अपीलकर्ता हे स्वतः माहिती घेण्याच्या संदर्भात तत्पर आहेत असे दिसून येत नाही. त्यांनी आयोगापुढे शास्ती करण्याची विनंती केलेली आहे. यावरुन त्यांना माहिती पेक्षा संबंधितांना शास्ती करणे हे महत्वाचे वाटते असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती हवी असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या करीता अतिरिक्त खर्चाचा भरणा करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 220/2010**

श्री डॉ. सुरेन्द्र जंगलुजी खरबडे
बी 9 पाक व्हयू अपार्टमेंट
के.सी.पोष्ट ऑफीस जवळ सिव्हील लाईन्स
नागपूर 440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्र. 1 नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री पी. पी. धरमशी
जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.12.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.8.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त यांचे कार्यालयात अर्जदाराची तक्रार दि. 17.8.2003 वर केलेली कार्यवाही व त्यांत निघलेला निष्कर्ष व तपास संबंधी रिपोर्ट अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.8.2009 अर्जा बाबत काय कार्यवाही केली याबाबत माहे ऑगस्ट 2003 चे स्टेशन डायरी संबंधाने पो.स्टे.च्या रेकॉर्ड रुममध्ये शोध घेतला असता मिळुन आला नाही. सदर अर्जदाराने पोलीस उपआयुक्त सा. परिमंडळ क्र. 1 नागपूर यांना दिलेल्या तक्रार अर्ज नोंदवही क्र. 180/03 दि. 16.10.03 प्रमाणे प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे परंतू सदरचा अर्ज चौकशी कामी कोणाला दिला व त्या अर्जावर काय कारवाही करण्यात आली याबाबत कोणतीही नोंद नाही अशी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 12.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती विहित मुदतीत माहिती उपलब्ध

करुन दिलेली आहे असा दिलेला असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांच्या तक्रारीची नोंद आहे परंतु वरील माहिती मिळत नाही हे योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती ही 2003 ची आहे तक्रार अर्ज प्राप्त आहे परंतु त्यावर कोणती कार्यवाही केली याबाबतची पुढील कोणतीही नोंद नाही. व ही बाब अपीलकर्ता यांना मुदतीत कळविण्यात आलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की तक्रारीची नोंद जर आहे तर पुढील कार्यवाही का करण्यात आली नाही. परंतु याबाबत सन 2010 मध्ये काही सांगता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच आयोग सुध्दा त्याबाबत कोणत्याही प्रकारची दखल घेवू शकत नाही व माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग 218/2010 व अपील कमांक नाग 219/2010**

ॲड. श्री सतिश महादेवराव उके
1271 पार्वती नगर नागपूर
ता. जि. नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील कमांक नाग 218/2010</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शाखा अभियंता
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत भोकारा
पो. गोधनी ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक नाग 219/2010</u>**

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर
4) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क. नाग 218/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त सदर विभाग नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मा.पोलीस उपायुक्त सा. यांना दि. 6.1.09 ची दिलेली तक्रार स्विकृती पोच दि. 6.1.09 तक्रार देणार – सचिव ग्रामपंचायत बोखारा विषय –ग्रा.पं.कारवाईचे वेळी पो.नि. मुंडेवाडी यांनी शाासकीय कामात अडथळा केला करीता कारवाईस्तव तक्रार व त्यासह सलग्न दस्तऐवज.
2. दि. 6.1.09 रोजी विधी अधिकारी ग्रामपंचायत बोखारा यांनी सचिव ग्रामपंचायत बोखारा यांना सदर अहवाल याची प्रतिलिपी मा. पोलीस उपायुक्त सा. यांना
वरील क्र. 1 व 2 संबंधाने क्र. 1 बाबत व त्यातील झालेली गुन्हेगारी कृत्याबाबत विरोधात झालेली कारवाईच्या बाबत आदेशपत्र, टिपण, सर्व कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती मिळणेस विनंती. सदरची माहिती संपतीबाबत असल्यामुळे व जिवीत व स्वातंत्र्य संबंधित स्वरुपाची असल्यामुळे लवकर 48 तासात देण्याची विनंती केली आहे. परंतु माहिती कशी घेणार याबद्यल कोणत्याही प्रकारे नमूद केलेले नाही. सदरचा अर्ज हा दि. 3.9.2009 रोजी शाासकीय माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त सदर विभाग नागपूर यांनी अर्जातील मुद्या क्र. 2 ची माहिती ही ग्रामपंचायत बोखारा यांचेशी संबंधित आहे. तरी मुद्या क्र. 2 ची माहिती ही ग्रामपंचायत बोखारा यांचे कार्यालयाच्या शाासकीय माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात यावी व तसे सहाय्यक माहिती अधिकारी बोखारा यांना अर्जाची प्रत हस्तांतरीत केलेली दिसून येते. सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 26.10.2009 माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पं. स. यांचेकडून प्राप्त झाला. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 11.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.1.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांच्या अर्जानुसार मागितलेली माहिती अपीलदारास परिपूर्णि माहिती 4 दिवसांचे आंत देण्यात यावी असे ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत बोखारा यांना आदेश दिलेले दिसून येतात. व त्याप्रमाणे दिनांक 22.1.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.
3. अपीलकर्ता हे स्वतः वकील आहेत व त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरची माहिती संपतीबाबत असल्यामुळे व जिवीत व स्वातंत्र्य संबंधित स्वरुपाची असल्यामुळे लवकर 48 तासात मिळण्याची विनंती केली होती. परंतु माहितीचे अवलोकन केले असता अशाप्रकारे व्यक्तीच्या जिवीत व स्वातंत्र्य संबंधित स्वरुपाची नसल्यामुळे 48 तासात मागितलेली दिसून येते. अशी विनंती वकील यांनी करणे हे योग्य नाही. पुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांचेकडे माहिती उपलब्ध आहे. परंतु त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिलेली नाही. त्यावरुन जन माहिती अधिकारी तसेच खंड विकास अधिकारी यांनी असे सांगितले की अशा प्रकारची कोणतीही तक्रार ग्रामपंचायत कार्यालयात केलेली नाही. व त्याबाबतचे कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे त्याबाबतचे पुरावे आहेत परंतु त्यांनी आज ते दाखल केले नाही. आयोगाचे नोटिसीमध्ये सर्व कागदपत्रे दाखल करणे

आवश्यक आहे. असे नमुद करुन सुध्दा त्यांनी ते दाखल केले नाहीत. परंतु अपीलकर्ता यांनी ते दाखल केलेले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. परंतु तरीही 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली नाही याकरीता मात्र जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द रु. 250/— ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्यांना त्याबाबत विचारले असता समाधानकारक खुलासा ते करु शकले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 219/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 21.10.2009 रोजी जन माहिती अधिकारी कार्यालय मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे उप मुख्य कार्यपालन अधिकारी यांना उद्येशून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

शासन परिपत्रकाचे विरोधात ग्रामपंचायत बोखारा द्वारा केले गेलेले गैरकामाविरोधात कारवाई न करता त्यांना मदत करणे बाबत माझी आपले कार्यालयास कालमर्यादा नोटिस आपले कार्यालयास तामील दि. 6.10.2009 बाबत मिहिती मिळणेस.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.1.2010 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना यांचे माहिती अर्जानुसार माहिती प्राप्त झालेली असून पुन्हा त्यांनी दि. 6.10.2009 ची नोटिस आपले कार्यालयात दिली त्या कार्यालयातील नोटिसीची सांक्षांकित प्रत देण्यात यावी अशी मागणी केली असल्यामुळे ते मान्य करुन 7 दिवसात माहिती देण्यात यावी असे आदेश कलेले आहेत. त्यामुळे त्यांना दि. 20.1.2010 रोजी ती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी लिगल नोटिस दिली होती त्याच्या संदर्भात काय कार्यवाही झाली एवढीच माहिती त्यांनी मागितली होती. तसेच माहिती 48 तासात उपलब्ध करुन द्यावी व व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. परंतु त्यांना ती 48 तासात उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये मालमत्ता संबंधाने 48 तासात धोका आहे अशा प्रकारचा काहीही संबंध नाही. परंतु त्यांना दि. 19.11.2009 रोजी स्वयंस्पष्ट त्यांच्या मालमत्तेच्या तक्रारीच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु मागितलेल्या सर्व माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयातील विवेचनाचा सुध्दा विचार केल्यास अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. नाग 218/2010 हे मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 250/– ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **खंड विकास अधिकारी पंचायत समिती नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
3) अपील क्र. नाग 219/2010 खारीज करण्यात येते.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग139/2010 व**
**अपील क्रमांक नाग140/2010**

**<u>अपील क्रमांक नाग139/2010</u>**
श्री भास्कर मिथुजी डोंगरे
कस्तुरबा वार्ड गोंदिया (पंचशिल झेंडया जवळ)
पो. ता. जि. गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी
गोरेगांव
ता. गोरेगांव जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
बाल विकास प्रकल्प कार्यालय गोरेगांव
ता. गोरेगांव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक नाग140/2010</u>**
3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर
4) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
अद्यापक विद्यालय दांडेगांव
ता. दांडेगांव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2010 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. नाग 139/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प कार्यालय यांचेकडे Information related to the appointment of Helper (मदतनीस) and Worker (सेविका) अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 20.11.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 11.3.2010 रोजी माहिती दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नव्हती म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.2.2010 रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता आज गैरहजर आहे. कागदपत्रावरुन असे दिसून येते की त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. त्याबद्यल त्यांना विचारले असता ते समाधानकारक खुलासा करु शकले नाही. जी उपलब्ध करुन दिली आहे ती राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून दि. 2.3.2010 रोजी सुनावणीची नोटिस

दिल्यानंतर प्रथम अपील तसेच माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे नाटक केलेले दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत असल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. नाग 140/2010 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 28.5.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य अद्यापक विद्यालय दांडेगांव यांचेकडे एकुण 12 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांना हजर राहण्यासाठी 9 वेळा संधी देण्यात आली होती परंतु ते हजर झालेले नाही त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीत अपीलाचा निर्णय देण्यात आलेला आहे. व त्याप्रमाणे नंतर अपीलकर्ता यांना माहिती घेण्याकरीता पत्र देण्यात आले. परंतु ते प्राप्त करण्या करीता कार्यालयात आलेच नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. नाग 139/2010 अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 250/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070-इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070-016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
2) अपील क्र. नाग 140/2010 खारीज करण्यात येते.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक नाग 141/2010

श्री तुकडुदास किसनजी शेंडे
मु. चांदोरी खुर्द पो. परसवाडा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत चांदोरी खुर्द पो. परसवाडा
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2010 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.3.2010 रोजी नोटीस काढून दि. 26.3.2010 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत चांदोरी खुर्द यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.
निर्मल ग्राम (हगनदारी/संडास बांधकाम) संडास बांधकामाची संपुर्ण यादी आलेला अनुदान किती आणि वाटप किती. संडास बांधकाम, अनुदान वाटप, आलेला अनुदान किती, आलेला अनुदान कोणकोणत्या कामात खर्च करण्यात आला त्याची संपुर्ण माहिती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.10.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.10.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.11.2009 रोजी देण्यात आलेला असून माहिती पुर्णपणे न मिळाल्यामुळे पुर्ण माहिती मिळण्याकरीता सात दिवसात माहिती संबंधित अपीलकर्ता यांना देण्यात यावे असे आदेश दिलेले आहे. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 1.12.2009 रोजी संपूर्ण माहिती घेवून जावी असे खंड विकास अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते. व दि. 7.12.2009 रोजी संपूर्ण माहिती

उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की 268 लोकांची यादी मिळाली परंतु त्यात बी पी एल चे 207 कोणत आहेत याबद्यलची माहिती नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी बीपीएल–अेपीएल मिळून 268 ची यादी दिली आहे. मात्र प्रथम अपीलाच्या नंतर 207 लोकांच्या व्हाऊचर्स दिलेल्या आहेत व त्यामध्ये सर्व 207 बीपीएलच्या लोकांची माहिती आलेली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३२९/अम/२००९.

श्री. शेषराव किसनराव रायबोले,
रा. पांढरी खानमपूर, ता. अजंनगांव सुर्जी,
जि. अमरावती. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. जी. ठाकरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती.

श्री. डी. एच. भागवत,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.९.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, अंजनगांव सुर्जी यांचेकडे मौजे वाघडोह येथे शहानूर प्रकल्पाचे मालकीचे शेतात आपण कृषी पंपाना विद्युत पुरवठा केला आहे. त्या सर्वांची नावे. कोणत्या दस्ताऐवजावर विद्युत पुरवठा केला त्याबाबत माहिती पुरवठा करण्याकरिता शहानूर प्रकल्पाचा ना हरकत दाखला घेतला असा विद्युत पुरवठा देता येते काय ? जागेची पाहणी करणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यांचे नांव, आता आपण दोषी अभियंत्यावर काय कारवाई करणार त्याचा तपशील. नियमबाहय विद्युत पुरवठा आता कधी खंडित करणार याबाबत माहिती देणे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार व दारिद्रय रेषेखालील रेशनकार्डची झेरॉक्स जोडली आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.१०.२००८ रोजी (२०.१०.२००८) माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक १८.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना शहानूर प्रकल्पाचे मालकीचे शेतात कृषी पंपाना विद्युत पुरवठयाची माहिती मागितलेली होती. परंतु माहिती अपूर्ण दिली व यादी दिली आहे. कोणत्या आधारावर कृषी पंपाना विद्युत जोडणी देण्यात आली ती कागदपत्रे दिली नाही व कार्यवाहीचे बद्दल सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही त्यांचेकडे नसून सहाय्यक अभियंता, अंजनगांव सुर्जी यांचेकडे असल्यामुळे त्यांचेकडून जी माहिती आली ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु कागदपत्राचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे संबंधित सहाय्यक अभियंता यांनी दिली नसल्यामुळे ती देता आली नाही. त्याबाबत पुन्हा सहाय्यक अभियंता, अजंनगांव सुर्जी यांनी कोणत्या आधारे कृषी पंपाना विद्युत जोडणी दिली होती त्याबद्यलची कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कार्यवाहीची मागणी करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांच्या शेवटच्या २ मुद्यांचे संदर्भात माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.९.२००८ च्या अर्जामध्ये मौजे वाघडोह येथील शहानूर प्रकल्पाचे मालकीचे शेतात कृषी पंपाना विद्युत पुरवठा कोणत्या दस्तऐवजाद्वारे दिला आहे त्या दस्तऐवजांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत संबंधित सहाय्यक अभियंता यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन व्यक्तिशः पुरविण्यात यावे व पोच घ्यावी. माहिती व्यक्तिशः घेण्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४८/२०१०.

श्री. राजेश वल्द नवलकिशोर ठाकूर,
रा. विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिलटॉप, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

सौ. पल्लवी दाढे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
सेंट झेवियर्स प्राथमिक शाळा,
एक्स -२१, एम.आय.डी.सी.
हिंगणा रोड, नागपूर - ४४० ०१६. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर सादर करण्यासाठी वेळ मागितला असल्यामुळे सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. आर. आर. चौधरी, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापिका, सेंट झेवियर्स प्राथमिक शाळा, एम.आय.डी.सी., हिंगणा रोड, नागपूर यांना माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने काही माहिती दिनांक ६.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारे आदेश दिलेले दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे श्री. आर. आर. चौधरी, वकील यांचेमार्फत लेखी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाश्यामध्ये सदर प्राथमिक शाळेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष मिळत नाही. याचा अर्थ सदरची शाळा ही विनाअनुदानीत शाळा आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्याबाबत अपीलकर्ता यांना विचारले असता अपीलकर्ता यांनी

सुध्दा सदरची शाळा ही विनाअनुदानीत आहे हे मान्य केले व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे सदरची शाळा ही सार्वजनिक प्राधिकरण होत नाही याकारणास्तव अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३३१/अम/२००९.

श्री. दिनेश मनोहरराव टिपरे,
रा. आसोना, पो. निंभी, ता. मोर्शी,
जि. अमरावती. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एस. कदम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक,
वनविभाग, जि. अमरावती.

श्री. जे. एन. तराळे,
जनमाहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनविभाग, मोर्शी, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनविभाग, मोर्शी यांचेकडे वन्यप्राण्यामुळे झालेल्या नुकसान भरपाई बाबत. तसेच सौ. उषाताई मनोहरराव टिपरे यांचा अर्ज दिनांक ७.६.२००७ नुसार काय कार्यवाही करण्यात आली व नुकसान भरपाईबाबत शासनाची प्रत मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयाचे संदर्भात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना काही माहिती मिळाली परंतु शासन निर्णयाची प्रत मिळाली नाही. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती मिळालेली आहे ती विलंबाने मिळाली व अपूर्ण मिळाली. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा शिपायांकडे दिलेला होता व तो योग्य त्या पध्दतीने सादर केलेला नाही. प्रथम अपील सुध्दा लिपिकांनी सादर केले नाही. त्यामुळेच प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली नाही. याचा अर्थ वनविभागामध्ये सोपविलेल्या कामाची जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही. त्यामुळे संबंधित लिपिकांविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. जेणे करुन जनमाहिती अधिकारी यांना विभागाच्या कृतीचे समाधान करता येणार नाही व माहिती अपीलकर्ता यांना वेळेत प्राप्त होईल.

त्यामुळे अपीलकर्ता यांना शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत शासन निर्णयाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तसेच माहितीचा अर्ज हा ज्या अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यानी संबंधित जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर केला नसेल. तसेच प्रथम अपील ज्या कर्मचाऱ्यांनी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे सादर केले नसेल त्यांच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३३२/अम/२००९.

कु. चंदा गोविंदराव बावणे,
रा. धामक (बेलोरा),
ता. नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. बी. जी. सोमवंशी,
जनमाहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १८.८.२००६ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग, अमरावती यांचेकडे जिल्हा परिषद, अमरावती परिचर श्रेणी-१, वर्ग-४ गट (ड) भरती २००३ आरक्षणात व भरती प्रक्रियेच्या संदर्भात एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक १६.१०.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.१२.२००६ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ती यांना एकूण ११०५ प्रती होतात. त्याचे शुल्क रुपये २२१०/- भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी सुध्दा अपीलकर्ती यांस दिनांक १४.११.२००६ व दिनांक २९.११.२००६ रोजी पत्र व्यवहार केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांना दिनांक २८.८.२००६ रोजी विहित मुदतीत भरती प्रक्रिया व परीक्षा पध्दतीचे अनुषंगानेही माहिती ५ दिवसांचे आंत देण्याबाबत शासकीय निर्देश असल्याने व माहितीचा अधिकार, २००५ मधील ६(१) प्रमाणे देणे सुलभ होणार नाही असे कळविले होते. तोंडी युक्तिवादात सुध्दा अपीलकर्ती यांनी सांगितले की, भरती प्रक्रिया ही २००३ मधील असली तरीही ती ११२५ परीक्षार्थ्यामध्ये उपलब्ध असल्यामुळे त्याबाबत अतिरिक्त खर्च भरणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ती यांचे वडील श्री. गोविंदराव धर्माजी बावणे यांनी आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांचेकडे तक्रार करतांना त्या तक्रारीमध्ये त्यांनी माहिती अधिकारांतर्गत माहिती मिळाली आहे असे नमुद केलेले आहे. याचा अर्थ अपीलकर्ती यांचे वडिलांना माहिती मिळाली असून सुध्दा अपीलकर्ती ही तीच माहिती मागत आहे व त्यांच्या युक्तिवादाप्रमाणे सदरची भरती प्रक्रियेमध्ये जो तथाकथित गैरप्रकार झालेला आहे त्याची चौकशी व्हावी अशी त्यांची अपेक्षा दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत चौकशी करण्याचा अधिकार हे आयोगास नाही. त्यामुळे अपीलकर्ती यांचे वडीलांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/२५८-२६०/३.३.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३३०/अम/२००९.

श्री. गजेंद्र केशवराव साबळे,
रा. काठीपूरा, धान्य गोदामाजवळ,
ता. अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. बी. खंडारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
कृषी विभाग, ता. अंजनगांव सुर्जी,
जि. अमरावती.

श्री. जी. आर. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कृषी पर्यवेक्षक,
तालुका कृषी अधिकारी,
कृषी विभाग, ता. अंजनगांव सुर्जी,
जि. अमरावती. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अंजनगांव सुर्जी यांचेकडे १) अंजनगांव तालुक्यात कृषि विभागाच्या कृषि सहाय्यक निवासस्थान इमारती किती, त्यांची नांवे, गावांची, बांधकामाची तारीख, इमारतीची सद्यःस्थिती, कृषि सहाय्यक निवासी राहतात काय ? निवासस्थानी राहत असलेल्या कृषी सहाय्यकाची नांवे, त्यांचे पगारामधून इमारत भाडे कपात करण्यांत येते कां ? व किती करण्यात येते यांचे संपूर्ण विवरण खासपूर येथील इमारती संदर्भात मे. आर.डी.सी.के.वन रेव्हेन्यु नं. एमआरसी-८/ईव्हीआय/०८/०७-०८ अंजनगांव सुर्जी बाबत सर्व कागदपत्रे. २) मौजा खासपूर कृषि सहाय्यक निवास स्थान इमारत बांधकामाचा आराखडा, बांधकाम कोणी केले, बांधकामात आलेली इमारत कोणाचे जागेत आहे. इमारतीची जागा मिळाली असल्यास जागेचे दानपत्र, भाडेतत्वावर असल्यास त्याबाबतचे कागदपत्रे, बांधकामासाठी ग्रामपंचायत खासपूरने दिलेली परवानगी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली ती अपूर्ण माहिती आहे व विशेषतः मुद्या क्रमांक २ ची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही म्हणून त्यांनी

दिनांक ६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.२.२००९ रोजी देण्यात आलेला आहे व त्यात खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्याप्रमाणेही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांच्या कार्यालयास माहिती नाही व त्यामुळे त्यांना दिनांक २३.१२.२००८ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती तसेच उपविभागीय कृषी अधिकारी, अचलपूर यांना पत्र दिलेले आहे व त्यानंतर दिनांक २३.१२.२००८ रोजी अनुरेखक, लेखा शाखा यांना सुध्दा पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक १२.१.२००९ रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती व उपविभागीय कृषी अधिकारी, अचलपूर यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झालेली नाही. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून अधिक्षक तथा शासकीय माहिती अधिकारी यांना दिनांक १०.२.२००९ रोजी एक पत्र दिलेले दिसून येते. त्यामध्ये निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती यांचे न्यायालयातील प्रकरण क्रमांक एमआरसी ८१/ईव्हीआय-०८/०७-०८ अंजनगांवसुर्जी केसबाबत सर्व कागदपत्रांची मागणी केली आहे.त्यानुसार प्रकरणांमध्ये एकूण ३३ पाने असून अर्जदाराला शासकीय नियमानुसार चलानचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरचा भरणा केलेला नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मुळातच जिल्हाधिकारी कार्यालयात असल्यामुळे त्यांनी ती जिल्हाधिकारी कार्यालयात मागणे आवश्यक होते. त्यामुळे अपीलकर्ता यांना ३३ पृष्ठांचा अभिलेखाचा खर्चाचा भरणा करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांनी पृष्ठ ३३ चा भरणा केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातून सदरची माहिती उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून रुपये ६६/- चा भरणा प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे करावा व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातून सदरची माहिती सर्व ३३ पृष्ठे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३३३/अम/२००९.

श्री. घनश्याम पुरुषोत्तम तिवारी,
रा. पार्वतीनगर, नं. २, आकोली रोड,
ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गुलाबराव पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
शिवाजीनगर, जि. अमरावती.

श्री. सुधाकर पु. फुलझेले,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
शिवाजीनगर, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. सुनील देशमुख, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन मंडळ, अमरावती विभाग यांचेकडे श्री. विनोद लक्ष्मीनारायण मिश्रा (सहाय्यक कारागीर) विभागीय कार्यशाळा, राज्य परिवहन मंडळ, अमरावती सेवा पुस्तकाची प्रमाणित नकलाची सर्व नोंदीसह डयुप्लीकेट सेवापुस्तक देण्यात यावे. सदरची माहिती टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.१०.२००८ रोजी सर्व झेरॉक्स प्रतीची तसेच पोस्टेज स्टॅम्पची रक्कम रुपये ४६/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक ३.११.२००८ रोजी रुपये ४६/- चा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांना माहिती चुकीची मिळाली अशा प्रकारे तक्रार केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा आदेश दिनांक १२.१२.२००८ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय

उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती २० पृष्ठे उपलब्ध करुन दिली व त्यांचेकडून रुपये ४६/- घेण्यात आले व त्यानंतर जी माहिती उपलब्ध करुन दिली ती अपूर्ण आहे किंवा सेवापुस्तकामध्ये काही नोंदी केल्या नाही व त्याबद्दलची तक्रार त्यांनी केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. सुनिल देशमुख, वकील यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जशी माहिती उपलब्ध आहे तशी उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीसुध्दा त्यांच्या मुद्यांच्या संदर्भामध्ये दिनांक १२.१२.२००८ रोजी मुद्ये निहाय खुलासा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सेवापुस्तकामध्ये संपूर्ण नोंदी घेतल्या नाही व ज्या आहेत त्या चुकीच्या आहेत. याचा अर्थ अपीलकर्ता यांची तक्रार गुणवत्तेच्या बाबत दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे अर्ज करते वेळेस ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्या स्वरुपात ती उपलब्ध होते. त्यातही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन किंवा नव्याने माहिती तयार करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. अपीलकर्ता यांच्या सेवापुस्तिकामध्ये त्यांचे म्हणण्याप्रमाणे अपूर्ण नोंदी असतील किंवा चुकीच्या नोंदी असतील त्याकरिता त्यांनी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणामधील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करणे किंवा न्यायालयामध्ये तक्रार करणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांना जशी माहिती आहे तशी उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना जशी माहिती आहे तशी माहिती उपलब्ध झाली आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४१/अम/२००९.

श्री. विठ्ठलराव महादेवराव गावंडे,
रा. मरोडा, ता. आकोट,
जि. अकोला. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. यु. एम. लाडोळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, आकोट,
जि. अकोला.

श्री. वसंत वानखेडे,
जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, आकोट,
जि. अकोला. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अकोट यांचेकडे दिनांक ३०.४.२००८ रोजी शिक्षक रविंद्र कापसे हयांनी मराठी शाळेच्या मस्टरप्रमाणे ६ दिवसाची रजा भोगली असून त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात कोणी नोंदविण्यास कसूर केली त्यांच्यावर उचित कार्यवाही करणेकरिता वरील तारखेला शाळेच्या मस्टरसह तक्रार केली होती. त्यावर आपल्या स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली त्या आदेशाची व टिपणीची संपूर्ण प्रत व मी केलेल्या तक्रारीची दिनांक ३०.४.२००८ प्रत सुध्दा देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती देण्यास विलंब झालेला आहे त्यामुळे विनामुल्य माहिती द्यावी. अहवालात नमुद केल्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या मुद्यांवर दिनांक १७.२.२००९ च्या आत अपीलकर्ता यांना माहिती द्यावी असा

आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आता पर्यंत त्या तक्रारीची चौकशी झाली नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक १८.३.२००९ रोजी माहिती दिली आहे. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयामध्येच विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा निष्कर्ष काढण्यात आलेला असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना तक्रार अर्जाचे संबंधित विषयाच्या बाबुनी रुपये १००००/- घेऊन गहाळ केले असून गेल्या ८ महिन्यापासून तक्रारी नंतर कार्यवाही केली नसल्याची अकोट पंचायत समितीच्या कार्यालयात चर्चा असून त्याची शहानिशा करणेकरिता व अकोट न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करण्याकरिता माहिती हवी आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे अर्ज मुळात चौकशी करिता नाही असे दिसून येते व त्याबाबत संबंधित लिपिक यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित तक्रारीची चौकशी ही २ वर्षात करण्यात आलेली नसल्यामुळे ती चौकशी त्वरित करणे आवश्यक आहे असे दिसून येते. माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>ा दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३३९/अम/२००९.

श्री. नारायणराव काशीराम महल्ले,
रा. दत्त मंदीराजवळ, गणेशनगर,
जुने शहर, डाबकी रोड, ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अकोला.

श्री. एस. एच. वाकोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ राजी शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे पत्र क्र. माध्य ब/३२००९/०८, दिनांक २२.८.२००८ नुसार संबंधित शाळांची चौकशी आपणास करावयास सांगून त्या चौकशी अहवालाचे अनुषंगाने तपासणी करुन वस्तुनिष्ठ अहवाल तात्काळ सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार आपण मला सदर चौकशीचा वस्तुनिष्ठ अहवाल माहितीचे अधिकारात देण्यात यावा अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांच्या गैरहजेरीमुळे अपीलाची सुनावणी झाली नाही व त्यांना दिनांक २३.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध आहे घेऊन जावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती घेऊन गेले नाही. परंतु तत्पुर्वी दिनांक २३.२.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, आता पर्यंत त्यांचे अर्जावर चौकशी झाली नाही व माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिली नाही. वास्तविक कोणत्याही प्रकरणामध्ये कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. परंतु चौकशी झाली आहे किंवा नाही याबाबत सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी काहीही अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येत नाही व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती

अधिकारी हे दोषी आढळून येतात.  त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे.  मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतर वस्तुनिष्ठ चौकशी करुन अहवाल प्राप्त झाला असल्यामुळे सदरच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.  त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत वस्तुनिष्ठ चौकशी अहवालाची प्रत विनामुल्य टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.  सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **<u>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला</u>** यांनी करावयाची असल्यामुळे त्यांचेकडे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४२/अम/२००९ व अपील क्रमांक १३४३/२००९.

श्री. अशोक आनंदराव नागमोते,
रा. कास्तकार संकुल क्र. १,
संतोषनगर, गुरुकुल नगरी,
ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
ता. जि. अमरावती.

श्री. खवले,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
ता. जि. अमरावती.

श्री. खवले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
ता. जि. अमरावती.

श्री. अनिल जंवजाळ,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वरुड,
जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ४.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दोनही द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १६.१२.२००८ रोजी दोन अर्जाचे माध्यमातून शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती व शासकीय माहिती अधिकारी तथा उपअभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वरुड, जि. अमरावती यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये प्रकरण ३ कलम ८ नुसार वरुड ते आमनेर (नागपूर) मार्गाकरिता तयार करण्यात आलेल्या नकाशाची प्रत ज्यामध्ये मार्ग सिमा आणि पुरोभाग रेषा व नियंत्रण रेषा लांबी रुंदी इत्यादी तपशील दर्शविणारी शेवटी दुरुस्त केल्याची तारीख दर्शवून नकाशावर मार्ग प्राधिकरण यांचा शिक्का व सही असलेल्या नकाशाची प्रमाणित प्रत पुरविण्यात यावी. २) वरुड ते आमनेर रोडच्या (मार्गाच्या) कडेला नेटवर्क कंपनीने शासन निर्णय क्र. डीआयटी/फाईल/०३/३३६ मंत्रालय मुंबई - ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २००६ नुसार नेटवर्क टाकण्याकरिता संबंधीत कंपनीने मागविलेल्या परवानगी अर्जासोबत जोडण्यात आलेल्या नेटवर्क नकाशाची व जमीनीच्या मालकीच्या तपशीलाची माहिती. तसेच माहिती तंत्रज्ञान संचनालय यांनी नेटवर्क कंपनीला दिलेली परवानगी व सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती यांचे सोबत केलेल्या अटी व शर्तीसह नेटवर्क टाकण्याकरिता परवानगी दिलेल्या आदेशाची प्रत पुरविण्यात यावी. १) आपले कार्यालयीन पत्र क्र. ३३, दिनांक ५.१.२००७ नुसार ढगा ते उदापूर हा ग्रामीण मार्ग क्रमांक १२६ म्हणून अस्तित्वात आहे. मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ ग्राम मार्ग प्रकरण ३ मधील कलम ७ पोटकलम (२) अन्वये ग्राम मार्ग बांधकामाबाबत तहसील कार्यालय, वरुड ग्राम पंचायत कार्यालय ढगा येथे महामार्ग बांधकामाबाबत प्रसिध्द करण्याकरिता पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत व रस्ता बांधकामबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेची प्रत पुरविण्यात यावी. २) महामार्ग अधिनियम, १९५५ ग्राम मार्ग प्रकरण कलम ८ अन्वये ग्राममार्ग ज्या क्षेत्रातून जातो त्या क्षेत्राचा नकाशा ज्यामध्ये महामार्ग (ग्राममार्ग) सिमा अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक तपशीलाच्या खुणा त्यामध्ये फेरफार केला असल्यास फेरफार केल्याचे तारखेसह ग्राममार्ग प्राधिकरणाच्या सही शिक्यासह ग्रामीण मार्ग क्रमांक १२६ (ढगा ते उदापूर) नकाशाची प्रमाणित प्रत पुरविणे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या दोनही अर्जाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक २७.१.२००९ रोजी व दिनांक १५.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु दोनही उत्तरामधून समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी व दिनांक ९.२.२००९ रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. दोनही प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २.३.२००९ व दिनांक २४.२.२००९ रोजी निर्णय देण्यात आलेला असून अर्जदारास १५ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच मागणी केलेला दस्तऐवज उपलब्ध नसल्यास तसे अर्जदारास कळविण्यात यावे व दुसरे अपील हे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे फेटाळण्यात आलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केली.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही नकाशाचे स्वरुपात उपलब्ध झाली नाही तसेच मुंबई मार्ग अधिनियम, १९५५ प्रमाणे महामार्गाचे संदर्भामध्ये किंवा रस्त्यांचे संदर्भामध्ये कलम ८ प्रमाणे नकाशा तयार करणे आवश्यक असते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे रस्ते हे अतिशय जुने आहेत. अधिनियमाचे कलम ३ प्रमाणे महामार्ग ८ जिल्हा परिषद ग्राममार्ग व त्या असलेल्या रस्त्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा पुर्वीचे कलम ३ प्रमाणे नोटीफिकेशन काढले नाही त्यामुळे कलम ८ प्रमाणे नकाशा सुध्दा उपलब्ध नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांच्या माहिती प्रमाणे १९६५ मध्ये त्यांचे वडिलांनी रस्त्याकरीता जमीन दान केलेली आहे अशी त्यांची माहिती आहे. परंतु लेखी पुरावा नाही. जर अपीलकर्ता यांचे म्हणणे खरे असले तर अर्थात भुसंपादनाची कार्यवाही झाली नसावी व ग्रामीण मार्ग उपलब्ध असल्यामुळे त्या संदर्भात नोटीफिकेशन झाले नसावे. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी असे आयोगाचे निदर्शनास आणले की, ही दोनही रस्ते दुरुस्त करण्याचा प्रस्ताव त्यांचे कार्यालयातून झालेला आहे यावरुन दोनही रस्त्यांची दुरुस्ती लांबी व रुंदी असणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्या दोनही रस्त्याचे संदर्भात दुरुस्तीकरिता जे एस्टिमेट उपलब्ध असेल त्या एस्टिमेटची प्रत देण्यात यावी व एम.बी.ची प्रत देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांनी दोनही रस्त्यांच्या संदर्भातील नस्तीचे निरिक्षण करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी कामाकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्या वेळेस उपस्थित राहून दोनही नस्त्यांचे निरिक्षण करावे व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या.

२) अपीलकर्ता यांनी तारीख व वेळ कळविल्यावर त्या वेळेस जनमाहिती अधिकारी यांनी कर्मचारी/अधिकारी यांचे उपस्थितीमध्ये अपीलकर्ता यांना नस्तीचे अवलोकन द्यावे व आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४०/अम/२००९.

श्री. राजकुमार दिगांबर इंगळे,
रा. वल्लभनगर, पो. सांगवीखुर्द,
ता. जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अश्विन मानकर, विस्तार अधिकारी (शिक्षण) हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. अभिजित बन्नोरे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) तालुक्यातील केंद्र प्रमुखांनी किती दिवस शिकवले त्याची लेखी माहिती व किती दिवस आजारी रजा घेतली सात दिवसात लेखी स्वरुपात देण्यात यावी. २) प्रभार कोणाकडे त्या शिक्षकाने त्या दिवसात शिकवल्याची माहिती. ३) केंद्र प्रमुखांचा आजारी रजेचा व पगार सन २००३ ते २००८ त्याची लेखी माहिती देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः पंचायत समिती कार्यालयात बोलावून देण्यात यावी. दारिद्रय रेषेखालील कार्ड सादर केलेला आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.३.२००९ रोजी देण्यात आलेला आहे. त्यात मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती देण्यात आली. मुद्या क्रमांक ३ ची माहिती अपीलकर्त्यास दिनांक १७.३.२००९ पर्यंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले आहे. परंतु जी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली त्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती दिशाभूल करणारी आहे व समाधानकारक नाही. त्यांना केंद्र प्रमुखांचे विषयाची संबंधित माहिती मागितलेली होती व त्यांना ती माहिती निरंक म्हणून कळविली नाही. परंतु केंद्र प्रमुखांनी रजा घेतली होती व त्याबद्यलचा त्यांचे जवळ पुरावा आहे व तो त्यांनी आयोगास दाखविला. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्ज आल्यानंतर तत्कालीन जनमाहिती माहिती अधिकारी यांनी (१ ते १७) केंद्र प्रमुखांना माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र दिले होते. त्याचे उत्तर दाखल केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने सर्व केंद्र प्रमुखांकडून माहिती उपलब्ध झाल्यानंतर दिनांक २०.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेतली नसल्यामुळे प्रथम अपीलाचे निर्णयानंतर पुन्हा संक्षिप्त माहिती त्यांना कळविण्यात आली. परंतु केंद्र प्रमुखांनी कळविलेली माहिती व अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिलेली माहिती यामध्ये निश्चितच तफावत आहे व त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक २९.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना सर्व केंद्र प्रमुखांकडून आलेल्या उत्तराच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेण्याकरिता कळविले होते. परंतु त्यांनी ती उपलब्ध करुन घेतली नाही व त्यानंतर सेवापुस्तकातून ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही. परंतु सेवापुस्तकात कोणतीही नोंद घेतली नाही असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना वेगळी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना सर्व केंद्र प्रमुखांकडून आलेल्या उत्तरांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५०/अम/२००९.

श्री. शेषराव जयवंत आवसरमोल,
रा. ब्राम्हण चिकना, पो. सोमठाणा,
ता. लोणार, जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी (मुद्रांक),
बुलढाणा.

श्री. जे. व्ही. भोंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक
ता. लोणार, जि. बुलढाणा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. सु. दे. रहाटे, सहाय्यक नगर रचनाकार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, लोणार यांचेकडे दिनांक १ जानेवारी १९९७ ते ३१ डिसेंबर २००६ पर्यंत स्थावर मालमत्तेच्या खरेदी विक्रीची माहिती या माहितीची योग्य ती फी मला कळवावी. मला २३ नकलांची फी कळवू नये ही माहिती वैयक्तिक स्वातंत्र्य व जिवीताशी निगडीत असल्यामुळे हा अर्ज मिळाल्यापासून ४८ तासाच्या आंत पाठविण्याची विनंती आहे. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.१२.२००८ रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने शासन निर्णय नियम क्रमांक १७(क) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची माहिती या आधिच जनतेकरिता उपलब्ध आहे. तसेच नोंदणी अधिनियम कलम ५७ अन्वये आपले अर्जात नमुद असलेल्या माहितीचे अभिलेख पाहणेसाठी या कार्यालयात उपलब्ध असून आपण योग्य ती शोध फी भरुन व शोध घेऊन पाहिजे असलेल्या नक्कलेकरिता विहित नमुन्यात अर्ज करुन मागणी करु शकता. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १९.१.२००९ रोजी आपण अपील सुनावणीस हजर राहिले नाही त्यामुळे संदर्भ क्रमांक ३ अन्वये दुय्यम निबंधक श्रेणी-१, लोणार यांनी आपणास पाठविलेल्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे नोंदणी अधिनियम कलम

५७ अन्वये शोध फी भरुन पाहिजे असलेल्या नकलेसाठी विहित नमुन्यात नक्कल अर्ज देऊन नियमाप्रमाणे नक्कल फी जमा करुन नक्कल घ्यावी. करिता आपला अपीलीय अर्ज निकाली काढण्यात आला असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी अशा प्रकारे शोध न घेता पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना सदरची माहिती त्यांच्या स्वतःच्या सावकारी प्रकरणाचे संदर्भामध्ये पुरावा म्हणून पाहिजे आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. जनमाहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, लोणार यांचेकडून माहिती घेतली असता त्यांचे कार्यालयात दिनांक १.१.१९९७ ते ३१.१२.२००६ या कालावधीत खालील प्रमाणे दस्तांची नोंदणी झालेली आहे.

| **वर्ष** | **दस्त संख्या** |
|---|---|
| १९९७ | १७७६ |
| १९९८ | १४८२ |
| १९९९ | १७८२ |
| २००० | १९२८ |
| २००१ | २२२६ |
| २००२ | २६२५ |
| २००३ | २१८१ |
| २००४ | २१९४ |
| २००५ | २४३४ |
| २००६ | २४६४ |
| **एकूण** | **२१०९२** |

अर्जदारास २१०९२ दस्तापैकी नेमक्या कोणत्या खरेदी विक्री व्यवहारांची माहिती पाहिजे आहे हे त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केलेले नाही. तसेच कोणत्या वर्षातील अथवा कोणत्या गावातील खरेदी विक्री व्यवहाराची माहिती पाहिजे हे सुध्दा अर्जात नमूद केलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा उपलब्ध अभिलेखावरुन शोध घेणे आवश्यक होते. त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, लोणार यांनी अर्जदार यांना कळविले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अर्जदार यांना त्याप्रमाणे कळविले आहे. तथापी अर्जदार यांनी वरील प्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा शोध न घेता किंवा नेमक्या

माहिती बाबत काहीही न कळविता मा.राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दुसरे अपील दाखल केले आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, १० वर्षाची माहिती ही फक्त व्यवहार असून त्यांना एका ओळीत त्यांनी तयार करुन द्यावी. परंतु अशी माहिती तयार करुन देण्याची तरतुद अधिनियमात नाही. माहिती जशी आहे तशी ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध होते. तसेच माहिती ही मोघम मागितली असली तरी "माहितीचा अधिकार" या व्याख्येप्रमाणे आधी निरिक्षण करावे व नंतरच छायांकित प्रती द्याव्या

.

.. ४



अशी कार्यपध्दती आहे व त्या कार्यपध्दती प्रमाणे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिनियम ४(१)(ए) प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी योग्यरित्या कळविले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५१/अम/२००९ व अपील क्रमांक १३५२/अम/२०१०.

श्री. भिकाजी मोतीराम वरोकार,
फुलेनगर, ता. शेगांव,
जि. बुलढाणा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जि. बुलढाणा.

श्री. एन. आर. झिने,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
ता. जि. बुलढाणा.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. खामगांव, जि. बुलढाणा.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. खामगांव, जि. बुलढाणा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांचे तर्फे श्री. पी. आर. गीते, पोलीस निरिक्षक, शेगांव हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

... २

२.	अपील क्रमांक १३५१/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००८ रोजी जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयात जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक १.९.२००८ चे जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालयामधून आलेल्या पत्राबाबत सविस्तर खुलासा मिळणेबाबत. मी दिनांक १.९.२००८ रोजी जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालयाकडे अर्ज केला होता व त्यामध्ये कलम १९७ सहाय्यक निबंधक श्री. पगारे, शेगांव व सहकार अधिकारी श्री. महेश कृपलानी यांचे विरुध्द फौजदारी करण्याकरिता परमिशन मागितली होती ते अधिकार आपले कार्यालयास असल्याने ती चौकशी होऊन परमिशन देण्याकरिता आपल्याला पत्र दिले होते. परंतु आजपर्यंत मला परमिशन मिळाली नाही. त्याकरिता मला सविस्तर लेखी स्वरुपात माहिती द्यावी. सदरची माहिती रजिस्टर पत्राद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.३.२००९ रोजी देण्यात आला असून त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपीलार्थी श्री. वरोकार यांच्या माहिती अधिकार अर्ज दिनांक २८.१२.२००८ व त्यासोबत जोडलेले मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दिनांक १०.९.२००८ चे पत्राबाबत अधिकची व सविस्तर माहिती आपल्या माहितीस्तव पुढील प्रमाणे सादर करीत आहे. अपीलार्थी श्री. वरोकार यांनी श्री. पुनीत शंकरलाल धानुका व सौ. संगिता रमण पल्हाडे, रा. शेगांव यांचेविरुध्द अवैध सावकारी व्यवहारातून त्यांची जमीन हडप केल्याबाबत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. शेगांव यांचे कार्यालयाकडे दिनांक ४.८.२००६ रोजी तक्रार दाखल केली. मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर मधील दाखल रिट याचिका क्रमांक २३४६/२००६ वरील निर्णयानुसार जमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत बाबतचा वाद दिवाणी न्यायालयाचे कार्यकक्षेतील असल्यामुळे सहाय्यक निबंधक यांनी सदर प्रकरणामध्ये निर्णय देऊ नयेत असे निर्देशित केले असल्यामुळे सहाय्यक निबंधक, शेगांव यांनी श्री. वरोकार यांचा तक्रार अर्ज दिनांक ७.१.२००८ रोजी खारीज केला. तत्पुर्वी सहाय्यक निबंधक, शेगांव यांनी सदर तक्रार अर्जावर त्यांचे कार्यालयात अर्जदार व गैरअर्जदार यांच्या प्रत्यक्ष सुनावण्या घेतल्या होत्या. परंतु श्री. वरोकार यांनी त्यांचे शेत श्री. धानुका यांना नोंदणीकृत खरेदीखत करुन विक्री केलेले होते. त्यामुळे सहाय्यक निबंधक, शेगांव यांनी श्री. वरोकार यांच्या तक्रार अर्ज खारीज केला. सदर अर्ज सहाय्यक निबंधक, शेगांव यांचेसमोर प्रलंबित असतांना मुख्य प्रकरणामधील गैरअर्जदार श्री. धानुका यांचे जबाबामधील सहया त्यांच्या नाहीत असा आक्षेप श्री. वरोकार यांनी घेतल्यामुळे हया सहया तपासणीसाठी तज्ञांकडे पाठविण्यांत आल्या. परंतु सदर कार्यालयास सदर पत्र मिळाले नाही. त्यामुळे श्री. वरोकार यांनी सहाय्यक निबंधक श्री. पगारे व सहकार अधिकारी श्रेणी-१ श्री. कृपलानी यांचेविरुध्द दिनांक १.९.२००८ रोजी तक्रार केली व त्यांचे विरुध्द फौजदारी कारवाईची परवानगी मिळण्याची मागणी केली. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडून श्री. वरोकार यांच्या तक्रार अर्जाची चौकशी करणे बाबतचे आदेश प्राप्त झाले. मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दिनांक १०.९.२००८ चे पत्र व त्यासोबत श्री. वरोकार यांच्या दिनांक १.९.२००८ च्या तक्रार अर्जाची प्रत या कार्यालयास प्राप्त झाली. सदर पत्रात नमुद केल्यानुसार सहाय्यक निबंधक श्री. व्हि. आर. पगारे व सहकार अधिकारी श्री. महेश कृपलानी यांचेवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ प्रमाणे फौजदारी कारवाई करण्यास श्री. वरोकार यांनी परवानगी मागितली होती. सदर प्रकरणाची चौकशी करणेबाबत श्री. आर. टि. अंभोरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. मोताळा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ११९६५/२००८, दिनांक २३.९.२००८ रोजीच्या पत्रान्वये सुचित करण्यांत आले होते. श्री. अंभोरे यांचा चौकशी अहवाल दिनांक २.१२.२००८ रोजी प्राप्त झाला. त्यापुर्वी मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे दिनांक १७.१०.२००८ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले होते व त्यासोबत श्री. वरोकार यांचा दिनांक ११.१०.२००८ चा अर्ज जोडलेला होता व त्यामध्ये त्यांनी श्री. अंभोरे यांचे चौकशीबाबत आक्षेप नोंदविला होता. पुढे याच प्रकरणी विधान परिषद नियम ९३ अन्वये सुचना करण्यांत येऊन शासनाचे पत्र दिनांक २३.१२.२००८ चे पत्रानुसार या प्रकरणांत वेगळा अधिकारी नेमून चौकशी करण्याबाबतचे

आदेश देण्यांत आलेले होते. श्री. वरोकार यांनी सहाय्यक निबंधक श्री. व्ही. आर. पगारे व सहकार अधिकारी श्री. महेश कृपलानी यांचेवर केलेल्या आरोपांची चौकशी करण्याची कार्यवाही सुरु होती व वर नमुद केल्याप्रमाणे शासनाचे पत्र दिनांक २३.१२.२००८ चे पत्रानुसार या प्रकरणांत वेगळा अधिकारी नेमून चौकशी करण्याबाबतचे आदेश देण्यात आलेले असल्यामुळे श्री. अंभोरे यांचे अहवालाची छाननी करण्यासाठी तसेच प्रकरणाची चौकशी करण्यासाठी श्री. एन. आर. झिने, सहाय्यक निबंधक (प्रशासन) यांना आदेशीत करण्यांत आले. याप्रमाणे सुरु असलेल्या कार्यवाहीचा अहवाल श्री. वरोकार यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ३५८६/०९, दिनांक ५.३.२००९ नुसार कळविण्यांत आला आहे. श्री. झिने यांचा अहवाल दिनांक २५.५.२००९ रोजी प्राप्त झाला. सदर अहवालामध्ये फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष आहे. तथापि परत या प्रकरणात जिल्हा सरकारी वकील तथा शासकीय अभियोक्ता, बुलढाणा यांचे अभिप्राय घेण्यांत आले. जिल्हा सरकारी वकील तथा शासकीय अभियोक्ता, बुलढाणा यांनी त्यांचे अभिप्रायानुसार सदर प्रकरणांत श्री. पगारे व श्री. कृपलानी यांचेविरुध्द भा.दं.वि. कलम १९७ प्रमाणे फौजदारी कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असा अभिप्राय दिला आहे. त्यानंतर या प्रकरणांत दिनांक २८.१०.२००९ रोजी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना अहवाल सादर करण्यांत आला व त्याची प्रत श्री. वरोकार यांना देण्यांत आली आहे. यानंतर श्री. वरोकार यांनी मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा.पुणे यांचेकडे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) श्री. झिने, सहाय्यक निबंधक, शेगांव श्री. पगारे व श्री. कृपलानी यांचेविरुध्द तक्रार दाखल केली. सदर तक्रारीची चौकशी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी केली या चौकशीमुळे समाधान न झ ााल्यामुळे त्यांनी परत अर्ज केल्यामुळे मा.सहकार आयुक्त यांचे निर्देशाप्रमाणे मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती हे या प्रकरणाची चौकशी करीत आहेत व प्रकरण त्यांचेसमोर आहे. वरील प्रमाणे श्री. वरोकार यांना त्यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे यथोचित कार्यवाही करुन वेळोवेळी झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पुरविण्यांत आलेला आहे. वरील खुलाश्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती ही दिनांक २८.१०.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. तत्पुर्वी सुध्दा कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नव्हती. तरीही त्यांना कळविले होते. चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे अभिप्रेत नाही. तरीसुध्दा त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३५२/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांचे कार्यालयामध्ये क्रमांक खा.वि./उपविपोअ/ अ.चौ./५५८२ नुसार कार्यालय उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव यांनी दिलेल्या अभिप्रायाची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत. मी दिनांक २६.११.२००८ रोजी मा.पो.अ.सा.कार्यालय, बुलढाणा यांचेकडे केलेल्या अर्जावरुन आपण माझे कागद पत्राची छाननी करुन जो अभिप्राय वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला त्याची एक झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली मला देण्यात यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली व त्याबद्दलची पोच सुध्दा अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. परंतु अभिप्रायाची प्रत मिळाली नाही या कारणासाठी दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलामध्ये त्यांना अभिप्रायाची प्रत मिळाली नाही या मुद्यांचा विचार न करता माहिती मिळाली आहे या कारणास्तव सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. क्र.खावि/उपविपोअ/अ.चौ/५५८२/०८, कार्यालय उपविभागीय पोलीस अधिकारी, खामगांव दिनांक १९.१२.२००८ यांनी दिलेल्या अभिप्रायाची झेरॉक्स प्रत मिळण्याबाबत कारण दिलेले आहे.

५. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना त्यांना मिळालेले सर्व कागदपत्रांच्या प्रती आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु त्यामध्ये मागितलेल्या अभिप्रायाची प्रत मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती मिळाल्याची पोच त्यांनी

दिलेली आहे असे आयोगापुढे सांगितले. परंतु अभिप्रायाचे प्रतीबद्यल कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी अपील कां केले आहे या कारणाचा विचार करुन निर्णय द्यावयाचा असतो. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे म्हणून अपील खारीज करण्यात येते याप्रमाणे कोणत्याही प्रकारचे आदेश न होता निर्णय देणे हे योग्य नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या अभिप्रायाची प्रत मिळणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३५१/अम/२००९ हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३५२/अम/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सदरच्या अभिप्रायाची प्रत विधी अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सि. पी. शिरोळे यांनी वरील प्रकरणांत चौकशीचे कागदपत्रावरुन सहाय्यक निबंधक यांचे संदर्भामध्ये योग्य अपराधी कृत्य घडले नसल्याचे दिसून आले व तसा अभिप्राय पोलीस स्टेशन, शेगांव यांचेकडे पाठविला असल्याची प्रत विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३४९/अम/२००९.

कु. छाया मुरलीधर गायकवाड,
द्वारा - श्री. दिलीप भालेराव,
१००, स्वप्नील निवास, जोशीनगर,
घाटपूरीनाका, ता. खामगांव,
जि. बुलढाणा - ४४४ ३०३. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. एस. पी. कर्वे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहआयुक्त,
अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
ईर्विन चौक, जि. अमरावती.

श्रीमती बोंद्रे,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
ईर्विन चौक, जि. अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २५.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपसंचालक तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती जाती पडताळणी समिती, अमरावती यांचेकडे सन २००३ ते २००८ आजतागायत ठाकूर हया अनुसूचित जमातीचे किती जात प्रमाणपत्रे वैध ठरतील ते कोणत्या निकषावर व अवैध ठरलेल्यांची कारणे. माझे दिनांक २०.१२.२००७ चे जात प्रमाणपत्र पडताळणीचे आपणाकडे सादर केलेले प्रकरण याबद्यल एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक १२.११.२००८ रोजी अंशतः माहिती दिली. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयात माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून अपीलकर्ती यांचे अपील हे फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणीची सादर केलेल्याचे संदर्भात त्यांनी मागितली आहे व अद्याप पर्यंत त्यांच्या प्रकरणाची पडताळणी झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अर्जदारास मुद्या क्रमांक १ मधील वैध प्रकरणांची माहिती दिनांक १०.१२.२००८ रोजीच पुरविलेली होती व त्यांच्या दिनांक १०.१२.२००८ रोजीच्या पत्रानुसार उपरोक्त नमुद मुद्या क्रमांक १ मधील उर्वरित माहितीचे विहित शुल्क रुपये ४२/- व टपाल खर्चाचे रुपये ७५/- असे एकूण रुपये ११७/- या कार्यालयात जमा करुन माहिती घेऊन जाण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक ९५३१, दिनांक २४.१२.२००८ अन्वये कळविले होते. तथापि अर्जदार यांनी विहित शुल्क जमा करुन माहिती नेलेली दिसत नाही. अर्जदाराने केलेली मागणी लक्षात घेता अर्जदाराचे उपरोक्त नमुद अपील पुढील कारणास्तव खारीज करण्यात यावे ही विनंती. अ) अपीलकर्तीने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या अपील अर्जात नमुद केले आहे की, माहिती अधिकारी यांनी नमुद केलेल्या कालावधीत म्हणजेच ५ दिवसांत (त्यांच्या वैयक्तिक जिवीताशी संबंधित असल्याने) माहिती पुरविली नाही. मला सदर अर्ज दिनांक ४.११.२००८ रोजी प्राप्त झाला. त्याचदिवशी संबंधित कर्मचाऱ्यांना ती माहिती सादर करावयास सुचित केले. त्यांचेकडून मला दिनांक १२.११.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली त्यातच दिनांक ९.११.२००८ रोजी रविवार सुटी होती. माहिती प्राप्त झाल्यावर तात्काळ मी दिनांक १२.११.२००८ रोजीच अर्ज निकाली काढला. विनाकारण अर्ज निकाली काढण्यात कसूर केलेली नाही शिवाय सदर बाब अर्जदाराच्या जिवनाशी निगडीत नाही. अर्जदाराच्या अर्जावर विहित वेळेत उत्तर देण्यात आलेले आहे. ब) अर्जदारास चुकीची, दिशाभूल करणारी किंवा अपूरी माहिती पुरविलेली नाही. क) अर्जदाराने मागितलेली मुद्या क्रमांक २, ३ व ४ ची माहिती ही माहितीच्या व्याख्येत बसत नाही. अर्जदार यांनी मुद्या क्रमांक २ ते ४ नुसार माहिती अधिकारी यांना अशा स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. जेणेकरुन माहिती अधिकारी यांना प्रश्न वाचून त्यावर स्वतःचे मत द्यावे लागेल जे माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अपेक्षित नाही. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(च) अन्वये कार्यालयात जी माहिती अभिलेख्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे अशीच माहिती पुरविणे अपेक्षित आहे. न्यायालयीन याचिका क्रमांक ४१९/२००७ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपिठाने (२००८(३)AIR BOM R ३४३) निर्णय देतांना सांगितले आहे की, Information has been defined by Section २(f) as follows :- "Section २(f) - Information means any material in any form, including record, documents, memos, e-mails, opinions, advices, pressreleases, circulars, orders, logbooks, contracts, reports, papers, samples, models, data material held in any electronic form and information relating to any private body which can be accessed by a public authority under any other law for the time being in force."

The definition cannot include within its fold answer to the question "Why" which would be the same thing as asking the reason for a justification for a particular thing. The Public Information Authorities cannot expect to communicate to the citizen the reason why a certain thing was done or not done in the sense of a justification because the citizen makes a requisition about information. Justifications are matter within the domain of adjudicating authorities and cannot properly be classified as information. त्यामुळे अशा प्रश्नार्थक स्वरुपाची विचारलेली माहिती

.. ४

कलम २(च) अन्वये माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याने तसेच उपरोक्त नमुद न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने फेटाळण्यात आली आहे. ड) अशाच प्रकारच्या अपील अर्जामध्ये निर्णय देतांना नागपूर खंडपीठाच्या माहिती आयुक्तांनी अपील अर्ज फेटाळलेले आहे व समान खंडपीठाचा निर्णय सदर अपील निकाली काढतांना विचारात घेणे योग्य राहील अशी धारणा आहे. सदर निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे व त्यात या प्रकरणांशी संबंधित खालील दिलेल्या मुद्यान्वये अपील अर्ज खारीज करण्यात यावे ही विनंती. a) मा.राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांनी दिनांक ५.४.२००८ ला सौ. संध्या गजानन इंगळे, राजू मधुकर इंगळे, गजानन मधुकर इंगळे विरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांच्या दिलेल्या निर्णयातील खालील २ मुद्यांचा विचार करण्यात यावा. i) अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भात अभिप्राय मागणे अपेक्षित नाही व तसेच अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या अनुषंगाने अपीलकाराचे स्वतःचे जात प्रमाणपत्र तपासणी प्रकरण सुरु आहे ही बाब लक्षात घेता त्यावरुन सदरची माहिती ही स्वहिताकरिता मागितलेली दिसून येते. ii) ठाकूर जमातीच्या संदर्भात प्रश्न विचारुन माहिती मागण्याचा हेतु स्पष्ट स्वहिताचाच दिसतो. समितीच्या कामकाजाची माहिती असूनसुध्दा समितीवर अनेक आरोप करुन अनेक अर्जाच्या माध्यमातून दबाव आणून संबंधितांचे जातपडताळणी प्रमाणपत्रे मिळविणे असाच दिसतो व त्यामुळे समाजाच्या व्यापक हिताकरीता नसून स्वहिताकरिता गैरवापर करुन हेतू साध्य करणे असा दिसतो. b) त्याच प्रमाणे श्री. रमेशकुमार व्यंकटस्वामी पोन्ना विरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांच्या प्रकरणात दिनांक ५.३.२००८ रोजी दिलेल्या निर्णयातील खालील ३ मुद्यांचा सुध्दा विचार करावा हि विनंती. i) कोणत्याही प्रकारच्या निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात अंतिम निर्णय मिळवून घेणे हे अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नाही व राज्य माहिती आयोगास सुध्दा तशा प्रकारचे आदेश देणे अधिकार कक्षे बाहेर आहे. ii) मुळातच वॅलिडीटी सर्टिफिकेट हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कोणत्याही तरतुदीप्रमाणे निर्णय होऊन उपलब्ध करुन देता येत नाही. त्याकरिता स्वतंत्र अशी कार्यपध्दती आहे. iii) राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारे निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात आदेश देता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे द्वितीय अपीलातील वॅलिडीटी सर्टिफिकेटची अंतीम कार्यवाहीची मागणी ही मान्य करण्यात येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. सदरच्या खुलाश्यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी योग्य तो निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५३/अम/२००९.

श्री. संतोष प्रल्हादराव खुरद,
मु. पो. भोसा, ता. मेहकर,
जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मेहकर,
जि. बुलढाणा.

श्री. एस. टी. मोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, भोसा,
ता. मेहकर, जि. बुलढाणा. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. व्ही. जाधव, विस्तार अधिकारी, पंचायत हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, भोसा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) आतापर्यंत झालेल्या विकास कामाचा आराखडा. २) रजिस्टर नंबर ६ च्या सर्व नकला. ३) कॅशबुकच्या झेरॉक्स (दिनांक १.१.२००७ पासूनच्या). ४) २००० ते २००८ ग्रामपंचायत टॅक्सपावतीच्या झेरॉक्स प्रतीची व्हिडीओ कॅसेट. ५) ग्रामपंचायतच्या ग्रामसभेत झालेल्या ठरावाच्या नक्कला. ६) आवक जावक जमा आणि वजा खर्चाच्या नकला. ७) जागा मोजमाप प्रसंगी जमा केलेल्या टॅक्सच्या पावती नकला. ८) जून २००७ ते २००८ मध्ये ग्रामपंचायतने कोणाची विहिर अधिग्रहण करुन गावाला शुध्द पाण्याचा पुरवठा केला. हयासंबंधी घेतलेला ठरावाची प्रत (नक्कल). ९) तळयामधील विहिरीमध्ये कोणाच्या घरापासून पुरक पाईप लाईन केली त्यासाठीचा झालेला खर्चाचा तपशील. सदरची माहिती टपालाद्वारे हवी असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१२.२००८ रोजी माहिती मिळण्या संबंधित फी पोस्टेज खर्चासहीत रुपये १०४०/- भरुन ग्रामपंचायतचे

पावती घेऊन जावी असे त्यांना कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन अपीलकर्ता यांना दिनांक ३१.१२.२००८ रोजी माहिती मिळालेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक ६.२.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध आहे ती त्वरित घेऊन जावी. तसेच मुद्या क्रमांक ४ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालय, भोसा येथे अवलोकनार्थ पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच मुद्या क्रमांक ८ ची झेरॉक्स प्रत तयार आहे. तेंव्हा मुद्या क्रमांक २ व मुद्या क्रमांक ८ ची माहिती ग्रामपंचायत भोसा मधून कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामाचे दिवशी निशुल्क घेऊन जावी. तसेच मुद्या क्रमांक ४ ची माहिती निशुल्क पाहण्यास उपलब्ध आहे असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे योग्य ती कार्यवाही जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**र.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६१/अम/२००९.

श्री. सैय्यद मुजोबोद्यीन सै. हबीबोद्यीन,
मस्जीद वार्ड, ता. पुसद,
जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एम. कांबळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
ता. जि. यवतमाळ.

श्री. जी. एन. नाईक,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. पुसद, जि. यवतमाळ. **.....**
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुसद यांचेकडे दिनांक १८.११.२००८ रोजी कलम १०१ वसुलीचा दाखला क्र. १६८९ देतांना आपण गाहण असलेली विवादीत मालमत्तेची स्थळावर जाऊन पाहणी केली आहे काय त्या संदर्भातील एकूण ७ मुद्यांतील माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची मागितलेली असल्यामुळे व व कार्यालयाचे अभिलेखात उपलब्ध नसल्यामुळे सदर माहिती आपणास पुरविण्यास हे कार्यालय असमर्थ आहे असे दिनांक १७.१२.२००८ रोजी कळविण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी प्रश्नार्थक जरी माहिती मागितली असली तरी त्या प्रश्नाचे संदर्भात उपलब्ध असलेली कागदपत्रे अपेक्षित असतात व त्यामुळे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली या कारणासाठी माहिती

नाकारली याचा अर्थ जनमाहिती अधिकारी कोणत्याही प्रकारचे अधिनियमाचे पालन करीत नाही किंवा आकलन नाही असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे असे सांगितले की, प्रश्नार्थक स्वरुपात माहिती असल्यामुळे ती नाकारण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपातील आहे तरी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचे कलम १०१ प्रमाणे जी कार्यपध्दती आहे त्या कार्यपध्दती प्रमाणे वसुलीचा दाखला १६८९ मध्ये जी कार्यपध्दती अवलंबिली असेल त्या कार्यपध्दतीची टिपणी उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे म्हणजे त्यातून अपीलकर्ता यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले असते. परंतु दुर्दैवाने अशा प्रकारे माहिती देण्याचा विचार होत नसल्यामुळे अर्धवट ज्ञानाचे आधारे माहिती नाकारली जाते हे योग्य नाही. ज्या प्रश्नातून जनमाहिती अधिकारी यांचे मत विचारले जाते व सदरचे मत हे कागदपत्रामध्ये उपलब्ध नसते त्यावेळेला त्या प्रश्नाची माहिती देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अधिनियमाच्या तरतुदीचे आकलन केलेले दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना काय अपेक्षित आहे याची चौकशी न करता प्रथम अपील हे खारीज करणे हा त्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांना कलम १०१ वसुलीचा दाखला क्रमांक १६८९ च्या संदर्भामध्ये जी कार्यपध्दती अवलंबिली असेल त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. तसेच जी कार्यपध्दती अवलंबिली जाते त्याची कलम १०१ ची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १०१ च्या वसुलीचा दाखला क्रमांक १६८९ च्या संदर्भामध्ये जी कार्यपध्दती अवलंबिली असेल त्या कार्यपध्दतीची (टिपणीची) छायांकित प्रत. तसेच कलम १०१ व त्या संदर्भात शासनाने केलेल्या कार्यपध्दतीचे नियम त्यांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६३/अम/२००९.

श्री. गजानन किसनराव भडके,
साईश्रध्दा, गजानननगर, पिंपळगांव,
ता. जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

श्री. पी. जी. रोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, यवतमाळ, .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. एम. जे. आत्राम, गटविकास अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ यांचेकडे ग्रामपंचायत, पिंपळगांव येथील सामान्य फंडाचे खाते, १२ व्या वित्त आयोगाचे खाते, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेचे खाते, भष्ट्राचार, हिशेब न देणे इत्यादी कारणास्तव ग्राम पंचायत सदस्यांनी बहुमतांनी उघडू (बदलवू) दिले नाही. सदर खाते उघडण्या संदर्भात पंचायत समितीने जे आदेश दिलेत त्या आदेशाच्या प्रती व त्याबाबत नियम, शासन निर्णय, परिपत्रकाच्या झेरॉक्स प्रती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहितीच्या अर्जाप्रमाणे किंवा प्रथम अपीलाचे माध्यमातून कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही व माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहेच असे विस्तार अधिकारी

यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असतेच असे बऱ्याच वेळा सांगितले. आजही माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी आयोगापुढे हजर नाही. प्रत्येक अपीलाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी हे वेगवेगळया कर्मचाऱ्यांना सुनावणीस पाठवितात. विस्तार अधिकारी आजही हे नागपूर मध्येच आहेत व आयोगाचा निर्णय होईल तो पर्यंत विस्तार अधिकारी म्हणून ते राहतील किंवा नाही किंवा आयुक्त सुध्दा राहतील किंवा नाही असे भाष्य त्यांनी केले असे आयोगापुढे सांगितले. यावरुन एक निष्कर्ष मात्र निश्चित निघतो की, तरतुदीच्या कलम १९(५) च्या अन्वये अर्जदारास माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही जनमाहिती अधिकारी यांची आहे व तरी त्यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसली तरी अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्याची तरतुद आहे व शास्ती लादण्याचे पूर्वी परंतुकाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असते. परंतु आयोगाचे असे निदर्शनास आणले आहे की, जनमाहिती अधिकारी हे आयोगापुढे उपस्थित राहण्याची टाळाटाळ करतात व अन्य कर्मचारी यांना पाठविण्यात येते. त्यामुळे आयोगास शास्ती करावयाची असल्यास जनमाहिती अधिकारी यांचे वैयक्तिक म्हणणे ऐकून घेता येत नाही व त्यामुळेच जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शास्ती लादावी लागते. परंतु आयोगाचे कार्यालयातून जनमाहिती अधिकारी यांना उपस्थित राहण्यासाठी नोटीस काढण्यात येते. याचा अर्थ जनमाहिती अधिकारी यांना उपस्थित राहण्याची संधी देण्यात येते. परंतु ते उपस्थित राहण्याची टाळाटाळ करीत असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी त्यांनी गमावलेली आहे. त्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती करणे हे आवश्यक होते. याप्रकरणात सुध्दा जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी हे आयोगापुढे वैयक्तिकरित्या उपस्थित झाले नसले तरी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे दाखल कागदपत्रावरुन उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी श्री. पी. जी. शेंडे, कक्ष अधिकारी यांनी दिलेल्या तोंडी जबाबावरुन दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला नाही व त्यांनी सुध्दा अधिनियमाचे तरतुदीचे व शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना दिनांक २४.३.२००९ रोजी पाठविण्यात आलेली आहे. माहितीचे अवलोकन केले असता ती योग्य आहे. परंतु विलंबाचे कारणासाठी शास्ती करणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांत मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूली त्यांच्या दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" यामध्ये जमा करण्यात यावे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६२/अम/२००९.

श्री. सैय्यद मुजीबोद्दीन सै. हबीबोद्दीन,
मस्जीद वार्ड, ता. पुसद, जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. एस. बल्की,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवन संरक्षक, वन विभाग,
ता. पुसद, जि. यवतमाळ.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक (तेंदु),
वन विभाग पुसद,
जि. यवतमाळ, .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. फुलझेले, सहाय्यक वनसंरक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वनविभाग, पुसद, जि. यवतमाळ यांचेकडे दिनांक ११.९.२००८ रोजी श्री. सै. मुजोबोद्दीन व इतर दोन नागरिकांनी आपले कार्यालयात श्री. लाड, लाकुड ठेकेदार, राहणार रोहडा यांनी वर्ग २ ची गैर कायदेशीर सागवान लाकुड कटाई बाबत केलेली तक्रारवर आपण केलेली चौकशी व कारवाईचे सर्व नकला देण्यात यावे (प्रमाणित प्रत) अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.२.२००९ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक २.२.२००९ रोजी मान्य झाले व तशी त्यांची स्वाक्षरी आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती मात्र मिळाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही अशा प्रकारे आयोगाचे निदर्शनास आणले. जनमाहिती अधिकारी हे स्वतः हजर नाहीत. परंतु उपवन संरक्षक उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.१२.२००८ रोजी विक्री शाखा प्रमुख यांनाही माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता पत्र पाठविले होते. परंतु माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता आली नाही. प्रथम अपीलाचे निर्णयातून सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र दिनांक ३.३.२०१० रोजी शाखा प्रमुख वन्यजिव शाखा यांचेकडून जी माहिती उपलब्ध झाली ती अपीलकर्ता यांना पाठविण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना सदरची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन आयोगाचे कार्यालयातून द्वितीय अपीलाची सुनावणीची नोटीस काढल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. म्हणजेच माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली होती असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी विक्री शाखा प्रमुख यांची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहाय्य घेतले असल्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू) पुसद यांनी विक्री शाखा प्रमुख यांना त्यांच्या दिनांक ४.१२.२००८ च्या पत्राप्रमाणे स्पष्टपणे समज दिलेली आहे व त्यामुळे त्यांचे विरुध्द माहिती अधिकारी यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- शास्ती लादण्यात येते. सदरची शास्तीची वसूली त्यांचे दरमहाचे वेतनातून करण्यात येऊन लेखाशिर्ष ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" यामध्ये जमा करण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत **उपवनसंरक्षक, वन विभाग पुसद, जि. यवतमाळ** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३५९/अम/२००९.

श्री. सचिन बबनराव राऊत,
भाग्योदय सोसायटी,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष पोलीस महानिरीक्षक,
राज्य राखीव पोलीस बल, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
समादेशक सहाय्यक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४,
नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री. एस. एच. रुहीलान, सहाय्यक समादेश हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर यांचेकडे दिनांक २७.८.२००८ राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर मध्ये सप्टेंबर महिन्यात लेखी पेपर पेन ऐवजी पेन्सीलने घेण्यात आला. महाराष्ट्रामध्ये कोठेही पोलीस भरतीत वापर झाला नाही. पण आपल्या येथे झाला. त्यासंबंधी राज्य शासनाची पेन्सिलच्या आदेशाची सत्यप्रत व जी.आर.क्रमांक व दिनांक मला कळविण्यात यावे. तसेच चेस्ट क्रमांक ५३१ चा माझ ा पुर्ण पेपरची सत्यप्रत व तुमची उत्तरपत्रिका मला देण्यात यावी. तसेच प्रकल्पग्रस्त आरक्षणची यादी मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पिड पोस्टाने देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय माहिती उपलब्ध करुन दिली या कारणासाठी दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती मिळाली नाही व त्यांचेकडून दिशाभूल करणारे उत्तर प्राप्त झाले होते. डी. डी. हा २ वेळा देण्यात आला. त्यांचेकडून रुपये १००/- चा भरणा करण्यात आला व माहिती मात्र ११ पृष्ठामध्ये देण्यात आली त्यामध्ये त्यांना अपेक्षित असलेली पुराव्या करिता निवड झालेल्यांची यादी त्यांनी मागितली होती. परंतु ती मिळाली नाही. इतर माहिती ही विलंबाने मिळालेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, डी.डी. कोणत्या नावाने द्यावा हे त्यांना चुकून कळविण्यात आले होते व त्या पत्र व्यवहारास उशिर झाला आहे असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे करिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसचे उर्वरित माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचेकडून अतिरिक्त माहितीकरिता रुपये १००/- चा भरणा करुन घेतला असल्यामुळे व पृष्ठे ११ (११ x २ = २२) हे वळते करुन उर्वरित रक्कम त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत परत करण्यात यावे. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३६०/अम/२००९.

श्री. डॉ. म. हुसेन हाजी अजीज डोसाणी,
नगीना मस्जीद जवळ, बाराभाई मोहल्ला,
मु. पो. ता. दिग्रस, जि. यवतमाळ - ४४५ २०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख,
ता. जि. यवतमाळ.

श्री. एस. बी. वाबळे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, ता. दिग्रस,
जि. यवतमाळ. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एच. डी. पवार, सिरस्तेदार हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.६.२००८ रोजी मौजा दिग्रस, शिट नं. १० बी, भुमापन क्रमांक ४५, क्षेत्रफळ २०९७ फुट, १९४.८ चौ.मी. प्रकार ए वर्ग-१, धारणाधिकार बाबत. दिनांक ३.६.१९५८ पासून आजपर्यंत हया जागेवरील प्रत्येक फेरफारच्या नकला तसेच प्रत्येक फेरफार करतांना दिलेल्या प्रत्येक कागदाच्या सत्यप्रति देण्यात यावी. दिनांक १९.४.२००० रोजी हाजी अजीज हा. ईस डोसाणी हयांनी दिलेल्या अर्जावर आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीच्या कागदाची सत्यप्रत अशी ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१०.२००८ रोजी तीच माहिती मागण्याचा अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.११.२००८ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.१.२००९ रोजी देण्यात आलेला असून मिळकतीवरील बोजाच्या फेरफार पुढील ७ दिवसांत पुरविण्याच्या सुचना दिल्यात. तसेच अपीलार्थी यांनी सुध्दा मान्य केलेत व प्रकरण बंद करण्यात आले असा आदेश केलेला दिसून

येतो. परंतु त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या संबंधीत नस्तीचे निरिक्षण करुन त्या त्या आवश्यक कागदपत्राची माहिती उपलब्ध करुन घेऊन त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना कळवून व त्यावेळेस कार्यालयात उपस्थित राहून नस्तीचे निरिक्षण करुन घेऊन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकिंत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित नस्ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७६/अम/२००९.

श्री. सुरेंद्र विठ्ठलराव वाकोडे,
रा. रेवसा, ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एम. भुयार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अमरावती, जि. अमरावती.

श्री. सी. एम. वाटाणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, रेवसा,
ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. राजेंद्र पांडे, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, रेवसा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दिनांक २०.९.२००८ ची द्वितीय अपीलाचा कार्यक्रम पुढे ढकललेल्या कार्यक्रमाची पुढील तारीख कळविण्यात येईल प्रमाणे या कालावधीत आपण काय कार्यवाही केली त्याच्या प्रती केली असल्यास त्याची कारणे. २) दिनांक १६ जून १९९३ चे शासन परिपत्रकानुसार रेवसा येथील जिल्हा परिषद कर्मचारी मुख्यालयी राहतात किंवा कसे ? ग्राम पंचायतने अशा प्रकारचा ठराव घेतला किंवा कसे ? नसल्यास त्यामागील कारणे. ३) लाभार्थी निवडीसाठी १९९८-९९ चे शासन निर्णयान्वये इंदिरा आवास योजने अंतर्गत लाभार्थी निवडीसाठी शासनाचे निकष, अटी व कोणकोणत्या कागदपत्राची गरज होती त्याची संपूर्ण यादीची प्रत. ४) क्र. पं.स.अ./शिक्षण/ग्रा.शि.स./४०२९/२००५, दिनांक २५.८.२००५ हे पत्र आपणास प्राप्त झाले होते काय ? प्राप्त झाले असल्यास आमचे मागणीप्रमाणे दिनांक २२.९.२००८ नुसार आम्हास का पुरविले नाही त्याची कारणे व ते पत्राची झेरॉक्स प्रत. ५) ग्राम दक्षता समितीच्या संदर्भात शासनाकडून आलेल्या पत्राच्या प्रती व कार्यरत सदस्यांची यादी तसेच ठरावाच्या नकला. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद पुर्व माध्यमिक शाळा, रेवसा यांचेकडे माहिती पुरविण्यासाठी सदरचा अर्ज हस्तांतर केला व त्या

पत्राची प्रत अपीलकर्ता यांना अग्रेषित केलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक १९.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा सचिव, यांनी माहितीचे शुल्क म्हणून रुपये ६/- व टपाल खर्च रुपये १०/- असे एकूण रुपये १६/- ची मागणी केलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २४.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु माहिती अपूर्ण आहे याकारणासाठी अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे दिनांक २७.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय निर्णय दिलेला दिसून येतो व त्यात जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता विस्तार अधिकारी (पचायत), पंचायत समिती, अमरावती, गटशिक्षणाधिकारी, अमरावती, मंडळ निरिक्षक (राजस्व), वलगांव सर्कल, तहसील कार्यालय, अमरावती, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, वलगांव, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद, पुर्व माध्यमिक शाळा रेवसा, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अमरावती यांना पत्र पाठविलेले दिसते व त्यातून उपलब्ध झालेली माहिती अपीलकर्ता यांना दिनांक १९.३.२००९ रोजी देण्यात आलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती माहिती ही जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, रेवसा या स्तरावर नाही. जिल्हा परिषद कर्मचारी मुख्यालयी राहतात किंवा कसे तसे कारण मागितल्यामुळे सचिव, ग्राम पंचायत यांनी माहिती उपलब्ध करुन घेऊन पुरविण्यात आलेली असल्यामुळे विलंब झालेला आहे. परंतु माहिती पूर्ण मिळाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७५/अम/२००९.

श्री. यशवंत तुकाराम मेश्राम,
रा. पंचशीलनगर, पुजा किराणा स्टोअर्स जवळ,
पो. कॅम्प, ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
जि. अमरावती.

श्री. शरद प्रभाकर तनखीवाले,
जनमाहिती अधिकारी तथा
संचालक (बी. सी. यु. डी.)
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,
ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा संचालक (बी.सी.यु.डी.), संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचेकडे अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे शिक्षक नियुक्ती प्रकरणी विद्यापीठाने श्री. जे. सी. राजपुत, श्री. ए. एन. बुच्चा, श्री. जी. पी. वाबळे, कु. संध्या एम. किल्लेकर यांच्या नियुक्तीस सत्र १९९६-९७ पासून विद्यापीठाने पत्र क्र. No/AV/B/C-२३५१/९९; दिनांक ५.१०.१९९९ नुसार जी मान्यता प्रदान करुन महाविद्यालयाच्या प्राचार्यांना जे पत्र पाठविले त्या पत्राची (o/c) ची साक्षांकित झेरॉक्स प्रत देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती सुध्दा मिळालेली नाही किंवा त्यांनी केलेल्या अर्जानुसार पत्रव्यवहार सुध्दा झालेला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेला पत्र व्यवहार हा १९९६ ते १९९९ या कालावधीतील होती व प्राध्यापकांचे नियुक्तीस मान्यता दिल्यानंतर

सदरचे अभिलेख हे ६-७ वर्षानंतर नष्ट केले जातात त्यामुळे आता विद्यापीठात नाही. परंतु ही बाब जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. यावरुन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या विद्यापीठात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या संदर्भात कोणतीही कार्यवाही होत नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यावर व द्वितीय अपीलाची सुनावणीची नोटीस या कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी निर्गमित केल्यानंतरच संचालकांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सदरची माहिती ही त्यांनी अमरावती शारिरीक शिक्षण महाविद्यालयाकडून उपलब्ध करुन घेतलेली दिसून येते व ती आज आयोगाचे कार्यालयात दाखल केलेली आहे. वास्तविक आयोग हे पोस्ट ऑफीस नाही. माहिती ज्या अपीलकर्ता/अर्जदाराने मागितली त्या अपीलकर्ता/अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे तोंडी आदेश दिले. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतो असे मान्य केले. परंतु त्यांनी व्यक्तिशः माहिती घेणार असे नमुद केले असल्यामुळे त्यांना व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु अपीलकर्ता माहिती न घेता निघुन गेले असे आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १/२०१०.

श्री. अरविंद हरीभाऊ फसाटे,
मु. पो. लोणखैरी, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
नागपूर ग्रामीण, नागपूर.

श्री. डी. व्ही. भालेराव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
ता. कामठी, जि. नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. त्यानंतर सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक २३.२.२०१० च्या पत्रान्वये दिनांक ८.३.२०१० रोजी असल्याचे कळविण्यात आले. त्यानुसार आज दिनांक ८.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी यांचेकडे १) खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत दिनांक १६.८.२००९ रोजी आरोपी जितेंद्र देवीलाल जमतवार, रा. लोणखैरी, वय २२ वर्षे यांचेवर रुपये ५०,०००/- चोरी आरोपाखाली दाखल गुन्हयाचे संपूर्ण आरोपपत्र, क्राईम रजिस्टर उतारा माहितीसह प्रमाणित प्रत. २) आरोपीचे बयानपत्र, ३) मौजा गुमथी, कोराडी तसेच बालाघाट जिल्हयामधील गांव आरंभा येथील आरोपीचे नातेवाईक यांचे बयान पत्राची सत्यप्रत त्यांचेकडून जप्त रुपयांची केलेली माहिती. ४) फिर्यादीचे बयानाची सत्यप्रत व तोंडी रिपोर्टची माहिती. ५) जप्ती केलेल्या ५००/- रुपयांचे नोट नंबरची सत्य माहिती. ६) पंचनामा सत्यप्रत (जप्त केलेल्या वस्तुचे विवरण). ७) आरोपी जितेंद्र देवीलाल, रा. लोणखैरी यांचेवर सन २००० ते आजपर्यंत पोलीस स्टेशन, खापरखेडा मध्ये दाखल गुन्हयाची माहितीसह प्रमाणित प्रत द्यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.९.२००९ रोजी मुद्दे निहाय उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २९.११.२००९ रोजी अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना एकूण १५ सहपत्रे

उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. परंतु त्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सुरुवातीला त्यांनी सागितले की, त्यांना काहीही माहिती उपलब्ध झाली नाही. वास्तविक त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे जरी सांगितले तरी त्यांना दिनांक २९.११.२००९ रोजी पत्र व सहपत्र दिले असे आयोगापुढे सांगितले व त्यानंतर मान्य केले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आरोपीचे दोन नातेवाईकांचे बयान घेतले तरी त्या बयानाची प्रत त्यांना मिळालेली नाही. तसेच त्यांचे बयानाचे संदर्भात त्यांची सही नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही उपलब्ध अभिलेखांचे संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत तपासणी करता येत नाही. त्यामुळे अभिलेख जसे असेल तसे उपलब्ध होतात त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७४/अम/२००९.

श्री. यशवंत तुकाराम मेश्राम,
रा. पंचशीलनगर, पुजा किराणा स्टोअर्स जवळ,
पो. कॅम्प, ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय,
हार्ट हॉस्पीटलजवळ, मार्डी रोड, ता. जि. अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय,
हार्ट हॉस्पीटलजवळ, मार्डी रोड, ता. जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, मार्डी रोड, अमरावती यांचेकडे १९९६ ते आज पर्यंत या कालावधीतील नौकरी विषयक दुय्यम सेवा पुस्तिका (Duplicate Service Book) पुरविण्यात यावी. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाकडे अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती द्वारा प्राचार्यामार्फत मान्यतेच्या संदर्भात प्रस्ताव क्रमांक No. १४५/९६, दिनांक ६.१०.१९९६ व पत्र क्रमांक २९/९९, दिनांक ५.७.१९९९ पुरविण्यात यावे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००९ रोजी अपीलीय अधिकारी अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, हार्ट हॉस्पीटल जवळ, मार्डी रोड, अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. सदरच्या अपीलाचे सुनावणीकरिता राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी सुनावणी करिता दिनांक ८.३.२०१० रोजी एकत्रित नोटीस १) श्री. प्रा. यशवंत तुकाराम मेश्राम, रा. पंचशिल नगर, पुजा किराणा स्टोअर्स जवळ, पो. कॅम्प, अमरावती, ता.जि. अमरावती. २) प्रथम अपीलीय अधिकारी अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, हार्ट

हॉस्पीटलजवळ, मार्डी रोड, ता.जि. अमरावती. ३) जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, हार्ट हॉस्पीटलजवळ, मार्डी रोड, ता.जि. अमरावती. अशी काढण्यात आली होती. अपीलकर्ता हे अमरावती येथेच राहतात. त्यांना ही नोटीस यु.पी.सी.ने काढून सुध्दा मिळाली व उत्तरवादी म्हणून शिक्षण संस्था हे सुध्दा अमरावतीतच राहतात. याचा अर्थ त्यांना सुध्दा सुनावणीच्या एक महिन्यापूर्वी पाठविलेली ही नोटीस मिळाली पाहिजे. परंतु आज सुध्दा आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य हे सुनावणीस हजर झाले नाही. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांची ही नेहमीचीच सवय आहे. त्यांना नोटीस मिळून सुध्दा ते हजर होत नाही. परंतु नोटीस मिळाली नाही म्हणून मात्र मा. उच्च न्यायालयाकडे याचिका दाखल करतात. अपीलकर्ता यांच्या अपील क्रमांक ४८२/२००७ मध्ये आयोगाने एकत्रित नोटीस काढून सुध्दा उत्तरवादी आयोगापुढे सुनावणीस हजर झाले नव्हते. याची त्यांना संधी देऊन सुध्दा ते हजर झाले नाही म्हणून दिनांक ८.१०.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांना रुपये २५०००/- शास्ती कां लावण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा मागितला होता. परंतु तसा खुलासा न देता उत्तरवादी यांनी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली. याचिका क्रमांक ४८४३/२००७ असून सदरच्या याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयानी आयोगाचे कार्यालयात हजर राहावे असा आदेश दिलेला असतांना सुध्दा व आयोगाने सुध्दा पुन्हा नोटीस काढली असतांना सुध्दा पुन्हा आयोगाचे कार्यालयात सुनावणीकरिता उत्तरवादी हजर झाले नाही व त्यामुळे आयोगाने दिनांक १५.९.२००८ रोजी रुपये २५०००/- ची शास्ती माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचे विरुध्द लादलेली होती. अमरावती या शहरामध्ये मध्यभागी सदरच्या संस्थेची इमारत असुन सुध्दा "संस्था नाही" असे हस्तबटवडयाने एका पाठविलेल्या नोटीसवर लिहून आले ही बाब याचिकेमध्ये सुध्दा आयोगाचे कार्यालयातून प्रतिज्ञापत्र सादर करुन मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणली आहे. त्यावर मा. उच्च न्यायालयाने आयोगाचे कार्यालयात हजर व्हावे असा आदेश दिनांक ३१.३.२००९ रोजी याचिका क्रमांक २५/२००९ मध्ये दिलेले दिसून येते. परंतु तरी सुध्दा आज पर्यंत (दिनांक २१.१०.२००८ पर्यंत) त्या मुळ अपील क्रमांक ४८२/२००७ मध्ये उत्तरवादी हजर झालेले नाही व अपीलकर्ता यांनी सुध्दा त्याचा पाठपुरावा केलेला नसल्यामुळे त्याच अपीलात निर्णय झालेला नाही. आज सुध्दा वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३७४/अम/२००९ मध्ये या अपीलामध्ये उत्तरवादी हजर झाले नाही व यावरुन उत्तरवादी यांची आयोगाचे संदर्भात प्रवृत्ती दिसून येते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१२.२००८ च्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व तसे उत्तर दाखल करुन घेतले नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अमरावती शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांना रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत सुध्दा जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक आहे. परंतु जनमाहिती अधिकारी किंवा संस्थेचे पदाधिकारी हे आयोगापुढे कधीही हजर होत नाही. त्यामुळे त्यांना उपलब्ध करुन दिलेली संधी त्यांनी घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येते.

३) सदरच्या शास्तीची वसुली ही सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी करावयाची असून त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८३/अम/२००९.

श्री. नागेश रामकृष्ण उंबरकर,
द्वारा - काठोळे निवास, भवानी वेश,
ता. दर्यापूर, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,
ता. जि. अमरावती.

श्री. डी. एल. बोरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
ता. दर्यापूर, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. एस. डफरे, सहाय्यक अधिक्षक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, दर्यापूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) दर्यापूर अंजनगांव शहरे व १५६ गांवे या पाणी पुरवठा योजने अंतर्गत किती पाण्याच्या टाकीवर फ्लोमिटर बसविण्यात आले ? त्या टाकीची एकूण संख्या व स्थळ दर्शक माहिती या कामाबाबत संबंधित कंत्राटदार एजन्सीला या कामाच्या मोबदल्यात टप्प्या टप्प्याने अदा करण्यात आलेल्या रक्कमा व उर्वरित ज्या टाक्यावर फ्लोमिटर बसविणे प्रस्तावित असतांना सुध्दा याबाबत सदर कंत्राटदारांना पूर्ण रक्कमा अदा करण्यात आल्या काय ? जर काम अपूर्ण असतांना सुध्दा त्यांचे बिल संबंधित कंत्राटदार एजन्सीला देण्यात आले असेल तर त्याची कारणे व रक्कमा अदा करण्यात आलेल्या कॅशबुक व्हावचर व बँक खाते पुस्तकाच्या सत्यप्रती व सदर काम संबंधित कंत्राटदार एजन्सीला किती कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक होते तसेच या कामाच्या विलंबाची कारणे प्रमाणित करुन देण्यात यावे. २) तसेच ज्या टाक्यावर फ्लोमिटर बसविण्यात आले आहे व ज्या टाक्यावर बसविणे प्रस्तावित आहे याबाबत संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी काम पूर्णत्वाचे आपल्या कार्यालयात सादर केलेले अहवालाच्या सत्यप्रती. ३) सन २००५ ते २००८-२००९ या आर्थिक वर्षात या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या

कार्यक्षेत्रात या योजनेच्या दुरुस्तीकरिता जी कामे करण्यात आली त्याची स्थळदर्शक माहिती सदर कामे कोणत्या कंत्राटदार एजन्सी मार्फत करण्यात आली व किती रक्कमेची करण्यात आली. तसेच सदर कामाची अंदाजपत्रके, प्रशासकीय मंजूरी आदेश, तांत्रिक मान्यता अहवालाच्या सत्यप्रती व या कामाकरिता वर्षावार किती रक्कम प्राप्त झाली व समायोजन कितीचे झाले ? समायोजन झाले नसेल तर त्याची कारणे. तसेच उपरोक्त कालावधीच्या वार्षिक अंकेक्षण अहवालाच्या सत्यप्रती. वरील सर्व खर्च कोणत्या लेखा शिर्षकाखाली भागविण्यात आला. लेखाअधिकारी यांनी आदेशित केलेल्या सत्यप्रती. ४) सदर योजनेची अंमलबजावणी व कार्यपुर्ती करिता शासनाचे आदेश परिपत्रके व वेळोवेळी केलेले मार्गदर्शन याबाबतची सविस्तर माहिती व या आदेश व कार्यपूर्ती संबंधित अधिकाऱ्यांनी अनुपालनाचे वरिष्ठ अधिकारी अथवा शासनास सादर केलेल्या अहवालाच्या सत्यप्रती. तसेच मा.कार्यकारी अभियंता यांना किती रक्कमेपर्यंत त्यांच्या सही शिक्क्यानिशी आदेश देण्याचे अधिकार आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती. ५) तसेच या कार्यालयात श्री. रामचंद्र बिसनसा गुल्हने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक १८.५.२००७ व ४.६.२००७, ७.६.२००७ रोजी दाखल केलेल्या अर्जाच्या सत्यप्रती. श्रीकृष्ण उपाख्य दादासाहेब क्षिरसागर यांनी दिनांक २२.८.२००८ रोजीचा अर्ज व सरदार अरविंदसिंह प्रितीमसिंह धुन्ना, चंद्रपूर यांचा दिनांक ७.११.२००८ चा अर्ज व सुनिल रमाकांत गजापुरकर, अहमदनगर यांचा अर्ज यांनी उपविभाग, दर्यापूर या कार्यालयात दिनांक ८.११.२००८ च्या सत्यप्रती. ६) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये आपल्या कार्यालयाने कलम ४(१) नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवालाच्या सत्यप्रती. ७) मा.कार्यकारी अभियंता हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, दर्यापूर या कार्यालयात ज्या दिनांकापासून रुजू झाले त्या दिनांकापासून तर अद्यावत पर्यंत त्यांच्या प्रवास दैनंदिनी टूरडायरीच्या तसेच त्यांच्या प्रवासभत्ता बाबतची संपूर्ण माहिती प्रमाणित करुन देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१.२००९ रोजी कार्यकारी अभियंता यांनी माहिती आयुक्त, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती यांचेकडे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये रुपये १०,०००/- पेक्षा जास्त किमंतीच्या होत असल्यामुळे व अपीलकर्ता दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे मार्गदर्शन मागितले होते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अधिक्षक अभियंता यांनी पुन्हा माहिती आयुक्त, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती यांना मार्गदर्शन विचारले. परंतु कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन उपलब्ध न झाल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही या कारणासाठी दिनांक १३.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा अतिरिक्त खर्च हा रुपये १०,०००/- पेक्षा जास्त किंमतीचा होता व त्याबाबतचा निधी कार्यालयात उपलब्ध नाही व त्यामुळेच त्यांनी माहिती आयुक्त, अमरावती यांचेकडे मार्गदर्शन मागितले होते. त्यावर पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील यादीत आहेत किंवा नाही याबाबत उपविभागीय अधिकारी (राजस्व), दर्यापूर यांना तपासणीकरिता दिनांक १४.१.२००९ रोजी पत्र दिले होते व त्यांचे उत्तराप्रमाणे ते दारिद्रय रेषेखालील आहेत असे कळविले असल्यामुळे दिनांक २१.४.२००९ रोजी प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये श्री. नागेश उंबरकर यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना योग्य ती तारीख व वेळ देऊन त्यांना माहिती दाखविण्यात यावी व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राची छायांकित प्रती देण्यात यावी. यांत प्राधिकरणावर छायांकित प्रतीचा जास्त भार पडणार नाही याची दक्षता घ्यावी असा आदेश अधिक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांना दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २२.५.२००९ रोजी कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु दिनांक २१.८.२००९ रोजी पर्यंत विभागीय कार्यालयाशी संपर्क साधला नाही. त्यामुळे आपणास सदर माहितीची आवश्यकता वाटत नाही असे दिसून येते. तरी पत्र मिळताच ७ दिवसांचे आंत आपणांस हवी असलेल्या माहितीचे निरीक्षण करुन आवश्यक माहिती आपण प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ३०.१.२०१० रोजी त्यांना पत्र दिलेले दिसून येते व त्यात काही माहिती दिलेली दिसून

येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता व ती अतिव्यापक प्रमाणात असल्यामुळे संबंधित अभिलेख्याचे निरिक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे संबंधित अभिलेखाचे निरिक्षण करुन आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८०/अम/२००९.

श्री. रामकृष्ण डोमाजी उमक,
मु. नरदोडा, ता. दर्यापूर,
जि. अमरावती. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अरुण नेवारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
दर्यापूर, जि. अमरावती.

श्री. डी. पी. ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसील कार्यालय,
ता. दर्यापूर, जि. अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, दर्यापूर यांचेकडे राष्ट्रीय सामाजिक अर्थ सहाय्य योजना (एन.एम. बि.एस.) प्रमाणे दिनांक ६.८.२००७ रोजी नैसर्गिक आपत्ती (आकस्मिक आग) मुळे मृत्युमुखी पडलेल्या कु. चारुलता रामकृष्ण उमक बाबत अर्थ सहाय्य मिळण्यासाठी केलेला अर्जा विषयी माहिती रजिस्टर पोस्टाने असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे माध्यमातून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.८.२००७ चा अर्ज कार्यालयात मिळून आलेला नाही. त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती दिली गेली नाही. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००८ रोजी अर्जाची छायांकित प्रत उपलब्ध करुन दिल्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अर्ज दिला. परंतु तो अर्ज राष्ट्रीय सामाजिक अर्थ सहाय्य योजना असे असल्यामुळे व त्यांना हवे असलेले अर्थ सहाय्य नैसर्गिक आपत्ती आग असल्यामुळे त्यांचेकडून नवीन अर्ज घेण्यात आला व त्या नवीन अर्जाचे संदर्भात अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१.२०१० रोजी

ठाणेदार खल्लार यांना पोस्टमार्डन व पंचनामा देण्याकरिता पत्र दिलेले आहे. परंतु त्यांचेकडून अद्याप पर्यंत कार्यवाही झाली नसल्याने माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तीही त्यांना माहिती कळविण्यात आलेली आहे. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडून खुलासा मागण्यात आलेला दिसून येतो व त्या खुलाशामध्ये ज्यावेळेस अर्ज प्राप्त झाला त्यावेळेस श्री. आर. टी. चक्रे, नायब तहसीलदार, (सं. गां. यो.) दर्यापूर हे रजेवर होते व ते रजेवर असल्यामुळे कार्यवाही झाली नाही असा त्यांनी खुलासा केलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १५.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तसेच दिनांक २.१२.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती तातडीने विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८२/अम/२००९.

श्री. जुगलकिशोर अंबुलाल शर्मा,
प्रभा, देशपांडे ले आऊट, दस्तूरनगर,
एम.आय.डी.सी.रोड, ता. जि. अमरावती - ४४४ ६०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),
जिल्हा परिषद, अमरावती.

श्री. अनील कांबे,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, अमरावती. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे असोसिएशन ऊर्दु मुलांची प्राथमिक शाळा, अमरावती येथे शालेय पोषण आहार संबंधी झालेल्या चौकशीच्या अहवालाची सर्व कागदपत्रासह प्रत. यासंबंधी जिल्हाधिकारी, अमरावती व मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून आदेशाच्या प्रति तसेच आपण काढलेल्या आदेशाच्या प्रती अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.९.२००८ रोजी माहितीचे शुल्क रुपये २/- व टपाल खर्च रुपये ३०/- असे एकूण रुपये ३२/- चा भरणा करावा असे कळविण्यात आले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी रुपये ३२/- चा भरणा केल्याचे पत्र दिलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक २४.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी आक्षेप घेणारे पत्र जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना दिलेले दिसून येते. त्यानंतरही दिनांक २०.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपीलकर्ता यांना असोसिएशन ऊर्दु मुलांची प्राथमिक शाळा, अमरावती या शाळेची चौकशी मा. अप्पर जिल्हाधिकारी यांनी केलेली होती. त्या चौकशी वसुली आदेशाची प्रत संदर्भिय १ अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सदर शाळेची शालेय पोषण आहार अंतर्गत तपासणी केली आहे. अप्पर जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक १२.८.२००८ रोजी दिलेल्या आदेशानुसार केलेली चौकशी कायम ठेवण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने या विभागाने चौकशी अहवालानुसार वसुली आदेश पारित केलेले आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ५.१.२००९ ला ठेवण्यात आल्याची नोटीस दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचे सुनावणीचे पत्र दिनांक ३.१.२००९ रोजी पोस्टाने पाठविले. दिनांक ४.१.२००९ ला रविवार व दिनांक ५.१.२००९ ला सुनावणी ठेवण्यात आली याचा अर्थ अपीलकर्ता हे सुनावणीस हजर राहू नये या कारणासाठी अशा प्रकारे फक्त १ दिवसाचे अंतराने पत्र पाठविलेले दिसून येते व त्यामुळे मी उपस्थित राहू शकलो नाही व प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी संगनमताने माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा त्यांनी युक्तिवाद केला. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या प्रकारणाची चौकशी झालेली आहे. परंतु त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही किंवा अहवालाची प्रत सुध्दा उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु ही बाब जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वेळोवेळी कळविणे आवश्यक होते. परंतु एकूणच प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली दिसून येते. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांचे संबंधी चौकशी होऊन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक राहिल. जनमाहिती अधिकारी यांनी सुरुवातीलाच सर्व माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली असती तरी अपीलकर्ता यांना प्रथम अपील किंवा द्वितीय अपील करण्याची आवश्यकता राहिली नसती. त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत चौकशी अहवालाच्या संदर्भातील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

३) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी करावयाची आहे. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८१/अम/२००९.

श्री. मिर्झा एजाज बेग मिर्झा मुख्तार बेग,
मौलाना आजाद कॉलोनी, वलगांव रोड,
डॉ. इब्राहीम चे बाजूला, जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, अमरावती. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. गुल्हाने, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. महाराष्ट्र शिक्षण समिती, शिरोळा नोंदणी क्रमांक एफ ११७, ता.जि. अमरावती द्वारा संचालित शाळा संबंधीची माहिती सन २००७-२००८ व २००८-२००९ सत्रा पर्यंतच्या कालावधीत अ) उपरोक्त कालावधीत झालेल्या संच मान्यतेच्या प्रती, ब) शाळा मधील वर्गवार तुकडी संख्या व तुकडी निहाय पटसंख्याची माहिती, क) आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांनी संस्थेची (इयत्ता ५ ते १२ वी) ची प्रमाणित करुन दिलेली बिंदु नामावलीची प्रत, ड) संस्थेत आजच्या तारखेला असलेल्या अनुशेषाची माहिती, ई) संस्थेत रिक्त असलेल्या पदाची माहिती, उ) उपरोक्त कालावधीत शिष्यवृत्तीसाठी मंजूर होऊन प्राप्त झालेल्या आदेशांच्या प्रती व वाटप केलेल्या अभिलेखाच्या प्रती, ऊ) संस्थेच्या खालील ७ शाळा आहेत व त्या संबंधीची माहिती १) महाराष्ट्र विद्यालय, राजणापुर्णा, २) महाराष्ट्र विद्यालय, निभी, ३) वाय.टी.देशमुख विद्यालय, पुजदा, ४) वसंतबाबा विद्यालय, देवरा, ५) कै. सुरेंद्र देशमुख विद्यालय, विचोरी, ६) कस्तुराबाई जैन विद्यालय, शिरोळा, ७) कै. भागीरथीबाई देशमुख विद्यालय, अमरावती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती ही मुख्याध्यापक स्तरावर असल्यामुळे त्यांचेकडे माहिती मागावी व न दिल्यास कार्यालयास कळवावे

असे कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १४.१०.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी ७ विद्यालयाचे मुख्याध्यापकांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिलेले दिसून येते व दरम्यान दिनांक २६.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. सदरची माहिती अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे सुनावणीचे दिवशी उपलब्ध करुन देण्यात आली व तसे अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केले. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना शिक्षणाधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही म्हणून शिक्षणाधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी अशी त्यांनी विनंती केली. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही त्यांचे कार्यालयातील माहिती नसून विद्यालयाचे स्तरावरील माहिती असल्यामुळे त्यांना पत्र दिले होते. प्रत्येक विद्यालयाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.९.२००८, दिनांक २०.१२.२००८ व दिनांक ५.११.२००८ रोजी माहितीचा खर्च कळविलेले दिसून येते व त्या खर्चाचा भरणा केल्यावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुंळे व तसे अपीलकर्ता यांनी मान्य केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८५/अम/२००९.

श्री. गिरीष विजय मेहता,
पहिला माळा, तखतमल इस्टेट,
जयस्तंभ चौक, जि. अमरावती - ४४४ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कांतानगर, अमरावती.

श्रीमती संगिता र. डोंगरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तालुका उपनिबंधक,
सहकारी संस्था, अमरावती. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. के. एस. बर्लींगे, सहाय्यक निबंधक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांचेकडे श्रीनाथ कॉपरेटिव हॉऊसिंग सोसायटी, सर्वे नं. ४७ जवळ, अमरावती १) सोसायटीची स्थापना आणि नोंदणी परवाना छायाप्रत सोबत माहिती. २) सोसायटीच्या सर्व सभासदस्यांचे नाव, पत्ता आणि फोन नंबर सहित लेखी माहिती. ३) सोसायटीचा स्थापनापासून आज तारखे पर्यंतचा स्टेटमेंट नफा नुकसान संपत्ती आणि शिल्लक आणि कर्जबाबत संपूर्ण माहिती छायापत्र सोबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.१.२००९ रोजी सदर माहिती ही संस्थेची निगडीत असल्यामुळे सदरचा अर्ज हा संस्थेकडे पाठविलेला दिसून येतो व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये सुध्दा ही माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार होते. परंतु माहितीचा अतिरिक्त खर्चाचा भरणा रुपये १००२/- रक्कम भरण्याकरिता स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये चलान बनुन द्यावे असे सांगितले होते ते न झाल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झ ाली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ही संस्थेची माहिती आहे व संस्थेची माहिती कार्यालयामध्ये उपलब्ध नसते. ती संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी लागते. परंतु संस्थेनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र प्रथम अपीलामध्ये संस्था माहिती देण्यास तयार होती. त्या माहितीचा खर्च रुपये १००२/- येत असल्यामुळे व माहितीचा खर्च हा अपीलकर्ता यांना भरावयाचा नसल्यामुळे माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही. माहितीचा खर्च हा स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये चलानने भरुन द्यावयाचे आहे व तसे जनमाहिती अधिकारी किंवा संस्था तयार नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यावर संस्था ही रोख भरणा करुन पावती देण्यास तयार आहे असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता संस्थेकडे खर्चाचा भरणा करुन पावती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. असे असले तरी अपीलकर्ता यांचे आता म्हणणे असे आहे की, त्यांना आता विनाशुल्क माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन पुरवावी व अपीलकर्ता यांनी ती व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९०/अम/२००९.

श्री. प्रकाश दगडू भारंबे,
अे-१, दुधगंगा अपार्टमेंट,
ज्योती विद्यालयासमोर, गोरक्षण रोड,
ता. जि. अकोला - ४४४ ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत,
३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत,
३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उपसचिव तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २.३.२०१० रोजी आयोगाकडे आज दिनांक १०.३.२०१० च्या सुनावणीचे

संदर्भात अपीलकर्ता यांचे प्रथम अपील आयोगाचे कार्यालयात उपलब्ध झालेले नाही, त्यामुळे अपीला संदर्भातील सुनावणी देता आलेली नाही आता त्यांनी आपणाकडे परस्पर द्वितीय अपील सादर केले आहे. यास्तव आपण श्री. भारंबे यांना अपीलाचे सुनावणीसाठी पाठवावे. आयोगाच्या अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने श्री. भारंबे यांचे समाधान न झाल्यास आपण द्वितीय अपीलाची सुनावणी ठेवणे यथोचित होईल अशी आयोगास विनंती केलेली आहे.

२. त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे सुनावणीकरिता आयोगाचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नोटीस पाठवून प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्याची प्रक्रिया संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता हजर न झाल्यास तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अधिनियमाचे कलम १९(५) अन्वये माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही किंवा कां नाकारण्यात आलेली आहे याबद्यलची जबाबदारी ही जनमाहिती अधिकारी यांची असल्यामुळे अपीलकर्ता गैरहजर आहेत याकारणासाठी सदरचे अपील खारीज करणे संयुक्तिक होणार नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाचे सोबत दिनांक १४.३.२००९ रोजी लेखी युक्तिवाद

पाठविलेला दिसून येतो. प्रथम अपील सुध्दा अपीलकर्ता यांनी योग्य त्या पत्त्यावर पाठविलेले दिसून येते व त्यामुळे सदरचा अपीलाचा शोध घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी अन्यथा पुन्हा अपीलकर्ता यांनी आयोगाकडे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द तक्रार केल्यास अधिनियमाचे कलम २० प्रमाणे आयोगास कार्यवाही करावी लागेल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अपीलाचा शोध घेऊन तसेच त्यांच्या लेखी युक्तिवादाचा शोध घेऊन त्यांना सुनावणीची नोटीस काढून हा निर्णय मिळाल्यापासून सुनावणी नोटीस व निर्णय ३० दिवसांचे आंत प्रक्रिया पूर्ण करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८८/अम/२००९.

श्री. रामदास खंडुजी जाधव,
सहकारी बँक कॉलनी, भाग-२,
सिरसो, दर्यापूर रोड, ता. मुर्तीजापूर,
जि. अकोला. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
मुर्तीजापूर. जि. अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
मुर्तीजापूर, जि. अकोला. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, मुर्तीजापूर यांचे कार्यालयाने पुढील मुदत मिळावी म्हणून विनंती केली. परंतु कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व कागदपत्रे सुदा दाखल केली नाहीत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय मुर्तीजापूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) अर्जदाराचे रिक्त जागेकरिता श्रीकृष्ण खंडूजी जाधव यांनी एकूण सहा सांजामध्ये मुर्तीजापूर तहसील अंतर्गत मुलाखत पत्र आले नाही याची माहिती मिळावी. २) मा.आयुक्त यांचा फॅक्स संदेश क्र.अका-३/भुसुधार/व.आ./कावी २८०/०८, दिनांक २३.९.२००८ पत्राची सत्यप्रत मिळावी. ३) क्र. अेपीटी ४५९७/प्र.क्र. २४८/ई-१० महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्र. १०.३.१९९७ चे पत्रावर आपण काय कारवाई केली तसेच जिल्हाधिकारी यांनी आपणाला काय आदेश दिले त्याची सत्यप्रत देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही मात्र दिनांक ६.३.२००९ रोजी पत्रात नमुद मुद्या क्रमांक १ बाबत नोटीसची झेरॉक्स प्रत हयासोबत देण्यात येत आहे. तसेच मुद्या क्रमांक २ व ३ बाबतचे दस्ताऐवज हया कार्यालयात उपलब्ध नाहीत. सबब देता येत नाही. सहपत्र-१ जोडलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सहपत्र-१ मिळालेले नाही. ज्या पध्दतीने मुद्या क्रमांक १, २ चे उत्तर दिलेले आहे त्यावरुन तहसीलदार, मुर्तीजापूर हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंमलबजावणीस गंभीर आहेत असे दिसून येत नाही व ते उडवाउडवीचे उत्तर आहे असे दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना द्वितीय अपील दाखल करावे लागले आहे. तहसीलदार यांचे कार्यालयातील आज आयोगापुढे कोणतेही अधिकारी हजर झालेले नाही. तहसीलदार स्वतः व्यस्त असतील तर त्यांनी कागदपत्रे घेऊन अधिकाऱ्यांस पाठविणे संयुक्तिक झाले असते. परंतु त्याबाबतही तहसीलदार यांनी कागदपत्रे न पाठविता पुढील मुदत मागितलेली आहे ती अमान्य करण्यात येत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १९.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने ३ मुद्यांमध्ये माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती घेण्याकरिता हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित व्हावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३) तहसील कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही केली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८७/अम/२००९.

श्री. दाऊद खान राही,
रा. नवाबपुरा, जुने शहर,
ता.जि. अकोला. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, अकोला. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. ए. डी. मानकर, गटशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे सन २००१-२००२ व फेब्रुवारी-मार्च २००८ मधील उर्दु शिक्षकांच्या नियुक्त्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्याबाबतची कागदपत्रे सुध्दा काहीही दाखल केले नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचे संदर्भामध्ये उपस्थित असलेले गटशिक्षणाधिकारी यांनी सांगितले की, संबंधित जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे निलंबित आहेत व ६८ उर्दु शिक्षकांवर कार्यवाही होऊन त्यांना अटक करण्यात आलेली आहे असे असल्यास अपीलकर्ता यांनी ती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संपूर्ण माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती कायम करण्यात येईल.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३८९/अम/२००९.

श्री. मो. युसुफ शे. रहिम,
रा. गवळीपूरा, जाम महोल्ला,
वार्ड नं. १९, ता.जि. अकोला. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २,
ता. जि. अकोला.

जनमाहिती अधिकारी तथा
समाज कल्याण विभाग,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. २,
ता. जि. अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी यांचे वतीने श्री. पी. बी. साखरे, उच्चश्रेंणी लघुलेखक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी व आयुक्त जात पडताळणी समिती, अकोला यांचेकडे जात पडताळणी साठी दिलेले सर्व कागदपत्रांची नक्कल मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने उत्तरवादी यांचे प्रतिनिधी श्री. पी. बी. साखरे, उच्चश्रेणी लघुलेखक यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त यांना निवेदन दिले आहे. त्यात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अमरावती समिती क्र. १ कडे उपलब्ध होती. सदर प्रस्ताव अमरावती समितीकडून अकोला समितीकडे हस्तांतर झाल्यानंतर कार्यालयातील सर्व कर्मचारी यांनी सदर माहितीचा शोध घेतला व सदरची माहिती जुन्या नस्तीमधून प्राप्त होताच अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१.२०१० रोजी त्यांना हातोहात

देण्यात आली.  सदरील माहितीबाबत अपीलार्थी यांचे समाधान झालेले आहे असे त्यांनी लेखी दिले आहे.  तथापि याबाबत काही तक्रार झाल्यास आम्ही जबाबदार राहू असे निवेदन सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९३/अम/२००९.

श्री. अब्दुल रशीद शेख,
नेहरुनगर, अकोट फैल,
ता. जि. अकोला - ४४४ ००३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. उमेश कोठीकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (प्र.)
महानगरपालिका, अकोला.

श्री. विजय मांडेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
लेखापाल (लेखा विभाग)
महानगरपालिका, अकोला. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा लेखाअधिकारी, लेखा विभाग, महानगरपालिका, अकोला यांचेकडे आस्थापनावर मासिक खर्च तथा टक्केवारी माहे सप्टेंबर २००८ ची एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती यांचेकडे लेखी निवेदन सादर केले आहे व त्यात माहिती अर्जानुसार लेखाअधिकारी, महानगरपालिका, अकोला यांनी अर्जदार/अपीलकर्ताला माहिती उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यामुळे दुसरे अपील खारीज करण्याची आपणांस विनंती आहे असे पत्र दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८१/२०१०.

श्री. विजय झुंगरुजी नगराळे,
मालवीय वार्ड, वरोरा रेल्वे पुलाजवळ,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एम. शहा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वरोरा,
जि. चंद्रपूर.

श्री. एम. आर. क्षिरसागर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहलेखापाल,
नगर परिषद, वरोरा, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी माहिती अधिकारी नगर परिषद, कार्यालय वरोरा यांचेकडे दिनांक २१.४.२००९ रोजीच्या अर्जान्वये सौ. विमल नगराळे यांचे भविष्य निर्वाह निधी लेख्याच्या सन १९८२-८३ ते १९९७-९८ आणि १९९९-२००० ते २००७-०८ वर्षाच्या प्रती प्राप्त झाल्यात सन १९९८-९९ व सन २००८-२००९ च्या प्रती अद्यापी प्राप्त झालेल्या नाहीत. त्या त्वरित उपलब्ध करुन देण्याचे करावे. (चा.क्र. ४६१६, दिनांक २७.४.२००९ अन्वये रुपये ५०/- रकमेचा भरणा करण्यात आला.) नगर परिषद वरोराची भविष्य निर्वाह निधी खाते वहीच्या सन १९८२-८३ ते १९९७-९८ व १९९९-२००० ते २००७-२००८ च्या ज्या प्रती उपलब्ध झाल्यात त्यात खालील प्रमाणे सौ. विमल नगराळे यांनी भविष्य निर्वाह निधीतून रकमा काढल्याचे दर्शविले आहे.

३.

**भविष्य निर्वाह निधी खाते वही**

| वित्तीय वर्ष | महिना | काढलेल्या रक्कमा | वित्तीय वर्ष | महिना | काढलेल्या रक्कमा |
|---|---|---|---|---|---|
| १९८८-८९ | ५/८८ | ५००/- | १९९९-२००० | ३/२००० | १००००/- |
| १९८९-९० | ९/८९ | ५००/- | २०००-२००१ | १२/२००० | १६०००/- |
| १९९१-९२ | ४/९१ | १०००/- | २००१-२००२ | ७/२००१ | १००००/- |
| १९९२-९३ | २/९३ | १०००/- | २००२-२००३ | २/२००३ | २००००/- |
| १९९३-९४ | ६/९३ | २०००/- | २००३-२००४ | ६/२००३ | १५०००/- |
| १९९५-९६ | ८/९५ | २०००/- | २००४-२००५ | ४/२००४ | ३००००/- |
| १९९७-९८ | ५/९७ | ५०००/- | | १२/२००४ | ३५०००/- |
| १९९८-९९ | ची भविनि खाते | वही अप्राप्त | | | |

सन १९८२-८३ ते सन २००८-०९ पर्यंत किती वेळा सौ. विमल नगराळे यांनी भविष्य निर्वाह निधीतून अग्रीम मिळण्यासाठी अर्ज केलेत. ते सर्व अर्ज तसेच नगर परिषदेने सौ. विमल नगराळे यांचे नांवे काढलेले भविष्य निर्वाह निधीचे सर्व देयके (आतापर्यंतचे) पाहण्यासाठी व नोंद घेण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे करावे. सदरच्या अर्जाचे अनुषंगांने दिनांक २३.११.२००९ रोजी मागणी केलेली माहिती सन १९८२-८३ ते २००८-०९ पावेतोचा रेकार्ड शोधण्याचे काम सुरु आहे. रेकार्ड मिळाल्यानंतर आपणास पाहण्यासाठी व नोंद घेण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.१.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक १२.१.२०१० रोजी कळविण्यात आले. त्यात अपीलार्थीला सदर्हु आदेश मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत पाहण्यासाठी व नोंद घेण्यासाठी रेकार्ड उपलब्ध करुन देण्यात यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यावर अपीलकर्ता यांना पूर्ण अर्ज दाखविण्यात आलेले नाहीत. दिनांक ६.१.२०१० रोजी सुनावणी वेळी सर्व अर्ज व पावत्यांची झ ेरॉक्स देण्याविषयी विनंती करण्यात आली होती. ती आपण मान्य केली होती. परंतु आदेशात ते नमुद नाही. असे त्यांनी आक्षेप नोंदविलेला दिसून येतो व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलात युक्तिवाद करतांना अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी नस्तीचे निरिक्षण केले. परंतु त्यांच्या छायांकित प्रती हया त्यांनी मागितल्या नव्हत्या. परंतु नंतर त्या त्यांनी मागितल्या त्याकरिता मात्र त्यांना अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी पुन्हा असे सांगितले की, त्यांना सर्व कागदपत्रे दाखविली नव्हती. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ जनमाहिती अधिकारी यांना कळवून त्यावेळेस उपस्थित राहून संपूर्ण नस्तीचे निरिक्षण करावे व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यानंतर त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी संपूर्ण नस्तीचे अवलोकन द्यावे व त्यातून आवश्यक त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८५/२०१०.

श्री. जनार्दन गुलाबराव मून,
७९१, नागसेन वन,
नागपूर - ४४० ०१७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. व्ही. डी. रुडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक,
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर.

श्री. डी. डी. तिडके,
जनमाहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक (गृह)
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह) नागपूर ग्रामीण, नागपूर यांचेकडे पोलीस स्टेशन, खापरखेडा येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शासनाची फसवणूक केल्याबाबत. पोलीस अधिक्षक कार्यालयात उपरोक्त विषयान्वये दिनांक ७.१०.२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याची तसदी घ्यावी. (सोबत तक्रार पत्र जोडले आहे). सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.१.२०१० रोजी यापुर्वीच आपले संस्थेचे सचिव, श्री. संजय ढोरे, रा. खापरखेडा, ता. सावनेर यांनी हीच माहिती मागितली होती व त्या माहितीच्या संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(त्र) अन्वये माहिती नाकारण्यात आली होती व तीच माहिती आता मागितली असल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्याच दिवशी दिनांक ११.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.   अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना दिनांक ७.१०.२००९ रोजी केलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. परंतु माहिती उपलब्ध करुन देतांना त्यांना दिशाभूल करणारी माहिती जी मागितलीच नाही त्याबद्यल माहिती देता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता ज्या संस्थेचे सभासद आहेत त्याच संस्थेचे सचिव, श्री. संजय ढोरे यांनी तीच माहिती मागितली होती व त्याच माहितीच्या संदर्भामध्ये आयोगाने अपील हे खारीज केलेले आहे. श्री. संजय ढोरे यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी प्रत्यक्ष माहिती मागितली होती व अपीलकर्ता यांनी श्री. संजय ढोरे यांनी मागितलेल्या माहितीचे रुपांतर हे तक्रारीत करुन अधिकाऱ्यांच्या चौकशीची माहिती मागितली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या तक्रारीचे चौकशी अहवाल त्यांना प्रथम उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.१०.२००९ च्या तक्रारीची चौकशी अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८७/२०१०.

श्री. सुनिल जॅकब,
यीशु हाऊस, ६४०/बी,
एन.आर.सी.डी.सी. कॉलोनी,
खलाशीलेन, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. व्ही. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, सदर, नागपूर.

श्री. यु. आर. खारोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
लिंक रोड, सदर, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लिंक रोड, गड्डीगोदाम, नागपूर यांचेकडे सन २००९-२०१० जुलै माह से शुरु करने हेतु किया गया अर्ज कितने संस्थाओ ने भरा था याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोग यांना निवेदन सादर केले असून अपील की माहिती गैरअर्जदार द्वारा मुझे दे दी गयी है और उसमे मेरा समाधान हो जानेसे मै अपना केस वापस लेता हूँ. कृपया मेरी दिनांक ११.३.२०१० की सुनवाई रद्द करे ऐसी आपसे आशा विनंती करता हूँ. असे कळविले आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९९/अम/२००९.

श्री. गोविंद धर्माप्पा गलांडे,
मु. पो. ता. महागांव, जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, यवतमाळ.

जनमाहिती अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, महागांव,
जि. यवतमाळ. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. देवानंद रामटेके, विस्तार अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. पी. वानखेडे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, महागांव यांचेकडे ५ वे वेतन आयोगाची थकबाकी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यापूर्वी रोखीने घेतलेल्या थकबाकीवर चक्रवाढ व्याजासह रक्कम मिळणाऱ्या पात्र सेवानिवृत्त शिक्षकांची विहित नमुन्यात माहिती देऊन व्याज आकारणी करुन एक प्रत माझेकडे अध्यक्ष, गोविंद धर्माप्पा गलांडे, महागांव यांचेकडे व एकप्रत मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचेकडे पाठवावी. खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट करण्यात यावा. शिघ्र टपालाद्वारे माहिती देण्यात यावी. विहित नमुन्यात झेरॉक्स सोबत जोडली आहे. पात्र असणाऱ्या एकूण ४१ सेवानिवृत्त शिक्षकांची यादी जोडली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आला असून १५ दिवसांचे आंत अर्जदारास माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिसून येतो. त्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी कार्यवाही करुन मागितली आहे. कोणत्याही कार्यालयात उपलब्ध असलेली कोणतीही माहिती मागितली नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम २(च) प्रमाणे मागितलेली माहिती योग्य नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना योग्य ते उत्तर ३० दिवसामध्ये देणे आवश्यक होते. तसा कोणताही पत्रव्यवहार केलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना प्रथम अपील दाखल करावे लागले. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे विचार न करता माहिती १५ दिवसांत द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु कोणत्याही सुनावणीस हजर राहिलेले दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना द्वितीय अपील करावे लागले आहे.

४.	या संपूर्ण अपील प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांचे पासून इतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचे पालन केलेले नाही. अपीलकर्ता यांना अपेक्षित केलेल्या कार्यवाहीकरिता आदेश देता येणार नाही. परंतु अपीलकर्ता यांना ३० दिवसांचे आंत योग्य ते उत्तर देणे हे बंधनकारक असल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक ठरते. त्याकरिता मात्र अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार हा अपीलकर्ता यांचेशी केलेला नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

२) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी करावयाची असल्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १६७/२०१०, अपील क्रमांक १६८/२०१०, अपील क्रमांक १६९/२०१०, अपील क्रमांक १७०/२०१०, अपील क्रमांक १७१/२०१०, अपील क्रमांक १७२/२०१०, अपील क्रमांक १७३/२०१०, अपील क्रमांक १७४/२०१०, अपील क्रमांक १७५/२०१० व अपील क्रमांक १७६/२०१०.**

श्रीमती सूनिता संजय कुकरेजा,
कुंज कॉलोनी, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्रीमती भारती मोहन कुकरेजा,
कुंज कॉलोनी, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्री. धर्मेंद्र मोहन कुकरेजा,
कुंज कॉलोनी, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्रीमती सरिता लक्ष्मण कुकरेजा,
कुंज कॉलोनी, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्री. लक्ष्मण मोटूमल कुकरेजा,
कुंज कॉलोनी, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्री. महेश खिलवानी,
६९०, आहूजानगर, शिवमंदीर जवळ,
जरीपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्री. काजल सुरेश खिलवानी,
६९०, आहूजानगर, शिवमंदीर जवळ,
जरीपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्रीमती मनिषा योगेश खिलवानी,
६९०, आहूजानगर, शिवमंदीर जवळ,
जरीपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्रीमती सितादेवी एन. खिलवानी,
६९०, आहूजानगर, शिवमंदीर जवळ,
जरीपटका, नागपूर - ४४० ०१४.

श्रीमती सुनिता एम. खिलवानी,
६९०, आहूजानगर, शिवमंदीर जवळ,
जरीपटका, नागपूर - ४४० ०१४.

..... **अपीलकर्ती /अपीलकर्ता**

## वि रु ध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर.

श्री. जे. एस. बेंडे
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्रमांक - २,
नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ते यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये एकूण १० द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या १० ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १७.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ते सर्व गैरहजर असून त्यांचे तर्फे प्रतिनिधी म्हणून श्री. पन्नालाल गजभिये व श्री. मदन मोहन बिसेन यांनी अधिकार पत्र सादर केलेले आहे. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. वरील सर्व अपीलामध्ये सर्व अपीलकर्त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १५.९.२००९ रोजी दिनांक २७.६.२००८ चा नामांतर अर्जाचे सदर्भामध्ये माझे नामांतरण झालेली सुधारित आखीव पत्रिका देण्याची तारीख सांगावी. मौजा नारी, न. भू. क्र. ४२०. सदरची माहिती नोदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या सर्व अर्जाचे संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी अर्ज दिनांक १९.९.२००९ रोजी प्राप्त झाला. त्या अनुषंगाने मौजा नारी येथील न. भू. क्र. ४२० मधील भुखंडाचे नामांतरण बाबत आपण या कार्यालयाकडे नामांतरण अर्ज सादर केला होता. परंतु सदर प्रकरणात उणिवा/त्रृटया असल्यामुळे आपले प्रकरणात नामांतरण होऊ शकले नाही. कृपया आपण प्रत्यक्ष कार्यालयात येऊन प्रकरणात असलेल्या त्रृटयांची पुर्तता करावी. पुर्तता करताच आपले प्रकरणात नामांतरणाची कार्यवाही करण्यात येईल. करिता आपला माहिती अधिकार २००५ अंतर्गत असलेला अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु सर्व अपीलकर्त्यानी सर्व अपीलामध्ये दिनांक १६.१२.२००९ रोजी प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. प्रथम अपीलांचा निर्णय हा दिनांक २८.१.२०१० रोजी देण्यात आलेला असून दिनांक ४.१.२०१० व दिनांक १८.१.२०१० ला सुनावणीची संधी देण्यात आली होती. परंतु गैरहजर राहिलेत. तसेच नगर भूमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांनी दिनांक १५.१०.२००९ पत्रान्वये वरील सर्व अर्जदारास माहिती दिली असलेचे दिसून येते व त्यामुळे सदरची सर्व अपीले ही निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही सर्व अपीलकर्त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ते आयोगापुढे सुध्दा हजर झालेले नाहीत व त्यांनी प्रतिनिधी पाठविलेला आहे. प्रतिनिधी यांनी आयोगाकडे खुलासा करतांना कार्यालयाने माझे अर्जावर १ वर्ष निघून गेल्यावरही नामांतरणाची कार्यवाही केली नाही व निश्‍चित कालावधीमध्ये माहिती दिली

नाही असे नमुद केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ प्रमाणे ज्या अर्जदाराने अर्ज केला असेल त्याच अर्जदाराने अपीलकर्ता म्हणून सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक असते. आयोगापुढे उपस्थित राहिल्यावर मदतनीस घेता येईल. परंतु उपस्थित न राहता प्रतिनिधी पाठविण्याची तरतुद नाही. त्यामुळे अपीलकर्ते यांच्या प्रतिनिधीची दखल घेण्याची आवश्यकता नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ते यांनी सर्व अर्जामध्ये नामांतर झालेल्या सुधारित आखीव पत्रिका देण्याची तारीख सांगावी अशी माहिती मागितलेली आहे. याचा अर्थ त्यांनी कार्यवाही करुन मागितलेली आहे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्येप्रमाणे अपीलकर्ते यांनी मागितलेली माहिती मोडत नाही. तसे असले तरी अपीलकर्ते यांचे नामांतरणाचे अर्जामध्ये त्रृटी आहेत व त्या त्रृटयांची पुर्ती करणे आवश्यक आहे असे कळविलेले आहे. याचा अर्थ अपीलकर्ते यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व तसेही अपीलकर्ते यांनी मागितलेली माहिती ही कोणत्याही व्यापक जनहिताच्या संदर्भात नसून त्यांचे व्यावसायिक व्यवहाराचे पुर्ती करिता मागितलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास जनमाहिती अधिकारी यांनी आणून दिली. उपस्थित झालेले प्रतिनिधी हे व्यवहारातील मध्यस्थ आहेत असेही आयोगापुढे सांगितले आहे व त्यामुळे अपीलकर्ते यांची सर्व अपीले ही खारीज करण्याची करावी अशी आयोगापुढे विनंती केलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्ते यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची सर्व अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ते यांची सर्व अपीले खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९६/अम/२००९.

श्री. किसनसिंग हरसिंग राठोड,
मु. पो. करजगांव, ता. दारव्हा,
जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जी. एस. भगत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, दारव्हा,
जि. यवतमाळ.

श्री. खडसे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, करजगांव,
ता. दारव्हा, जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, करजगांव, ता.दारव्हा, जि. यवतमाळ यांचेकडे श्री. हरीचंद्र फकीरा राठोड व सिताराम गलबु राठोड हयांनी

.

.. २

केलेले अतिक्रमण बद्यल आपण काय केले व अतिक्रमण हटविणार काय अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०१० रोजी सदर प्रकरणी माहिती मिळाली असून त्यापासून समाधानी आहे असे अपीलकर्ता यांनी तोंडी सांगितले असून रोजनाम्यावर सही केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९७/अम/२००९.

श्री. हरीराम कान्हा चव्हाण,
मु. दुधागिरी (तांडा), पो. लोहरा (ई),
ता. पुसद, जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पुसद,
जि. यवतमाळ.

श्री. अविनाश चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, दुधगिरी (तांडा), पो. लोहरा (ई),
ता. पुसद, जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. संजय राठोड, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुसद यांचेकडे मौजा दुधगिरी (तांडा) चे विकासासाठी सन २००५ ते आजपर्यंत कोणकोणत्या योजनानुसार किती कामे झाली त्या कामासाठी किती निधी उपलब्ध व किती खर्च करण्यात आला त्याबाबत दस्ताऐवजाच्या प्रती. ग्राम पंचायत अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२०१० रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती पुसद यांचेकडे लेखी निवेदन दिले असून मला संपूर्ण माहिती व दस्ताऐवज प्रत्यक्षात दाखविण्यात आले. त्याप्रमाणे माझे पूर्ण समाधान झाले असून सदर प्रकरण खारीज करण्यात यावे अशी विनंती केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३९८/अम/२००९.

श्री. बी. जी. बनकर,
मु. पो. बान्सी,
ता. पुसद, जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पुसद,
जि. यवतमाळ.

श्री. पी. बी. माळोदे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, रंभा, पो. भोजला,

ता. पुसद, जि. यवतमाळ. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. संजय राठोड, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत कार्यालय, रंभा, पो. भोजला ता. पुसद यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी सचिव, ग्रामपंचायत कार्यालय, रंभा, पो. भोजला यांचेकडे लेखी निवेदन सादर केले आहे व त्यात दिनांक ४.१.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती दाखविली. यामध्ये माझे समाधान झाले. पुढील कार्यवाहीबाबत तक्रार अथवा माहिती बाबतची अपील वैगेरे खारीज करण्याची कृपा व्हावी ही विनंती. असे निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०२/२०१०.

श्री. प्रदिप गोविंदराव कावळे,
३१४, ऐश्वर्य, नवीन नंदनवन ले आऊट,
कॅनाल रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
जुने सचिवालय इमारत, नागपूर.

श्री. सुखदेवे,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २,
बंगला नं. ३९/२, सिव्हील लाईन, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. एस. टी. डहाके, सहाय्यक अधिक्षक अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक २, नागपूर यांच्याकडे नवीन नाला व नविन पुल बनविण्या मागचा हेतु जाणून घेण्यासाठी सोबतच्या तक्त्यामध्ये वर्णन केलेली माहिती मागितलेली दिसून येते. (२ पाने झेरॉक्स लावून मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहे.) सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची अभिप्राय व मत प्रकट करण्याबाबतची आहे. तसेच कोणत्या कामाबाबत माहिती हवी आहे याबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्रश्नार्थक स्वरुपाची माहितीचे उत्तर देणे अभिप्रेत नाही व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.१.२०१० रोजी देण्यात आला असून माहितीच्या अर्जासोबत विवरणपत्र/तपशील पत्रातील अनु क्र. १, २, ४ व ५ मधील मागणी संदर्भात त्यांचेकडील उपलब्ध माहिती/कागदपत्रांच्या प्रती १० दिवसांत विनामुल्य पुरविण्यास आदेशीत करण्यात येत आहे. असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक

१८.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना ३ पृष्ठामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु तसे न करता त्यांनी अभिप्राय मागितले या कारणासाठी माहिती देण्यास नाकारलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर माहिती दिली होती. त्याबाबतची संपूर्ण कागदपत्रे दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती ही दिनांक २३.१०.२००७ रोजी सुध्दा दिलेली आहे. परंतु त्याबाबत अपीलकर्ता हे अभिप्राय मागत आहेत. तसेच मुद्या क्रमांक २ मध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारीचे अभिप्राय विचारले आहे व त्यामुळेच त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. मुद्या क्रमांक ३ मध्ये सुध्दा त्यांनी माहिती मागण्यापेक्षा आक्षेप दिलेले आहे. तसेच त्यांनी ज्या पत्राचा उल्लेख केलेला आहे त्या पत्राचे संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारच्या तपशीलातील संदर्भ दिलेला नाही. तसेच जमीन भुमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजनी केली आहे व त्यावर नमुद केलेल्या स्केलनुसार त्याच नकाशात नमुद करुन देण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली आहे. ती मागणी सुध्दा अधिनियमाचे तरतुदीनुसार त्यांना करता येत नाही व तशा प्रकारची कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित नाही व त्यामुळेच त्यांना अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले होते. अपीलकर्ता यांनी वरील प्रमाणे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्या संदर्भातील उपलब्ध असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध होऊ शकतील. परंतु कार्यवाही करुन मागणे किंवा जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नसल्यामुळे त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. त्यातही जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भामध्ये ७ दिवसाचे आंत पुन्हा संदर्भीत माहितीची नस्तीचा शोध घेऊन त्यातून छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याचे आश्र्वासन दिले व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत नस्तीचा शोध घेऊन नस्ती उपलब्ध झाल्यास छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९६/२०१०.

श्री. दिपक कुसारामजी सातपुते,
जोगीनगर, मार्ग क्र. ११,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. अशोक टालाटुले,
जनमाहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी , शिक्षण विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन सादर केले असून माहिती अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेकडून दिनांक
२५.२.२०१० ला मला पाहिजे असलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. तरी माझा अपील अर्ज खारीज करण्याची कृपा करावी. याबाबत माझी कुठलीही तक्रार राहणार नाही असे लेखी निवदेन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३७७/अम/२००९, अपील क्रमांक १३७८/अम/२००९ व अपील क्रमांक १३७९/अम/२००९.**

श्री. रमेश सोनाजी कहाळे,
शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्र,
ता. हिंगणघाट, जि. वर्धा- ४४२ ३०१.

श्री. ए. डब्ल्यु. ठवरे,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
अमरावती.

श्री. अनिलकुमार ठवरे,
अध्यक्ष, बालक,
पो. बॉक्स नं. २०९,
कॅम्प अमरावती -४४४ ६०२. **..... अपीलकर्ते**

**वि रु ध्द**

श्री. ए. एन. डोंगरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
मोर्शी रोड, अमरावती - ४४४ ६०३.

श्री. ए. एन. भोंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक लेखाधिकारी,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
मोर्शी रोड, अमरावती - ४४४ ६०३. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ते यांनी अनुक्रमे दिनांक १३.३.२००९, दिनांक १३.३.२००९ व दिनांक २१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये ३ द्वितीय अपीले

.

.. २

दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक १३७७/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सहा. प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती यांचेकडे सुधारित वेतन श्रेणीनुसार थकबाकीची रक्कम अदा न केल्याविषयी दिनांक १०.६.२००८ रोजी सादर केलेल्या तक्रारीवर कार्यवाहीची माहिती एकूण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचे उत्तर दिले. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक २.२.२००९ रोजी प्राप्त झाले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता गैरहजर होते. परंतु माहिती अधिकारी तथा सहा. प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, अमरावती यांनी दिलेली माहिती योग्य आहे. त्या कारणासाठी सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिनांक १६.१.२००९ च्या उत्तरासोबत सहपत्र पाठविले नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यासोबत सहपत्र जोडले होते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा सादर केलेला आहे. उपरोक्त विषयान्वये आपणास विनंतीपुर्वक कळविण्यात येते की, श्री. रमेश सोनाजी कहाळे हे सध्या मुख्याध्यापक या पदावर शासकीय तंत्र माध्यमिक विद्यालय केंद्र, हिंगणघाट येथे कार्यरत आहेत. यापुर्वी ते अमरावती विभागात प्राचार्य या पदावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाशिम येथे कार्यरत होते. सदर ठिकाणी कार्यरत असतांना त्यांचे गोपनीय अहवाल प्रतिकुल नोंदविल्या गेलेले आहे. त्याबाबतची प्रत आपल्या माहिती करिता या पत्रासोबत सहपत्रित करण्यात येत आहे. तसेच त्यांची एकाच विषयाबाबतची माहिती वेगवेगळया माहिती अधिकार अर्जान्वये मागण्याची प्रवृत्ती आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी मुद्या क्रमांक १, ३ व ५ च्या संदर्भामध्ये पुन्हा कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३७८/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मोर्शी रोड, अमरावती यांचेकडे वित्त मंत्रालय, मुंबई चे शासन निर्णय शुध्दीपत्रक क्रमांक वेपूर-१२०१/प्र.क्र. ४/भाग २(२)/सेवा-९, दिनांक २४.१.२००७ नुसार १२ वर्षानंतरची कालबध्द पदोन्नती अर्थात वरिष्ठ वेतनश्रेणी जून २००४ ला देण्याबाबत दिनांक २९.११.२००८ ला अर्ज केला होता. परंतु आपणाकडून अजूनपर्यंत कोणतीही कारवाई केल्याचे न कळल्याने केलेल्या कार्यवाईच्या सत्यप्रती त्वरित पुरविण्याबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. १९९८ पासून (पाचवे वेतन आयोगापासून) अजून वेतन निश्चिती शासन निर्णयानुसार न केल्यास आर्थीक लाभापासून वंचित केल्यामुळे. अशी त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१.२००९ रोजी माहितीच्या करिता रुपये १४/- शुल्क रक्कम भरण्याबाबतचे पत्र देण्यात आले व त्या दिवशी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना तो दिनांक २५.२.२००९ रोजी

देण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती त्यांच्या अर्जावरील केलेल्या कार्यवाहीची माहिती असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक १३७९/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांचेकडे पदांचा आढाव्या अगोदर व नंतरची कर्मशाळा परिचर/भांडार परिचर या तांत्रिक पदाच्या लेखाशिर्ष २२०३ व २२३९ च्या आस्थापनेवर मागासवर्गीयांच्या जातीनिहाय मंजूर आरक्षणाची प्रमाणित माहितीच्या सन १९९० ते २००७ पर्यंत या कालावधीतील सत्यप्रती अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.२.२००९ रोजी देण्यात आला असून दिनांक १८.१२.२००८ अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून सुधारित दिनांक १.९.२००८ बिंदू नामावलीची माहिती सहा.संचालक (अतांत्रिक) प्रादेशिक कार्यालय, अमरावती देतील असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

७. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना सन १९९० ते २००७ पर्यंतच्या कालावधीतील माहिती मागितली होती. परंतु ती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती उपलब्ध नाही व ज्या ज्या वेळेस पदाची जाहिरात दिलेली आहे. त्या त्यावेळेस बिंदू नामावली मंजूर करुन घेऊन दिनांक ३०.९.२००६ अन्वये भांडार परिचर/कर्मशाळा परिचर ही पदे सर्मर्पित झाली असल्यामुळे ती माहिती कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते. प्रभारी सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांनी आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. उपरोक्त विषयान्वये आपणास विनंती करण्यात येते की, श्री. ए. डब्ल्यु. ठवरे हे सध्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था, यवतमाळ येथे कार्यरत आहेत. यापुर्वी ते औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती येथे कार्यरत होते. श्री. ठवरे हे एकाच प्रकारची माहिती वेगवेगळया माहिती अधिकार अर्जान्वये मागत असतात व ही त्यांची प्रवृत्ती आहे. सदर ठिकाणी

कार्यरत असतांना त्यांचे गोपनीय अहवाल प्रतिकुल नोंदविल्या गेलेले आहे. तसेच आपणास आवश्यक वाटल्यास त्यांचे माहिती अधिकारान्वये या कार्यालयाला प्राप्त झालेले अर्ज व गोपनीय अहवालाच्या प्रती आपणाकडे सादर करता येईल.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३७७/अम/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १, ३ व ५ ची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात पुन्हा विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपील क्रमांक १३७८/अम/२००९ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

३) अपील क्रमांक १३७९/अम/२००९ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०५/२०१०.

श्री. हिरालाल जेठामल मोटवानी,
माजी नगराध्यक्ष, मु. पो. ता. देसाईगंज,
जि. गडचिरोली - ४४१ २०७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

कु. माधुरी मडावी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली.

श्री. व्ही. ए. बडवाईक,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य लिपिक,
नगर परिषद, देसाईगंज,
जि. गडचिरोली. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी (१.४.२००९ प्राप्त) जनमाहिती अधिकारी तथा अग्निशमन शाखा, नगरपरिषद, देसाईगंज यांचेकडे श्री. लक्ष्मी टॉकीज, देसाईगंज अग्निशमन नुतनीकरण प्रमाणपत्र प्रदान केल्याचे संबंधाने एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.७.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात अग्निशमन लिपिक, नगर परिषद, देसाईगंज यांचेवर रुपये २५०/- दंड करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित विभाग प्रमुखांनी २४ तासांचे आंत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच ज्या मुद्यांचे दस्तावेज नगरपरिषद कार्यालयात उपलब्ध नाहीत किंवा गहाळ झाले आहेत. याबद्दल पोलीस स्टेशन, देसाईगंज येथे तक्रार दाखल करण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	द्वितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे त्यांचा विश्वासघात झालेला आहे व त्यांना माहिती मिळाली नाही तरी चालेल. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचा विश्वासघात झाल्यामुळे शास्ती झाली पाहिजे. तसेच त्यांच्या आदेशाप्रमाणे पोलीस स्टेशन, देसाईगंज येथे तक्रार दाखल केलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. मुद्या क्रमांक १ :- श्री. हिरालाल जेठामल मोटवानी यांचे माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नमूना जोडपत्र "अ" या कार्यालयास दिनांक १.४.२००९ रोजी प्राप्त झाले असून उपरोक्त जोडपत्र "अ" मधील माहिती कर व अग्निशमन विभागाशी संबंधित बाब असल्याने जनमाहिती अधिकारी श्री. म. गो. गोस्वामी यांनी नोटीस क्र. २८२/२००९, दिनांक ६.४.२००९ व दिनांक २२.४.२००९ नुसार श्री. मोटवानी यांचे जोडपत्र "अ" मधील माहिती सादर करण्यास संबंधित विभागांना नोटीस दिले असल्याचे दिसून येते. (सहपत्र १ व २) परंतु कर विभाग आणि अग्निशमन विभाग प्रमुख यांनी जनमाहिती अधिकारी श्री. म. गो. गोसावी यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे श्री. गोस्वामी हे अर्जदाराला विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देऊ शकले नाही. त्यामुळे मोटवानी यांनी या कार्यालयास दिनांक १५.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. परंतु प्रशासकीय अडचणीमुळे सदरच्या अपीलावर ५ दिवस उशिरा सुनावणी घेण्यात आले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली सुनावणीच्या निर्णय संबंधितास लगेच उपलब्ध करुन दिला व निर्णयानुसार कर निरिक्षक व अग्निशमन लिपिक यांनी सुध्दा संबंधिताला माहिती उपलब्ध करुन दिली (सहपत्र ३, ४ व ५) मुद्या क्रमांक २ :- श्री. हिरालाल जेठामल मोटवानी यांचे नमुना जोडपत्र "अ" मध्ये दिनांक १५.६.२००९ रोजीचे प्राप्त प्रथम अपील मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, श्री. सी. एम. सदावर्ती यांनी दिनांक २०.७.२००९ ला अपीलकर्ताच्या अपीलवर सुनावणी घेवून अपीलकर्त्यास पारित आदेशाची प्रत दिनांक २१.७.२००९ ला उपलब्ध करुन दिली. तसेच सदरचे पारित आदेशातील मुद्दे अग्निमशन विभागाशी निगडीत असल्याने पारित आदेशाची प्रत आवश्यक अंमलबजावणी करिता अग्निशमन विभाग आणि संबंधित विभाग प्रमुख कर निरिक्षक/अग्निशमन लिपिक/लेखापाल व आस्थापना लिपिक यांना उपलब्ध करुन देण्यात आली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे काम हे वर नमुद विभागाचे आहे. यात जनमाहिती अधिकाऱ्याचे कुठेही संबंध येत नाही. यासंबंधाने अग्निशमन लिपिक यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दिनांक २०.७.२००९ रोजी पारीत निर्णयानुसार अग्निशमन लिपीक यांनी श्री. हिरालाल जेठामल मोटवानी यांचे दिनांक ३१.३.२००९ रोजीचे ज्या मुद्यांतील माहिती नगर परिषद कार्यालयात उपलब्ध आहे ती माहिती हिरालाल जेठामल मोटवानी उपलब्ध करुन दिली व ज्या मुद्यांची माहिती अग्निशमन विभागास उपलब्ध नाही. ती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. (सहपत्र ६) असे स्पष्ट कळवून सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी पारित आदेशातील मुद्या क्रमांक ३ चा श्री. मोटवानी पाठपुरावा करीत आहे हे योग्य वाटत नाही. यात श्री. सदावर्ती मुख्याधिकारी हे विद्यमान नगर परिषद उपाध्यक्षास कोणत्याही प्रकारे संरक्षण करीत नसून यात अपीलकाराची दिशाभूल केलेले नाही. मुद्या क्रमांक ३ :- वरील प्रमाणे. मुद्या क्रमांक ४ :- श्री. राधेशाम परसराम काबरा, शिवाजी वार्ड, देसाईगंज यांनी या कार्यालयास दिनांक १४.१०.२००९ रोजीचे नमुना जोडपत्र "अ" मधील मुद्यांची माहिती श्री. राधेशाम काबरा यांना विहित मुदतीत म्हणजे दिनांक ११.११.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु श्री. हिरामल जेठामल मोटवानी यांनी राधेशाम परसराम काबरा यांना दिनांक ११.११.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या आधारावर मा. राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते. एकंदरीत श्री. काबरा यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या आधारावर श्री. मोटवानी यांनी द्वितीय अपील दाखल करणे कितपत तर्कसंगत वाटत नाही. (सहपत्र-६) यात श्री. हिरालाल जेठामल मोटवानी यांनी मा. राज्य माहिती आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करुन मा. राज्य माहिती आयोग तसेच नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा अमुल्य वेळ वाया घालवित आहे. वास्तविक पाहता श्री. हिरामल जेठामल मोटवानी यांचे प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द ९० दिवसांचे आंत राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे द्वितीय अपील सादर करण्यास पाहिजे होते. परंतु त्यांनी तब्बल १६० दिवसानंतर द्वितीय अपील

दाखल केले आहे. त्यामुळे श्री. हिरालाल जेठामल मोटवानी यांनी मा. राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे दाखल द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र ठरते. सदरच्या खुलाश्यामध्ये अधिनियमाचे कलम १९(३) चे परंतुकाप्रमाणे मुदतीचा मुद्या उपस्थित करण्यात आलेला आहे. सदरचे अपील हे मुदतीत दाखल करण्यात आले नाही. १९० दिवसांचे आंत १६० दिवसानंतर दाखल करण्यात आले आहे. ते खारीज करण्यास पात्र आहे. याबद्यल अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा आयोगाकडे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे खुलासा केलेला नाही. आज आयोगापुढे खुलासा करतांना त्यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला असल्यामुळे व त्याची अंमलबजावणी होईल या विचाराने त्यांनी द्वितीय अपील सादर केलेले नाही. मात्र द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी सहपत्र क्रमांक ४, दिनांक ११.११.२००९ च्या पत्रानुसार पोलीस तक्रार दाखल करण्यात आलेली नसल्याचे कळविले असे नमुद केले आहे. परंतु दिनांक ११.११.२००९ चे पत्र हे अपीलकर्ता यांना अग्रेषित केलेले नसून श्री. राधेशाम परसराम काबरा यांनाअग्रेषित केलेले आहे व त्यामुळे सदरच्या मुद्यांच्या संदीामध्ये कोणताही विचार करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे विलंबाचे कारण ही समाधान कारक नसल्यामुळे सदरचे अपील हे मुदत बाहय म्हणून खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील मुदतबाहय असल्यामुळे व त्याबाबतचा खुलासा समाधानकारक नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २२/२०१०.

सौ. प्रभाताई शा. मंदुरकर,
तिडके-ले-आऊट, मालेवार ले आऊट शेजारी,
वरठी रोड, ता. जि. भंडारा. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, भंडारा.

जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. मागील दिनांक ३.२.२०१० रोजीच्या सुनावणीस अपीलकर्ती हे हजर राहू शकत नाही असे त्यांनी आयोगास पत्र दिले असल्यामुळे व त्याच दिवशी उत्तरवादी हजर होते त्यामुळे उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यामुळे आज अपीलकर्ती हजर आहे व उत्तरवादी हजर नाही.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद प्रशासन, भंडारा यांचेकडे सत्यम सिनेमा मागे तिडके ले आऊट मधील रस्ते/नाल्या बांधकामा संबंधीत सन २००८-२००९ या कालावधीतील एकूण ३ मुद्यांची माहिती व पोटमुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेऊन जाऊ असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक १३.८.२००९ रोजी पत्र पाठविले. परंतु सदरचे पत्र त्यांनी घेतले नाही व त्यानंतर मात्र अपीलकर्ती यांनी दिनांक २६.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ती यांना ७ दिवसाचे आंत माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर अपीलकर्ती यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी व दिनांक १३.१०.२००९ रोजी माहिती घेऊन जाण्यास कळविण्यात आले. परंतु माहिती घेऊन जाण्यास न आल्यामुळे दिनांक २३.१०.२००९ रोजी माहिती कुरिअरने पाठविले. परंतु समाधान न झाल्यामुळे दिनांक ६.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांना जी माहिती उपलब्ध झाली ती दिशाभूल करणारी माहिती आहे व मागितलेली माहिती नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले. अपीलकर्ती यांनी आयोगा पुढे असे सांगितले की, दिनांक ११.६.२००८ रोजी मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या

आदेशाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. परंतु उपलब्ध करुन दिलेली माहिती ही सन २००७ मधील आहे व त्यातही तिडके ले आऊट मधील माहितीच्या संदर्भामध्ये कोणतीही माहिती दिसून येत नाही. यावरुन अपीलकर्ती यांची दिशाभूल करण्यात आलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. उपलब्ध झालेल्या माहितीचे अवलोकन केल्यावर सुध्दा असे दिसून येते की, त्यांना सन २००७ मध्ये पारित झालेल्या ठरावातील निविदांची माहिती पाठविली आहे व त्यामुळे आयोगाची सुध्दा खात्री झालेली आहे की त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक ठरते. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना त्यांच्या दिनांक १३.७.२००९ च्या अर्जामध्ये व जोडपत्रात मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे मुद्दे निहाय कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. (दिनांक ११.६.२००८ च्या मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशानंतरची कार्यवाही)

२) अपीलकर्ती यांना दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्याधिकारी, नगरपरिषद, भंडारा यांनी करावयाची आहे.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२८५/अम/२००९.

श्री. एस. एस. गवळी,
२६, मेघदुत कॉलनी, (अमर कॉलनीजवळ),
बायपास रोड, ता. जि. अमरावती. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
प्लॉट नं. ९०, शिवाजी नगर,
नागपूर विभाग, नागपूर - ४४० ०१०.

जनमाहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक (वर्ग-१),
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १८.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणीस गैरहजर होते. त्यांनी मुदत मागितली होती. उत्तरवादी हजर असल्यामु त्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते. आज दिनांक १९.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेतले.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे तसेच सह जिल्हा निबंधक, मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा यांचेकडे भंडारा शहरालगत व भंडारा जिल्हा तहसीललगत सर्व शेत स. नं. कृषक जमीन अकृषक करुन घेणाऱ्या व्यक्तिंची नांवे व पत्ता अशी एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.१२.२००७ रोजी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता खर्चाची माहिती कळविलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००८ रोजी मुख्यालय दुय्यम निबंधक वर्ग-२ यांनी सुध्दा त्यांच्या दिनांक ६.३.२००८ च्या पत्राप्रमाणे एक पत्र दिलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक ११.९.२००८ निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु निर्णयामुळे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती आता पर्यंत त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यांना माहितीच्या खर्चाकरिता किंवा अभिलेख शोध घेण्याकरिता जी फी सांगितली आहे ती माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे नाही. जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा तसेच त्यांनी केलेल्या युक्तिवादाप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज केलेला आहे. तो माहितीचा अर्ज हा जिल्हाधिकारी, भंडारा तसेच सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे केलेला आहे. तो अधिनियमाचे कलम ६ प्रमाणे नाही. अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक असते. परंतु एकच अर्जामध्ये जिल्हाधिकारी व सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी भंडारा माहिती अधिकाऱ्याचे वर्णन न करता मोघम असे वर्णन केले. त्यातही माहितीचे जे वर्णन केलेले आहे ते मोघम असे दिलेले आहे त्यातही निश्चित असे माहितीचे वर्णन नाही. त्याकरिता सदरच्या माहितीचा शोध घेण्याकरिता नोंदणी कायदा १९७८ नुसार कार्य पध्दतीची माहिती दिली होती. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यांनी दिनांक ५.१२.२००७ रोजी मुख्यालय दुय्यम निबंधक वर्ग-२ भंडारा यांनी सुध्दा संपूर्ण कार्य पध्दती नमुना सहीत कळविले होते. अपीलकर्ता यांनी अर्ज करण्याचे पुर्वी सुध्दा त्यांना त्याच पध्दतीची कार्य पध्दती दिनांक ११.१०.२००७ रोजी कळविले होते व त्यामुळेच त्यांनी माहितीचा अधिकार अर्जामध्ये माहिती मागविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु तशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सुध्दा अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती अतिशय व्यापक व मोघम स्वरुपाची असून प्रमाणाबाहेर असलेली दिसून येते. तशी माहिती उपलब्ध करुन देण्यास शासकीय यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित दिसून येत नसल्यामुळे सदरची माहिती ही उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. अपीलकर्ता यांनी अपील दाखल करण्याची मुदत सुध्दा पाळलेली नाही. त्यांनी माहितीचा अर्ज दिनांक २६.११.२००७ ला केलेला आहे. दिनांक १५.१२.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. त्याविरुध्द दिनांक २८.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे व त्या निर्णया विरुध्द ९० दिवसांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावयाची असते. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियम ४ प्रमाणे माहिती करिता जी फी नमुद करण्यात आलेली आहे व त्यामध्ये (A) (a) "When the concerned Department has already fixed the price of some documents, maps, etc. The price so fixed plus postal Charges" अशा प्रकारची तरतुद आहे व त्याप्रमाणेच अपीलकर्ता यांना त्यांनी नोंदणी कायदा १९०८ तरतुदीची माहिती दिलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४०६/अम/२००९.

श्री. दत्ता नथ्थु खंदारे,
मु. पो. सुकळी ज., ता. उमरखेड,
जि. यवतमाळ. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
उमरखेड, जि. यवतमाळ.

श्री. एस. आर. थोरवे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
साजा - सुकळी ज.
ता. उमरखेड, जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. बी. बी. वानखेडे, मंडळ अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तलाठी, साजा सुकळी ज., यांचेकडे वर्ष २००७-०८ मध्ये साजा अंतर्गत गावात शेतकऱ्यांना ७/१२ तसेच इतर कागदपत्रे वाटप करण्यात आली त्या संदर्भात जमा झालेल्या महसूल नोंदवहीची सत्यप्रत तसेच साजा अंतर्गत गावात फेरफार केलेल्या शेतकऱ्यांची माहिती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १४.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक २७.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध आहे घेऊन जावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध करुन न घेता अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती घेऊन जाण्याकरिता बरेच वेळा सांगितले. परंतु त्यांनी माहिती घेऊन गेलेले नाही. तसेच अपीलकर्ता यांनी नस्तीमध्ये पत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १९/२०१०.

श्री. गोपाळा मारोतराव पोटदुखे,
मु. चिंचगुंडी, ता. अहेरी,
जि. गडचिरोली. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
चंद्रपूर.

श्री. के. गोणीपसप्पा,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
लघु पाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,
चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्था. स्तर) विभाग, चंद्रपूर यांचेकडे उपसा सिंचन योजना अहेरी बाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अहेरी यांनी राज्य माहिती आयुक्त यांचेकडे निवेदन सादर केले असून या कार्यालयाचे पत्र क्र. ५४/व.लि., दिनांक १८.२.२०१० नुसार चचा द्वारे पूर्ण करुन संबंधितांना लेखी स्वरुपात देण्यात आली आहे. त्यांना माहिती दिल्याची नोंद स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तरीपण माहिती बाबत तक्रार आल्यास आम्ही माहिती देण्यास जबाबदार राहू असे लेखी निवेदन दिले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९७/२०१०.

श्री. निमाई अनिल दास,
बिरसी कॅम्प, पो. परसवाडा (कामठा),
ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
मोरगांव अर्जुनी, जि. गोंदिया.

श्री. एस. के. यादव,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
मोरगांव अर्जुनी, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, मोरगांव अर्जुनी, जि. गोंदिया यांचेकडे तलाठी, कोरंभी टोला, सा.क्र. ३०, तह. मोरगांव अर्जुनी अंतर्गत ग्राम अरुननगर के १) बाईन निर्मल गिरीष, २) बाईन भुपती गिरीष, ३) सरकार कालीपद अनिल, ४) सरकार रामपद अनिल इन ४ लोगों के जमीन की ७/१२ मिलने बाबद. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सोबत दारिद्रय रेषे खालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांना ७/१२ चे उतारे तलाठी यांचेकडे उपलब्ध होत असून दिनांक २७.११.२००९ रोजी पत्र दिले. तलाठी यांनी दिनांक १.१२.२००९ रोजी ते उपलब्ध करुन दिले. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल

केले व ते सुनावणीस आले नाही.  त्यामुळे त्यांना दिनांक २३.२.२००९ रोजी त्यांना डाकेने माहिती उपलब्ध करुन दिली असे सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९८/२०१०.

श्री. चंद्रभान सिताराम बारापात्रे,

२९९, ओमनगर, नागपूर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रशांत दानोडीकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग,
महाल, नागपूर.

श्रीमती माडेलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग,

महाल, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.९.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग, महाल, नागपूर यांचेकडे मिटर कॉस्ट पेड आणि बिलांवर लिहणे बंद कां केले ? सन

२००० च्या नंतर नवीन मिटर लावण्यात आले. मिटर कॉस्ट वसूल करणे सुरु हे कोणत्या कायद्यानुसार केले त्याची कॉपी हवी आहे. पेड केलेली रक्कम ग्राहक बिलावर लिहून येत होती हे लिहणे ३१.७.२००७ पासून कोणत्या नियमानुसार बंद केले त्याची कॉपी हवी आहे. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या माहितीचा कालावधी सन २००० ते २००८ पर्यंत असून सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१०.२००९ रोजी आपण मागितलेली माहिती नंदनवन उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नागपूर यांना संबंधित असल्यामुळे आपली तक्रार नंदनवन उपविभागाकडे पाठविण्यात आली आहे. तरी आपण हवी असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त करावे असे नमुद केलेले आहे. त्यानुसार दिनांक २७.१०.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. मात्र दिनांक १२.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. तत्पुर्वी दिनांक ६.११.२००९ रोजी

आपण मागितलेल्या माहितीकरिता आम्ही उच्च कार्यालयाशी संपर्क केलेला आहे. पत्र प्राप्त होताच आपणाला माहिती देण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, महाल विभाग, नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक ७.१२.२००९ रोजी सन २००४ नंतर नवीन मिटर लावण्यात आले. त्याची मिटर कॉस्ट महावितरण कंपनीच्या आदेशानुसार करण्यात आले. त्याच्या प्रती उपलब्ध होताच आपणास देण्यात येईल. पेड केलेली रक्कम ग्राहक बिलावर लिहुन येत होती. महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कमर्शियल सर्क्युलर क्रमांक ४३, दिनांक २७.९.२००६ तसेच माननीय महाराष्ट्र विद्युत नियमक आयोग यांचे आदेशानुसार मीटरची किंमत वसुल करणे बंद झाली. या परिपत्रकाची छायांकित प्रत या पत्रासोबत जोडली आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक २७.१.२०१० रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, महावितरण यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती मागितली तरी ते माहिती देत नाहीत. वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधून माहिती देता येईल अशा प्रकारचे उत्तर देतात. त्यांच्या देयकांत कशा प्रकारे आकारणी केलेली असते हे सर्व सामान्य ग्राहकास कळत नाही व त्यांचे कार्यालयात गेल्यास त्याबद्दल काहीही सांगत नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचे कार्यालयात कोणत्याही प्रकारचे परिपत्रक किंवा धोरणात्मक आदेश हे उपलब्ध नसतात. संगणकामध्ये जे सॉफ्टवेअर दिले असते त्याप्रमाणे आकारणी केली जाते. परंतु असे असले तरी कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे नियम असल्या शिवाय अधिकाऱ्यास त्यांच्या समोरील प्रकरणात कार्यवाही करता येत नाही. त्याप्रमाणे शाखा अभियंता किंवा उपअभियंता असेल तर त्यास कार्यवाही नियमाशिवाय करता येत नाही. त्यामुळे नियमाची माहिती असणे आवश्यक असते. त्यामुळे त्यांचे कार्यालयात नियमावली असणे आवश्यक आहे. परंतु महावितरण यांची कार्य पध्दती विचित्र दिसून येते. त्यांच्या अधिकाऱ्यांना ते जे कर्तव्य करतात त्याच्या बद्दल अधिकाऱ्यांना माहिती नसून कंपनी धोरणानुसार घेण्यात येते अशा प्रकारचे उत्तर अभियंता देत असतील तर ते अज्ञानी आहेत किंवा ग्राहकांना त्याप्रमाणे सविस्तर उत्तर देता येत नाही व टाळाटाळ करतात असा त्याचा अर्थ होतो. पारदर्शकता दर्शविण्यासाठी हे सर्वसाधारण ग्राहकांना कळणे आवश्यक असते व त्याचकरिता या अधिनियमाचा उद्येश आहे. परंतु त्या अधिनियमाचे तरतुदींना सुध्दा महावितरण अधिकारी हे हरताळ फासतांना दिसून येतात. अपीलकर्ता यांना नियमाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सुरुवातीला जी उत्तरे दिली ती निश्चित समाधानकारक नाही किंवा संबंधित अभियंता यांना तरतुदीचे आकलन येत नाही असे दिसून येते. त्यामुळे यापुढे अशा प्रकारची माहिती न देता निश्चितपणे माहिती देता येईल याबाबत मुख्य अभियंता यांनी त्यांचे कंपनीतील माहिती अधिकारी यांना तसे आदेश देणे आवश्यक आहे. ही जबाबदारी मुख्य अभियंता यांची आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे त्या नियमाप्रमाणे कार्यवाही झालेली नसेल तर नियामक आयोगाकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०३/२०१०.

श्री. वसंत पांडेय,
नयनतारा, अनेकांत स्वाध्याय मंदिर,
अग्रसेन भवन जवळ, वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. मेघना वासनकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा प्रकल्प अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

श्रीमती माडेलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय,
नगरपालिका प्रशासन विभाग, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे नयनतारा द्वारा दिनांक २५.८.२००९ रोजी दिलेल्या निवेदना संबंधी आपको नयनतारा द्वारा १६ मुद्योंका जन सर्वेक्षण मांगपत्र कारवाई हेतू दिया गया था. उस संबंध मे आपके द्वारा की गयी कारवाई का ब्यौरा सूचना के अधिकार के तहत उपलब्ध कराया जाय. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा संबंधामध्ये दिनांक ३०.११.२००९ रोजीचे पत्रामध्ये दिनांक १०.१२.२००९ रोजी सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी तसेच दिनांक १८.१२.२००९ रोजीचे पत्रामध्ये दिनांक २३.१२.२००९ रोजी उपस्थित राहण्यास कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक १.१.२०१० रोजीचे पत्रामध्ये दिनांक ११.१.२०१० रोजी उपस्थित राहण्यास कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचे निर्णयाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आता पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.१२.२००९ रोजी देण्यात आला असून त्या पत्राची प्रतिलिपी श्री. वसंत पांडेय, नयनतारा, साध्याय मंदिर (अग्रेसन भवन) वंजारी चौक, वर्धा यांना माहितीसाठी अग्रेषित केलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही हे म्हणणे योग्य नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांच्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता हे त्यांच्या निवेदनावरील करावयाची बैठकीची कार्यवाही व माहितीची व प्रथम अपीलाची कार्यवाही याबाबत सरमिसळ करीत असल्यामुळे सदरच्या अपीलाचे सुनावणीचे संदर्भामध्ये त्यांनी वरील मुद्दे उपस्थित केले आहेत. माहितीच्या अर्जाप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती (अंतीम निर्णय नाही) उपलब्ध करुन दिल्यावर माहिती उपलब्ध घाली असे अपेक्षित असते. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत निर्णय हा माहितीच्या अधिकारात मिळत नाही व तसे अपेक्षित पण नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०२/२०१०.

श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र सुखदेवे,
मु. पो. बोंडगांव (देवी),
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती ममता झा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एन. एस. डोंगरवार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
मानवता विद्यालय, बोंडगांव (देवी),
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर असून प्रकृती अस्वस्थेमुळे उपस्थित राहू शकत नाही असे कळविलेले आहे. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, युनायटेड एज्युकेशन

... २



सोसायटी, बोंडगांव देवी, ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया यांचेकडे नोंदणी क्रमांक २८९८ (मे) चा संपूर्ण रेकॉर्डस दस्ताऐवज, नकल पत्र व्यवहार व मालमत्ता इत्यादीची सविस्तर माहिती एकूण १६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.१०.२००९ रोजी माहितीच्या संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व त्यानंतर पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक १७.९.२००९ रोजी तीच माहिती मुख्याध्यापक यांना मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात दिनांक ५.१०.२००९ रोजी मुख्याध्यापक यांनी उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता सुनावणीस

उपस्थित झाले नाही. यावरुन त्यांना माहितीची आवश्यकता नाही असा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्राचे संदर्भात जी त्यांना माहिती मागितली होती ती त्यांनी दाखल केली होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे प्रमाणपत्र त्यांनी दाखल केले नव्हते व त्यांचे वडिलांचे प्रमाणपत्र होते. आता द्वितीय अपील नस्तीमध्ये प्रमाणपत्र दाखल केलेले आहे ते २००२ च्या संदर्भात आहे. परंतु २००७ च्या संदर्भातील नाही. सचिवांकडे जो अर्ज केला होता त्याबाबत ते माहिती अधिकारी नाही व त्यांनी सर्व माहिती ही विश्वस्त संस्थेला सादर केलेली आहे असे त्यांनी कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना स्वतःला सदरच्या माहिती आवश्यकता नाही असे ते सांगत असतात. तसेच त्यांचा मोठा भाऊ श्री. ताराचंद रामचंद्र सुखदेवे यांचे शाळा न्यायाधिकरणाकडे अपील क्रमांक १९०/९५ अन्वये प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच अपीलकर्ता यांचे मोठे बंधु श्री. ताराचंद रामचंद्र सुखदेवे यांनी हीच माहिती मागितली होती. परंतु राज्य माहिती आयोगाचे अपील क्रमांक २६६४/२००७ प्रमाणे त्यांचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. तसेच त्यांचे बंधुनी माहितीचे अधिकारात सोबत जोडलेले दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्र हे बनावट आहे असे खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी/मोर यांचा अहवाल असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते व त्यामुळे त्यांचे बंधुचे अपील हे शाळा न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असल्यामुळे व ते पुर्वी शिक्षक होते त्यांमुळे ते संस्थेस त्रास देण्याचे उद्येशाने माहिती मागत आहेत असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात संस्थेच्या संदर्भातील व कर्मचाऱ्यांचे संदर्भातील १९९१ पासूनची ते आजपर्यंत मागितलेली दिसून येते व ही माहिती सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार शेकडो पृष्ठामध्ये होईल व त्यामुळे ती दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्र असल्यामुळे संस्थेस किंवा शाळेस निधी उपलब्ध नसल्याने माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. त्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०५/२०१०.

श्री. किरण प्यारेलाल भगत,
द्वारा - श्री. राजेंद्र खंडाळ,
११ ब, श्रीरामवाडी, गणेश मंदीर,
अयोध्यानगर, नागपुर - ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर.

श्री. डॉ. प्रमोद सोनुने,
जनमाहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिक्षक,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
मेडिकल, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. पी. डी. दोरवे, मुख्य प्रशासकीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय, नागपूर यांचेकडे माझे वडील प्यारेलाल दुलिचंद भगत यांचे देय दिनांक २५.३.२००८ च्या निर्णयानुसार रक्कम १,२५,३३५/- मला देयक आहे. त्यापैकी मला फक्त ३२,५९१/- रुपये धनादेश क्रमांक ४९१७१६ मा. कामगार आयुक्त यांचे मार्फत प्राप्त झाला. त्यात मला आपल्याकडून ३९२/- रुपये कमी देण्यात आले आहेत. मला देय असणारी मुळ रक्कम ३२,९८३/- रुपये आहे व त्यावरील व्याज ९२,७४४/- रुपये + ३९२/- रुपये आणि दिनांक २५.३.२००८ पासूनचे ३२,९८३ रुपये वरील १० % व्याज रक्कम मला देण्यात येई पर्यंत आपण केंव्हा देत आहात. याबाबत माहितीच्या अधिकारात सविस्तर माहिती मला द्यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ११.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ

ााल्यामुळे त्यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.९.२००९ रोजी पुन्हा देण्यात आलेली दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांन दिनांक ११.९.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली व दिनांक २५.९.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिली त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०६/२०१०.

श्री. सुनिल के. अभिचंदानी,
१४२, रेसीडेन्सी रोड, सदर,
नागपुर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. पी. भिवगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
मंगळवारी झोन क्र. १०,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. व्ही. डब्ल्यू. गभने,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
लोककर्म विभाग,
मंगळवारी झोन क्रमांक १०,
महानगरपालिका, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी, मंगळवारी

झोन क्रमांक १०, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक १४.८.२००९ च्या संदर्भामध्ये एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.१०.२००९ रोजी देण्यात आला असून ८ दिवसात माहिती द्यावी. नस्तीचा शोध लागत नसल्यास संबंधितांवर stringent action घ्यावी व १५ दिवसात अहवाल सादर करावा असा प्रकारे आदेश दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आता पर्यंत त्यांना त्यांच्या निवेदनावर काय कार्यवाही झाली याबद्यलची कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २२.१२.२००९ रोजी त्यांचे निवेदनावर होत असलेली कार्यवाहीची माहिती त्यांना कळविण्यात आली होती. जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, त्यांची तक्रार कार्यवाही करावयाची आहे. ज्या नस्तीची आवश्यकता आहे ती उपलब्ध होत नाही. सदरची माहिती १९९८ ची आहे. १९९८ च्या आवक जावक नोंदी समोर पुढील कोणतीही नोंद नाही. त्यामुळे सदरची नस्ती कोणत्या विभागात प्रलंबित आहे हेही आज आढळून येत नाही. त्यामुळे सहसंचालक, नगर रचना यांचेकडे सर्व बांधकाम विभागास सदरची नस्ती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले आहे. परंतु नस्ती आढळून येत नाही. त्यामुळे पुढील कोणतीही कार्यवाही होऊ शकत नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे निवेदनावर कोणती कार्यवाही सुरु आहे हे तरी कळविणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आता पर्यंत शाखेत नस्तीचा शोध घेऊन माहिती त्यांना उपलब्ध करुन देता. अपीलकर्ता यांनी सुध्दा हे मान्य केले. जनमाहिती अधिकारी हे नस्तीचा शोध घेत आहेत. परंतु नस्ती उपलब्ध होत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १०४/२०१०.

श्री. राजेश काशिनाथराव मासुरकर,
१६८, ओमनगर, नागपुर - ४४० ००९. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
लेखाधिकारी (शिक्षण विभाग),
रविनगर, नागपूर.

श्री. हुद्दार,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण विभाग),
रविनगर, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, शिक्षण विभाग, नागपूर यांचेकडे किशोर मासुरकर, मुख्याध्यापक, उज्वल विद्यालय, नागपूर यांचे वेतन निश्चिती प्रकरणाबाबत तक्रार दिनांक १५.१०.२००९ संबंधाने कार्यालयाने केलेली कार्यवाहीचा अहवाल प्रमाणित प्रतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.१२.२००९ रोजी श्री. किशोर मासुरकर,

मुख्याध्यापक, उज्वल विद्यालय, नागपूर यांच्या संबंधातील माहिती या कार्यालयाचे पत्र क्रमांक लेखा/शिवि/१२२८/२००९, दिनांक २५.११.२००९ अन्वये मागितलेली आहे. त्याची प्रत आपल्याला या कार्यालयाने दिनांक १.१२.२००९ ला देण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक २०.१.२०१० रोजी श्री. किशोर मासुरकर, मुख्याध्यापक, उज्वल विद्यालय, नागपूर यांच्या वेतन निश्चितीच्या प्रती या कार्यालयात उपब्ध करुन घेतल्या आहेत. आपण स्वतः येऊन घेऊन जावे. त्यांना मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मुख्याध्यापक पदाची मान्यता दिली असून १२ वर्षे सेवा झाल्यानंतर संस्थेनी प्रस्ताव पाठविल्यानुसार वरिष्ठ वेतन श्रेणी या

कार्यालयाने प्रमाणित करुन दिलेली आहे असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीची चौकशीची माहिती किंवा अहवालाची माहिती त्यांनी मागितली. परंतु त्यांना सदरच्या अहवालाची माहिती ही अद्याप पर्यंत उपलब्ध झालेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. लेखाधिकारी कार्यालयामध्ये एकदा शासनाची मान्यता निश्चित झाल्यानंतर वेतन पथक कार्यालयातून वेतन देण्यात येते. त्यामुळे कोणतीही तक्रार असली तरी त्यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे तक्रार करणे आवश्यक होते व त्यांनी चौकशी केल्यानंतर त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध इ ाली असती व त्यामुळे अपीलकर्ता यांचे निवेदनात म्हटल्यानुसार सदरची तक्रार ही शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे व ही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली होती. त्यामुळे पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. श्री. राजेश मासुरकर यांनी माहिती अधिकारांतर्गत दिनांक २५.११.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अर्जानुसार संबंधित कनिष्ठ लेखा परिक्षक यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ३.१२.२००९ टिपणी सादर केली (सहपत्र ३) या कार्यालयाने दिनांक १५.१०.२००९ च्या तक्रारीच्या

अनुषंगाने मुख्याध्यापक, उज्वल हायस्कूल, नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक १२२८, दिनांक २५.११.२००९ अन्वये मुख्याध्यापकांना प्राप्त झालेल्या तक्रारीची प्रत पाठवून वेतननिश्चितीची फेरतपासणी करण्यास्तव आवश्यक दस्ताऐवज सादर करण्याबाबत कळविले होते. सदर्हु कार्यवाही श्री. राजेश मासुरकर यांनी या कार्यालयास दिनांक १५.१०.२००९ च्या अनुषंगाने केली होती. त्यामुळे श्री. राजेश मासुरकर यांचा माहितीचा अधिकारांतर्गत अर्ज दिनांक २४.११.२००९ प्राप्त दिनांक २५.११.२००९ मध्ये मागितलेल्या माहितीची प्रत संबंधित अपीलकर्ता यांना दिनांक १.१२.२००९ रोजी देण्यात आली होती. (सहपत्र ४) सदर्हु माहिती अपीलकर्तांनी या कार्यालयातून प्राप्त करुन घेतली होती. या संदर्भात अपीलकर्ता यांना या कार्यालयाचे जावक क्रमांक लेअ/शिवि/१२४१/२००९, दिनांक ८.१२.२००९ अन्वये कळविण्यात आलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ९९/२०१०.

श्री. अनिल जयसिंग धनोले,
नविन बिडीपेठ, प्लॉट नं. ३,
पो. अयोध्यानगर, नागपुर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव (परिक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत,
३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,
हुतात्मा चौक, मुंबई - ४०० ००१.

श्री. अ. ध. लोखंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
बँक ऑफ इंडिया इमारत,
३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,
हुतात्मा चौक, मुंबई - ४०० ००१. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरिक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा १९९८, २००३, २००६ व २००७ च्या संबंधात माहिती मिळणेबाबत अर्जदाराने माहिती विशिष्ट नमुन्यामध्ये मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १ जानेवारी १९९८ ते सप्टेबर २००९ आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३.११.२००९ रोजी कक्ष अधिकारी यांनी माहितीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक निरंक रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे

अपील हे मुद्दे निहाय माहितीचे विवेचन करुन निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगानी आता पर्यंत घेतलेल्या पोलीस उपनिरिक्षक संपूर्ण उमेदवारांची माहिती मुख्य परिक्षा प्रवेशाची माहिती त्यांना मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे म्हणजे महाराट्र लोकसेवा आयोगाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळविणे असे होते व ते सर्वस्वी अशक्य आहे व त्यातही त्यांचे नमुन्यात मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक ३.११.२००९ रोजी व प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे कळविलेले आहे. अपीलकर्ता यांना आयोगाकडून रामाआ/अपील क्रमांक/३२८८/०२ या अपील निर्णयामध्ये दिनांक १५.१२.२००८ रोजी मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी माहिती जशी आहे तशी देणे अधिनियमांतर्गत देणे अपेक्षित आहे. माहितीचे वेगळयाने वर्गीकरण करुन देणे, उदाहरणासह स्पष्टीकरण देणे माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अपेक्षित नाही. सबब अपील अमान्य करण्यात आलेली आहे असा निर्णय दिलेला आहे. तरीही अपीलकर्ता यांनी तशाच प्रकारची माहिती मागितली असल्यामुळे व मुख्य माहिती आयुक्त यांनी योग्य तो निर्णय दिला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११६/२०१०.

श्री. विलास महादेव ऐन्रेड्डीवार,
पिंटु धाबा जवळ, जुनी मंगळवारी,
नागपुर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जयदेव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
लक्ष्मीनगर, झोन क्रमांक ३,
महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
वार्ड अधिकारी,
लक्ष्मीनगर झोन क्र. ३,
महानगरपालिका, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा वार्ड अधिकारी, लक्ष्मीनगर झोन, नागपूर यांचेकडे महानगरपालिका घर क्रमांक २६५९, वार्ड नं. ७५, मौजा खामला, प्लॉट नं. १८ याची

असिसमेंट फाईलची सत्यप्रतिलिपी नामांतर आदेश दिनांक १६.२.१९९६ अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१०.२००९ रोजी या मालमत्तेची नस्ती उपलब्ध करुन देण्याकरिता अभिलेख विभागास सोबत जोडल्यानुसार मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. अद्याप पर्यंत नस्ती उपलब्ध न झाल्यामुळे आपणास योग्य माहिती पुरविणे शक्य होत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२००९ प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.११.२००९ रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये प्रकरण दिनांक २६.११.२००९ ला घेण्यात आले. अपीलार्थी हजर, विभागातर्फे श्री. वानखेडे व ज्यांनी रेकॉर्ड मधून फाईल घेतली ते श्री. घाटे हजर. फाईल उपलब्ध नाही. करिता विभागाने तीन

दिवसात लेखी कळवावे व कर विभागाने नस्ती जतन करण्यास जबाबदार कर्मचाऱ्याविरुध्द नियमानुसार कार्यवाही करावीया सुचनेसह प्रकरण निकाली काढण्यात येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अद्याप पर्यंत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे आज प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून उपस्थित झाले आहेत. आयोगापुढे त्यांनी असे सांगितले की, त्यावेळेस ते माहिती अधिकारी होते व त्यांना अभिलेख विभागास नस्ती मागितली होती. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा कर विभागाने नस्ती जतन करण्यास जबाबदार कर्मचाऱ्यांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करावी. त्यामुळे त्याप्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना अद्यात पर्यंत माहिती मिळाली नाही. वास्तविक त्यावेळेस प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ती केली नाही. त्यामुळे संपूर्ण नस्ती गहाळ झाल्याचे संबंधामध्ये पोलीसाकडे एफआयआर दाखल करणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची नस्ती उपलब्ध करुन देण्याचे दृष्टिने ती गहाळ झालेली असल्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करावा व एफ. आय. आर. दाखल केल्यानंतर आयोगाकडे १० दिवसांचे आंत अहवाल सादर करावा. अन्यथा जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५,०००/- शास्ती लादण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११५/२०१०.

श्री. रामनाथ पुंडलिक भोवते,
रा. मुंडीपार/सडक, पो. पिंपळगांव,
ता. साकोली, जि. भंडारा. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. बी. जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. साकोली, जि. भंडारा.

श्री. एस. आर. चनाप,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
साकोली, जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचेकडे डी वन रजिस्टरची एपीएल/बीपीएल/अंत्योदयची यादी मिळण्याबाबत. राशन स्वस्त धान्य दुकान ३६ कार्डधारकांची यादी मिळणेबाबत. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. दारिद्रय रेषेखालील

प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाच अनुषंगाने दिनांक ९.९.२००९ रोजी मागितलेली माहिती प्राप्त होताच ती देण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.१.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती १ महिन्याचे आंत देणे आवश्यक होते. परंतु माहिती दिली नाही अशा प्रकारे जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांनी माहिती देण्यास कसुर केली असे स्पष्ट होते. परंतु या न्यायालयाला गैरअपीलार्थी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांना दंड करण्याचे अधिकार नसल्यामुळे दंड करता येत नाही. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांनी अर्जदाराला ३ दिवसांचे आंत माहिती द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.        जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरची माहिती ही पुरवठा निरिक्षक, तहसील कार्यालय, साकोली यांचेकडे असल्यामुळे त्यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून आदेश दिले होते.  पुरवठा निरिक्षक यांनी तहसीलदार, साकोली यांना दिनांक १७.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली.  सदरची माहिती ही अर्जदारास पाठविण्यास श्री. सुनिल रंगारी, कनिष्ठ लिपिक, तहसील कार्यालय, साकोली यांनी ३ महिने विलंब लावला व अर्जदारास दिनांक १८.१२.२००९ ला माहिती पुरविली.  उपरोक्त विलंबास श्री. सुनिल रंगारी, कनिष्ठ लिपिक हे जबाबदार आहेत असे आयोगापुढे लेखी निवेदन सुध्दा दिले आहे.

४.        प्रथम अपीलाचा निर्णय हा स्पष्ट आहे.  परंतु त्यात जबाबदारी निश्चित करण्यात आलेली दिसून येत नाही.  मात्र जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, साकोली यांचे निवेदनावरुन त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे पुरवठा निरिक्षक तसेच श्री. सुनिल रंगारी, कनिष्ठ लिपिक यांचा अहवाल घेणे अपरिहार्य होते.  त्यामुळे त्यांनी त्यांचे सहाय्य घेतले आहे. पुरवठा निरिक्षक यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली होती.  कनिष्ठ लिपिक श्री. सुनील रंगारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती
देण्यास विलंब केलेला आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे श्री. सुनिल रंगारी, कनिष्ठ लिपिक यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.९.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसात माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यास श्री. सुनिल रंगारी, कनिष्ठ लिपिक हे जबाबदार आहेत अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.  सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही तहसीलदार, साकोली यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत करावी.

३) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ११४/२०१०.

श्री. राजू उर्फ शत्रुध्न महादेव गैनवार,
रा. पो. कुंभार मोहल्ला,
पुराना आखाडाजवळ, ता. भद्रावती,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती उ. अ. पुरखे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग- १,
नवीन प्रशासकीय इमारत, पहिला माळा,
हॉल क्र. ४, चंद्रपूर.

श्री. अ. भ. उईके,
जनमाहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक, श्रेणी-१,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक कार्यालय, भद्रावती यांचेकडे मौजा चिचोर्डी साझा क्रमांक २५ मधील दिनांक ३१.८.२००९ ला विक्री झालेल्या दस्तक

क्रमांक (दस्तऐवज) क्रमांक १५३९ आणि दस्त क्रमांक १५४० च्या विक्री पत्राची (जागेच्या) शेती साक्षांकीत प्रत संपूर्ण विवरणासहीत माहितीसह मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जदार बीपीएल मध्ये आहे व पत्रकार आहे असेही नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१०.२००९ रोजी सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांची अधिसुचना क्र. आरटीआय-२००५/सी.आर.३१५/ ०५/२००५, दिनांक ११.१०.२००५ नुसार ज्या विभागाने विशिष्ट दस्तऐवजाची फी अगोदरच निश्चित केली असेल तर निश्चित केलेली फी भरावी लागेल अशा सुचना आहेत. नोंदणी कायदा १९०८ चे कलम ७८(ग) व महसूल व वनविभाग यांची अधिसुचना क्र. नोंदणी-२००१/२८८५/प्र.क्र. ६१२/म-१, दिनांक २८.१२.२००१ नुसार दस्ताच्या प्रमाणित प्रतीसाठी प्रती

पृष्ट रुपये २०/- प्रमाणे फी निश्चित केली आहे. दोन्ही दस्तामध्ये एकूण ८४ पृष्ठे असल्यामुळे आपणास रुपये १६८०/- इतकी फी भरावी लागेल. त्यानंतर आपणास दस्ताची प्रमाणित प्रत देता येईल. सोबत सुधारित अर्ज सुध्दा करावे लागेल व त्याला रुपये ५/- रुपये चे कोर्ट फी लेबल लावावे लागेल आणि अर्जासोबत न्यायीकेत्तर स्टॅम्प प्रत्येकी रुपये १०/- प्रमाणे जोडावे लागेल. असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३०.११.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी नोटीस काढलेली दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.१२.२००९ रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्र अभिलेख असल्यामुळे त्यांना संपूर्ण माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना पृष्ठ ८४ चे रुपये १६८०/- भरावे लागतील असे कळविलेले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचेकडे अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कोणत्याही प्रकारचा निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिलेला नाही. त्यामुळे सदरचा खर्च हा सादिल खर्चामधून करावा लागतो. परंतु तशीही मर्यादा आहेत. त्यावर अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये निरिक्षण करावे व त्यातून त्यांनी माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे सुचविले असतांना त्यांनी असे सांगितले की, त्यांना सदरची माहिती वैयक्तिक कामाकरिता हवी आहे. त्यांच्या घरगुती कामाकरिता हवी आहे. कोणत्या जनहिताकरिता हवी आहे त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही विचारता येत नसली तरी ती व्यापक जनहिताकरिता आहे काय असे विचारले असता त्याबद्यल त्यांना काहीही खुलासा करता आलेला नाही. परंतु त्यात भ्रष्टाचार आहे असे वाटते म्हणून त्यांनी माहिती मागितलेली आहे असे त्यांनी अंतिमतः सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची शंका आली तर ते दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्रधारक आहेत म्हणून माहिती मागितली असे त्यांचे उत्तर होते. परंतु त्यातून त्यांना निश्चित करणे आवश्यक राहिल. तसेच अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये ते पत्रकार आहेत हे नमुद केलेले आहे व पत्रकार हे बीपीएल आहेत किंवा नाही याबद्यलची चौकशी करणे आवश्यक राहिल. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांची तालुका भद्रावती येथील पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना अपीलकर्ता हे दारिद्र रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्रधारक या निकषात येतात किंवा नाही हे तपासून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता हे पत्रकार असल्यामुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्रधारक निकषात येतात किंवा नाही हे जनमाहिती अधिकारी यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भद्रावती यांचे कडून तपासून घेऊन त्यांचे प्रमाणपत्र योग्य असल्यास त्यांना संबंधित माहितीचे निरिक्षण केल्यानंतर पुरविण्यात यावी. त्याकरिता कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्यांना नोटीस द्यावी व आवश्यक असले त्या कागदपत्राची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९/२०१०.

श्री. भिमराव सिताराम गजभिये,
मु. सुशिला ले आऊट, प्लॉट नं. ४, ५,
गुरुद्वाराजवळ, पाटणकरचौक,
नागपूर -४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्र. २, नागपूर शहर,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पाचपावली विभाग, नागपूर शहर,
नागपूर. दुय्यम निबंधक, श्रेणी-१,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २२.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. कोकोटे हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री. सहारे, लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली विभाग, नागपूर यांचेकडे इस्तगासा केस नं. १३६/२००९ १०७, ११६(३) जा. फी. दिनांक १५.६.२००९ ते ४.८.२००९ इस्तगासाचे संपूर्ण अंतिम आदेशापर्यंत दर्शन व तपशील १) फुलवंत कौर मुलतानी, २) भिमराव गजभिये. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषगाने दिनांक ३०.१०.२००९ रोजी आपण मागितलेली माहिती ही त्रयस्त पक्षाशी संबंधित असून श्रीमती कुलवंत कौर रघुविंदर सिंग यांनी माहिती देण्यावर आक्षेप घेतलेला आहे. तेंव्हा माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११(१) अन्वये अर्जात नमुद माहिती पुरविणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.१.२०१० रोजी देण्यात आला असून अपील विहित मुदतीत नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले आहे व त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. सदरच्या अपीलाची सुनावणी ही दिनांक २५.२.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. परंतु त्रयस्थ पक्षानी आक्षेप घेतला आहे असे आयोगापुढे सांगितले असल्यामुळे अधिनियमाचे कलम ४(१) अन्वये त्रयस्थ पक्षाचे ऐकून घेणे हे बंधनकारक असल्यामुळे दिनांक २२.३.२०१० रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे पत्र निर्गमित करण्यात आले व त्याप्रमाणे आज त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेतले. त्रयस्थ पक्ष हे अपीलकर्ता यांचे शेजारी राहणारे आहेत. त्रयस्थ पक्षाचे विरुध्द अपीलकर्ता यांनी तक्रार दाखल केली. तसेच त्रयस्थ पक्षाने सुध्दा अपीलकर्ता यांचे विरुध्द तक्रार दाखल केली होती. त्रयस्थपक्ष यांनी आयोगापुढे निवेदन सादर केले आहे. महोदय सेवा में नम्र विनंती अर्ज करीत हुं की, मेरी केस नं. १३६/०९ कलम १०७, ११६(३) तथा गैर अर्जदार इसकी केस नं. १३७/०९ कलम १०७, ११६(३) जा. फौ. अन्वयेची प्रतिबंधक कार्यवाही करके जरिपटका पोलीस से मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी, पाचपावली विभाग, नागपूर शहर इनके कोर्ट में दिनांक १५.६.२००९ को दाखल हुई थी. जिसमें हमने और गैरअर्जदारने शांतता भंग न करने का बंधपत्र लिखकर कोर्ट मे दिया था. मगर गैर अर्जदार ने मेरी केस के पुरे कागजपत्र माहिती के अधिकार के जरीये मांगा है. लेकिन मेरी केस के कोई भी कागजपत्र गैर अर्जदार और किसी को भी नही दिये जाये. और यही मेरी आपसे विनंती है. तसेच न्यायालयामध्ये सदरचे प्रकरण हे प्रलंबित आहे. यावरुनही त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही. तक्रार किंवा एफआयआर दाखल झाला असला तरी त्या तक्रारीमध्ये अर्जदाराचा संबंध असेल तर ती त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही व त्यामुळे ती सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.९.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १११/२०१०.

श्री. रमेश सुखदेव बांगरे,
मु. पो. अडयाळ, ता. पवनी,
जिल्हा भंडारा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. एस. चौबळ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
भंडारा.

श्री. व्ही. एन. गभणे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे दिनांक १.९.२००९ च्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्र रेषेखालील आहे असे नमुद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.१.२०१० रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलाचे निणर्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे सांगितले. परंतु ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे हजर झाल्यावर त्यांना त्या प्रकरणातील कोणत्याही प्रकारची माहिती आहे असे दिसून आले नाही व त्यांनी सदरची माहिती घेण्याचा करिता त्रास घेतला दिसून येत नाही. सदरची माहिती विलंबाने दिली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे.

त्याकरिता त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. परंतु त्याबद्यल त्यांनी कोणतेही समाधानकारक खुलासा सादर केला नाही. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली व आयोगापुढे सुध्दा कोणत्या प्रकारे माहिती उपब्ध करुन दिली याबद्यल काहीही सांगता आले नाही त्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करण्यात येऊन "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१७/२०१०.

श्री. गौतम मनीरामजी मोटघरे,
मु. जयभिम चौक, इंदिरामाता नगर,
डांगे किराणा स्टोर्सच्या मागे, डिगडोह,
वार्ड क्र. ५, हिंगणा रोड, ता. हिंगणा,
जिल्हा नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. डब्ल्यु. खंडाळ,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिंगणा,
जि. नागपूर.

श्री. डी. आर. लोहकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, डिगडोह (देवी),
ता. हिगंणा, जि. नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. अपीलकर्ता यांच्या वतीने श्री. राजेंद्र लाळे हे बाजू मांडणार आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत डिगडोह (देवी), ता. हिंगणा यांचेकडे त्यांचे घराबाबत एकूण ८ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २७.१.२०१० रोजी देण्यात आलेला असून ग्राम विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना आदेश देण्यात आलेले दिसून येते.

३. यावरुन दिनांक १६.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली ही बाब प्रथम अपीलाचे सुनावणीत अपीलकर्ता किंवा जनमाहिती अधिकारी यांनी कां सांगितले नाही याबद्यलचा कोणताही खुलासा होऊ शकत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी त्यांना दिनांक १६.१२.२००९ रोजी माहिती मिळाली आहे हे मान्य केलेले आहे. परंतु त्यानंतर सौ. संघमित्रा रविंद्र मोटघरे यांचे विरुध्द जी कार्यवाही

करण्यात आलेली आहे त्या कार्यवाहीचे कागदपत्रे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून सौ. संघमित्रा रविंद्र मोटघरे यांचे विरुध्द जी कार्यवाही करण्यात आलेली आहे त्या कार्यवाहीची कागदपत्रे अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१६/२०१०.

श्री. गफार हमीद शेख,
शिवणगांव, पो. एअरपोर्ट,
जिल्हा नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर विशेष भूअर्जन अधिकारी,
पेंच प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय,
नागपूर.

श्री. प्रकाश गं. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
अप्पर विशेष भूअर्जन अधिकारी,
पेंच प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय,
नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विशेष भुअर्जन अधिकारी, पेंच प्रकल्प नं. २, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे दिनांक १.७.२००५ रोजी अवार्ड पारित झाल्याच्या संदर्भामध्ये आक्षेप नोंदविला होता. या आक्षेपा संबंधी चौकशी कार्यवाहीची माहिती

मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १.२.२०१० रोजी अप्पर विशेष भुअर्जन अधिकारी, पेंच प्रकल्प, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांचे वकील, श्री. अरविंद एम. कुळकर्णी व नितीन एस. उपासनी, वकील हे हजर असून त्यांनी युक्तिवाद केला व त्या युक्तिवादामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक १.७.२००५ च्या आक्षेपावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही किंवा रोजनाम्यात सुध्दा त्या आक्षेपाचा उल्लेख नाही व अपीलकर्ता यांच्या दिनांक १.७.२००५ च्या आक्षेपा सोबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाही असे त्यांना कळविण्यात आलेले आह. संपूर्ण नस्ती त्यांना दाखविण्यात आली. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची कागदपत्राची छायाकिंत प्रती मिळाल्या नाही व ते देण्यास तयार आहेत. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी नस्तीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून नस्तीच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३०/२०१०.

श्री. इंद्रकुमार साधूराम लहरवानी,
५-बी, जरिपटका, नागपूर - ४४० ०१४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त -१,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त/प्रभाग अधिकारी,
मंगळवारी झोन क्र. १०, नागपूर महानगरपालिका,
नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोन क्र. १०, मंगळवारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक २६.१२.२००८ च्या अर्जाचे संदर्भात झालेली कार्यवाही तसेच दिनांक ७.३.२००७ च्या नोटीसच्या विरुध्द काय कार्यवाही केली त्याबद्यलची एकूण १९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.११.२००९ रोजी संबंधित अभियंता यांना मुळ नस्ती सादर करणेबाबत पत्र देण्यात आले आहे व माहितीची नस्ती प्राप्त होताच कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झालेली दिसून येत नाही. परंतु दिनांक २१.११.२००९ रोजी १) सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, २) मुख्य अग्निशामक अधिकारी, महानगरपालिका, ३) सहाय्यक अधिक्षक कर व कर आकारणी विभाग, झोन क्र. १०, ४) प्रदिप सरपाते, प्र. कनिष्ठ अभियंता, झोन क्र. १०, यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात आदेश दिलेले दिसून येते. पुन्हा दिनांक ३.१२.२००९ रोजी सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, तसेच जलप्रदाय विभाग, झोन क्र.१० यांना पत्र दिलेले दिसून येते. परंतु अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्त यांचेकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्याप पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्यासंदर्भातील नस्ती ही २००७ मध्येच नगर रचना विभागाकडे पाठविण्यात आलेली होती. परंतु सदरची नस्ती अद्याप पर्यंत आढळून येत नाही. त्याकरिता सर्व संबंधितांना आदेश दिले आहेत. तसेच दिनांक २१.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक ११ व १२ च्या संदर्भात माहिती दिलेली आहे. परंतु जो पर्यंत नस्ती उपलब्ध होत नाही तो पर्यंत अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.१२.२००८ च्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. त्याकरिता संबंधित कर्मचाऱ्यांस कारणे दाखवा नोटीस पण दिलेली आहे. परंतु अद्याप पर्यंत कार्यवाही सुध्दा झालेली नाही व नस्ती सुध्दा उपलब्ध झाली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सांगितले. सदरची नस्ती उपलब्ध होत नसल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होते व त्यानंतरही पोलीस स्टेशन कडे एफ.आय.आर. दाखल करणे आवश्यक होते. परंतु त्यातही त्यांनी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संबंधित नस्तीचा शोध घेण्यासाठी व जबाबदारी निश्चित करण्याकरिता पोलीस स्टेशन यांचेकडे नस्ती गहाळ झाल्या बद्यल एफ.आय.आर. दाखल करावा व त्याबद्यलची सर्व कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना वेळोवेळी कळविण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२९/२०१०.

श्री. कुंदनसिंह डागोर,
प्लॉट नं. १, डॉ. आंबेडकर नगर,
धरमपेठ, हिंग्लाज माता मंदिर के पास,
पो. शंकरनगर, नागपूर - ४४० ०१०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
क्रिडा व युवक सेवा संचालनालय,
पुणे-१.

श्रीमती प्रतिभा एम. देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
उपसंचालक,
क्रिडा व युवक सेवा,
विभागीय क्रीडा संकुल, शिवाजीनगर,
मोर्शी रोड, अमरावती. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. जे. एस. दुबळे, उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे स्वर्गीय श्री. लखनलाल डागोर इनको दिनांक ३.१२.१९८८ से १४.१२.१९९४ तक भारतीय संविधान के श्रमिक अधिनियम की कौनसी धारा के तहत ६ साल तक नौकरीसे बाहर और वेतन से वंचित रखा गया. क्षतिपूर्ती के नुकसान भरपाई की अमानत का अविलंब भुगतान करणेबाबत. माहिती नोंदणीकृत टपालाद्वार घेणार असे नमुद करुन मागितलेली आहे व सोबत ७ मुद्यांमध्ये विश्लेषन करणारे निवेदन जोडण्यात आलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक६.१.२०१० रोजी सुनावणी घेण्यात येऊन उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती

कार्यालयाकडे जी नस्ती उपलब्ध आहे ती त्यांना पाहण्यास देऊन त्यातील आवश्यक ती कागदपत्रे आजच विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा आदेश उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांना दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ११.१.२०१० रोजी पुन्हा मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व मागणी केलेली दस्तावेज/कागदपत्राची माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. अशा प्रकारची माहिती दिली म्हटले आहे तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना त्यांना आता पर्यंत दिनांक ३.१२.१९८८ ते दिनांक १४.१२.१९९४ चे संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मुळात अपीलकर्ता यांनी पुणे येथे संचालक यांचेकडे माहिती मागितली. माहिती ही अमरावती येथील कार्यालयातील आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा अमरावती येथे हस्तांतर झाल्यामुळे अपीलकर्ता यांना १० दिवसाचे विलंबाने माहिती दिलेली आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात त्यांना पुन्हा मुद्दे निहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी लोकआयुक्त यांचेकडे तक्रार केलेली होती व त्या तक्रारीच्या निर्णयात सुध्दा दिनांक २.१०.२००९ रोजी दिलेला आहे. माहिती करिता मा. सचिव यांचेकडे सुध्दा सुनावणी झालेली आहे व त्यातून त्यांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असून सुध्दा

क्षतीपुर्ती के नुकसान भरपाई की अमानत का अविलंब भुगतान करणेबाबत माहितीचे अधिकारात मागणी केलेली आहे जी अपेक्षित नाही व त्यामुळ अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध झालेली असुन सुध्दा त्यांनी माहितीच्या अधिकारात पुन्हा वापर करुन अधिनियमाचे तरतुदीचा गैरवापर केलेला आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/४४३-४४५/२५.३.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १३१/२०१०.

श्री. गोपाल बालाजी झाडे,
प्लॉट नं. ८, पुरोहीत ले आऊट,
अंबाझरी, नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग,
६४३ मुख्य मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

जनमाहिती अधिकारी तथा
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
६४३ मुख्य मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी राज्य माहिती आयुक्त, नागपूर यांचेकडे निवेदन सादर करुन द्वितीय अपीलात नमुद केलेली उर्वरित माहिती मला दिनांक १२.३.२०१० रोजी मिळाली. ती समाधानकारक असल्याने माझी काहीही तक्रार राहिलेली नाही. त्याबाबत सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही अशी विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२८/२०१०.

श्री. बाबा भिवाजी बनसोड,
५६, समता नगर, अंबाझरी,
नागपूर - ४४० ०३३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

श्री. सुभाष बेलसरे,
जनमाहिती अधिकारी तथा
कुलसचिव,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.११.२००९ रोजी कुलगुरु तथा माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे प्रा. बाबा शंभरकर यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारी संदर्भात माहिती सन २००८ ते २००९ एकूण २ मुद्यामध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार (५ दिवसात) असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.२.२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.		अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती अद्याप पर्यंत उपलब्ध झालेली नाही व जी उपलब्ध झालेली आहे ती अपूर्ण आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे अर्ज न करता कुलगुरु यांचेकडे केलेला होता. त्यामुळे सदरचा अर्ज हा विलंबाने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १९.११.२००९ रोजी प्राप्त झाला व अपीलकर्ता यांना दिनांक १६.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे उत्तराचे अवलोकन केले असता विद्यापीठातर्फे नोटीस बजावला. संस्थने त्यास समाधानकारक उत्तर दिले. त्यामुळे प्रकरण दप्तर दाखल करण्यात आले आहे. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा निर्णयात माहिती उपलब्ध करुन दिली याचा अर्थ अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १२७/२०१०.

श्री. विलास तुळशीरामजी देशभ्रतार,
द्वारा - अशोक नगरारे, रोड क्रमांक ७-एल,
चंद्रमणीनगर, पो. भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
प्रकाश भवन, लिंक रोड, सदर, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग - जलालखेडा, ता. काटोल, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, नागपूर यांचेकडे ज्युनिअर इंजिनिअर, म.रा.वि.वि.कं.लि. उपविभाग, भारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर येथे दिनांक १९.५.२००९ चा अर्ज (कार्यालयास प्राप्त दिनांक २२.५.२००९) च्या संबंधाने उपविभागामार्फत केलेल्या चौकशी अहवालाची कार्यालयीन टिप्पणीसह सविस्तर माहिती पुरवावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही शिघ्रटपालाद्वारे घेणार व दारिद्रय रेषे खालील कुटुंबाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ८.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामध्ये दिनांक ५.१०.२००९ चा अर्ज हा दिनांक ६.१०.२००९ रोजी प्राप्त झाला असे नमुद केलेले आहे. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी प्रथम अपील हे मुख्य अभियंता यांचेकडे दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.१२.२००९ रोजी देण्यात आलेला आहे व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती मिळाली परंतु ती अपुर्ण मिळाली याचा अर्थ त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे दिनांक १७.१२.२००० पासून विद्युत जोडणी पुरवठा आहे. परंतु माहिती दिनांक ३.१२.२००९ रोजी देण्यात आली व त्यासंदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी केली नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी मुळात तक्रार अर्ज ज्युनिअर इंजिनिअरकडे दिला. माहिती मात्र अधिक्ष अभियंता यांचेकडे मागितली व तसेच प्रथम अपील मुख्य अभियंता यांचे अर्ज दिला. त्यामुळे त्यांच्या अर्जावर ज्युनिअर इंजिनिअरनी जी कार्यवाही केली होती. सदरचा अर्ज हा हस्तांतर करण्यात आला. त्यासंबंधात अपीलकर्ता यांना दिनांक २९.२.२००९ रोजी माहिती देण्यात आली होती. परंतु पुन्हा प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये जे आदेश दिले त्या आदेशाप्रमाणे पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली ती १२ पृष्ठामध्ये आहे. तशी पोच अपीलकर्ता यांची आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली परंतु अपीलकर्ता यांची कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते व त्यात विद्युत जोडणी कापली ही सारासार कंजुमर्स सोबत अर्थात माझ्या सोबत झालेली फसवेगिरी दिशाभूल करणारी खोटी व चुकीची माहिती दिली असे त्यांनी प्रतिज्ञा पत्र सुध्दा केलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकरणी गुणवत्तेच्या बाबत चौकशी करता येत नाही व कार्यवाही सुध्दा करता येत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४३/२०१०.

श्री. उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड नं. १७, ता. सावनेर, जि.नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वनसंरक्षक,
नागपूर वनविभाग, नागपूर.

श्री. एस. बी. भलावी,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय वनअधिकारी,
नागपूर वनविभाग, नागपूर. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी नागपूर उपवनसंरक्षक, नागपूर वन विभाग, नागपूर यांच्याकडे दिनांक १८.११.२००९ ला दिलेल्या लेखी तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिनांक १९.१२.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांनी योग्य माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४४/२०१०.

श्री. गुलाब श्रावण मेश्राम,
मु. पो. सावरगांव, ता. नरखेड,
जि.नागपूर - ४४१ ३०६. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. के. गोरटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (कृषी)
पंचायत समिती, नरखेड,
जि. नागपूर.

श्री. एच. एस. साबळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्रामपंचायत, सावरगांव,
ता. नरखेड, जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, सावरगांव यांच्याकडे दिनांक २२.१२.२००८ व दिनांक २०.३.२००९ ला केलेल्या तक्रारीची चौकशीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे सुनावणी पुर्वी दिनांक ७.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.६.२००९ रोजी देण्यात आलेला आहे व माहिती घेण्यास नकार दिला. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या प्रकरणामध्ये मौका चौकशी केलेली आहे व मौका चौकशीमध्ये जे आढळून आले आहे ती माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान होत नाही. त्यामुळे

त्यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे ग्रामपंचायत अधिनियम, १९६० प्रमाणे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५/२०१०.

कु. अनिता विक्रम कांबळे,
मोहन नगर, खलाशी लाईन,
कॅथलिक क्लब के पास,
नागपूर. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १४.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे विना अनुदानित शाळेच्या आया या पदावर असणाऱ्या कर्मचारी यांच्या ५ वे व ६ वे वेतन आयोगांतर्गत शासनाचे आदेशाप्रमाणे वेतन श्रेणी निश्चित नियमावली बद्दल सविस्तर माहिती देण्याबाबत अर्ज सन २००२ ते २००९ माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.१०.२००९ रोजी माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.११.२००९ रोजी देण्यात आलेला असून सदरची माहिती आपणास पुरविण्यात आलेली आहे. दिलेली माहिती योग्य सत्य असल्याने आपले माहितीस कळविण्यात येत आहे. दिनांक ३१.१२.२००९ च्या माहितीच्या अर्जानुसार सदर माहिती शाळेचे मुख्याध्यापक हे त्या शाळेचे माहिती अधिकारी असल्याने त्यांचे स्तरावरुन प्राप्त करुन घ्यावी. शाळेकडून माहिती मागितली परंतु दिनांक २१.१.२०१० रोजी अतिरिक्त खर्चाची मागणी करण्यात आली व दिनांक १०.१२.२०१० रोजी गार्डिनर प्राथमिक शाळेला शिपाई पद मान्य नसल्यामुळे व ही शाळा बिनाअनुदानित असल्यामुळे मागितलेली माहिती पुरवु शकत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा दिनांक २३.१०.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी माहिती

उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.  यावरुन अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६/२०१०.

श्री. मधुकर विठ्ठलराव बोंडे,
नवेगांव (मुरखळा) पेट्रोल पंपाजवळ,
पो. मुडझा, ता. जि. गडचिरोली - ४४२ ६०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. के. काळबांधे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती, गडचिरोली,
जि. गडचिरोली.

श्री. ए. बी. ठाकरे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्राम पंचायत, मुरखळा (नवेगांव),
पो. मुडझा, ता. जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, मुरखळा (नवेगांव) पो. मुडझ ाा, ता.जि. गडचिरोली यांचेकडून एकूण १९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.२.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक ५.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक ८, ९, १२, १५ इत्यादी मुद्यांवरील माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा दिशाभूल करणारी माहिती आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी प्रत्येक मुद्यांच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध असलेली ती दिलेली आहे व उपलब्ध नसलेली दिलेली

नाही असे सांगितले. अपीलकर्ता यांची तक्रार ही गुणवत्तेच्या संदर्भात दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णयाची गुणवत्तेच्या संदर्भामध्ये तपासणी करण्याचे अधिकार नाही. माहिती जशी आहे तशी उपलब्ध होते व त्यामुळे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष उपस्थित होऊन नस्तीचे निरिक्षण घेऊन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी उपस्थित राहून संबंधित नस्तीचे निरिक्षण करावे.

२) अपीलकर्ता उपस्थित झाल्यावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये अपीलकर्ता यांना संबंधित नस्तीचे निरिक्षण उपलब्ध करुन देण्यात यावे व आवश्यक असलेल्या त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या व पोच घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४२/२०१०.

श्री. दत्तात्रय व्यंकटेश क्षिरसागर,
नायब तहसीलदार,
ता. देवळी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
अव्वल कारकुन (आस्थापना शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.३.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.३.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे दिनांक १८.२.२००९ रोजीच्या अर्जावर पारीत झालेल्या आदेशाची प्रत मिळणेबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे निवेदन सादर केले आहे. त्यात मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांचे कार्यालयातील जनमाहिती अधिकारी (अस्थापना शाखा) यांनी त्यांचे पत्र क्र. कक्ष-ब/आस्था/मा.अ./कावि-४५७/१०, दिनांक १७.३.२०१० अन्वये पुरविलेली आहे. सबब मा.आयोगाकडून सुनावणीची आवश्यकता राहिलेली नाही असे लेखी सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ४३/नाग/२०१०

१)श्री मारोती भाऊरावजी चंदनखेडे,
प्लॉट नं.१, अशोक कॅालनी, पो.खामला,
ता.जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक(प्रशासन)
उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर बेंच, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपप्रबंधक,
उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर बेंच नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.१.२०१० रोजी एकत्रित नोटीस काढून दिनांक ८.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००९ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"Copy of the High Court letter bearing No.Goa.१५०२/८९ dated ७.७.१९९९ which Hon'ble Registrar(legal) J.R. Deshpande referred in affidavit in reply on behalf of R.No.१ in C.A.No.७१९४/२००५ in W.P.No.३७०५ of २००४ M.B.Chandankhede Vs. High Court of Judicature at Bombay through the Registrar General and another, be supplied to me immediately as I am required to file the said copy of letter with my W.P. No.१२९/२००७ pending before the High Court Bombay for amending the same and effective prosecution."**

**३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी "Bombay High Court Right to Information Revised Rules, २००९ च्या नियम १३ प्रमाणे 'माहिती प्रकट करण्यास' अपवाद यातील पोट नियम(एफ) "Information/copy/ies inspection with respect to cases pending in Court, which shall obtained from the Court, as per the Rules and Orders in force for the time being" या नियमानुसार अपीलकर्ता यांनी रिट पिटीशन नंबर १२९/२००७ च्या संदर्भात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये संदर्भ दिलेले पत्र दिनांक ७.७.१९९९ च्या पत्राची प्रत ही न्यायिक प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे वरील नियम १३ (एफ) प्रमाणे प्रकट करता येणार नाही, तसेच अपीलकर्ता यांनी व्यापक जन हित काय आहे याबाबतचे स्पष्टीकरण दिलेले नाही. उलटपक्षी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असून ती अधिनियमाचे कलम ८(१)(जे) च्या तरतुदीप्रमाणे प्रकट करता येणार नाही" असे उत्तर दिलेले दिसून येते.**

**सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.१२.२००९ रोजी देण्यात आला असून "जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे. तसेच अधिनियमाचे कलम ८(१)(जे) प्रमाणे वैयक्तिक स्वरुपाची माहिती असल्यामुळे व्यक्तीच्या खाजगी हितसंबंधात हस्तक्षेप करण्यासारखे होईल व त्यामुळे ती गोपनिय आहे व म्हणून देता येणार नाही. तसेच सदरच्या माहिती करीता गोपनियता राखण्याच्या दृष्टीने सक्षम प्राधिकारी म्हणून मा. मुख्य न्यायाधिश यांचेकडून श्री व्ही.के. जाधव, प्रबंधक यांनी Bombay High Court Right to Information Revised Rules, २००९ च्या नियम १३ (ई) प्रमाणे मान्यता घेतलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी मा. न्यायालयामध्ये मुख्य ट्रान्सलेटर या पदाकरीता नियुक्तीस आव्हान दिलेले असल्यामुळे Bombay High Court Right to Information Revised Rules, २००९ च्या सेक्शन १३ (एफ) प्रमाणे प्रकट करण्यास अपवादामध्ये येत असल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना त्यांनी मागितलेल्या पत्राची प्रत ही संदर्भित प्रतिज्ञापत्रामध्ये उल्लेख केलेला आहे, परंतु, याचिकेच्या कागदपत्रामध्ये दाखल केलेली नसल्यामुळे त्यांनी सदरच्या पत्राची प्रत मागितली आहे. प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांनी संदर्भ दिलेला असल्यामुळे एकतर ती प्रतिज्ञापत्रासोबत दाखल करणे आवश्यक आहे. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे ती अर्जदारास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले.**

**जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची प्रत संदर्भिय प्रतिज्ञा पत्रासोबत दाखल केलेली आहे किंवा नाही. व तरीही त्यांनी Bombay High Court Right to Information Revised Rules, २००९ च्या तरतुदी प्रमाणे मा. सक्षम प्राधिकरणाने कोणती माहिती प्रकट करता येणार नाही याबाबतचे नियम केलेले असल्यामुळे व त्या नियमांप्रमाणे सक्षम अधिकारी यांचा**

गोपयितेबाबत निर्णय हा अंतिम असल्यामुळे व तसे सक्षम प्राधिकरणाने गोपनियतेच्या कारणास्तव माहिती देता येणार नाही. व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(जे) प्रमाणे सदरची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे व ती व्यक्तीच्या खाजगी जीवनाशी संबंधीत असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी ती व्यापक जन हिताच्या दृष्टीने प्रकट करणे आवश्यक आहे याबाबतचे स्पष्टीकरण दिलेले नसल्यामुळे सदरची माहिती प्रकट करता येणार नाही असा निर्णय जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वरील युक्तीवादाप्रमाणे अधिनियमाचे कलम २८ मध्ये सक्षम प्राधिकरणास नियम करण्याचा अधिकार असून याप्रमाणे मा. उच्च न्यायालयाचे सक्षम प्राधिकारी मा. मुख्य न्यायाधिश यांनी केलेले नियम **Bombay High Court Right to Information Revised Rules,** २००९ मध्ये केलेल्या नियम १३ पोटनियम (एफ) प्रमाणे मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याकरीता मा. उच्च न्यायालयाचे जे नियम/आदेश आहेत त्याप्रमाणे कागदपत्र उपलब्ध करुन घेता येतील असे नियम केलेले आहेत त्यामुळेच वर म्हटल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या पत्राची प्रत ही मा. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्यामुळे प्रकरणातील प्रतिज्ञापत्रासोबत असल्यास ती अपीलकर्ता यांना त्या संदर्भातील असलेल्या नियमाप्रमाणे उपलब्ध करुन घेता येईल. व तशी ती दाखल केलेली नसल्यास ती प्रलंबित नाही असा निष्कर्ष काढून ती अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध होणे न्यायोचित होईल. परंतु वर म्हटल्याप्रमाणे त्या प्रतिज्ञापत्रासोबत सदरचे पत्राची प्रत दाखल केली किंवा नाही याबाबतची माहिती नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्याबाबतची माहिती देता येत नाही असे सांगून आयोगाकडे विनंती केली की, सदरची प्रत ही प्रकरणात दाखल केलेली आहे किंवा नाही याबाबतची माहिती घेण्यासाठी पुढील मुदत मिळावी व त्याप्रमाणे त्यांना मुदत देण्यात आली होती.

अपीलकर्ता यांनी आयोगाचे तोंडी असे निदर्शनास आणले की ती प्रत ही सदरच्या याचिकेमधील प्रतिज्ञा पत्रासोबत दाखल केलेली दिसून येत नाही व त्यामुळे आयोगाने योग्य तो निर्णय द्यावा अशी विनंती केली.

जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरची माहिती प्रकट करण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २८ प्रमाणे मा. मुख्य न्यायाधिश, मुंबई उच्च न्यायालय यांनी केलेल्या नियमांचा आधार घेतला आहे व तो घेताना गोपनियतेच्या कारणास्तव सक्षम प्राधिकरणाने दिलेला निर्णय हा अंतिम असल्यामुळे माहिती प्रकट करता येणार नाही ही कारणे दिलेली आहेत. परंतु मा. मुख्य न्यायाधिश, मुंबई उच्च न्यायालय यांनी केलेले नियम हे दुय्यम विधिविधान आहे व त्यामध्ये गोपनियतेच्या कारणास्तव माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व त्याबाबतचा मा. सक्षम प्राधिकरणाचा निर्णय हा अंतिम असेल असे जे म्हटलेले आहे ते मुळातच संसदेने केलेल्या अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे कलम ८(१) ची व्याप्ती वाढविणारे आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१) मध्ये माहिती प्रकट करण्यास अपवाद याबाबत आठ निकष देण्यात आलेले आहेत त्यांत गोपनियतेच्या कारणास्तव माहिती देता येणार नाही असा निकष नाही. व माहिती उपलब्ध करुन द्यावयाची किंवा नाही हा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी त्या निकषांची तपासणी करुन द्यावयाचा आहे व तो निर्णय योग्य आहे किंवा नाही हे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ठरवावयाचे आहे व प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या विरुध्द आयोगाकडे द्वितीय अपीलाची तरतुद आहे. व त्यावरील आयोगाचा निर्णय हा अधिनियमाचे कलम २३ प्रमाणे अंतिम आहे. त्यामुळे गोपनियतेच्या कारणास्तव सक्षम प्राधिकरणाने दिलेला निर्णय हा अंतिम असेल तर आयोगाने निर्णय देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. आयोगास अधिनियमाप्रमाणे दिलेला अपीलांचा अधिकार मा. उच्च न्यायालयाच्या बाबत अनावश्यक ठरतो. परंतु, तसे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. तसेच अधिनियमाचे कलम ८(१)(जे) प्रमाणे ती वैयक्तिक स्वरुपाची माहिती आहे व व्यक्तीच्या खाजगी हितसंबंधाशी हस्तक्षेप तसेच व्यापक जनहित काय आहे याचे अपीलकर्ता यांनी स्पष्टीकरण दिलेले नाही हा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय सुध्दा असंबध्द असा आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या पत्राची प्रत आज प्रत्यक्ष आयोगापुढे नाही. किंवा त्या पत्राचे स्वरुप काय आहे हे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे स्पष्ट केलेले नाही व त्यामुळे पदोन्नतीच्या संदर्भात असेल तर ती बाबच मुळात सार्वजनिक व्यापक हिताची आहे, व व्यक्तीच्या खाजगी हितसंबंधाशी हस्तक्षेप करणारी नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय हा रद्द करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.९.२००९ च्या माहितीच्या अर्जात मागितलेल्या पत्राची छायांकित प्रत ही हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत "माहितीच्या अधिकारात दिली" असे प्रमाणित करुन व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३३६/अम/२००९
अपील क्रं. १३३७/अम/२००९
अपील क्रं. १३३८/अम/२००९

१)सौ. सविताताई संजयकुमार मालखेडे,
मु.पो.बोपापूर, ता.अचलपूर, जिल्हा अमरावती. अपीलकर्ती

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद, अमरावती. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अचलपूर, ता.अचलपूर, जि. अमरावती. उत्तरवादी

अपील क्रं. १३३७/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद, अमरावती. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, अचलपूर, ता.अचलपूर, जि. अमरावती. उत्तरवादी

अपील क्रं. १३३८/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती, अचलपूर, ता.अचलपूर, जि.अमरावती. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
जि.प.प्रा.शाळा हिवरा पूर्णा ता. अचलपूर, जि. अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलांची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १३३६/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**(१) "आपले कार्यालयातील पत्र ३५३९/०५ दिनांक २१.७.२००५ मध्ये श्री एस.यु.मालखेडे, स.शि.खैरी यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन अचलपूर मध्ये गुन्हयाची नोंद झाल्याबरोबर जोडपत्र पाठवून निलंबीत करण्याची शिफारस आपण त्वरेने केली. परंतु, श्री सुनिल राऊत व अजय सचिदानंद पवार यांचेवर प्रत्यक्ष गुन्हा दाखल होऊन त्यांना पोलीस कस्टडीत ठेवून सुध्दा त्यांचा प्रस्ताव न पाठविता व त्यांचे निलंबनाची शिफारस न करण्याचे प्रयोजन काय याचा खुलासा द्यावा."**

**अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला दिसून येत नाही. परंतु, सुनावणीकरीता हजर राहाण्यासाठी पत्र मात्र निर्गमित केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**२. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगीतले की, श्री सुनिल राऊत व श्री सचिदानंद पवार सहाय्यक शिक्षक यांचे विरुध्द सुध्दा गुन्हा दाखल होऊन त्यांना पोलीस कस्टडीत ठेवून सुध्दा त्याचा वृत्तांत न पाठविण्याचे व त्यांचे निलंबन न करण्याचे प्रयोजन काय याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी याबाबत कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली दिसून येत नाही. व तशी कागदपत्रे सुध्दा आयोगाकडे दाखल केलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्या दोघांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसल्यामुळे माहिती उपलब्ध नाही. परंतु, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्या दोघांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला होता व त्यांना अटकेत ठेवण्यात आले होते ही बाब मान्य केली आहे. असे असतांना त्यांच्या संदर्भात निलंबनाची कार्यवाही झाली असली पाहिजे व त्या कार्यवाहीची टिपणी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

**३. अपील क्रमांक १३३७/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहे जानेवारी, २००५ ते माहे ऑगष्ट, २००८ पर्यंतच्या कालावधीतील पंचायत समिती, अचलपूर कक्षेतील मस्टरची, जिल्हयातील सर्व शाळेची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.९.२००८ रोजी मागीतलेली माहिती व्यापक स्वरुपाची आहे व निरिक्षणाकरीता यावे असे पत्र दिलेले दिसून येते. तसेच पुन्हा दिनांक ७.१०.२००८ रोजी अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे माहिती नाकारलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम**

अपीलाचा निर्णय दिनांक २०.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतु त्याकरीता पंचायत समिती कार्यालयात जावून ३०० पृष्ठापर्यंत मर्या. प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे रक्कम भरणा केल्यानंतरच माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही संपूर्ण पंचायत समिती क्षेत्रातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेतील हजेरी पत्राची चार वर्षाची व सर्व शिक्षकांची सेवा पुस्तकाची माहिती मागितलेली असल्यामुळे ती अतिशय व्यापक प्रमाणातील माहिती आहे व त्रयस्थ पक्षाची माहिती आहे. त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल व सर्व शिक्षकांना, त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे विचारणा सुध्दा करावी लागेल. व त्याकरीता सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणाचा निधी व वेळ खर्ची पडेल. त्यामुळे अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३३८/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००७ व २८.४.२००८ रोजी दोन अर्जाच्या माध्यमातून मुख्याध्यापक, जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा अचलपूर यांचेकडे दिनांक २८.१०.२००५ ते १४.६.२००६ पर्यंत अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे पुन्हा दोनही अर्जांमध्ये हजेरी पत्रकाची दुसरी प्रत तयार करुन मिळावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. दोनही अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २१.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, उपलब्ध माहिती ही अपूर्ण व असमाधानकारक असल्यामुळे दिनांक १५.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असून दिनांक ३१.१०.२००८ व १४.१०.२००८ रोजी मुख्याध्यापक यांना पत्राने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे.त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कोणती अपूर्ण माहिती दिली आहे याची त्यांच्याकडून माहिती घेवून त्यांना पुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३३६/अम/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३३७/अम/२००९ खारीज करण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३३८/अम/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २२.१२.२००७ व २८.४.२००८ च्या अर्जामध्ये मागितलेली संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३३४/अम/२००९
अपील क्रं. १३३५/अम/२००९

१)श्री मोहीत रशीद सौदागर,
रा.अजंता स्टोअर्स, चर्चरोड, धारणी,
ता.धारणी, जिल्हा अमरावती-४४७०२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी,
ता. धारणी, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी(प्रशासन)
एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प, धारणी,
ता.धारणी, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलांची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १३३४/अम/२००९ व अपील क्रमांक १३३५/अम/२००९ मध्ये अनुक्रमे दिनांक १८.९.२००८ व २७.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**(१) "दिनांक १०.२.२००८ को खरीदी बिल नं. ३४३ दुगौ स्पोर्टस धारणी की खरीदी की झेरॅाक्स व टेंडर नोटीस कोटेशन ऑर्डर कापी की झेरॅाक्स प्रत मिलनेबाबत."**

**(२) "आपल्या कार्यालयास आश्रमशाळा स्टेशनरी व किरकोळ साहित्य पुरवठा करण्याबाबत दि. २०.९.०८ ला मी ६०००.०० रुपये एसबीआय डी.डी. क्रं. ०४२४८० व सोबत निविदा भरुन दिली होती. ती आजपर्यंत काही माहिती कळली नाही त्याबाबत माहिती."**

**अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २७.१०.२००८ व १६.१२.२००८ रोजी प्रकल्प अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु दोनही प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, आतापर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.११.२००८ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १८.९.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी खरेदी केल्याची छायांकित प्रत मागितली होती परंतु ती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा मान्य केले की त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. परंतु आता दिनांक २५.२.२०१० रोजी आयोगाची नोटीस दिल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरीही छायांकित प्रत उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे असलेल्या नस्तीचे निरीक्षण करुन त्यातील आवश्यक त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३३४/अम/२००९ व अपील क्रमांक १३३५/अम/२००९ अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत माहितीशी संबंधीत नस्तीचे निरीक्षण करुन सर्व कागदपत्रे स्वतः तपासून त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्य उपलब्ध करुन घ्यावीत. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना कामाकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ कळवावी व त्या दिवशी उपस्थित राहून नस्तीची पाहाणी करुन आवश्यक माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्या व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१३४८/अम/२००९

१)श्री कन्हैयालाल बनवारीलाल तिवारी,
रा.स्टेशन विभाग, मरीमाता मंदिर जवळ, मुर्तिजापूर,
मुर्तिजापूर, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, अकोला,
पहिला माळा, विद्युत भवन, अकोला-४४४००५. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,शहर उपविभाग क्रं.३,
दुर्गा चौक, अकोला, ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.३.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१२.२००८ रोजी उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"ग्राहक क्रमांक ३१००७३५०९३२६/मिटर क्रमांक ९०००५३०३१९ असे असून हा मिटर कधी लावण्यात आला त्या दिनांकापासून १.१२.०८ पर्यंत प्रत्येक महिन्यांचे रिडींगचे झेरॉक्स बिलाची प्रती. प्रत्येक महिन्यात प्राधिकृत कर्मचा-यांचे नांव, पत्ता आजपर्यंत संबंधीत ग्राहकाला विज महामंडळाने किती वेळा कोणत्या रक्कमेचे युनिटचे वर्णन संदर्भाकिंत बिलाचे विवरण, बिल वाटप करणा-या कर्मचा-यांचे नांव, आजपर्यंत संबंधीत ग्राहकाचा आपल्या महामंडळाकडे किती रकमेचा किती युनीट महिन्याचा भरणा रक्कमेचा विवरण देणे. चालु महिन्याचा बिलाचे विवरण पत्रक संबंधीत ग्राहकाला पाठविण्यात आला आहे का. संबंधीत ग्राहकास आपल्या विज वितरण कंपनीचे कर्मचारी दमदाटी देवून विद्युत पुरवठा खंडीत करण्याची ताकीद देतात असे आदेश आपल्या कंपनी कडून देण्यात आले आहे याचा संदर्भाकिंत पत्रासह संदर्भाकिंत खुलासा करुन विवरण देण्यात यावे. संपूर्ण अकोला जिल्हयात फोटो रिडींगचे बिल देण्यात येतात परंतु संबंधीत ग्राहकास आजपर्यंत फोटो रिडींगचे बिल देण्यात आले नाहीत. कार्यालयीन लेजरवरुन मिटर लावल्याच्या त्या तारखेपासून आजपर्यंतचे बिलाचे विवरण व ग्राहकाचा भरणाबाबत खुलासा द्यावा."अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्रयस्थ पक्षाशी संबंधीत माहिती असल्यामुळे दिनांक १८.१२.२००८ रोजी श्री भारत शामदेव पटेल यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्दल पत्र दिले व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली होती. त्याप्रमाणे दिनांक २०.१२.२००८ रोजी श्री भारत शामदेव पटेल यांना मागितलेल्या माहितीशी श्री तिवारी यांचा काहीही संबंध नाही, ओळख नाही. खोडसाडपणाने आपण माहिती मागितलेली आहे..वगैरे असे लिहून दिलेले होते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २६.१२.२००८ रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केल्यावर निर्णय दिनांक २१.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे त्यांना ३ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दिनांक २६.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व उर्वरित माहिती दिनांक ७.३.२००९ रोजी पुरविण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३४६/अम/२००९

अपील क्रं. १३४७/अम/२००९

१)श्री दामोधर किसन राऊत,
रा.पातूर, पितांबरवाडी, ता.पातूर, जि. अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

## अपील क्रं. १३४६/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
कृषि विभाग, अकोला. ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक कृषि,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अकोला,
ता.जिल्हा अकोला. उत्तरवादी

## अपील क्रं. १३४७/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,
कृषि विभाग, (शिला फार्म) पातूर, ता. पातूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय (शिला फार्म), पातूर
ता.पातूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ५.३.२००९ व ४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन अपील दाखले केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १३४६/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, उपसंचालक कृषि यांचे कार्यालयामध्ये, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयामध्ये दिनांक १०.७.२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती, तसेच दिनांक १८.७.२००८ रोजी दिलेले स्मरणपत्रावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः मागितलेली असून माहिती तयार झाल्यास कळविणे असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उलपब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा स्मरणपत्र दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २५.२.२०१० रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांना ३३ पृष्ठ विनामुल्य देण्याचे निश्चित झाले व ती माहिती त्यांना त्याच वेळेस देण्यात आली. त्यावर दामोदर किसन राऊत, रा. पातूर यांची दिनांक २५.२.२०१० ची सही आहे. परंतु, तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असून माहिती उपलब्ध झाली नाही असे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरचा तक्रार अर्ज हा दिनांक २३.८.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी, पातूर यांना पाठवून त्यांच्या तक्रारीवर चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. दिनांक ३१.७.२००८ नुसार चौकशी समिती गठीत करुन सदर प्रकरणावर कार्यवाही करण्याची विनंती केली. तसेच सदर प्रकरणामध्ये क्षेत्रिय कर्मचारी दोषी नसल्याचे कळविले. कार्यालयाचे पत्र दिनांक १५.९.२००८ नुसार तालुका कृषि अधिकारी, पातूर यांनीच चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे कळविले. दिनांक १६.९.२००८ नुसार श्री दामोदर किसन राऊत यांना त्यांच्या तक्रारी बाबत त्यांना श्री डि.के. कु-हेकर, तालुका कृषि अधिकारी यांचे सोबत संपर्क करण्याबाबत कळविले. शासकिय माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पातूर यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधित पर्यवेक्षक यांचे खुलाशानुसार सर्व्हे क्रमांक ६१/४ व ६१/१० मधील झाडे तोडण्याची भोगवट दाराकडून परवानगी नसल्याचे तसेच शेताबाबत वाद असून प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदर शेतात काम करण्यात आले नाही असे कळविले. दिनांक ११.२.२००९ नुसार प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहाण्याचे कळविले. अर्जदाराने पत्र स्विकारले नाही. दिनांक २१.२.२०१० रोजी फेर सुनावणी ठेवण्यात येवून अर्जदारास बोलाविण्यात आले. त्यांना त्यांच्या तक्रार अथवा चौकशी संबंधात उपलब्ध माहिती देण्यात येवून समाधान करण्यात आले. पुन्हा दिनांक २.३.२०१० रोजी प्रत्यक्ष चर्चा करुन दिनांक १०.७.२००८ च्या अर्जावर चौकशी करण्याकरीता पत्र दिनांक २.३.२०१० नुसार दिनांक ८.३.२०१० रोजी**

शेजावर जावून समक्ष निरीक्षण करण्याचे ठरले. अपीलार्थी अर्जदाराचे शेती संबंधीचे वाद असल्याने सर्व्हे क्रमांक ६१/४ व ६१/१० मध्ये भोगवटदाराने परवानगी नाकारल्याने व प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सदर शेतात काम करण्यात आले नाही. कार्यालयाने वेळोवेळी कार्यवाही बाबत त्यांना माहिती दिली असल्याने प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

वरील सर्व घटना क्रमावरुन असे दिसून येते की, माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु त्यांची अपेक्षा त्यांचे मुळ काम करुन घेण्याची दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत कार्यवाही करुन मिळत नाही, त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक १३४७/अम/२००९ मध्ये दिनांक ३०.६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

"बागायत पातूर भागात सन २००८ मध्ये उन्हाळयात पारसाया व पाणी पुढे काढून देण्यासाठी केलेल्या नाल्यांचे खोदकाम ज्या कर्मचा-यांच्या अधिपत्याखाली झाले त्या कर्मचा-यांच्या नेमणुकीबाबत तालुका कृषि अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकारी यांनी केलेल्या ऑर्डरची प्रमाणित नक्कल (२) वरील खोदकामाच्या प्रमाणित नकाशाची नक्कल ज्यामध्ये खोदलेल्या कामाची लांबी, रुंदी खोली ही माहिती असेल (३) त्या कामाबाबतच्या पूर्व नियोजीत नकाशाची प्रमाणित नक्कल (४) शेतक-यांना ज्या शेतक-याच्या शेतामध्ये केलेल्या खोदकामाबाबत त्यांना दिलेल्या पूर्व सूचनेबाबतच्या संबंधीत सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित नक्कला (५) त्या कामावर खोदकामाकरीता असलेल्या मजूरांचे नांव, गांव पूर्ण पत्यासह त्यांना दिलेली एकुण मजूरी व्हाऊचरसह संबंधीत सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित नक्कला (६) वरील कामाच्या पूर्व नियोजीत नकाशाच्या प्रमाणित नक्कल शक्य तितक्या लवकर त्वरीत माहिती मिळावी." माहिती व्यक्तीशः घेणार व माहिती तयार असल्यास कळवावे, अशी विनंती केलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १२.११.२००८ रोजी निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. त्यात अर्जानुसार आवश्यक माहिती मंडळ कृषि अधिकारी, पातूर यांचेकडून दिनांक १७.११.२००८ पर्यंत एकुण कागदपत्रेची संख्या व त्यानुसार भरणा करावयाची रक्कम बाबत माहिती प्राप्त होईल असे कळविले. अपीलकर्ता यांना दिनांक २४.११.२००८ पर्यंत कळविण्याबाबत ठरले. अपीलकर्ता यांनी कर्मचारीचे कामाबाबतचे आदेश मागितले आहेत. त्यानुसार कर्मचारीची पदस्थापना मुख्यालयानुसार वरिष्ठांचे आदेशानुसार करण्यात येते असे तालुका कृषि अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांनी कळविले. कर्मचारीचे पदस्थापनेचे आदेश मा. विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश देणेबाबत अपीलीय अधिकारी यांनी कळविले. त्यावर अपीलकर्ता, शासकिय माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व मंडळ कृषि अधिकारी यांच्या सह्या दिसून येते. व त्यानंतर त्याच दिवशी पुन्हा अपीलकर्ता यांना एकुण कागदपत्रांची संख्या व त्यानुसार भरणा करावयाची रक्कम ही माहिती दिनांक २४.११.२००८ पर्यंत देण्यात येईल, असे कळविण्याचे पत्र दिले व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध
झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, आतापर्यंत त्यांना त्यांच्या एकुण ६ मुद्यांच्या संदर्भात एकाही मुद्याची माहिती उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, सदरची माहिती ही मंडळ कृषि अधिकारी यांचेकडील असल्यामुळे अर्ज त्यांचेकडे पाठविला आहे. त्यानंतर त्यांनी पुन्हा तो अर्ज कनिष्ठांकडे पाठविला. त्यामुळे आतापर्यंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. आज मंडळ कृषि अधिकारी, पातूर हे सुध्दा हजर आहे. कृषि पर्यवेक्षक श्री डी.के. कु-हेकर हे सुध्दा हजर आहे. परंतु सदरची माहिती त्यांनी दिलेली नाही हे मान्य केले.

वास्तविक सदरची माहिती ही ज्या कार्यालयाला मागितली त्याच कार्यालयाने ती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. माहितीचा अर्ज हा माहिती अधिकारी यांच्या कनिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांचेकडे हस्तांतरण करण्याची तरतूद नाही व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच कृषि मंडळ अधिकारी, कृषि पर्यवेक्षक हे सर्व या संदर्भात जबाबदार दिसून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अर्जदाराने काय माहिती मागितलेली आहे याची प्रथम अपीलाची सुनावणी घेवून सुध्दा काही आकलन झाले आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय हा एखाद्या बैठकीच्या चर्चेप्रमाणे निर्णय दिलेला दिसून येतो. या संपूर्ण कार्यवाहीचा परिणाम मात्र असा आहे की अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेली माहिती अद्याप पर्यंत उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता संबंधीत अधिकारी दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये एक हजार फक्त शास्ती लादणे आवश्यक आहे. जेणेकरुन पुढे अर्ज वाचून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अर्ज वाचून निर्णय देण्याचे करावे म्हणजे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची आवश्यकता भासणार नाही. अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३४६/अम/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १३४७/अम/२००९ हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १३.६.२००८ च्या अर्जाचे वाचन करुन कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी- मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम ५(४)(५) प्रमाणे माहिती अधिकारी म्हणून अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/-(रुपये एक हजार फक्त) शास्ती करण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम योग्य त्या प्रमाणात तिघांच्याही दर महिन्याचे वेतनातून वसूल करुन ती

"००७०-इतर प्रशासकिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखा शिर्षात जमा करावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३४४/अम/२००९

अपील क्रं. १३४५/अम/२००९

१)श्री गोपाळराव श्रीधरनाथ वंजारे,
मु.पो.निमकर्दा, ता. बाळापूर, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

अपील क्रं. १३४४/अम/२००९

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय बाळापूर, ता.बाळापूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
मौजा पारस भाग-१, ता.बाळापूर, जिल्हा अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ४.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ४.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२.** अपील क्रं. १३४४/अम/२००९ **मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे मौजा पारस भाग-१ मधील अकृषक खातेदाराची खाते नंबर, नांव, गट नं., क्षेत्र, आकारणी, एनएपी नंबरसह संपूर्ण माहिती तसेच अकृषक करण्यात वसुलीची २००७-०८ व २००८-०९ ची एकुण माहिती किती याबाबत संपूर्ण माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील हे अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सोबत अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेचे प्रमाणपत्र शालेय व आरोग्य यासाठी देण्यात आलेले असे दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१.२००९ रोजी दिला असून अपील मंजूर करण्यात आली असून जन माहिती अधिकारी यांनी आदेश प्राप्त झाल्यापासून १७ दिवसांचे आंत अर्जदारास रेकार्ड दाखवून निश्चित माहितीची मागणी उपलब्ध करुन घ्यावी. त्यानुसार अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होऊन आवश्यक माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न**

**झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध असल्याचे पत्र दिले व नंतर प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा ते कार्यालयात उपस्थित झाले, परंतु माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे दिनांक १८.१२.२००८ रोजी त्यांनी एखादया स्वतंत्र खातेदाराची किंवा अनेक खातेदारांची किंवा संपूर्ण खातेदाराची माहिती मागितली आहे किंवा कसे. मागितलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची असल्यामुळे माहितीचे स्वरुप कळत नाही. निश्चित माहितीचे स्वरुप कळविल्यास माहिती देण्यात येईल असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे व अपीलकर्ता यांना सदरच्या पत्राची प्रत प्राप्त झालेली आहे. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी स्पष्टीकरण न देता संपूर्ण अकृषक खातेदारांची नांवे व खातेदार यांची माहिती मागितलेली आहे. त्यानंतर प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतर सुध्दा दिनांक ३१.१.२००९ रोजी झालेल्या माहितीचा अधिकार २००५ च्या अपीलावर प्रकरणामध्ये श्री गोपाळराव श्रीधरराव वंजारे प्रकरणात मला कोणतीही लेखी आदेश प्राप्त झालेले नाही व त्या दरम्यान श्री गोपाळराव वंजारी यांनी युपीसीने पत्र पाठविले आहे. दिनांक ७.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना तलाठी तथा जन माहिती अधिकारी यांचेकडून पुन्हा पत्र पाठविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता हे कार्यालयात वेळोवेळी हजर झाले परंतु माहिती उपलब्ध झाली नाही अशा प्रकारचे पत्र त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेले दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**खुलासाः "प्रस्तुत अपीलकर्ता श्री गोपाल श्रीधर वंजारे हे महसुल विभागात पूर्वी मौजे निमकर्दा ता. बाळापूर जि. अकोला येथे कोतवाल या पदावर कार्यरत असतांना तेथील नागरिक तलाठी, ग्रामसेवक यांचेशी योग्य प्रकारे वर्तणुक करीत नसल्यामुळे हया सर्व व्यक्तींनी सामुहिकरित्या त्यांचे विरुध्द कार्यवाही करणेबाबत पोलीस स्टेशन बाळापूर येथे तक्रार दाखल केली होती. दिलेल्या तक्रारीवरुन तहसिलदार बाळापूर यांनी श्री गोपाल वंजारे यांना निलंबित केले होते. अडीच वर्षाच्या निलंबनानंतर त्यांना गायगांव ता. बाळापूर जि. अकोला येथील तलाठी यांचे अधिनस्त कोतवाल म्हणून देण्यात आले. निलंबन कालावधीमध्ये वरील नामक व्यक्तीस पारस भाग-२ येथे वि. तहसिलदार साहेबाच्या आदेशानुसार पारस भाग-२चे कोतवाल म्हणून रुजू करा असे कळविण्यात आले. तरी पण वरील नामक व्यक्ती पारस भाग-१ यांचेकडे माहितीच्या अधिकारात माहिती मिळणे बाबत प्रस्तुत अर्ज दाखल करीत होते. प्रस्तुत अर्जामध्ये जी माहिती मागितलेली होती ती अकृषक परवानगीबाबतचे आदेश हे तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचे कडून पारित केले जात असतात. तरी देखील वरील नामक व्यक्तीने अकृषक खातेदारांचे खाते नंबर, नाव, गट नं. क्षेत्र आकारणी व एन.ए.पी. नंबरसह संपूर्ण माहिती मागीतली. वरील नामक**

व्यक्तीस वेळोवेळी माहिती दिल्यानंतरही मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग(खंडपीठ अमरावती) यांचेकडे अपील दाखल केली होती. प्रस्तुत अपील प्रकरणात दिनांक १.१०.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशाद्वारे मा. आयुक्त साहेबांनी हे प्रकरण खारीज केले. आदेशाची सत्यप्रत सोबत जोडली आहे. वरील नामक व्यक्तीने तहसिलदार बाळापूर व उपविभागीय अधिकारी बाळापूर यांचे लोकशाही दिनानिमित्त काही तक्रारी दाखल केल्या होत्या. परंतु, प्रस्तुत तक्रारी नंतर हया व्यक्तीने दिनांक ५.९.२००९ रोजी तक्रारी मागे घेण्याबाबत अर्ज सादर केला तो अर्ज व सोबत रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञालेख दिनांक १४.९.२००९ रोजी वि. तहसिलदार बाळापूर यांचे समक्ष सादर केला आहे. त्याची सत्यप्रत सोबत जोडली आहे. सध्या वरील नामक व्यक्ती हे तलाठी गायगांव यांचे कोतवाल म्हणून रुजू झाले असून त्यांना दरमहा रुपये २०००/- मानधन शासनाकडून प्राप्त होत आहे व सोबतच शेती सुध्दा आहे. त्यांचे पत्नीचे नावे, तरी देखील माहितीच्या अधिकाराअंतर्गत अर्जासोबत दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडले जात आहे. फक्त हे दारिद्रय रेषेचे कार्ड शैक्षणिक व वैद्यकिय उपयोगाकरीता देण्यात आले आहे. परंतु, प्रस्तुत कोतवाल हे दारिद्रय रेषेअंतर्गत कसे पात्र ठरले हा देखील संशोधनाचा विषय आहे.

उपरोक्त विवेचनाच्या आधारे सादर करण्यात येते की, प्रस्तुत अपीलार्थी श्री गोपाल वंजारे हे तहसिल कार्यालय, तलाठी व इतरांना विविध प्रकारे त्रास देतात. प्रस्तुत अपील प्रकरण हे सुध्दा निष्कारण दाखल केले आहे. तलाठी कार्यालयामध्ये हजर असल्यानंतरही कार्यालयामधून माहिती घेवून न जाता मा. आयुक्त साहेब यांचेकडे अपील दाखल केले आहे. शासकिय माहिती अधिकारी तथा तलाठी पारस भाग-१ यांनी माहितीच्या अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत पूर्ण माहिती दिली आहे. सबब प्रस्तुत अपील अर्ज विनंती निहाय खारीज करण्यात यावा. अपीलार्थी हे मुद्दाम शासकिय कर्मचारी व अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने अधिनियमाचा गैरफायदा करुन घेण्याचे प्रयत्न करीत आहे. यासोबत गावक-यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार केली आहे. सोबत सत्यप्रत जोडत आहे. करीता त्यांना योग्य शासन व्हावे." सोबत जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे, मा.ग्राम विकास मंत्री, उपविभागीय अधिकारी, बाळापूर, गट विकास अधिकारी, ठाणेदार, बाळापूर यांचेकडे सुध्दा एकुण १०० ते १२५ तक्रार अर्जाच्या प्रती(अपीलकर्ता यांचे विरुध्द दाखल

झालेल्या) जन माहिती अधिकारी यांनी जोडलेल्या आहेत. तसेच अपीलकर्ता यांनी तहसिलदार यांचेकडे संपूर्ण तक्रारी मागे घेतलेल्या आहेत, त्या अर्जाची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. त्याच बरोबर राज्य माहिती आयोग, खंडपीठ, अमरावती यांनी अपील खारीज केलेल्या निर्णयाच्या प्रती सुध्दा दाखल केलेल्या आहेत.

४. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर करीत आहे व विनाकारण शासकिय कर्मचा-यांना त्रास देत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच अपीलकर्ता हे तलाठी यांचे कोतवाल असून रुपये २००० दरमहा प्राप्त करीत आहेत. त्यांचेकडे शेती आहे व तरी सुध्दा दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. याबाबत गट विकास अधिकारी, बाळापूर यांनी चौकशी करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे अहवाल तहसिलदार, बाळापूर यांचेकडे पाठविणे संयुक्तिक राहील. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्रं. १३४५/अम/२००९ मध्ये दिनांक २२.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी शासकिय माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी बाळापूर यांचेकडे, आपल्या तालुका कृषि अधिकारी कार्यालया अंतर्गत स्व.वसंतराव शेती व स्वावलंबन योजने अंतर्गत २५,००० रुपये अनुदाना करीता सुरुवातचे निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांचे प्रसिध्द करण्यात आलेली गाववार यादीची झेरॉक्स प्रत मिळणेबाबत एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सोबत दारिद्रय रेषेखालील आरोग्य व शालेय कामाकरीता देण्यात आलेले प्रमाणपत्र जोडलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

६. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु, कृषि अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक ३.१२.२००८ रोजी सदरची माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे आपण प्रत्यक्ष कार्यालयात येवून माहितीचे अवलोकन करावे अन्यथा रुपये ९००/- चा भरना करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु, त्यावर अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही. विलंबा बाबत असे सांगितले की दिनांक २२.१०.२००८ चा अर्ज असता तरी तो दिनांक ३.८.२००९ रोजी प्राप्त

झालेला असल्यामुळे त्यांना विहित मुदतीत पत्र दिलेले आहे. या अपीलामध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १३४४/अम/२००९ खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता यांचे अपील १३४५/अम/२००९ खारीज करण्यात येत आहे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३५४/अम/२००९

१)श्री जयकुमार शालीग्राम चांडक
C/o जननिनाद कार्यालय, बालाजी प्लॅाट, खामगांव,
ता.खामगांव, जिल्हा बुलढाणा-४४४३०३. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद जलगांव जामोद, ता.जळगांव जामोद,
जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय जळगांव जामोद,
ता. जळगांव जामोद, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद जळगांव जामोद यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"नगर परिषदेने १ डिसेंबर २००६ पासून २० ऑक्टोबर २००८ पर्यंत नगर परिषद मार्फत टेंडर द्वारा काढलेली कामे व केलेली खरेदी(पुर्ण झालेले, सुरु असलेले, मंजूर झालेले) त्यांची रक्कम व कामाचा तपशील खालील तक्त्यात देण्यात यावा.**

| अ.नं. | दिनांक | कामाचा तपशील/खरेदी केलेल्या मालाचा तपशील | ज्याला काम देण्यात आले किंवा ज्याचेकडून खरेदी करण्यात आले त्यांचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**(२) नगर परिषदने १ डिसेंबर २००६ पासून २० ऑक्टोबर २००८ पर्यंत टेंडर न काढता नगर परिषदसाठी (कर्मचा-यांचे वेतन सोडून) केलेला खर्च किंवा केलेली खरेदी खालील तक्यात देण्यात यावी.**

| अ.नं. | दिनांक | कामाचा तपशील/खरेदी केलेल्या मालाचा तपशील | ज्याला काम देण्यात आले किंवा ज्याचेकडून खरेदी करण्यात आले त्यांचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही. परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भात तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री दातीर यांना दूरध्वनीवरुन त्यांच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये विचारणा केली असता त्यांनी बेजबाबदारपणे व निष्काळजीपणाने तसेच उर्मटपणे वागणुक दिली व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही. व आतापर्यंत त्यांना माहिती सुध्दा मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या ज्या शाखा आहेत व ज्यांचेकडे संपूर्ण माहिती आहे त्यांना दिनांक १.११.२००८ रोजी पत्र दिले होते. व त्या पत्राप्रमाणे माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन द्यावी असे कळविण्यात आले होते. परंतु, सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही व्यापक प्रमाणातील माहिती असल्यामुळे व ती संकलित करावयाची असल्यामुळे विलंब झालेला आहे व त्यांनी आयोगापुढे माहितीचे सर्व कागदपत्र आणलेले दिसून येते.**

**प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द जिल्हाधिकारी यांचेकडे अपीलकर्ता यांनी तक्रार केलेली असून त्या तक्रारीच्या संदर्भात जिल्हाधिका-यांनी तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री दातीर यांना आदेश देवून सुध्दा कोणत्याही प्रकारे जिल्हाधिकारी यांचे आदेशाची दखल घेतली नाही. तसेच अधिनियमाच्या तरतुदींचे व शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्याकरीता त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक आहे.**

**असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांनी संपूर्ण उपलब्ध असलेल्या अभिलेख्यांची तपासणी करावी व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्या वेळेस उपस्थित होऊन संबंधीत अभिलेख्यांचे निरीक्षण करावे व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात याव्या व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता हे कळविलेल्या तारखेस उपस्थित झाल्यावर जन माहिती अधिकारी यांनी नगर परिषद अधिका-याच्या उपस्थितीत अपीलकर्ता यांना अभिलेखे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे व त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या व पोच घ्यावी.**

**३) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द पुढील कारवाई करण्यासाठी पाठविण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३५८/अम/२००९

१)श्री राजेंद्र सुगदेव सुरळकर,
मु.पो.दिधी, ता.नांदूरा, जिल्हा बुलढाणा-४४३४०१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
जिल्हा परिषद(शिक्षण विभाग)बुलढाणा,
ता.जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती(शिक्षण विभाग)मलकापूर,
ता.मलकापूर, जिल्हा बुलढाणा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२००९ रोजी एकत्रित नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा संबंधीत कक्षाचे वरिष्ठ सहाय्यक(शिक्षण विभाग), पंचायत समिती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"शासनाच्या वतीने राष्ट्रीय शालेय माध्यान्ह भोजन कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांना सुरु करण्यात आली. त्या संबंधी संपूर्ण मलकापूर तालुक्याची माहिती सत्यप्रतीत जि.आर.सह माहिती हवी. तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, मान्यता प्राप्त जिल्हा परिषद खाजगी, अनुदानित शाळांची माहिती. जून २००८ ते २००९ कालावधी संबंधी माहिती हवी. वरील दिलेल्या तपशिला नुसार (१) संबंधीत योजनेची जि.आर.झेरॉक्स प्रत देण्यात यावी. (२) मलकापूर तालुक्यातील शाळेचे बँकचे खाते हे शाळेच्या किंवा संस्थेच्या वा ग्राम शिक्षण समीतीच्या नांवे असते, तर पास बुकात बिले काढले असतील तर पास बुकाच्या एन्ट्रीच्या झेरॉक्स प्रत देण्यात यावा. (३) उपस्थितीच्या आराखडया नुसार संपूर्ण तालुक्यातील शाळांनी जी दरमहा बिले काढण्यात आली त्या तक्त्याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. तालुक्यात कोणत्या तारखेपासून जिल्हा परिषद अंतर्गत खाजगी, मान्यता प्राप्त अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा एकुण किती आहेत. गावाच्या शाळेच्या नांवासह माहिती दयावी. (४) कोणत्या शाळेवर कोणते मुख्याध्यापक आज रोजी कार्यरत आहेत त्यांच्या नांवासह पत्ता देण्यात यावा. (५) संपूर्ण तालुक्याची मुलांची/मुलींची पट संख्या देण्यात यावी. माहिती सत्यप्रतीत देण्यात यावी." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.**

**सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१२.२००८ रोजी कार्यालयाशी संबंधीत माहिती टपालाने पाठविली आहे. परंतु, अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना सांगितले की, माहिती उपलब्ध झाली होती परंतु ती अपूर्ण आहे. त्यात राष्ट्रीय शालेय माध्यान्ह भोजन याचे देयक नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर योजना दिनांक ५.१२.२००८ पासून लागू**

**झालेली असल्यामुळे व अर्ज त्यापुर्वीचा असल्यामुळे त्याबाबतची माहिती देणे शक्य नव्हते. राष्ट्रीय शालेय माध्यान्ह भोजन योजनेची माहिती ही वर्ग १ ते ५ च्या संदर्भात उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उर्वरित उपलब्ध असलेली देयकाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. २) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

**Ordermarch१०-Balki**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३५६/अम/२००९

१)श्री रामदास नामदेव तेलंग,
रा.खरबडी, ता. मोताला, जिल्हा बुलढाणा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट प्रमुख
जिल्हा सुलभीकरण चमू, जलस्वराज्य प्रकल्प,
जिल्हा परिषद, बुलढाणा. ता.जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, बुलढाणा,
ता.जिल्हा बुलढाणा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी, कक्ष अधिकारी जिल्हा परिषद, बुलढाणा, जल स्वराज्य प्रकल्प अधिकारी यांचेकडे, मौजा आडविहिर ता. मोताळा येथील जलस्वराज योजनेअंतर्गत होत असलेल्या कामासंबंधीची माहिती एकुण दोन मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अर्जदाराने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनाक २३.१.२००९ रोजी देण्यात आला असून गट प्रमुख, जलस्वराज प्रकल्प तथा अपीलीय अधिकारी यांनी, सदर माहिती सदस्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडून प्राप्त करुन या कार्यालयास सादर करावी असे आदेश सचिव, ग्राम पंचायत आडविहिर यांना दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती सदस्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, आडविहिर यांचे स्तरावरील असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांचेकडे पाठवून अपीलकर्ता यांनी त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश दिलेले होते. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे त्यांनी संपर्क साधला असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिला. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की,दिनांक १५.३.२००७ च्या विभागीय सुलभाकरीता जलस्वराज प्रकल्प अमरावती विभाग,अमरावती यांचे पत्राप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक,जिल्हा परिषद यांना पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने जलस्वराज प्रकल्पाची अंमलबजावणी संदर्भात माहिती मागण्यात आली असेल तर सदरची माहिती सचिव, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती या स्तरावरुन ती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले होते. व त्यामुळे सदरचा अर्ज हस्तांतर करण्यात आला होता. अपीलकर्ता यांना त्यानंतर दिनांक ११.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना अपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्याकरीता सचिव, ग्रामपंचायत हे दोषी आढळून येतात असा निष्कर्ष काढावा लागतो व ते शास्तीस पात्र आहे. परंतु आज सचिव, ग्राम पंचायत हे हजर नाही. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्या दिनांक ५.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी ज्या अधिका-यानी टाळाटाळ केलेली असेल ते जन माहिती अधिकारी असतील किंवा सचिव ग्राम पंचायत आडविहिर असतील, त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. सदरची कारवाई ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे पाठवावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३५७/अम/२००९

१)श्री पितांबर तोताराम चौधरी,
शिवनेरी चौक, विष्णू वाडी, बुलढाणा, ता.जि. बुलढाणा. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्यूरो, अमरावती. ता.जि. अमरावती. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्यूरो, अमरावती, ता.जि.अमरावती. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००९ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्यूरो, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.**

**"(१) श्री जाधव पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्यूरो बुलढाणा यांची दिनांक १३.१.२००८ ते १९.१.२००८ दिनांक २३.३.२००८ ते २९ मार्च, २००८ दिनांक २५.५.२००८ ते ३१.५.२००८ पर्यंत आठवडा डायरीची नक्कल दोन प्रतीत (२)श्री इंगळे पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्यूरो, बुलढाणा यांची दिनांक १३.१.२००८ ते १९.१.२००८, दिनांक २०.१.२००८ ते २६.१.२००८ पर्यंत आठवडा डायरीची नक्कल दोन प्रतीत मिळावी. (३) अे.एस.आय. विजय पाचपांडे, अे.एस.आय. संजय भंडारी, पो.हे.कॅा. भास्कर वानखेडे, ना.पो.कॅा. शेख मोबीन यांची दिनांक १३.१.२००८ ते १९.१.२००८ पर्यंत आठवडा डायरीची/पेट्रोल बुक/नोटबुक उतारा प्रत्येकी दोन प्रतीत मिळणेबाबत." अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.२.२००९ रोजी मुद्या क्रमांक १ अन्वये तीन मुद्यांवर मागितलेली माहिती ही व्यापक जनहिताच्या दृष्टीने आवश्यक नाही. सदर माहितीचा सार्वजनिक हिताशी काही संबंध नाही. त्याचप्रमाणे अर्जदार यांचा मुलगा श्री अनंत चौधरी हा अपराध क्रमांक ३००४/०८ कलम ७,१२,१३(१)(ड)सह १३(२) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ या गुन्हयातील आरोपी असल्यामुळे वैयक्तिक स्वार्थासाठी माहितीचा वापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मागितलेली माहिती अधिनियमाचे कलम ८(१)(जे) अन्वये नाकारण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे परंतु त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कारणाचे संदर्भात कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे त्यामध्ये, अर्जदार यांनी राज्य माहिती आयोग, अमरावती यांचेकडे अपील दाखल केले होते. अपील क्रमांक रामाआ/अपील/१३२१ दिनांक ११.९.२००९ हा आहे. त्यांनी अपीलामध्ये निर्णय देवून दिनांक ४.३.२००९ व दिनांक ११.९.२००९ या आदेशाने अर्जदार यांना त्यांच्या पत्यावर रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती पाठवावी असा निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १५.९.२००९, १२.१०.२००९ व १४.१०.२००९ अन्वये पोस्टाने व अर्जदार स्वतः दिनांक ३०.११.२००९ रोजी कार्यालयात हजर झाल्यावर त्यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. मुद्या क्रमांक १,२ व ३ मध्ये मागणी केलेल्या माहितीच्या प्रती यापुर्वीच त्यांचे कार्यालयातून वर नमुद केल्याप्रमाणे देण्यात आलेल्या आहेत. अपीलकर्ता यांनी सुध्दा सदरची माहिती उपलब्ध झाली आहे असे मान्य केले होते. परंतु त्यांचे म्हणणे आहे की त्यांनी अर्ज दिला त्यावेळेस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगीतले की, त्यांच्या मुलावर जो गुन्हा दाखल झालेला आहे त्याबाबतचा तपास चालू होता. त्यामुळे माहिती नाकारण्यात आली हाती. परंतु, त्यानंतर त्यांच्या इतर अर्जाचे संदर्भात तपास पूर्ण झालेला असल्यामुळे व आरोपपत्र दाखल झालेले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य होता व त्यानंतर सर्व माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३५५/अम/२००९

१)श्री संदिप प्रकाश गाडेकर,
गांधी नगर, वार्ड नं.६ चिखली, ता.चिखली,जिल्हा बुलढाणा. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक,
क्रिडा व युवक सेवा, अमरावती विभाग, अमरावती,
विभागीय क्रिडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा,
क्रिडा संकुल, जांभरुन रोड, बुलढाणा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय कक्ष अधिकारी यांचकडे एकुण तीन मुद्यांमध्ये जिल्हा क्रिडा अधिकारी, बुलढाणा यांचेकडून जिल्हयातील तालुकानिहाय संस्थाना वाटप केलेल्या अनुदानाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतर माहिती अपूर्ण मिळाली म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांना दिनांक १५.९.२००८ रोजी रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता हे दिनांक १९.९.२००८ रोजी प्रत्यक्ष कार्यालयात आल्यावर त्यांचेकडून पोच घेतली. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २५.८.२००८ रोजीचे पत्राप्रमाणे दिनांक २७.८.२००८ रोजी रुपये ७०/- चा भरणा केल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. त्यांच्या मुळ अर्जाप्रमाणे माहिती दिली. परंतु त्यात काही त्रुटया होत्या व त्याचा खुलासा त्यांनी केलेला आहे व दिनांक ११.११.२००८ रोजी पत्राव्दारे त्यांना संपूर्ण माहिती दिलेली आहे.**

**विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी तालुकानिहाय माहिती मागितली होती व जिल्हा कार्यालयाकडे**

**तालुकानिहाय माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे तालुकानिहाय संपूर्ण माहिती देण्यासाठी विलंब झालेला आहे. विवरण देण्यामध्ये काही त्रुटी राहिल्या होत्या त्या नंतर दुरुस्त करुन दिलेल्या आहेत. माहिती २००३ पासूनची असल्यामुळे व्यापक प्रमाणात होती व त्यामुळे विलंब झालेला आहे, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ४७/२०१०

१) श्री तरुण चतूरभाई परमार,
१८, भूपेश नगर, पोलीस लाईन टाकळीचे पाठीमागे,
नागपूर-१३. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय, नागपूर. ता.जि. नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक ४.३.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक १२.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरची तक्रार तहसिलदार नागपूर यांचे कार्यालयाकडून दिनांक ८.९.२००९ रोजी अर्जदार तक्रार सादर करण्यासाठी गेले असता महिला आवक लिपिक यांनी सदरचा अर्ज घेण्यास नकार दिला. अर्ज घेण्यासाठी तहसिलदार यांच्या परवानगीशिवाय अर्ज घेवू शकत नाही असे सांगितले व त्यामुळे त्याच दिवशी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. जन माहिती अधिकारी, तहसिलदार यांचे कार्यालय यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्या कार्यालयाने कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही, असे आयोगाचे निदर्शनास आणून देण्यात आले. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी दिनांक ४.३.१०१० रोजी खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये, कार्यालयीन आवक-जावक लिपिक यांनी अर्ज स्विकारला नसल्यामुळे स्पष्टीकरण विचारण्यात आले होते. अर्जदाराने मागितलेली माहिती ही विशिष्ट विभागाची नसल्यामुळे तहसिलदार कार्यालयातील हैसियत प्रमाणपत्र वाटप करण्याचे काम सुरु असून वरील वेळ लागण्याची शक्यता आहे. आयोगाकडून पत्र प्राप्त झाले त्यावेळेस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, नागपूर शहर विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या कामात व्यस्त होते. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला आहे. ही माहिती लवकर अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही या कार्यालयातर्फे करण्यात येईल असा खुलासा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे श्रीमती रोडीया, आवक लिपिक यांना दिनांक ६.१०.२००९ रोजी दिलेल्या कारणे दाखवा नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यावर श्रीमती रोडीया यांनी मा. तहसिलदार नागपूर शहर यांचे मौखिक आदेशानुसार माहिती अधिकाराच्या अर्जावर संबंधीत अधिका-यांची मार्किंग असल्याशिवाय अर्ज घेवू नये असे आदेश असल्यामुळे अर्ज घेतला नाही असा खुलासा केला आहे.**

**यावरुन तहसिलदार यांनी माहिती अधिकारी म्हणून त्यांची जबाबदारी आवक जावक लिपिक यांचेवर टाकलेली आहे. आवक जावक लिपिक यांनी ही जबाबदारी तहसिलदार यांचेवर टाकलेली आहे. परंतु अर्जदारास माहिती उपलब्ध झालेली नाही ही बाब तशीच आहे. तक्रारदार यांचा माहितीचा अर्ज दिनांक ८.९.२००९ रोजी तहसिल कार्यालयात स्विकारलेला नसल्यामुळे तहसिल कार्यालयातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी सदरचा अर्ज स्विकारण्याचा निर्णय घेतला नाही त्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्या अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांच्या दिनांक ८.९.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) तक्रारदार यांचा माहितीचा अर्ज दिनांक ८.९.२००९ रोजी तहसिल कार्यालयात स्विकारलेला नसल्यामुळे तहसिल कार्यालयातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी सदरचा अर्ज स्विकारण्याचा निर्णय घेतला नाही त्यामुळे ते दोषी आढळून येत असल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्या अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचेकडून रुपये ५००/- ची वसुली त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखा शिर्षात जमा करावी.**

**३) सदरच्या शास्तीची वसुली जिल्हाधिकारी यांनी करावयाची असल्यामुळे निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोस्टाने जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.**

**४) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३६८/अम/२००९

१)श्री बापूराव लक्ष्मणराव मोरे,
संभाजी नगर,दिग्रस, ता.दिग्रस, जिल्हा यवतमाळ. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, यवतमाळ, जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ,
जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक) कार्यालय, जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडे सन २००७-०८ या कालावधीतील दिग्रस येथील दिनबाई शिक्षण संस्थेतील कर्मचा-यांच्या सेवा जेष्ठता (शिक्षणाधिकारी माध्यमिक) यांनी तयार केलेल्या यादीनुसार यादीची झेरॉक्स प्रत मागितलेली दिसून येते. माहिती साधे टपालाने घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २१.१.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा अधीक्षक शिक्षण विभाग(माध्यमिक) यांनी मुख्याध्यापक/प्राचार्य दिनबाई विद्यालय, दिग्रस यांना, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध**
**झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, दिनबाई शिक्षण संस्थेतील कर्मचा-यांची यादी उपलब्ध झाली होती ती यादी शिक्षणाधिकारी यांचेकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कोणत्याही शिक्षण संस्थेतील कर्मचा-यांची सेवा जेष्ठता यादी करण्याचे अधिकार हे अध्यक्ष/सचिव, यांचे अर्थात शिक्षण संस्थेचे आहे. व त्यानंतर त्या यादीला शिक्षणाधिकारी यांचेकडून मान्यता मिळते. परंतु, संस्थेने यादी पाठविली नसल्यास शिक्षणाधिकारी यांचेकडून सदरची यादी उपलब्ध होत नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापक यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते.**

**अपीलकर्ता यांनी शिक्षण संस्थेकडे किंवा मुख्याध्यापक यांचेकडे माहिती मागणे आवश्यक होते. व त्यानंतर शिक्षणाधिकारी यांचेकडे मान्यता नसतील तर तक्रार करणे आवश्यक होते. परंतु ज्यांचेकडे माहिती नाही त्यांचेकडून माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३६६/अम/२००९

१)श्री अ.हमीद शेख चांद,
मस्जीद वार्ड, पुसद, ता. पुसद जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पुसद,जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्राम पंचायत गायमुख नगर पो.पि.एन.कॅालेज,पुसद,
ता. पुसद, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१२.२००८ रोजी सचिव, ग्राम पंचायत गायमुख नगर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"तहसिल कार्यालयातील पुरग्रस्त रेकार्ड नोंदी LNA २२/९१-९२ अनुक्रमांक १०७३ मौजे गायमुख नगर पुसद हा घर कोणत्या व्यक्तीस देण्यात आले. त्याचे नांवासह पत्यासह माहिती मिळणे बाबत. (२) शेख चाँद मोहम्मद नवाज या व्यक्तीच्या नांवाने आपल्या ग्राम पंचायत हद्दीत सन १९९१-९२ साली पुरग्रस्त लाभार्थी म्हणून घर देण्यात आले आहेत कां. असल्यास त्याचे पुरावेसह माहिती मिळणे बाबत. (३) रोजगार हमी योजने अंतर्गत सन २००६ ते सन २००८ पर्यंत झालेल्या कामाचा अहवाल मिळणे बाबत. (४) ग्राम पंचायत गायमुख नगरचे आमसभा, ग्रामसभाचा अहवाल मिळणेबाबत, सन २००७-०८ पर्यंतचे. (५) आपल्या ग्राम पंचायतचे शासकिय नियमाप्रमाणे कार्यालय उघडे ठेवण्याचे वेळ पत्रकाची माहिती मिळणेबाबत."**

**विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १९.१.२००९ रोजी सुनावणीसाठी पत्र पाठविले व दिनांक ५.२.२००९ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात येवून जोडपत्र-अ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक ४.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध झाली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, माहिती विलंबाने व दिशाभूल करणारी उपलब्ध झाली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायतचे नमूना नंबर-८ ची नोंदवही आयोगाचे निदर्शनास आणली व त्यात ९२८ घर क्रमांक आहे व एलएएन १०७३ हा नंबर नाही. एलएएन याचा अर्थ सदरचे घर क्रमांक नाही. तर तो तहसिल कार्यालयातील रेकार्डचा नंबर असल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारचे घर नसल्यामुळे तशी माहिती देण्यात आली आहे.**

**यावरुन माहिती उपलब्ध झाली होती. परंतु मुद्या क्रमांक २ व ३ चे संदर्भात अपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३.१२.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३६४/अम/२०००९

अपील क्रं. १३६५/अम/२००९

१)श्री श्री गुलाब कर्णुजी गुरनुले,
मानोली पो.अंजी (नृ), ता.घाटंजी, जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पं),
जिल्हा परिषद, यवतमाळ, ता.जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती घाटंजी, ता.घाटंजी, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती घाटंजी यांचेकडे, यशवंत ग्राम समृध्दी योजना अंतर्गत झालेल्या मौजा मानोली येथील ग्राम पंचायतच्या हद्यीतील रस्त्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी होऊन माहिती मिळण्याबाबत, अशी माहिती मागीतलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक ११.२.२००९ रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामध्ये दिनांक २७.१.२००९ रोजी पंचायत समिती घाटंजी यांनी चौकशी अहवाल व उपअभियंता यांचेकडील तांत्रिक अहवाल असे दोनही अहवालाच्या प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. व तशी पोच पावती माहिती अधिकारी, पंचायत समिती घाटंजी यांनी सादर केली आहे. अपीलकर्ता यांनी सुनावणीचे वेळेस माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे अपील अस्विकृत करुन खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेली पोचपावतीची नक्कल व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेल्या टिप्पणीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३६७/अम/२००९

१)श्री आनंदराव सिताराम भोयर,
पटवारी कॅालनी वणी, ता.वणी, जि.यवतमाळ — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त,
आदिवासी विकास विभाग, अमरावती.
ता.जि.अमरावती. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
अप्पर आयुक्त आदिवासी कार्यालय, अमरावती,
ता.जिल्हा अमरावती. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ६.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००८ रोजी अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग, अमरावती यांचेकडे, या कार्यालयातील प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचा दिनांक ११.१२.२००६ चा अप्पर आयुक्त यांना गोपनिय अहवाल दिला त्यावर आज दिनांक २६.२.२००८ पर्यंत केलेली कार्यवाही, कार्यालयीन कार्य विवरण टिपणीसह, मागीतलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १७.१२.२००८ व ६.३.२००९ अन्वये त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु त्यांच्या प्रथम अपील व द्वितीय अपीला मेमो व**
**प्रतिज्ञा पत्रावरुन असे दिसून येते की, गुणवत्तेबाबत कार्यवाही व्हावी अशी त्यांची अपेक्षा दिसून येते. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत निर्णय अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१४०४/अम/२००९
अपील क्रं.१४०५/अम/२००९

१)श्री शैलेष गुलाबसिंह ठाकूर,
संतश्री मारोती महाराज वार्ड, घाटंजी,
ता. घाटंजी, जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद घाटंजी, ता.घाटंजी,जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा कर अधीक्षक,
नगर परिषद घाटंजी, ता.घाटंजी, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी
४)जन माहिती अधिकारी तथा कनिष्ट अभियंता,
नगर परिषद घाटंजी, ता.घाटंजी, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपील क्रमांक १४०४/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन २००५-०६ ते २००८-०९ चतुर्थ कर आकारणी मध्ये कर आकारणीवर अपील संबंधात मालमत्ताधारकांनी ट्रीब्यूनल पुढे दाखल केले होते. ट्रीब्यूनलने या अपीलावर निर्णय घेतला आहे. सदर निर्णयाच्या नकला मला प्रमाणित करुन द्यावे. तसे ट्रिब्यूनलमधील वेगवेगळया सदस्यांनी जो शेरा अपीलावर दिला त्या शे-याचा समावेश माहिती देतांना असावा जेणे करुन प्रत्येक सदस्यांचे म्हणणे लक्षात येईल्, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.१.२००९ रोजी देण्यात आला असून, विहित मुदतीत माहिती दिनांक १.१.२००८ पुर्वी पुरविणे आवश्यक होते. परंतु निवडणुक कामाकरीता ओळखपत्र वाटपाचे, छायाचित्र काढण्याचे कामात डयूटीवर असल्याने कार्यालयीन काम करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही. तसेच माहितीच्या झेरॅाक्स प्रती जादा असल्याने विलंब झाला असा जबाब दिला आहे. जाणिवपुर्वक विलंब झालेला नाही परंतु, माहिती पुरविण्यास विलंबाचे कारण अर्जदारास कळविलेले नसल्यामुळे ते अंशतः दोषी आहेत.**
**माहिती अधिकारी यांचेकडून मागितलेली माहिती विनामुल्य प्राप्त करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु, त्यानंतरही माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना दिनांक १७.३.२०१० पर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहितीच्या अर्जाच्या कालावधीत ते निवडणुक कामकाजाचे कार्यात होते. परंतु, प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये तसे अपीलकर्ता यांना कळविलेले नाही म्हणून त्यांना दोषी धरण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस माहिती तयार होती. ती तत्कालीन अपीलीय अधिकारी यांना दाखविली होती. परंतु, अपीलकर्ता यांनी माहिती मागितली असताना व ते हजर असताना त्यांना माहिती कां देण्यात आली नाही याबाबत कोणत्याही प्रकारचा त्यांनी खुलासा केला नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्याकरीता तत्कालीन जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी स्वतः उपस्थित असल्यामुळे त्यांना प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अद्यापपर्यंत माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही याबाबत विचारले असता त्यांनी आयोगापुढे समाधानकारक खुलासा केला नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

**४. अपील क्रमांक १४०५/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नगर परिषद घाटंजी यांचेकडे, नगर परिषद घाटंजीचे नवीन सांस्कृतिक भवनाविषयी झालेल्या गैर प्रकाराबाबत दिनांक २०.१०.२००८ ला केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे चौकशीच्या अहवालाची प्रत किंवा चौकशी अहवाल कोणत्या प्रगती स्तरावर आहे याबाबतची माहिती नोंदणीकृत टपालाने मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक**

**७.२.२००९ रोजी देण्यात आला असून उपलब्ध माहिती आजच देण्यात यावी अशी टिप्पणी दिसून येते. परंतु, त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**५. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये व मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे चौकशी अहवालाची माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही. तसेच दिनांक १७.११.२००८ व २.१२.२००८ रोजी तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद घाटंजी यांनी श्री स.वि. भोंग, कनिष्ठ अभियंता, श्री स.न. मडावी, बांधकाम लिपिक, नगर परिषद घाटंजी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारची चौकशी करुन माहिती मुख्याधिकारी यांना देण्यात आली नाही असे मुख्याधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. परंतु त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांनी आज आयोगाचे कार्यालयात आणलेली आहे व ती माहिती अपीलकर्ता यांना देता येईल असे आयोगास सांगितले. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, माहिती अपूर्ण आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या तक्रारीची चौकशी अद्यापपर्यंत मुख्याधिकारी यांचेकडून झालेली नाही व त्यामुळे त्या चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी अहवालाची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी आयोगास सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती ही, श्री स.वि. भोंग, कनिष्ठ अभियंता व श्री स.न. मडावी, बांधकाम लिपिक, नगर परिषद घाटंजी यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही हे स्पष्ट होत असल्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४०४/अम/२००९ मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.१२.२००८ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे रुपये २५०००/-चे शास्तीस पात्र राहातील.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक १४०४/अम/२००९ मधील प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना अद्यापपर्यंत त्यांच्या दिनांक २.१२.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीताचे दरमहिन्याचे वेतनातून वसूल करुन ती** "००७०-इतर प्रशासकिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)"**. या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १४०५/अम/२००९ मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत चौकशी अहवालाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**४) अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन मुख्याधिकारी यांनी श्री स.वि. भोंग, कनिष्ठ अभियंता व श्री स.ना. मडावी, बांधकाम लिपिक, नगर परिषद घाटंजी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले असताना सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे प्रत्येकी रुपये १०००/-(रुपये एक हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीतांच्या दरमहिन्याच्या वेतनातून वसुल करुन ती** "००७० इतर प्रशासकिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)"**. या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१४०३/अम/२००९

१)श्री शैलेष गुलाबसिंह ठाकूर,
संतश्री मारोती महाराज वार्ड, घाटंजी,
ता. घाटंजी, जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ,
ता.जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ.
ता.जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांनी मुदत मागीतली आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ यांचेकडे, दिनांक २७.११.२००८ रोजी त्यांच्या जीवितास धोका असल्याने पोलीस संरक्षण मिळण्याकरीता पत्र दिले होते. त्यावर काय कार्यवाही झ ाली याबाबतची माहिती त्यांनी नोंदणीकृत टपालाने मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.१.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु, त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना शस्त्रधारी पोलीस संरक्षण नाकारण्याबाबत परिपूर्ण अहवाल मागवून त्याची प्रत आपणास देण्याबाबत तोंडी निर्देश दिले. व ते पोलीस निरीक्षक व अपीलकर्ता यांच्या वकीलांनी मान्य केल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती प्राप्त झाली होती परंतु ती विलंबाने प्राप्त झालेली आहे. उत्तरवादी यांनी मुदत मागितली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली नाही असे सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन कां दिली याबाबतचा खुलासा आयोगापुढे करणे आवश्यक आहे. अन्यथा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक होईल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.१२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती कां उपलब्ध करुन दिलेली नाही याबाबतचा खुलासा आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४०१/अम/२००९

१)श्री प्रफुल्ल रामभाऊ मेश्राम,
अंबिकानगर, वार्ड नं.३, प्लॅाट नं.इ/१८, यवतमाळ
ता.जिल्हा यवतमाळ-४४५००१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकरी(पंचा.)
जिल्हा परिषद यवतमाळ. ता.जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बाभूळगांव, ता.बाभूळगांव, जिल्हा यवतमाळ. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांचेकडे सन २००६ ते २००८ या कालावधीत (१) संपूर्ण तालुक्यात उपरोक्त योजने अंतर्गत किती बंधारे बांधले गावनिहाय यादी. ७२) सदर कामाचे कंत्राट कोण्या कंस्ट्रक्शन कंपनीला किंवा ठेकेदाराला दिले त्याची यादी (३)सदर कामाचे मापन पुस्तीका(मस्टर बुक) (४) वेल्ही येथील नदीवरील बंधा-याचे कंत्राट कुण्या ठेकेदाराला दिले त्याचे संपूर्ण अहवाल वर्कऑर्डरसह अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.२.२००९ रोजी देण्यात आला असून, निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाभूळगांव यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु, त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, तत्कालीन शाखा अभियंता श्री एम.बी. गायकवाड यांना दिनांक १८.१०.२००८, २४.११.२००८ व दिनांक २२.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आदेश दिलेले दिसून येते. परंतु, श्री गायकवाड यांनी कोणत्याही प्रकारची माहिती सादर केली नाही. व प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा हजर झाले नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर मात्र दिनांक २.३.२००९ रोजी श्री एम.बी. गायकवाड यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली, ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ती माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. परंतु सदरची माहिती अपीलकर्ता यांना कशाप्रकारे उपलब्ध करुन दिली याबाबतचा कोणताही पुरावा आयोगापुढे सादर केला नाही. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे जे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे ते योग्य आहे असे गृहित धरावे लागते. यावरुन अपीलकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही यास जबाबदार श्री एम.बी. गायकवाड आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री एम.बी. गायकवाड यांचे सहाय्य घेतले असल्यामुळे श्री गायकवाड,शाखा अभियंता हे अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/-(पाच हजार फक्त) शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक १८.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संपूर्ण माहिती कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.९.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच गट विकास अधिकारी यांच्या दिनांक १८.१०.२००८ व २४.११.२००८ च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यामुळे श्री एम.बी. गायकवाड, शाखा अभियंता यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांच्या दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासकिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी. तसेच

संबंधीत शाखा अभियंता यांची इतरत्र बदली झाली असल्यास संबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४००/अम/२००९

१)श्री बबनराव शामरावजी गायकी,
चिंतामणी, १९, राधिका ले आऊट, दर्डा नगर जवळ,
आर्णी रोड, यवतमाळ. ता.जिल्हा यवतमाळ. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि)
जिल्हा परिषद, यवतमाळ. ता.जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद यवतमाळ. ता.जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२००९ रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(१) कर्करोग झालेल्या शासकिय (जि.प.) कर्मचा-यास कशाप्रकारे रजा देण्यात येतात व रजा काळात वेतन कसे दिले जाते हे कुठल्या शासन निर्णयाद्वारे (जी.आर.)देण्यात यावा. (२) सौ. उषा बबनराव गायकी, स.शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडगांव रोड, यवतमाळ हयांनी कर्करोगामुळे रजेसाठी अर्ज केलेले होते. त्यांचे ऑक्टोबर, २००८ पर्यंतचे वेतन व शासन मंजूर अग्रीम राशी रुपये १०,०००/- त्यांना देण्यात आलेली नाही. त्यासंबधीची संपूर्ण माहिती व सदर वेतन व अग्रीम राशी न काढण्यास दोषी व्यक्तीची माहिती व अशा प्रकरणी दोषींवर काय कार्यवाहीची तरतूद आहे हयाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी. कर्करोगाच्या ऑपरेशन करीता अग्रीम राशी मिळण्याकरीता अर्ज करणा-या व्यक्तीस किती दिवसांमध्ये अग्रीम राशीचे देयक देण्यात यावे. हयाबद्दल काय शासन निर्णय (जी.आर.) आहे. खाजगी रुग्णालयात उपचार घेण्याचा शासकिय कर्मचा-यास अग्रीम देण्याद्दल काय शासन निर्णय आहे. सौ. उषा बबनराव गायकी, स.शिक्षिका जि.प.प्राथमिक शाळा, वडगांव रोड यवतमाळ हयांनी कर्करोगाच्या ऑपरेशनकरीता ३.४.०८ व दूसरा अर्ज दिनांक ५.७.०८ रोजी केला होता. सदर अग्रीम राशीचे देयक त्यांना कधी देण्यात आले. अग्रीम देयक देण्यास उशीर होणेस दोषी व्यक्ती कोण व दोषी व्यक्तीवर काय कार्यवाही करण्याची तरतूद आहे. जिल्हा परिषद यवतमाळच्या सर्व विभागातील र्मचारी, अधिकारी व पदाधिका-यांनी खाजगी रुग्णालयात वैद्यकिय उपचार घेतल्यास सदर वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येते काय. व कुठल्या शासन निर्णयाद्वारे (जी.आर.)देण्यात येते. जानेवारी, २००० ते ऑक्टोबर २००८ हया कालावधीत जिल्हा परिषद यवतमाळ किती कर्मचारी/अधिकारी व पदाधिका-यांनी खाजगी रुग्णालयात वैद्यकिय उपचार घेऊन वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करण्यासाठी अर्ज केले व त्याचे पुढे काय झाले हयाची सविस्तर माहिती.(रुग्णाचे नांव, गांव, पद विभाग, उपचार घेतलेल्या रुग्णालयाचे नांव, गाव, आजाराचे नांव, सादर केलेल्या वैद्यकिय खर्चाची रक्कम, सादर केल्याची तारीख, मंजूर केलेली रक्क्म व तारीख, देयक दिल्याची तारीख, व अर्ज नामंजूर केले असल्यास कारण) देण्यात यावी." सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे.**

**३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.११.२००८ रोजी एकुण ७९२ पृष्ठांचे रुपये १५८४/-चा भरणा कार्यालयात करावा असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून दिनांक ५.१२.२००८ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ७.१.२००९ रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती प्रमाणे- पदाधिका-यांनी खाजगी रुग्णालयात वैद्यकिय उपचार घेतल्यास सदर वैद्यकिय खर्चाची प्रतीपुर्ती करण्याबाबत शासनाचे निर्देश नाहीत. व दिनांक १९.१२.२००८ रोजी माहिती देण्यात आलेली आहे असे पत्र दिलेले आहे, अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु जी माहिती उपलब्ध झाली त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या पत्नीस कॅन्सर झाला होता व वैद्यकिय अधिका-यांच्या परवानगीने खाजगी रुग्णालयात उपचार केला. त्याबाबतचे प्रमाणपत्र आयोगास दाखविण्यात आले. तरी सुध्दा त्यांचे देयके परत करण्यात आले आहे. व त्यामुळे त्यांनी सर्व नियमांची व शासन निर्णयाची माहिती मागितलेली दिसून येते. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक ३०.१२.२००८ रोजी ७ दिवसांचे आंत माहिती देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु तरीही सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यांना ८१४ पृष्ठ उपलब्ध झालेले आहेत. त्यामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली**

**माहिती आहे किंवा नाही याबाबतची तपासणी करावी असे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांना सांगीतले व तपासणी नंतर मागितलेली माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली नसेल तर आयोगाचे निदर्शनास आणावे असे सांगितले व त्याकरीता एक तास वेळ देण्यात आली. त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिलेल्या माहितीची तपासणी केली व त्यात त्यांच्या दोन अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही असे निदर्शनास आणल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु विहित मुदतीत योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात नियमानुसार माहितीची पूर्ती करुन द्यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी करावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १४०२/अम/२००९

१)श्री निवृत्ती तुळशिराम कुळसंगे,
पोलीस मुख्यालय वसाहत, क्वार्टर नंबर ६२, यवतमाळ,
ता.जिल्हा यवतमाळ. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ. जि. यवतमाळ. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ. जि. यवतमाळ. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी यांनी मुदत मागितली आहे. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"दिनांक ६.२.०८ रोजी N.C.No. २३७/०८ क.४१७/५०६ संबंधी N.C. पोच व स्टेशनडायरी नक्कल उतारा (२) दिनांक ४.३.२००८ रोजीची N.C.No. २३७/०८ क ४१७/५०६ भादंवि संदर्भात पोलीस अभिलेख्यावरील रजिस्टरमध्ये नोंदविलेली N.C. (३) N.C.No. २३७/०८ क. ४१७/५०६ IPL संदर्भात चौकशीकामी कोर्टाची परवानगी घेतली होती काय. घेतली असल्यास कोर्टाची आदेश प्रत मिळणेस विनंती. परवानगी न घेत असल्यास तसे स्पष्ट नमूद करावे. (४) दोषारोप पत्रासंबंधी वरिष्ठांकडील त्रुटीची पुर्ततेची प्रत (५) दोषारोपपत्र दाखल करण्यासंबंधी वरिष्ठांचे लेखीपत्र (६) पो.स्टे. वणी३३३१/०८ दिनांक ६.१०.०८ चा वरिष्ठांकडे पाठविलेला प्रगती अहवाल. आरोपपत्र दाखल करण्यासंबंधी शासनाची आदेश प्रत. परवानगी घेतली नसल्यास तसे नमूद करावे. (८) दोषारोप पत्रामध्ये ३६६/५०६ समाविष्ठ केले तर त्याबाबतचा वरिष्ठांचा लेखी अहवाल (९) फिर्यादीचा जबानी रिपोर्ट दिनांक २२.३.३००८ रोजीचा (१०) अब्दुल हफीज अ. सत्तार शेख रा. मोमीनपुरा, वणी हयांचेवर पो.स्टे.वणी येथे किती गुन्हे नोंद आहे. (११) मा. एस.डी.पी.ओ.वणी हयांचेकडील P.E. संबंधी कागदपत्रे व वरिष्ठांला पाठविलेला प्राथमिक चौकशी अहवाल (१२) सौ. अनुसाया आनंदराव मडावी रा. चिखलगांव हिने तिची गाय मधुकर जिवतोडे हयाने आगुटून ठेवली त्याबाबत पो.स्टे.ला दिलेला रिपोर्ट मिळण्याबाबत."**

**सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना त्यांना माहिती कशा प्रकारे उपलब्ध करुन दिली नाही याबाबतचे विश्लेषण केले. परंतु आज जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर नसल्यामुळे व कोणत्याही प्रकारचे कागदपत्र त्यांना दाखल केलेले नसल्यामुळे व अपीलकर्ता यांच्या म्हणण्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतची कागदपत्रे व खुलासा दिनांक ६.४.२०१० रोजी आयोगापुढे सादर करावा. व तसे न केल्यास जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५,०००/- ची शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी. उत्तरवादी यांना सदरची प्रत पाठविण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.१२२८/अम/२००९
अपील क्रं.१२२९/अम/२००९

१)श्री सतनामसिंग गुजराल,
गुरुद्वाराजवळ, मुर्तीजापूर
ता.मुर्तीजापूर, जिल्हा अकोला. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.१.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते.**

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०१० रोजी सुनावणीस मुदत मिळावी व दोन महिन्यानंतरची मुदत मिळावी असा अर्ज आयोगाकडे केला होता व त्यामुळे त्यांना दिनांक १८.३.२०१० ही सुनावणीची तारीख दिली होती. दिनांक २९.१.२०१० रोजी उत्तरवादी हजर होते व त्यांचे म्हणणे ऐकुन घेतले होते. अपीलकर्ता यांना दिनांक ५.२.२०१० रोजी आयोगाचे कार्यालयातून सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती परंतु ते आजही हजर झाले नाही व त्यांनी मुदतीचा अर्ज सादर केला नाही.**

**२. अपील क्रमांक १२२८/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती स्वतः घेणार असे नमूद केले आहे.**

**"Xerox copy of identy card of Gulabbaba Hamal Majoor Sanstha Akot working in District Government godown i.e. Akot Murtizapur Balapur Akot Barshitakali and Telhara २२ March ०६ to ३१st December, २००७. List of Hamal labours who are members of Gulabbaba Hamal Majoor Sanstha Akot engaged in government godown Akola, Balapur Telhara, Murtizapur Barshitakali and Akot with Xerox copy of identity card certified by D.D.R.Co-operative Society Akola engaged in loading, unloading grain in above godowns."अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु मुद्दा क्रमांक ३ ची माहिती प्राप्त होताच पुरविली जाईल असे कळविलेले दिसून येते व त्याबाबत अपीलकर्ता यांनी पोच सुध्दा दिलेली आहे. परंतु उर्वरित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.११.२००८ रोजी देण्यात आला असून, अपील मंजूर करण्यात येत असून माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मागणी केलेली माहिती विनामुल्य पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २.४.२००८ रोजी पाच पृष्ठांमध्ये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व द्वितीय अपील मेमोमध्ये प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे कारण दिलेले आहे.**

**अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमो मध्ये सहाय्यक लेखा अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे विलंब झाला व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे अर्जदाराच्या अर्जावरील माहितीचा बोध होत नसल्यामुळे माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असा खुलासा केलेला आहे. परंतु, अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२००८ रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती ही निश्चितच विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना ज्या लेखा अधिका-यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली त्यांना अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे आवश्यक झाले आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

**३. अपील क्रमांक १२२९/अम/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"Xerox copies of power of additional collector Akola while awarding contract of loading unloading grain in govt. godwon in Akola from March २३ to ३१ March, २००८."**

**सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.१.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये दिनांक ३.५.२००८ रोजी खुलासा दिला होता, तरी सुध्दा सहाय्यक लेखा अधिकारी, अकोला यांना त्याबाबतचा आदेश दिलेला होता असे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, अर्जदारास दिनांक ३.६.२००८ ला माहिती दाखविली व ती देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.११.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिल्यानंतर दिनांक ३.१२.२००८ ला माहिती दिली, असा खुलासा केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी त्यांच्या अपील मेमोमध्ये दिलेले असल्यामुळे सहाय्यक लेखा अधिकारी, अकोला हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १२२८/अम/२००९ व अपील क्रमांक १२२९/अम/२००९ हे मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे सहाय्यक लेखा अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई जिल्हाधिकारी, अकोला यांनी करावयाची असल्यामुळे** निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ९२/नाग/२००९

१)श्री उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
सावनेर वार्ड क्रं.१७, ता.सावनेर, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक) यांचेकडे, सारस्वत पब्लीक स्कुल सावनेर (नर्सरी ते १२वी) यांच्या शाळा इमारत सुरक्षेबाबतच्या अहवालाची प्रत, नॅशनल बिल्डींग कोड नुसार इमारत बांधकामाचे प्रमाणपत्र व संबंधीत सर्व विभाग अभियंत्यांकडून प्राप्त तपासणी प्रमाणपत्राची माहिती मिळणेबाबत, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती ही शाळा स्तरावरील असल्यामुळे शाळेकडून मागण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी आज हजर झाले व त्यांनी असे सांगितले की, सदरची शाळा विना अनुदानित असून शाळा इमारत सुरक्षेच्या संदर्भातील संपूर्ण माहिती संस्थेकडे असते व ती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविले आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी सदरची माहिती संस्थेकडून मागणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ९०/नाग/२००९

१)श्री मुर्लीधर हरबाजी गायकवाड,
मु.पो.शिवणी, ता.सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक,
उत्तर चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक,
उपवनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर.
ता.जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक यांचकडे, वनपरिक्षेत्र अधिकारी पळसगांव वनपरिक्षेत्र यांचे हलचल(दैनंदिनी)रजिस्टर व दौरा भत्ता बिलाची व उचल केलेल्या रकमेची चौकशी बाबत. श्री आर.एम.अग्रवाल परिक्षेत्र अधिकारी पळसगांव यांचे संदर्भात एकुण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.११.२००९ रोजी वनपरिक्षेत्र अधिकरी पळसगांव यांची माहिती अधिकारी अशी नियुक्ती असल्यामुळे व माहिती वन परिक्षेत्राधिकारी, पळसगांव यांचे कार्यालयातील असल्यामुळे त्यांचेकडे अर्ज करावा असे त्यांचेकडे सहपत्रित करण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.१२.२००९ रोजी सहाय्यक वनसंरक्षक, चंद्रपूर वन विभाग यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी दाखल केलेले अर्ज व अपील यावर कोणत्याही प्रकारे योग्यरित्या तारीख घातलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता हे याबाबत गंभिर आहे असे दिसून येत नाही. मात्र सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध करुन दिली आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी ज्या कार्यालयात माहिती उपलब्ध आहे त्या कार्यालयात माहिती मागणे आवश्यक असते व तशी ती न मागता त्यांनी वरिष्ठ कार्यालयात माहिती मागितली आहे.**

**या संपूर्ण प्रक्रियेत अपीलकर्ता यांना दिनांक ७.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध झालेली दिसून येत असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २०६/नाग/२०१०
अपील क्रं. २०७/नाग/२०१०
अपील क्रं. २०८/नाग/२०१०
अपील क्रं. २०९/नाग/२०१०

१)श्री आनंद रामभाऊ चिमुरकर,
भानापेठ वार्ड नं.२, पोलीस लाईन जवळ, चंद्रपूर,
ता.जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर
ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,
(विकास आस्थापना शाखा)विभागीय आयुक्त कार्यालय,
नागपूर, ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

अपील क्रं. २०७/नाग/२०१०, अपील क्रं. २०८/नाग/२०१०
अपील क्रं. २०९/नाग/२०१०

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य),
जिल्हा परिषद चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलांची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी वरील सर्व अपीलांमध्ये अनुक्रमे दिनांक २६.१०.२००९, १८.११.२००९, ७.३.२००९, ४.५.२००९ व ५.११.२००९ रोजी मा.विभागीय आयुक्त यांचेकडे दिनांक २५.३.२००९ रोजी दिलेल्या अर्जाचे संदर्भात मा. विभागीय आयुक्त कार्यालय व माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे तसेच श्री माणिक वानखेडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या सर्व अर्जाचे संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक ९.१.२००९, १५.१२.२००९, ३.६.२००९ तसेच १.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. या सर्व अर्जाच्या संदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी अनुक्रमे २६.११.२००९, २६.१२.२००९, ११.६.२००९, ७.१२.२००९ रोजी प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. प्रथम अपीलांचा निर्णय हा दिनांक १७.१२.२००९, १८.१.२०१०, १८.१.२०१० व १८.१.२०१० रोजी देण्यात आला असून उर्वरित माहिती अपीलकर्ता यांना आवश्यक ती फी भरुन उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.**

**३. या सर्व अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की, त्यांना आतापर्यंत जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती अपूर्ण आहे व त्यांनी जो तक्रार अर्ज केलेला होता त्या तक्रार अर्जातील सर्व मुद्यांची माहिती दिलेली नाही. व श्री माणिक वानखेडे यांचे विरुध्द कारवाई करण्यासाठी तक्रार केली होती ती कारवाई केलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**"श्री आनंद रामभाऊ चिमुरकर हे मा.मु.का.अ. जि.प. चंद्रपूर यांचे नियुक्ती आदेश क्रमांक साप्रवि/स्था/३३६७/१९८१ दिनांक २०.११.१९८१ नुसार कनिष्ठ सहायक म्हणून प्रथम नियुक्ती जि.प. हायस्कुल गुंजेवाही येथे केल्यानुसार ते दिनांक २५.११.१९८१ ला नियुक्ती स्थळी रुजू झाले.**

**श्री आनंद रामभाऊ चिमुरकर हे पंचायत विभागात कार्यरत असताना त्यांचेवर पोलीस स्टेशन चंद्रपूर येथे (१) अपराध क्रमांक ३०६४/२०००, कलम २९४, ५०९, ५०६ भा.दं.वि.चा दिनांक २५.९.२००० ला व (२) अपराध क्रमांक १८६/२००० कलम ३५४, २९४, ३२३ भा.दं.वि.चा दिनांक २६.९.२००० ला गुन्हा दाखल झाला होता. त्यादरम्यान प्रशासन त्यांना अडचणीत आणेल म्हणून त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करावी असे अर्जात स्पष्ट नमुद करुन स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करण्यास्तव अर्ज केला. स्वेच्छा निवृत्ती मंजूरीस्तव उप**

मु.का.अ.(सा), यांचे समक्ष उपस्थित राहण्यास श्री आनंद रामभाऊ चिमुरकर, क.सहा. हयांना दिनांक १६.३.२००८, १८.३.२००८, १९.३.२००२ व २६.३.२००२ अन्वये कळविण्यात आले होते. परंतु वारंवार कळवून सुध्दा ते उपस्थित न झाल्याने त्यांना शेवटी एक संधी दिनांक १.४.२००२ रोजी देण्यात आली. परंतु ते उपस्थित न झाल्याने त्यांना त्यांचे स्वेच्छा नोटीसाच्या अनुषंगाने दिनांक ३०.४.२००२ पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यात आले.

त्याच दरम्यान त्यांचे विरुध्द दाखल झालेल्या फौजदारी गुन्हयात अनुक्रमे (१) अपराध क्रमांक ३०६४/२००० मधील दिनांक २२.५.२००२ ला कलम २९४ भा.दं.वि.मध्ये १ महिना साधी सजा व दंड रुपये २०००/- दंड न भरल्यास १० दिवस साधी सजा, कलम ५०९ भा.दं.वि. मध्ये एक महिना साधी सजा व दंड रुपये २०००/- न भरल्यास १५दिवस साधी सजा, कलम ५०६ भा.दं.वि. मध्ये निर्दोष व (२) अपराध क्रमांक १८६/२००० च्या गुन्हयात कलम ३५४, २९४, ३२३ भा.दं.वि.मध्ये दिनांक १०.३.२००३ ला सहा महिने साधी सजा व दंड रुपये १०००/- दंड न भरल्यास दिड महिना साधी सजा अशा प्रकारची सजा झालेली आहे. ती त्यांनी उपभोगलेली आहे.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर यांची दिनांक ३०.४.२००२ पासून स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर केल्यामुळे, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम १९८२ मधील कलम २६ मधील तरतुदीनुसार कर्मचा-यांच्या चांगल्या वर्तणुकीवर त्यांना निवृत्ती वेतन मंजूरी संबंधात व निवृत्ती उपरान्त सर्वदेय अनुज्ञेय रक्कमांचे विवरण संबंधी आवश्यक कागदपत्रे व फार्म भरुन देण्याविषयी कार्यालयीन पत्र दिनांक २.९.२००९, १२.२.०२, ४.२.२००३, २८.५.२००३, ३१.७.२००३, १३.२.२००४, १५.१०.२००४, १६.३.२००५, ३०.११.२००५ व दिनांक ७.२.२००६ अन्वये निर्देश देण्यात आलेले होते. त्यांनी कोणत्याही प्रकारची आवश्यक दस्तऐवज वेळेवर सादर न केल्यामुळे त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण प्रलंबीत राहीले यास स्ततः श्री आनंद रामभाऊ चिमुरकर हे सर्वस्वी जबाबदार ठरतात. या उपरान्त त्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन दोनवेळा मंजूर करण्यात आले. आता त्यांना निवृत्ती वेतन मंजूर करुन दिलेले आहे व ते सध्या नियमित स्वेच्छा निवृत्तीवेतन घेत आहेत.

श्री आनंद रामभाऊ चिमुरकर यांची दिनांक ३०.४.२००२ पासून स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर केल्यानंतर सुध्दा ते आजतागायत जि.प.च्या सेवेत आहेत अशा प्रकारचे गैरवर्तन करीत असून ते सकाळी १० वाजता येतात व ५.४५ वाजता परत घरी जातात हा त्यांचा नित्यक्रम सध्या सुरु असून प्रशासनास कशा प्रकारे अडचणीत आणता येईल या दृष्टीकोनातून शासनस्तरावर व जि.प. स्तरावर माहितीच्या अधिकारात अनावश्यक पत्रव्यवहार करीत राहतात व माहिती मागत असतात. याबाबत सुध्दा शासनाने अहवालाची मागणी केल्याप्रमाणे शासनास सुध्दा अहवाल सादर केला आहे. शासनाने त्यांचे पत्र क्रमांक सेनिव/४२०५/१६४९/सी.आर.१५६/आस्था-११ दिनांक १९.८.२००६ नुसार श्री आनंद रामभाऊ चिमुरकर क.स. यांची स्वेच्छा सेवा निवृत्तीची जिल्हा परिषदेने केलेली कार्यवाही नियमानुसार असल्याचे कळविलेले असून संबंधितांना सुध्दा शासनाने कळविलेले आहे."

यावरुन अपीलकर्ता हे जी माहिती मागत आहे त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित नाही. त्यांनी स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतलेली आहे ती तीन महिन्याच्या आंत परत घेतलेली नसल्यामुळे अंतिमतः ती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्य केलेली आहे. त्याबाबत सुध्दा त्यांनी अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या. शासनाकडून सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असे कळविले आहे. परंतु, तरी सुध्दा अशा प्रकारच्या तक्रारी करुन ते प्रशासनास वेठीस धरत आहे असे आयोगाचे निदर्शनास आले आहे. व त्यामुळे सदरची चारही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

आदेश

१) **अपीलकर्ता यांचे** अपील क्रं. २०६/नाग/२०१०, अपील क्रं. २०७/नाग/२०१०, अपील क्रं. २०८/नाग/२०१०, अपील क्रं. २०९/नाग/२०१० **खारीज करण्यात येत आहेत.**

२) **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १००/नाग/२०१०

१)श्री चंद्रकांत सदाशिव तायडे, ॲडव्होकेट,
१/३७१, आशिष अपार्टमेंट, नार्थ अंबाझरी रोड, गांधीबाग,
नागपूर. ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त-१,
महानगर पालिका, नागपूर. ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त/झोनल अधिकारी,
धरमपेठ झोन क्रमांक-२, महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"Contemplated action as to Nagpur-४४००१० NMC Acts, regulation and norms fixed and their violation. What rectification clauses are applied to regularise the unlawful construction, if happened, Is it by penalizing or compounding it if warranted in the said exigency please apprise me of the information as to provisions. Matter relates to notice dated २१.४.२००९(NMC Dharampeth Zone no.२) used by Deputy Zonal Officer together with Asstt Commissioner, wherein, it is alleged to have noticed unauthorized construction/Enclose Balconies pertaining to Ashish Apartment Gandhinagar, Nagpur, enumerating total affected area ८.७९ +६.७०+४५.२३=६०.७२ m२. The said Apartment was built in the years between १९८६-१९८७ by the builders Smt. Hemlata Shukla, Shri Ashish Shukla & Anup Shukla, who are resident of New Delhi and after completion of the said construction they are not the owners of the Apartment at present/also previously. Now the entire apartment is in occupation of Flat Owners indicated in the notice and thus, needs individual notices in favour of the defaulters under law provision. Hence meticulous inspection of parking as also, the unauthorized constructions is needed. Recently NMC Officials team visited but of no avail. Therefore, you are requested to peruse the enclosed documents once again to initiate appropriate action, please (R.T.I.Act, २००५) and furnish the requisite information early personally."**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.१२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती दिनांक ५.११.२००९ ला दिलेली असल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती अपूर्ण आहे. त्यांनी जे अर्ज दिनांक १३.७.२००९ व ८.९.२००९ रोजी केलेले होते त्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे मत व्यक्त केले नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या आशिष अपार्टमेंटमध्ये अनधिकृत बांधकाम आहे. त्या बांधकामाच्या संदर्भात संबंधितांना एम.आर.टी.पी.ॲक्ट प्रमाणे नोटीस दिलेल्या आहेत. व ते विशिष्ट कालावधीत काढून टाकलेले नसल्यास ते अतिक्रमण विभागाला काढून टाकता येते अशा प्रकारची माहिती त्यांना दिली. यावरुन त्यांना कार्यवाहीची माहिती देण्यात आलेली आहे व त्यामुळेच त्यांनी अनेक अर्ज करुन अभिप्रायाची अपेक्षा केली आहे.**

**परंतु, अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षीत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(च) मध्ये अभिप्राय असा जो उल्लेख आहे तो नस्तीमध्ये अभिप्रायाची प्रत असत्यास ती उपलब्ध करुन देणे असा होतो व त्यामुळे अपीलकर्ता यांची अभिप्रायाची विनंती मान्य करता येत नाही. व जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)	अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १०१/नाग/२००९

१)श्री संतोष तुळशिरामजी लोलुसरे,
८७, शेषनगर, मनिष ले आऊट, खरबी रोड, नागपूर.
ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.मुख्य अभियंता(विद्युत)
सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकिय इमारत, ३रा मजला,
सा.बां.परिसर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबुर(पूर्व), मुंबई. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहा.अधीक्षक अभियंता,
प्रादेशिक(विद्युत)मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग,
बंगला क्रं. ३९/१, सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रारंभीक वेतनावर व कायम स्वरुपी पदावनतीचे संदर्भात- १.४.८० ते १.४.२००० पर्यंत. कार्या.आदेश क्रं.२६४ दिनांक २३.३.९० ची प्रत.(२) माझेवरील आरोपाची प्रत वगैरे..एकुण १५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना एकुण ५ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २७.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३१.१२.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना त्यांना मुद्दा क्रमांक ५ ची माहिती मिळाली. परंतु उर्वरित माहिती मिळाली नाही असे त्यांनी मान्य केले आहे. परंतु इतर मुद्यांचे अवलोकन केले असता त्यांनी प्रश्नांच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले आहे व ते अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. परंतु, त्या संदर्भात जर कागदपत्र उपलब्ध असतील तर ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे सेवानिवृत्त होऊन १०-१५ वर्षे झालेले आहे व त्यापूर्वीची ती माहिती आता**

**उपलब्ध असतेच असे नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येणार नाही. व तसेही अपीलकर्ता यांनी अभिमत विचारलेले असल्यामुळे व ते जन माहिती अधिकारी यांनी देणे अपेक्षित नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २१०/नाग/२००९

**१)** सौ.निर्मला आनंद चिमूरकर,
C/o श्री आनंद रामभाऊ चिमूरकर, भानापेठ वार्ड नं.२,
पोलीस लाईन जवळ, चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २०.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. परंतु सदरच्या अपीलांमध्ये श्री आनंद रामभाऊ चिमूरकर यांनी माहितीचा अर्ज व प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा श्री आनंद रामभाऊ चिमूरकर यांना दिलेला आहे. परंतु राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील हे सौ.निर्मला आनंद चिमूरकर यांनी दाखल केलेले आहे. व ते अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १०९/नाग/२०१०

१)श्री माधव केशवराव जिवतोडे,
मु.वडेगांव, पो. गुळगांव, ता.भद्रावती, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी,
(मुख्यालय व नियोजन)उत्तर चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर,
सिव्हील लाईन्स, चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,
उत्तर चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, उत्तर चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"दिनांक ९.५.२००५ सहभागी वन व्यवस्थापन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन होते. त्या अनुषंगाने मा. वनसंरक्षक उत्तर चंद्रपूर वनवृत्त यांनी वन समित्यांचे मुल्यांकन करुन त्यांना फायदे देण्यासाठी सहाय्यक वनसंरक्षक (उत्तर चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर) चंद्रपूर वनविभाग चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली मुल्यांकन समिती गठीत केलेली होती. या गठीत केलेल्या समितीने चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर या विभागातील वनसंरक्षक यांनी मुल्यांकन अहवाल आपणास सादर केलेला आहे. तो अहवाल मला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम ०४ मला पाहाण्यासाठी देण्यात यावा."**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.७.२००९ रोजी, आपणास दिनांक १.८.२००९ रोजी कार्यालयीन वेळेत माहिती पाहाण्यासाठी देण्यांत येईल, असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दिनांक ५.८.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी यांनी अर्जदार श्री माधव केशवराव जिवतोडे यांना माहिती पाहाण्यासाठी उपस्थित राहाण्याविषयी दिनांक १.८.२००९ रोजी बोलाविले होते व ते उपस्थित झाले होते. परंतु सदर माहिती श्री डी.बी. मारबते, मुख्य लेखापाल व सौ. लाकडे, लेखापाल, योजना कक्ष यांनी अर्जदारास माहिती पाहाण्यासाठी उपलब्ध करुन दिली नसल्याचे खालील हस्ताक्षरकर्ता यांचे निदर्शनास आले आहे. तरी निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर वन वृत्त, चंद्रपूर यांचेकडे अपील करता येईल असे कळविले. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.**

**४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु, त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**५. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी अहवालाची पाहाणी करण्यास मागितली होती. परंतु त्यांना दिवसभर बसवून ठेवण्यात आले व संध्याकाळपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे त्यांना त्याच गावी मुक्काम करावा लागला. व दूस-या दिवशी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही. मात्र दिनांक २०.३.२०१० रोजी आयोगाची नोटीस मिळाल्यानंतर त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.**

**६. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यानी श्री डी.बी. मारबते, मुख्यलेखापाल व सौ. लाकडे, लेखापाल यांना, अपीलकर्ता यांना निरीक्षणासाठी माहिती द्यावी असे आदेश दिले होते. वास्तविक, अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असते व मुख्य लेखापाल किंवा लेखापाल यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल तर त्यांचे विरुध्द प्रशासकिय कारवाई करणे आवश्यक होते, परंतु ती सुध्दा करण्यात आलेली दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रकरण गंभिरपणे घेतलेले नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास संपूर्ण कार्यालय टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.**

**७. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १९.३.२०१० रोजी श्री डी.बी. मारबते, मुख्यलेखापाल व सौ. लाकडे, लेखापाल यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे. परंतु ही सर्व कार्यवाही त्यांनी आयोगाची नोटीस मिळाल्यानंतर केलेली असल्याचे दिसून येते. व यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच मुख्यलेखापाल व लेखापाल हे माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शास्तीची कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच मुख्यलेखापाल व लेखापाल यांना अधिनियमाचे कलम ५(४)(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येत असून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कारवाई ही वनसंरक्षक यांनी करावयाची आहे. त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे, पोस्टाने मुख्य वनसंरक्षक, उत्तर वनवृत्त, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११३/नाग/२०१०

१)श्रीमती ठगाबाई भोलाराम चौरागडे,
मु.गौरीटोला पो. तिल्ली, ता.गोरेगांव, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, गोरेगांव, ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,
विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, तिल्ली,
ता. गोरेगांव, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २२.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था यांचेकडे, (१)कर्ज माफी झालेल्या सर्व शेतक-यांची खतावणी रजिस्टरची नक्कल. (२) कर्ज माफी झालेल्या सर्व शेतक-यांची यादी अशा प्रकारे माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे, असे नमूद केले आहे.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.९.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे व खतावणी रजिस्टरची नक्कल देण्यात आलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्याकरीता दिनांक १६.९.२००९ रोजी सहाय्यक निबंधक यांनी आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर दिनांक १४.१२.२००९ रोजी अध्यक्ष/सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था यांनी अपीलकर्ता यांना कर्ज माफी यादी देत आहे असे पत्र दिलेले दिसून येते. माहितीच्या अधिकारा अंतर्गत जी माहिती आपण मागीतलेली आहे ती माहिती आपणास देणे शक्य नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार आर्थिक बाबी विषयी ज्या व्यक्तीची माहिती आहे, अशीच माहिती त्या सभासदास देता येते. उर्वरित बाकी सभासदांची आर्थिक हितसंबंध येत असल्याने इतर सभासदांची खतावणीची नक्कल आपणास देता येणे शक्य नाही. तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था हयांना माहितीचा अधिकार राज्य माहिती आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचिका क्रमांक ५६६६/२००७ दिनांक ८.२.२००९ मध्ये निर्णय दिला असल्याने लागू होत नाही. करिता आपणास वरील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देत आहोत, असे कळविलेले दिसून येते. सहाय्यक निबंधक यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.१.२०१० रोजी दिलेला असून, संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपील फेटाळण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, ते अल्पभूधारक असून दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक असल्यामुळे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर संस्थेचे सचिव यांनी असे सांगितले की, सदरची खतावणीची माहिती ही ५००-६०० शेतक-यांची माहिती आहे व ती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास खर्च येईल. व संस्थेकडे खर्चाची तरतूद नाही. तसेच सदरचा अधिनियम हा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेस लागू होत नसल्यामुळे माहिती देण्याची आवश्यकता नाही. परंतु, अपीलकर्ता हे संस्थेचे सदस्य असल्यामुळे त्यांना त्यांची स्वतःची संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे.**

**५.मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी श्री गजानन वानखेडे विरुध्द डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बँक लि. अमरावती, अपील क्रमांक ५४४/२००७, याचिका क्रमांक ५६६६/२००७ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नागरी सहकारी बँकेस व सहकारी संस्थांना लागू होत नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२२/नाग/२०१०

१)श्री सुरेश वारलू जांभूळे,
मु.राळेगांव, पो. चारगांव बु.
ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुर्नवसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी, चंद्रपूर कार्यालय यांचेकडे, प्रकल्प ग्रस्तांविषयी माहिती मिळण्याबाबत (१) घनश्याम नामदेव घुगल वर्ग ३ तलाठी, मु.पो.वडधा, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. (२) रामअवतार भाऊराव लोनकर, मु. नगिनाबाग वार्ड क्रं.१ चोकामेडा वसतीगृह चंद्रपूर (३) कु. शुभांगी केशव डाहुले, मु.वरोरा, ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर (४) श्री महेश विठ्ठल लोनकर, मु. सुमठाना, ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर यांच्या बाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.५.२००९ रोजी मुद्येनिहाय पाच मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु श्री घनश्याम घुगल यांच्या बद्दलची माहितीची नस्ती उपलब्ध नसल्यामुळे देता येणार नाही व नस्ती उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीकडून मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भातील उर्वरित प्रकरणाचा तात्काळ शोध घेवून उपलब्ध असलेली माहिती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आंत पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. त्याप्रमाणे दिनांक ५.१०.२००९ रोजी जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांनी एकुण २२ प्रकरणांचा शोध घेतला असता प्रकरण दिसून आले नाही. सध्या निवडणुकीचे काम सुरु आहे. प्रकरण मिळताच माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना वेळोवेळी म्हणजे दिनांक ३०.५.२००९ रोजी दोन पत्रांच्या माध्यमातून पत्र क्रमांक ४२८ व ४२९, तसेच दिनांक २५.६.२००९ रोजी पत्र क्रमांक ४४२ व ४४३ अन्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु श्री घनश्याम घुगल यांचेबाबतचे प्रकरण १५ वर्षापुर्वीचे असल्यामुळे व त्या प्रकरणाचा कसून शोध घेवून सुध्दा ते मिळून येत नाही. त्यानंतर दिनांक ९.७.२००९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना त्याबाबत कळविलेले आहे.**

**यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व प्रत्येक वेळेस कसून शोध घेतलेला आहे व अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविलेले आहे हे दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तरी सुध्दा पुन्हा एक वेळ प्रकरणाचा शोध घेवून माहिती उपलब्ध झाल्यास माहिती देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत प्रकरणाचा शोध घेवून माहिती उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य पुरविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२४/नाग/२०१०

१)श्री सय्यद हाजीअली करीमअली,
बिनबा गेटचे मागे, सोनटक्के ले आऊट, चंद्रपूर.
ता.जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी,
नगर परिषद चंद्रपूर. ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार,
नगर परिषद कार्यालय चंद्रपूर.ता.जि.चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी बांधकाम विभाग, नगर रचना, नगर परिषद चंद्रपूर यांचेकडे (१) मे. मुख्य अधिकारी न.प. चंद्रपूर यांनी चान्दा शिक्षण मंडळ चंद्रपूर यांना वाढीव व सुधारित बांधकाम मंजूरी प्रारंभ प्रमाणपत्र क्रं.चं.न.प./नर/बां.पर/१४१/०८ दिनांक ९.९.२००८ देतांना मूळ बांधकाम बद्दल घातलेली अट क्रं. ३४ प्रमाणेचे नोटीसप्रमाणे संबंधीतावर केलेल्या कार्यवाहीबद्दल तपशिलवार व साधार माहिती मिळणे. (२) उक्त परवानगी प्रारंभ प्रमाणपत्रातील अट क्रं. २१ प्रमाणे संबंधीताने अनुपालन केले असल्यास त्याबाबतची व त्यावर नगर परिषदेकडून पुढील बांधकामास दिलेल्या मंजूरीचे आदेश, कागदपत्रे इ. बाबत तपशिलासह माहिती. (३) अर्जदार छोटी मस्जीद ट्रस्ट वक्फ कमेटी, चंद्रपूर कडून दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी सादर केलेल्या अर्जानुसार जनता कॅालेजचे अनाधिकृत इमारत बांधकामाविरुध्द केलेल्या कार्यवाहीबद्दल तपशिलवार माहिती. (४) उक्तप्रमाणेच संस्था वक्फ कमेटीद्वारे दिनांक २९.५.२००९ रोजी सादर केलेल्या अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची तपशिलवार माहिती (अवैध बांधकामाविरुध्द कार्यवाही) (५) उक्त वक्फ ट्रस्ट संस्था अध्यक्ष यांनी दिनांक १० ऑगष्ट, २००९ चे निवेदनावर मा. जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रं.कार्या-१०/न.पा./टे-१/२००९/९६५ दिनांक १८.८.२००९ अनुसार मौ. चान्दा रै. येथील स.नं.२/१ ते २/५ मधील लेआऊट व इतर अनाधिकृत बांधकामाबद्दल त्यांचे विरुध्द किंवा केलेल्या कार्यवाहीबाबतची तपशिलवार माहिती-प्लॅाट इमारत निहाय स्वतंत्र माहिती देणे., अशी माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुन करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलार्थीकडून केलेल्या युक्तीवादावरुन त्यांना कार्यवाहीची अपेक्षा आहे. परंतु अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे ते अपेक्षित नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात किंवा नगर पालिकेने काढलेल्या कारणे दाखवा नोटीसचे संदर्भात नगर परिषदेने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही अशी माहिती उपलब्ध करुन देतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल कार्यवाहीच्या संदर्भात घेतलेली नाही व माहितीच्या अधिकारात अपील खारीज केलेली आहे. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो माहितीच्या अधिकारात योग्य आहे. परंतु कोणत्याही प्रकरणात कार्यवाही होत नसेल तर प्रशासनाचे प्रमुख म्हणून मुख्याधिकारी यांनी संबंधीत अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे पुढील कार्यवाही करणे ही सर्वसामान्याची अपेक्षा असते. परंतु प्रमुख म्हणून सुध्दा कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन यांचेकडे नगर परिषद किंवा नगर रचना या कायादयान्वये तक्रार करणे आवश्यक राहील. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२५/नाग/२०१०

१)श्री श्रावण डोमाजी सायरे,
मु.पो.नगरधन, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी, आयुक्त कार्यालय,नागपूर.
ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.
ता.जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी (१) दिनांक १०.७.२००९ च्या माहिती अधिकारा अंतर्गत मागितलेल्या माहिती नुसार तलाठी यांनी केलेल्या चौकशीनुसार दिनांक ४.८.२००९ मिळालेल्या माहिती नुसार श्री राघेरा देवाराव अंबिरवार व इतर ३ यांनी स.नं. ९५८ ०.२७ हे.आर. ९७८ ०.६ हे.आर याची अंदाजे ५ ते ६ वर्षापासून वहिवाट आली ती वहिवाट कोणत्या गटात मोडते. (२) ५ ते ६ वर्षाची वहिवाट दर्शविण्यात आली ही माहिती अर्जदार गैरअर्जदार व सभोवतालचे शेतक-याकडून घेण्यात आली आहे का (३) तलाठी यांनी स.न. ९५८ ०.२७ हे.आर ९७८ ०.६ हे.आर या शेतीची चौकशी करते वेळी मोक्यावर अर्जदार गैरअर्जदार व शेतकरी यांचे उपस्थितीत चौकशी करण्यात आली का. अशी माहिती टपालाने (स्पीड पोस्टने) घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.२.२०१० रोजी देण्यात आला असून आपण सदर माहिती मिळण्यासंबंधाने जिल्हाधिकारी नागपूर अधिनस्त कोणत्या माहिती अधिका-यांकडे अर्ज केलेला आहे याबाबत पुरावा जोडलेला नाही. त्यामुळे सदर माहिती अधिकारी यांचे आदेश/कार्यवाहीसंबंधी कोणते नियुक्त अपीलीय अधिकारी आहेत याचा बोध होत नाही. संबंधीत माहिती अधिकारी यांचे आदेश/माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यास नियुक्त प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करण्याची आवश्यकता असल्याने आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये या कार्यालयास केलेले प्रथम अपील स्विकार्य नसल्याने फेटाळण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान**
**न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे वकील श्री ए.जी. करमारे यांनी युक्तीवाद करताना असे सांगीतले की, मोक्यावर चौकशी केल्यावर जो कब्जा दाखविण्यात आला आहे तो कोणत्या आधारावर दाखविण्यात आला आहे, याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाही.जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयातून तहसिलदार, रामटेक यांचेकडे दिनांक २१.१२.२००९ रोजी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता आदेश दिले होते. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली त्यामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ३१.७.२००९ रोजी तसेच दिनांक १०.७.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली होती. परंतु आता अपीलकर्ता यांनी ताबा वहिवाट कोणत्या गटात मोडते अशी माहिती विचारलेली आहे. परंतु ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येत नाही. त्यावर माहिती प्राप्त झाली होती. उपलब्ध करुन देता येत नाही याचा अर्थ जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे माहिती प्राप्त झाली होती. परंतु अपीलकर्ता यांना कां देण्यात आली नाही याबाबत ते कारण सांगू शकले नाही. सदरची माहिती पुरविण्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या कर्मचा-यांचे सहाय्य घेतले होते याबाबतची माहिती सुध्दा त्यांनी सांगितली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व जन माहिती अधिकारी यांना रुपये १०००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१२.२००९ च्या अर्जाप्रमाणे विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२)अपीलकर्ता यांच्या दिनांक १६.१२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा त्यांनी ज्यांचे सहाय्य माहिती पुरविण्याकरीता घेतले असेल असे अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात. शास्ती करण्याकरीता जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की माहिती प्राप्त झाली होती परंतु ती पुरविण्यात आली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/-(रुपये एक हजार फक्त) शास्ती**

**लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**३)सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे, पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**४)अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ११४/नाग/२०१०

१)श्री जयदेव नामदेव थुलकर,
मु.पो.नान्होरी, ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
रो.ह.यो.सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर.
ता.जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,
रो.ह.यो.सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रं.१, ब्रम्हपूरी,
ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ५ मार्च, २०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांचेकडे, मौजा नान्होरी येथे अर्थसाहयातील ग्रामीण पायाभूत विकास निधी योजना १३ अंतर्गत रो.ह.यो. सा.बां. चंद्रपूर उपविभाग क्रं.१ ब्रम्हपूरी यांचे कार्यालय नान्होरी रस्त्यावरील भूतीनाल्यावर आर.सी.डब्ल्यू. अंतर्गत केलेल्या बांधकामासंबंधी मोजमाप(एम.बी.)ची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत सन २००८ ते २००९. विषयांकित नमूद केलेल्या बांधकामाची मोजमाप पुस्तीकेची संपूर्ण प्रमाणित प्रत मिळावी. तसेच वरील बांधकामावर संपूर्ण खर्चाच्या प्रतीची प्रमाणित प्रत मिळावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अपीलकर्ता दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनाक २६.१०.२००९ रोजी दिला असून, माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी माहिती अधिकारी यांना आदेशित केले व त्याप्रमाणे दिनांक २९.१०.२००९ रोजी माहिती देण्यात आलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व माहिती उपलब्ध झाली नाही असे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, माहिती उपलब्ध झाली होती. परंतु ती दिशाभूल करणारी माहिती आहे व त्यात व्हाऊचर मिळाले नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.१०.२००९ रोजी पंजीबध्द डाकेने माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिल्यामुळे त्यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी व्हाऊचर मिळाले नाही असे सांगितल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेली माहिती तपासून सांगावे असे विचारले असता त्यांनी एम.बी.मध्येच त्याचा उल्लेख असल्यामुळे तेच व्हाऊचर समजण्यात यावे. त्यामुळे स्वतंत्रपणे माहिती दिली नाही असे सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध**
**झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १४/२०१०

१) श्री अरुण अमृत गवई,
रा.सी.पी.डब्ल्यू.डी. क्वार्टर नं.२७, टाईप-III(जूने)
सिव्हील लाईन्स, नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, अकोला. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक२३ ४.३.२०१० )

निर्णय

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ७४१/२००९ मधील दिनांक १.१०.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक १ व २ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.१२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५.१.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशा प्रकारचा खुलासा दिनांक १५.३.२०१० रोजी आयोगाकडे दाखल करण्यात आलेला आहे.**

**२. तक्रारदार यांनी सांगितले की, जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार यांना दिनांक २५.११.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, फेर फार कशाच्या आधारावर घेतले ही माहिती मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी झिंग्या डोंग्या गवई यांचे नांव कशा प्रकारे फेर फार मध्ये घेण्यात आले त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध असल्यास तलाठी यांना विचारुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.**

**३. वास्तविक, तक्रारदार यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तलाठी यांनी सुध्दा दिनांक ६.३.२०१० रोजी परस्पर सर्व मुद्यांवर तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तक्रारदार यांची कार्यवाही करुन मागण्याची अपेक्षा आहे. परंतु सदरचे प्रकरण हे राजस्व प्रकरण आहे व त्यामध्ये महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे त्यांनी अपील केल्यास त्यांना न्याय मिळू शकेल. व त्याप्रमाणे तक्रारदार यांनी सक्षम अधिकारी यांचेकडे अपील करणे योग्य राहील. फेर फारच्या संदर्भात तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ५.१२.२००९ च्या तक्रारीचे अर्जातील श्री झिंग्या डोंग्या गवई यांचे संदर्भातील फेर फार कशाच्या आधारावर घेण्यात आले याबाबतची कागदपत्रे उपलब्ध असतील तर पुरविण्यात यावी व नसल्यास तसे स्पष्टपणे अर्जदार यांना जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२६/नाग/२०१०

१)श्री धनपाल धाडुलाल धुवारे,
मु.पो. रतनारा, ता.जि. गोंदिया. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गोंदिया. जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, गोंदिया. ता.जि. गोंदिया. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय, गोंदिया यांचेकडे (१) रा.मा.क्रं.एम.आर.सी.८१/४५३/०५-०६ (२)रा.मा.क्रं.६८३/एन.ए.डी./३६/ ९२-९३. कालावधी ८.६.२००६ ते १५.१०.२००१. (३) रा.मा.क्रं.एम.आर.सी. ८१/४५३/०५-०६ दिनांक ८.६.२००६ ला पारीत झालेल्या आदेशाची पूर्ण फाईलची झेरॅाक्स प्रत मिळणेबाबत. (४) रा.मा.क्रं.६८३/एन.ए.पी.३६/९२-९३ दिनांक १५.१०.२००१ ला पारीत झालेल्या आदेशाची पूर्ण फाईलची झेरॅाक्स प्रत मिळणेबाबत. अशा प्रकारची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.१२.२००९ रोजी दिला असून मागणी केलेल्या माहितीबाबत अप्पर तहसिलदार अकृषिक तथा माहिती अधिकारी यांचेशी आपण स्वतः भेटून (संपर्क साधून) माहितीचे अवलोकन करावे व आपणास पाहिजे असलेली माहिती प्राप्त करावी असे कळविलेले दिसून येते. व निर्णय दिनांक २२.१२.२००९ रोजी दिलेला दिसून येतो. त्यामध्ये मुद्या क्रमांक १ चा प्रकरणाचा कालावधी दोन-तीन वर्षापुर्वीचा असून शोध घेणे किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्तुतकार दासगांव सर्कल यांचेकडून हलगर्जीपणा होत असल्याचे समजते. तरी प्रस्तुतकार दासगांव सर्कल यांना ताकिद देण्यात येते की, त्यांनी प्रकरणाचा कसून शोध घेवून माहिती सात दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा आपण माहितीचे कायदया अंतर्गत शास्तीस पात्र आहात असे समजण्यात येईल व तशी कार्यवाही करण्यात येईल. मुद्या क्रं. २ ची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्धारित तारखेपेक्षा दिर्घ कालावधी झाला असून आज तारखेपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबत कोणतेही पुरावे किंवा पत्र या कार्यालयास प्राप्त न झाल्यामुळे माहिती पुरविण्यात आली नाही असे गृहित धरण्यात येते. तरी सदर माहिती त्वरीत उपलब्ध करुन द्यावी. करीता अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी हे आदेश प्राप्त होताच संपर्क साधावे व तसे या कार्यालयालाही सूचित करावे, असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती उपलब्ध झाली. मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मुद्या क्रमांक २ ची माहिती आमच्या कार्यालयात उपलब्ध आहे. परंतु संबंधीत प्रस्तुतकार हे माहिती उपलब्ध नाही असे त्यांनी लेखी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिलेले आहे. अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी श्री एस.बी. रघुवंशी, अव्वल कारकून(अकृषक), श्री एस.के.पांडे, प्रस्तुतकार, श्री रणवीर, दासगांव यांचेकडे पत्राने माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले होते. परंतु श्री एस.के. पांडे यांनी अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या मुद्या क्रमांक २ ची माहिती या शाखेशी संबंधीत नाही असे कळविलेले आहे. श्री एस.बी. रघुवंशी यांनी उपलब्ध माहिती अर्जदारास डिसेंबर, २००९ रोजी प्रत्यक्षात दिली आहे. परंतु व्यस्त कामामुळे पावती घेण्याचे राहून गेले असे माहिती अधिकारी यांनी लेखी दिलेले दिसून येते. तसेच अव्वल कारकून(अकृषक) गोंदिया यांनी सुध्दा उपविभागीय अधिकारी यांना खुलासा केलेला दिसून येतो. श्री एस.बी. रघुवंशी यांनी पुन्हा दिनांक २७.१०.२००९ रोजी खुलासा केलेला दिसून येतो. श्री व्ही.आर.पुड, यांनी दिनांक १०.१२.२००९ रोजी शोध घेतला असता प्रकरण उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिनांक ४.१२.२००९ रोजी सर्वांना पत्र दिले होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पुन्हा सांगितले की, संबंधीत प्रस्तुतकार हे माहिती उपलब्ध असून सुध्दा ती उपलब्ध नाही असे लेखी देतात. परंतु ते त्यांचेविरुध्द कोणतीही कार्यवाही करु शकत नाही. ती कार्यवाही तहसिलदार यांनी करावयाची आहे.**

**यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही. परंतु त्यांनी अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्यास सहाय्य घेण्यास आदेश दिले होते. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही हे सिध्द होते. व त्यामुळे संबंधीत प्रस्तुतकार किंवा अव्वल कारकून (अकृषक) यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी होती. त्याकरीता त्यांना जन माहिती अधिकारी**

**समजण्यात येते व ते अधिनियमाचे कलम २०(१) व (२) प्रमाणे शास्तीस पात्र आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. आज संबंधीत प्रस्तुतकार आयोगापुढे हजर नसले तरी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पत्र दिलेले आहे व त्यांचे उत्तर सुध्दा माहिती उपलब्ध नाही असेच आहे. त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.८.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक २ ची माहिती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता यांच्‍ या दिनांक ६.८.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ९.९.२००९ रोजी श्री एस.बी. रघुवंशी, अव्वल कारकून(अकृषक), श्री एस.के. पांडे, प्रस्तुतकार, श्री व्ही.अे. गणवीर किंवा श्री व्ही.आर.पुड, दासगांव यांचे सहाय्य घेतले होते. त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येत नसल्यामुळे त्यांना प्रत्येकी रुपये १,०००/-(रुपये एक हजार फक्त)ची शास्ती लादण्यात येत आहे. तसेच त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची करवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही तहसिलदार गोंदिया यांनी करावयाची आहे. रुपये १०००/-(एक हजार फक्त)शास्ती वसुली संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनातून वसूल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".**या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२३/नाग/२०१०

१)श्री सुरेश वारलू जांभुळे,
मु.राळेगांव, पो. चारगांव बु.
ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर, ता.जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय प्रपत्रलिपिक सत्यप्रत विभाग, चंद्रपूर यांचेकडे, (१) म.औ.वि.कं.लि.(C.T.P.S.) यांची जेष्ठता यादी पाटबंधारे व महसुल यांच्या जेष्ठता यादीत समाविष्ट करण्यात आली आहे ते कोणते शासन परिपत्रकाचा आधारावर याची माहिती पुरविण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३१.७.२००९ रोजी म.रा.वि.म.ने.तयार केलेली जेष्ठता यादी शासन परिपत्रक दिनांक १३.९.२००० अन्वये यापुढे परस्पर नियुक्त्या न करता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची मागणी करावी असे स्पष्ट निर्देश असल्याने सदर कार्यवाही तत्कालीन मा. जिल्हाधिकारी यांनी चर्चेअंती दिनांक १७.१२.२००५ रोजी मान्यता दिली. त्यानुसार म.रा.वि.म.यांची यादी समाविष्ठ करण्यांत आली, अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून शासन परिपत्रकाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.१२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असली तरी अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती पुरविल्याचे अहवालावरुन दिसून येत नाही. त्यामुळे आदेश प्राप्त होताच ७ दिवसांचे आंत विना मुल्य तात्काळ माहिती पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, जे परिपत्रक उपलब्ध करुन दिलेले आहे त्यामध्ये सि.टी.पी.एस.च्या जेष्ठता यादीच्या संदर्भात कोणताही उल्लेख दिसून येत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या परिपत्रकांमध्ये स्पष्टपणे जिल्हाधिकारी यांनी प्रकल्पग्रस्त उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करताना प्रकल्पग्रस्तांनी सादर केलेल्या प्रथम अर्जाच्या दिनांकानुसार जेष्ठता ठरवावी व त्यासाठी एक नोंदणी रजिस्टर ठेवावे असे नमूद केलेले असल्यामुळे यादी नियमानुसार करण्यात आलेली आहे. व त्यामुळे त्यात सि.टी.पी.एस.च्या संदर्भात स्वतंत्रपणे कोणत्याही प्रकारचा उल्लेख दिसून येत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे सांगितले की, त्या परिपत्रकाप्रमाणे जिल्हयातील सर्व प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज केल्यानंतर त्या अर्जाप्रमाणे त्याची जेष्ठता यादी ठरविण्यात येते. अपीलकर्ता यांचे बंधूचे प्रकल्पग्रस्त यादीमध्ये नांव होते. वय राहीलेले नसल्यामुळे नांव बदलविण्यात आले व अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या बंधूची जेष्ठता त्यांना मिळावी. परंतु यासंदर्भात अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणताही निर्णय देता येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३६/नाग/२०१०

१)श्री अनिल गोपीचंद चांद,
ए-१, जीवन ज्योती कॅालनी, क्लार्क टाऊन, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर-४४०००४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१,
सदर नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रं.१,
सदर नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"(a) How many persons belonging to above category have been issued such validity certificate as "Bawa-Bairagi", "Bawa", "Bairagi" caste (NT-I) to Sindhi speaking persons belonging to Hindu Religion by the Department. (b) Name, Address and Date of issuing Caste Validity Certificates to persons belonging to such category. (c) In how many such cases, caste validity certificates are issued without insisting for submission of caste related pre-१९६१ documents."**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.५.२००९ रोजी समिती कार्यालयात येवून अभिलेख्यांचे निरीक्षण करावे. आवश्यक अभिलेखे आपणास निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी निरीक्षण घेतले व त्यातून पाच केसेस काढल्या व त्या पाच केसेसच्या संदर्भात कागदपत्रे मात्र त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी त्याकरीता दिनांक २७.५.२००९ रोजी श्री आर.एस.सूपारे यांना पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा त्याकरीता तीन कर्मचा-यांची समीती गठीत करुन उमेदवारांच्या कागदपत्रांचा शोध घेण्यास आदेश करण्यात आले. सदरच्या प्रकरणाचा शोध घेतला असता कार्यालय स्थानांतरणाचे वेळी शासकिय अपंगाची कर्मशाळा, नागपूर येथे रेकॅार्ड ठेवण्यात आलेला होता. त्या ठिकाणी शोध घेतला असता तेथील रेकॅार्ड उधळी/वाळवीने नष्ट केल्याने अत्यंत जीर्ण अवस्थेत आढळून आले व त्याचा भूसा झालेला असून शोध घेता येत नसल्याचा अहवाल सादर केलेला आहे. त्यापैकी काही रेकॅार्ड संस्थेचे चोखामेळा मुलांचे शासकिय वसतीगृह येथे ठेवण्यात आला होता. तेथे चौकशी केली असता तो इंदोरा येथे आणल्याचे सांगण्यात आले. त्याप्रमाणे चौकशी केल्यावर सन १९९८-९९ मधील पाच सेवाविषयक प्रकरणे प्राप्त झाली. आदेशित केल्याप्रमाणे उमेदवारांची प्रकरणे संस्थेला नाही व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती स्वहस्ते पुरविण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलामध्ये उपलब्ध रेकॅार्डचा पंचनामा १५ दिवसांचे आंत करण्यांत यावा व मागितलेली माहिती देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्याप्रमाणे पंचानामा करुन अभिलेखे हे अस्थाव्यस्त व जीर्ण अवस्थेत असून सर्व कागदपत्रांना उधळी लागल्याचे आढळून आलेले असून मजकुर वाचण्यायोग्य नाही. त्यानुसार सर्व कागदपत्रे पोत्यात भरुन ठेवण्याबाबात सांगण्यात आले व कार्यवाही दूपारी २.३० वाजेपर्यंत केली आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांस दिनांक २०.३.२०१० रोजी पत्रान्वये अवगत केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या पंचनामा अहवालाची माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपीलार्थी यांस माहिती देणे शक्य नाही असा खुलासा केलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्बितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांचे वकील श्री एल.एस. समुद्र यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, पंचनामा करताना अर्जदार यांना त्यात सामील करुन घेण्यात आले नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे किंवा नाही याबाबत अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांना पुन्हा अभिलेख्यांचे निरीक्षण देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना लेखी कळवून त्यादिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन त्यांना ज्या कागदपत्रांच्या संदर्भात पंचनामा केलेला होता त्या कागदपत्रांचे निरीक्षण द्यावे व त्यानंतर जर त्यांना कागदपत्रे आढळून आल्यास त्याच्या छायांकित प्रती काढणे शक्य असल्यास त्या अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३४/नाग/२०१०

१)श्री प्रभाकर शंकरराव चापले,
घोडे प्लॉट, काटोल, ता.काटोल, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
नागपूर पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
नागपूर मध्यम प्रकल्प विभाग, नागपूर
सिव्हील लाईन बंगला क्रं.१३, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, जाम नदी प्रकल्प कालवे उपविभाग, काटोल अंतर्गत झालेल्या बांधकामाविषयी माहिती सन १९९६ ते २००९ या कालावधीची मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.९.२००९ रोजी, आपण कळविलेले आहे की, उपविभाग जाम नदी प्रकल्प कालवे उपविभाग, काटोल यांनी दिनांक १०.८.२००१ अन्वये दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे. उपविभागाने दिलेल्या माहितीची शहानिशा करण्यास्तव आपण दिनांक १७.९.२००९ ला दुपारी ३.०० वाजता विभागीय कार्यालयास उपस्थित राहावे(संपूर्ण कागदपत्रांसह) आपण उपस्थित न झाल्यास आपल्याला माहितीची आवश्यकता नाही असे समजण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता हे चर्चेला उपस्थित झाले होते व त्यांना मागितलेली माहिती ही उपविभागीय अभियंता यांनी देण्यात यावी असे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक २३.१०.२००९ रोजी अर्ज दिलेला दिसून येतो व त्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.११.२००९ रोजी उपस्थित होण्यास कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अभियंता यांचेकडे पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ११.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २५.९.२००९ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पुन्हा चार मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३३/नाग/२०१०

१)श्री पँथर यशवंत बळीराम अंबागडे,
मु.पो.सिर्सी, ता.उमरेड, जिल्हा नागपूर-४४१२१४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, उमरेड. ता.उमरेड, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, उमरेड, ता.उमरेड, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. "(१) अर्जदाराने दिनांक २५.८.२००९ रोजी मा.खंड विकास अधिकारी, पंचायत समिती उमरेड यांचेकडे निवेदनाद्वारे ग्रामपंचायत सिर्सी विरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदाराचे निवेदनावर घेतलेल्या निर्णयासहित केलेल्या कार्यवाही व त्यासंबंधी विविध पत्रव्यवहार व इतर दस्तऐवजांच्या साक्षांकित सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी. (२) ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत सिर्सी यांनी मा.खंड विकास अधिकारी यांना त्यांचे पत्र क्रमांक ग्रा.प.का.सिर्सी/०२/०९ दिनांक १९.५.०९ रोजी म.ग्रा.रो.ह.यो. मजूरांना बेरोजगारी भत्ता मिळण्याबाबत पुढील कारवाहीचे पत्र तसेच पत्र क्रमांक ग्रा.पं.का.सिर्सी १७०/०९ दिनांक २३.६.०९ रोजी ग्राम पंचायत, सिर्सी येथे संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालय अनुदान वाटप करण्याकरीता मार्गदर्शन सूचना मिळण्याबाबतच्या पत्रावर निर्णाया सहित केलेली कार्यवाही, खुलासे, अहवाल व इतर दस्तऐवजांच्या साक्षांकित सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी."**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी, पंचायत समिती उमरेड यांनी श्री व्ही.पी. लोखंडे, विस्तार अधिकारी (पंचायत) यांना, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २८.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना गट विकास अधिकारी यांनी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यात गट शिक्षणाधिकारी यांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता गट विकास अधिकारी यांनी पत्र दिलेले होते व त्याप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी समीतीचे पुर्नगठन करुन अपीलकर्ता यांना दिनांक ७.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती ही उपलब्ध**

**झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती त्यांना विलंबाने उपलब्ध झाली. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केला की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यक्षेत्रात नव्हती व त्यामुळे त्यांनी श्री व्ही.पी. लोखंडे, विस्तार अधिकारी (पंचायत) तसेच गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती उमरेड व श्री गेडाम, क.ले.अ., पंचायत समिती उमरेड यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपूर्ण माहिती मिळाली या कारणासाठी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु श्री व्ही.पी. लोखंडे, विस्तार अधिकारी(पंचायत) यांचेकडून सदरची माहिती विलंबाने प्राप्त**

**झाली. त्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. गट शिक्षणाधिकारी यांचेकडील माहिती ही कार्यवाही करुन द्यावयाची असल्यामुळे विलंब लागणे साहजिकच आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली, त्याकरीता श्री व्ही.पी. लोखंडे, विस्तार अधिकारी, पंचायत समिती, उमरेड यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येते. दोषींविरुध्द जबाबदारी निश्चित करुन पुढील कार्यवाही करावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १३२/नाग/२०१०

१)श्री सोमय्याजी संकेपाकवार,
मु.पो.ता.एटापल्ली, जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, एटापल्ली, ता.एटापल्ली, जिल्हा गडचिरोली. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत एटापल्ली, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००९ रोजी ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत एटापल्ली यांचेकडे, इश्वर ढोके यांचे घरासमोर असलेल्या खुल्या सार्वजनिक जागेवर ग्रामपंचायतने पिण्याचे पाण्याची सोयीसाठी नळ दिला.सदर नळ काढून टाकण्यात येवून त्याजागी अतिक्रमण झाले. सदर अतिक्रमण तात्काळ काढून टाकणे. जागा मोकळी करुन तेथे पूर्ववत नळ किंवा कुपनलीका देऊन पाण्याची सोय करण्यात यावी. यासंबंधी ग्रामपंचायत ठरावाची प्रत सोबत जोडली आहे.(ग्रामसभेची), अशा स्वरुपाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.११.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे दिनांक १२.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली श्री ईश्वर ढोके यांचे घराजवळील सार्वजनिक नळ, एटापल्ली-डुमे रस्त्याचे रुंदीकरण करताना काढून टाकण्यात आला आहे. यावरुन ग्राम पंचायत सभेच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगीतल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २१५/नाग/२०१०

१)श्री भिवा मुखरु मोहुर्ले,
मु.पो.बरडकिन्ही, ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर. जि. चंद्रपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, ब्रम्हपुरी, ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०१० (४.३.२०१०)रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"माझे वडील नामे मुखरु सिताराम मोहुर्ले यांची वडीलोपार्जित मालकीची जागा मौजा बरडकिन्ही ता. ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर येथील गावठाण मधील शिट नं.३ न.भू.क्रं. ३५१ आहे. माझे वडील लहानपपणीच मरण पावले. वडीलांचे मृत्यू पश्चात मी व माझे लहान दोन भाऊ यांना घेवून माझी आई आमचे वडीलोपार्जीत घरातच राहत होती. तिथेच तिने आम्हाला लहानाचे मोठे केले. आमचे अज्ञानाचा व आईचे असहाय्यतेचा फायदा घेवून बळजबरीने शेजा-यांनी आमचे जागेवर अनधिकृत ताबा केला. त्यामुळे आमची आई व आम्ही अतिक्रमण करण्यास मनाई केली. शेजारी मानत नसल्यामुळे आम्हाला आमचे वडीलोपार्जित मालकीची जागा मोजणी करुन घेणे भाग पडले. मी स्वत: दिनांक १६.३.२००८ ला माझे वडीलोपार्जित मालकीची जागा मोजणी करुन घेण्याकरीता रितसर फी भरुन आपले कार्यालयात अर्ज सादर केला. दिनांक २२.५.२००८ ला आपले कार्यालयातील भूमापक श्री पगाडे यांनी पंचासमक्ष मोजणी केली. परंतु माझ ी वडीलोपार्जित मालकीची संपूर्ण जागा मोजणी करुन दिली नाही. सबब उपरोक्त विषयानुसार मला मौजा बरडकिन्ही येथील गांवठाण मधील शिट नं. ३ न.भू.क्रं.३५१ ची आखीव पत्रिका वडीलोपार्जित मालकी हक्काचे जागेचे संपूर्ण क्षेत्रफळासहीत देण्याची कृपा करावी."**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १४.१०.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.३.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.**

**परंतु तरीही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या वडीलोपार्जित संपूर्ण जागेची मोजणी करुन देण्यात आलेली नाही. त्यांनी स्वत: दिनांक १६.३.२००८ रोजी त्यांची वडीलोपार्जित जागा मोजणी करण्याकरीता फी भरुन अर्ज केला होता. मोजणी करण्याकरीता श्री पगाडे परिक्षण भूमापक येवून त्यांनी दिनांक २२.५.२००८ रोजी पंचासमक्ष मोजणी केली परंतु माझे वडीलोपार्जित जागेची मोजणी करुन हद्द कायम करुन दिली नाही. त्यामुळे मोजणी मान्य नाही. व त्यामुळे मौजा बरडकिन्ही येथील गावठाण मधील शिट नं.३ न.भू. ३५१ ची आखिव पत्रिका वडीलोपार्जित मालकी हक्काची संपूर्ण क्षेत्रफळासहित देण्याची कृपा करावी अशी मागणी केलेली दिसून येते. व त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या संपूर्ण वडीलोपार्जित घराची मोजणी करुन माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची मोजणी तालुका निरीक्षक यांचे कार्यालयाने करावयाची आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

**Ordermarch१०-Balki**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. १२१/नाग/२०१०

१)श्री संजय विठ्ठलराव सत्येकार,
डॉ.आंबेडकर चौक, जे.एन.रोड, कन्हान,
ता. पारशिवनी, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
पेंच प्रकल्प, वैनगंगा नगर, अजनी, नागपूर.
ता. जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,
पेंच प्रकल्प, टेकाडी, ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २३.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००९ रोजी माहिती अधिकारी (टेकाडी)यांचेकडे खालील- प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"आपल्या टेकाडी कार्यालयाचा कार्यक्षेत्राकडे सध्या पाणी वाटप सोसायटया किती आहे. त्यांचे नांव व पदाधिका-यांचे नांव तथा प्रत्येक सोसायटीचे सिंचन क्षेत्रफळ एकरमध्ये किती आहे. (२) शेतक-याला देण्यात येणारे पाणीचे मोजमाप कशा प्रकारे केले जाते या पाण्यामधून किती प्रतिशत पाणी नाल्या व नदीमध्ये असेच वाहून जाते याची माहिती दयावी. (३) सध्या आपल्या कार्यक्षेत्रात किती सोसायटयामध्ये नहराचे दुरुस्ती व बांधकामाचे कार्य सुरु आहे. ते कुठल्या ठेकेदार, कंपनी कडून केले जात आहे. त्यांचे नांव, पत्ता तसेच इस्टीमेटची प्रत व अनुमानीत खर्च किती व किती दिवसामध्ये ते काम पुर्ण करावयाचे आहे (४) ते काम करण्याकरीता या भागातील सोसायटीची एन.ओ.सी. किंवा ठरावाची आवश्यकता असते काय, असल्यास त्या काम सुरु असलेल्या सोसायटीचे एन.ओ.सी. किंवा ठरावाची पत्र देण्यात यावी (५) सोसायटी शिवाय दूसरे कोण कोणते नहर बांधण्याचे कार्य सुरु आहे. या कार्याची संपूर्ण माहिती अनुमानित खर्च ठेकेदाराची संपूर्ण माहिती अनुमानीत खर्च, ठेकेदाराची माहिती, इस्टीमेटची प्रत देण्यात यावी. (६) आपल्या कर्मचा-यांची माहिती व ते कुठल्या पदावर कार्यरत आहे व किती वर्षापासून इथे कार्यरत आहे." माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ७.११.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या खर्चाची रक्कम रुपये १.२५ लक्ष कळविण्यात आली. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे. व त्यातून अनावश्यक कागदपत्रे सुध्दा द्यावी लागतील. त्याकरीता अपीलकर्ता यांनी माहितीचे निरीक्षण करुन आवश्यक असलेल्या बंधा-याचे संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील. व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांना कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन संबंधीत आवश्यक असलेल्या माहितीचे निरीक्षण करावे व त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या व पोच द्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २११/नाग/२०१०

१)श्री जी.एस. ठाकुर,
नझुल प्लॉट क्रमांक १४, जनता चौक, पप्पु मेडीकल स्टोअर्स जवळ,
जरीपटका, नागपूर-४४००१४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रवर्तन अधीक्षक,
प्रवर्तन विभाग, महानगर पालिका, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
मंगळवारी झोन क्रमांक १०, महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १२.६.२००९ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.**

**"Removal of total encroachment from cons.lane ४५०' x १०' starting from main ६०'.०" Janta Chowk Road upto ४०' wide Bhojsingh Chowersia Chowk, Jaripataka. This should be open to sky ४५०'.०" long & १०'.०" wide. Information required within २ days as per the action has already started. Shri P.A. Sarpate, Jr.Engineer (p.w.d.) W.no.१७, १८ & १९ since past २-३ days."**

**अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २.४.२००९ ला प्रवर्तन विभागाकडे पाठविला होता. व दिनांक २.६.२००९ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही अतिक्रमण काढण्यात आले नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केल्याचे दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अतिक्रमण काढण्याची नस्ती दिनांक २.४.२००९ ला प्रवर्तन विभागाकडे पाठविली व त्यानंतर दिनांक ९.४.२००९ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिलेले आहे. व या प्रकरणात प्रवर्तन अधिकारी हे माहिती अधिकारी असल्यामुळे अर्जदाराने विभागाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यास्तव मुळ अर्ज प्रवर्तन विभागाकडे पाठविण्यास्तव आदेश झालेले आहे व तसे दिनांक १०.७.२००९ ला अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते. मुळात माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन मागता येत नाही. परंतु प्रवर्तन विभागाकडे नस्ती पाठविली असल्यामुळे प्रवर्तन विभागाने सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रवर्तन विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.६.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ९५/नाग/२०१०

१) सौ.माधुरी कृष्णा साकुळकर,
४४, सुर्वे ले-आऊट, संजुबा हायस्कुलच्या मागे,
रघुजीनगर, नागपूर-४४००२४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा, ता.जिल्हा वर्धा. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
समुद्रपूर, ता.समुद्रपूर, जिल्हा वर्धा. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ६.२.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे, दिनांक ७.७.२००९ रोजी केलेल्या तक्रारीची सद्यस्थितीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.९.२००९ रोजी, अर्ज नामंजूर करण्यात येत आहे असे उत्तर देण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील कार्यालयात प्राप्त**
**झाले नाही या कारणास्तव प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी अर्जाचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भात अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांच्या तक्रार अर्जावर कोणत्या प्रकारची कार्यवाही झाली किंवा नाही याबाबत त्यांना काहीही कळविले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या तक्रार अर्जावर चौकशी पूर्ण झालेली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु दिनांक १६.९.२००९ चे उत्तर पाहाता उलट असे दिसून येते की, उत्तर देताना कोणत्याही प्रकारे सर्वसाधारण बुध्दी वापरलेली दिसून येत नाही. प्रश्नार्थक चिन्ह दिसले की, दोन ओळीत उत्तर खरडायचे अशा पध्दतीने माहिती अधिकारी यांनी सहया केलेल्या दिसतात. कार्यवाही काय झाली याचा अर्थ असा की, त्या तक्रार अर्जाचे संदर्भात सोप्या भाषेत पांढ-या कागदावर काळे काय केलेले आहे त्याची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे असा होतो. चौकशी झाली असल्यास व ती कागदावर उतरविली असल्यास व निर्णय कागदावर दिलेला असल्यास त्याची छायांकित प्रत देणे. केवळ प्रश्न चिन्ह पाहून अर्ज फेटाळून लावणे हे बुध्दी न वापरण्याचे लक्षण आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती अर्थातच माहिती न देण्याबरोबर आहे व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलात सुध्दा मात्र अपील हे प्राप्त झाले नाही असे म्हटलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातच अपील दाखल केले होते. उपविभागीय अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी असतील तर त्यांचेकडे ते हस्तांतर करणे आवश्यक होते. परंतु त्याहीबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही काळजी घेतलेली दिसून येत नाही व त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात अधिनियमाच्या तरतुदीबाबत आनंदी आनंद आहे, असे दिसून येते. व त्यामुळे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रार अर्जाचे संदर्भात काय कार्यवाही झाली किंवा काय कार्यवाही सुरु आहे याबाबत तारीखवार माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी पाठविलेल्या अर्जामध्ये आकलन करुन घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी या कारणास्तव त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस केल्याशिवाय पुढील अर्जाच्याबाबत न्याय मिळणार नाही असे दिसून येते व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.**

**३) सदरच्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे स्वतंत्रपणे, पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. २०१/नाग/२०१०

१)श्री सुनिल महादेवराव पाटील
वांढरे ले आऊट, वरोरा, नागपूर चंद्रपूर हायवे,
ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद वरोरा, ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,
नगर परिषद वरोरा, ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २३.३.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ४.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.३.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. अपीलाची सुनावणी घेण्यात आली.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद, वरोरा यांचेकडे सन २००८-०९ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.**

**"२००८ ते २००९ मध्ये वांढरे लेआऊट मोकाशी लेआऊट मध्ये रस्ता बांधकाम, नाले खोदाई इस्टीमेट मधील दिलेले साहित्य, त्यांची उंचाई, रुंदी व प्रत्यक्षात झालेल्या कामाचे मोजमाप, साहित्याची एकुण क्वांटीटी इत्यादी बाबतची माहिती."**

**३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ९.१२.२००९ रोजी वांढरे लेआऊटची दोन मुद्यांमध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे एक छायांकित प्रत दाखल केली व त्यामध्ये राजीव गांधी वार्डच्या संदर्भात तुकाराम बोवा लेआऊट च्या संदर्भात पहिल्या मागणीप्रमाणे माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तुकाराम बोवा लेआऊटच्या संदर्भात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली होती परंतु त्यांनी पुन्हा माहिती मागितली, त्यामुळे पुन्हा तशीच माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्या सर्व प्रती आयोगापुढे सादर केल्या व त्यामध्ये सर्व माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे दिसून येत असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं.२२४/२००९

१) श्री सुभाष बाबुरावजी विखार,
मु.पो.कुर्झा, ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा संचालक,
शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्था,
देसाईगंज वडसा(हेटी), जिल्हा गडचिरोली. — गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा संचालक,
मागासवर्गीय सुशिक्षित बेकार एज्युकेशन सोसायटी,
ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. — गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ७१३/२००८ व अपील क्रमांक ७१४/२००८ मधील आदेश पारित दिनांक १६.५.२००९ मधील आदेश क्रमांक १ प्रमाणे निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दिनांक ३.९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व ती अपूर्ण उपलब्ध करुन दिली. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी. तसेच संपूर्ण माहिती मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द सदरच्या निर्णयातील आदेश क्रमांक २ प्रमाणे माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही याकरीता रुपये २५,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा विचारण्यात आलेला होता. व त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.९.२००९ रोजी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच दिनांक २५.३.२०१० च्या खुलाशाप्रमाणे लावलेली शास्तीची रक्कम माफ करण्यात यावी अशी विनंती केली आहे. दोनही खुलासा खालीलप्रमाणे आहे.**

**"वरीलविषयी विनंती याप्रमाणे आहे की, अपीलार्थी सुभाष बाबुरावजी विखार मु.पो.कुर्झा, ता.ब्रम्हपूरी जि.चंद्रपूर हे आमच्या शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्थान, देसाईगंज (वडसा), जिल्हा गडचिरोली द्वारा संचालीत अनुसूचित जातीची आश्रमशाळा, कुरुड ता. वडसा जिल्हा गडचिरोली येथे सन २००३ पासून लिपिक या पदावर कार्यरत होते. सुरुवातीपासूनच अपीलार्थी हे शाळेत वेळेवर न येणे मुख्याध्यापकाला न विचारता कधीही शाळेतून घरी जाणे, इतर कर्मचा-यांना उलट सुलट चढवा चढवी करणे, काळजीवाहक कर्मचा-यांना कामे करण्यास रोखणे, १-१, २-२ महिने गैरहजर राहणे इत्यादी वाईट कामे करीत होते. अपीलार्थी स्वभावाने एकंदर उद्दट व तेडया स्वभावाचे व वाईट वर्तणुकीचे व्यक्तीमत्व आहेत. त्यातच त्यांची वर्तणुक वाईट वृत्तीची सगळयांना आढळून आली. एकदा त्यांनी बाहेरील बाई घेवून ते करुड गावात त्यांच्या रुमवर आली. त्यांनी त्या बाईला घेवून शाळेत फिरवणे शाळेच्या बांधकाम चालु असलेल्या शाळेच्या आळ चोरी लपीने वावरणे इत्यादी गोष्टी कर्मचा-यांच्या लक्षात आल्या तसेच गावक-यांच्या लक्षात आल्या. गावक-यांनी त्याला मारझोड करणाचा प्लॅन रचला व वेळीच मला माहित झाले व तो प्रसंग होवू दिला नाही. एकंदर अपीलार्थी हे फारच वाईट वृत्तीचे व्यक्ती आहेत. जवळ जवळ दोन वर्षापुर्वी पासून त्यांनी शाळेत येणे बंद केले. ते आजतागायत शाळेत आलेले नाही. आता त्यांनी शाळा स्वत:हून सोडून दिली आहे. त्यामुळे शाळेचे कामकाज चालविण्यासाठी संस्थेने दूस-या लिपिकाची नियुक्ती केली.**

**वरील गोष्टीचा विचार करता अपीलार्थीने वाईट भावनेतून काहीतरी सूड घेण्याच्या भावनेतून संस्थेला बदनाम करण्याच्या भावनेतून संस्थेला व संचालकाला काहीतरी त्रास दयावा हया भावनेतून माहितीचा अधिकारा खाली दिनांक २५.६.२००८ रोजी माहिती मागीतली. परंतु त्यांचा वाईट स्वभाव पाहून संस्थेने त्याला माहिती दिली नाही. त्यांच्या ऐवजी दूस-या सज्जन व्यक्तीने माहिती मागितली असती तर आम्ही माहिती नक्कीच दिली असती. माहिती न दिल्याबाबत मी आयोगाची माफी मागतो.**

**वरील बाबीनुसार खुलासा देण्यात येते की, अपीलार्थी हयाचे संस्थेशी काहीही संबंध नाही. संस्थेअंतर्गत सदरची आश्रमशाळा गेल्या ६-७ वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर चालवित आहे. अशा स्थितीत संस्थेला काय अडचणी येत असतील हे आपणास कल्पना असेलच अशाप्रकारची अनुसूचित जातीची मुलांची मोफत सेवा करीत असतांनाही एखादयाने अशाप्रकारे वाईट भावनेतून संस्थेला त्रास दयावा ही बाब योग्य नाही. म्हणुनच आम्ही अपीलार्थीना माहिती दिली नाही याबद्दल माफी मागत आहे.**

**करीता आपणास विनंती आहे की, आपणास जर अपीलार्थीनी मागीतलेली माहिती आवश्यक असेल तर १५ दिवसांच्या आत आम्ही आयोगांना माहिती देण्यास तयार आहे. करता खुलासा सादर करण्यात येत आहे."**

**"वरील विषयी विनंती याप्रमाणे आहे की, अपीलार्थी सुभाष बाबुरावजी विखार मु.पो. कुर्झा, ता.ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर हयांनी मागितलेल्या माहितीनुसार अपीलार्थी हयांचा मागासवर्गीय सुशिक्षीत बेकार एज्युकेशन सोसायटी, ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर या संस्थेशी कोणताही संबंध नाही. तसेच अपीलार्थी हे स्वभावाने वाईट प्रवृत्तीचे व वाईट वर्तणुकीचे असल्याने**

तसेच त्यांचा हया संस्थेशी काहीही संबंध नसल्यामुळे आम्ही त्यांना माहितीचे अधिकाराखाली माहिती दिली नाही. याबद्दल आम्ही संस्था माफी मागतो.

अपीलार्थी यांनी वाईट भावनेतून, काहीतरी संस्थेला त्रास देण्याच्या भावनेतून माहितीच्या अधिकाराखाली दिनांक १५.६.२००८ रोजी माहिती मागितली. परंतु त्यांची वाईट वृत्ती पाहून त्यांना माहिती दिली नाही. त्यांच्या ऐवजी दुसरा सज्जन व्यक्तीने माहिती मागीतली असती तर आम्ही माहिती नक्कीच दिली असती. माहिती न दिल्याबद्दल मी आयोगाची माफी मागतो.

करीता आपणास विनंती आहे की, आपणास जर सदर माहिती आवश्यक असेल तर १५ दिवसात आम्ही आयोगांना सदर माहिती देण्यास तयार आहो. करीता खुलासा सादर करण्यात येत आहे."

"उपरोक्त संदर्भांकित विषयाच्या अनुषंगाने विनंती याप्रमाणे आहे की, श्री सुभाष बाबुरावजी विखार, मु. कुर्झा, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर यांनी दिनांक २५.६.२००८ च्या माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शांतीवन अपंग, निराधार व आदिवासी विकास शिक्षण संस्थान, देसाईगंज(वडसा) जिल्हा गडचिरोली व त्याच संस्थेद्वारा संचालीत आश्रमशाळा, कुरुड तसेच मागासवर्गीय सुशिक्षीत बेकार एज्युकेशन सोसायटी, ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर व संस्थेद्वारा संचालीत स्व. राजीव गांधी निवासी अपंग विद्यालय, देसाईगंज(वडसा) जिल्हा गडचिरोली येथील मागीतलेली माहिती पुर्णतः दिनांक ८.३.२०१० रोजी श्री सुभाष बाबुरावजी विखार यांना टपालाद्वारे सादर करण्यात आलेली असून टपालाची झेरॉक्स प्रत व माहिती पाठविल्याची दूसरी प्रत जोडण्यात आलेली आहे.

करीता महोदय आपले चरणी विनंती आहे की, झालेल्या चुका माफ करुन संस्थेची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे आपले पत्र क्रं.५३१५ दिनांक ३.११.२००९ रोजीच्या पत्रानुसार लावलेली शास्तीची रक्कम रुपये २५,०००/- माफ करण्यात यावी, ही विनंती."

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करताना असे सांगितले की, अपीलाच्या सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी हे हजर राहू शकत नाही व त्यामुळे अपीलाच्या संदर्भात त्यांचे म्हणणे आयोगापुढे आले नाही. व त्याकरीता त्यांनी वरप्रमाणे खुलासा सुध्दा केलेला आहे. व त्यामुळे आयोगाचा निर्णय हा एकतर्फी झालेला आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात आहे. व सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेला प्रमाणाबाहेर खर्च येणार आहे. असे असल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वेळीच कळविणे आवश्यक होते. परंतु ते तसे त्यांनी कळविलेले नाही. मात्र अपीलकर्ता यांच्या खुलाशावरुन अपीलकर्ता हे त्याच संस्थेमध्ये सन २००३ पासून लिपिक या पदावर कार्यरत होते. सुरुवातीपासून ते शाळेत वेळेवर न येणे, मुख्याध्यापकाला न विचारता घरी जाणे, इतर कर्मचा-यांना उलट सुलट चढविणे, गैरहजर राहाणे इ. वर्तणुकीचे होते. तसेच त्यांनी बाहेरील बाई..वगैरे जो खुलासा केलेला आहे यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती संस्थेस मागीतली आहे ती कोणत्याही व्यापक जन हिताच्या दृष्टीने नाही. पुर्वीचे वैर काढण्याच्या दृष्टीने माहिती मागितलेली दिसून येते. तक्रारदार यांना व्यापक जन हिताच्या बाबत विचारले असता त्यांनी असे सांगितले की, माहिती मागण्याचा अधिकार आहे व त्याप्रमाणे माहिती मिळाली पाहिजे असे आयोगास सांगितले. परंतु अधिनियमाच्या तरतुदी हया व्यापक जनहिताच्या दृष्टीने माहिती प्रकट करण्याच्या बाजूने आहेत. वैयक्तिक स्वार्थाकरीता अधिनियमाचा वापर करणे हे गैर आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा खुलासा समाधानकारक असल्यामुळे रुपये २५,०००/-ची शास्ती लादण्याची आवश्यकता नाही. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आयोगानी माहिती उपलब्ध करुन द्यावी हा निर्णय दिलेला असल्यामुळे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे योग्य राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

<u>आदेश</u>

१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य टपालाने उपलब्ध करुन द्यावी. परंतु तक्रारदार यांना टपाल खर्च कळविण्यात यावा व तक्रारदार यांनी टपाल खर्चाचा भरणा केल्यावर सदरची माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जन माहिती अधिकारी यांचा खुलासा समाधानकारक असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/- ची शास्ती लादण्याची आवश्यकता नाही.

३) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं.३६/२०१०

१) श्री शरद बळीरामजी ढगे,
नवीन शुक्रवारी फवारा चौक,
हनुमान मंदीरा समोर, नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक ,
भूमि अभिलेख कार्यालय, सिव्हील लाईन्स,
नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २५.३.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक २५.३.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत. तक्रारीची सुनावणी घेण्यात आली.**

**२. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. तो दिनांक ४.१.२०१० रोजी दाखल करण्यात आला आहे. सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, जी माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती चुकीची व दिशाभुल करणारी आहे. व त्याकरीता मोका चौकशी करणे आवश्यक आहे. त्यामुळे अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी त्यांचेच कार्यालयाच्या अधिका-यांमार्फत मोका चौकशी करणे संयुक्तिक राहील. त्याकरता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अधिनियमाचे कलम १८(१) प्रमाणे तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील न.भू.क्रं. २१२/१, २१२/२, २१२/३ व ४४४ चे दरम्यानच्या खुल्या जागेच्या संदर्भात मोजणी करुन मोका चौकशी करावी व त्याबाबतचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. /

१) तक्रारकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक ४.३.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक /२०० च्या दिनांक च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक .२.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक .१.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक .२.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलांची सुनावणी दिनांक .२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

<u>आदेश</u>

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

**जावक क्रं. दिनांक**